# संशोधन-धारा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 2028.
१६६

REFBK-0015912

पां. ना. कुलकर्णी

68620
११३५१
2024

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलगत
अनुक्रम 68620 वि: निबंध
स्थलांक 2024 नोंद दि. ११।३।६१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

# संशोधन-धारा

प्रा. पां. ना. कुलकर्णी, एम्. ए.,
राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर

दा. क्र. १५९१२

मूल्य रु. ४·००

REFBK-0015912

व्हीनस प्रकाशन : पुणे

पहिली आवृत्ती : जुलै १९६७

◆ ◆

© सौ. मंदाकिनी पां. कुलकर्णी

◆ ◆

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
'तपश्चर्या'
व्हीनस प्रकाशन
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी 'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ' याजकडून अकराशे पंचवीस रुपयांचे अनुदान मिळाले आहे.

◆ ◆

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ : पुणे २

माझ्या आईवडिलांच्या –

लक्ष्मीनारायणांच्या –

पवित्र स्मृतीस

# प्रास्ताविक

प्राचीन मराठी कवी आणि काव्य यांविषयीच्या माझ्या आठ संशोधनपर लेखांचा हा संग्रह सादर करिताना अतिशय आनंद होत आहे.

संशोधक हा सत्यपूजक असला तरी मतभेद निर्माण होतात, व्हावेत. तथापि सत्याचा साक्षात्कार आपल्यालाच झाला आहे असा अभिनिवेश निर्माण झाला की संशोधनात 'मी' अवतरतो. पण खरे म्हणजे संशोधनात 'मी'ला महत्त्व नाही. म्हणून मलाही महत्त्व नाही.

बुद्धया काही नवे मांडण्याचा येथे प्रयत्न नाही. संशोधनात शोधाशोधी-इतकीच संशुद्धीला प्रतिष्ठा असते. संशुद्धीने मतभिन्नता कमी व्हावी म्हणून हे लेखन. माहितीचे विखुरलेले कण एकत्र आणून त्यांतून काही विचाराकृती निर्माण करण्याची इच्छा येथे प्रबळ आहे. या संग्रहात स्वतःच्या विचारांच्या प्रस्थापनाचा आणि परमतांच्या खंडनाचा भाग जरूर आहे, पण समर्थन करण्याचा प्रसंग आलेला नाही असे वाटते.

संशोधनात संप्रदाय नसावेत तशीच संशोधकाला नातीही नसावीत. माझे पूज्य गुरुवर्य कै. प्रा. द. सी. पंगू आणि माझे एक आवडते विद्यार्थिमित्र डॉ. पंडित आवळीकर यांच्या संशोधनातील टीका, जवळिकीमुळेच की काय कठोर उतरली. ती तशी न उतरती तर बरे होते. असो.

असल्या स्फुट लेखनात अभ्यासाच्या कक्षा प्रबंधलेखनापेक्षा अधिक दूरवर जातात. जाणवलेले सत्य जास्तीत जास्त साधार व शुद्ध स्वरूपात मांडण्याचे धोरण सर्वत्र संभाळलेले आहे. अंगोपांगे धुंडाळण्याच्या नादात लेखनाचा वेग मंदावल्याची बोचणी अनेकदा लागत असे, पण उपाय नव्हता. तथापि, संपादनाच्या नि लेखनाच्या काही योजना मनाशी बाळगून आहे.

अनेक सज्जनांनी आपल्याजवळची हस्तलिखिते देऊन मला कायमचे उपकृत केले आहे.

ज्या संपादकांनी या लेखांना प्रथम प्रसिद्धी दिली त्यांचा मी आभारी आहे.

'संशोधन-धारे'च्या प्रकाशनास 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळा'कडून ११२५ रुपयांचे अनुदान मिळाल्यामुळेच हा संग्रह प्रसिद्ध होत आहे. आर्थिक साह्याच्या रूपाने मला दिलेल्या उत्तेजनाबद्दल मंडळाचा मी ऋणी आहे.

माझे स्नेही श्री. स. कृ. पाध्ये यांनी व्हीनस प्रकाशन म्हणून हा ग्रंथ प्रकाशित करण्याचे मनावर घेऊन व्यावहारिक कटकटींतून मला मुक्त केले. 'स्नेही' हा शब्द आभार-प्रदर्शनास आक्षेप घेतो आहे.

'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळा'च्या ऋणाची आणि श्री. स. कृ. पाध्ये यांच्या प्रेमाची वृद्धी व्हावी ही अपेक्षा.

पुण्याच्या 'सुलभ मुद्रणालया'ने छपाईचे काम सुबक आणि शुद्ध केल्याबद्दल त्यास धन्यवाद.

कोल्हापूर,
श्रीएकनाथषष्ठी
२१ मार्च १९६६

पां. ना. कुलकर्णी

## अनुक्रमणिका


| लेख | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. विठ्ठल बीडकराचे 'सीतास्वयंवर' आणि मराठी काव्यांतील त्याची उसनवारी | ... | १ |
| २. मुक्तेश्वरचरित्राविषयी पुनर्विचार | ... | ३२ |
| ३. नामा पाठकाचे अश्वमेधपर्व | ... | ६२ |
| ४. भावार्थरामायणाचे तिसरे उत्तरकांड | ... | ७८ |
| ५. मनाचे चरित्र | ... | ९९ |
| ६. 'शान्त' गुरुपरंपरा | ... | १३१ |
| ७. शान्तलिंगाप्पा आणि विवेकचिंतामणी | ... | १४४ |
| ८. मुक्तेश्वराचे विराटपर्व | ... | १६३ |
| व्यक्तिनाम सूची | ... | १८९ |
| शुद्धिपत्र | ... | १९६ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वीकार
अनुक्रम 78520
95912

# विठ्ठल बीडकराचे 'सीतास्वयंवर' आणि मराठी काव्यांतील त्याची उसनवारी

**प्रतिभाशून्य विठ्ठल**— विठ्ठल बीडकर हा चमत्कृतींच्या मागे लागणारा एक सामान्य कवी आहे. तो बहुश्रुत आणि प्रयत्नशील आहे. निरनिराळ्या ठिकाणांहून तो आपल्या काव्याची सामग्री जमवितो. आरंभी आरंभी शब्दालंकारांवर त्याची भारी भिस्त आढळते; पण शके १५९६त रचिलेल्या 'रुक्मिणी-स्वयंवरा'पेक्षा शके १५९९ त रचिलेल्या 'सीता-स्वयंवरा'त त्याचा हा हव्यास पुष्कळच कमी झालेला आहे. त्यामुळे सीतास्वयंवरातील भाषेत अधिक सुगमता आणि प्रवाहित्व आलेले आहेत. पण एकंदरीत त्याच्या काव्यांत भावनात्मकतेचा अभाव दिसतो. त्याची व्यक्तिचित्रे निर्जीव वाटतात. अशा प्रकारच्या पौराणिक काव्यांत पुराणान्तरी आलेल्या व्यक्तीच येत असल्याने कवीच्या व्यक्तिचित्रणकौशल्याकडे रसिकांचे जावे तितके लक्ष जात नाही. विठ्ठलाच्या काव्यांवरून त्या त्या व्यक्तींची स्वभावचित्रे रेखाटल्यास ती तुलनेने मिळमिळीत आणि निष्प्रभ ठरतील. सीतास्वयंवरातील रावण काहीसा उठावदार वाटतो; पण तो विठ्ठलाचा गुण नसून मुळात ती व्यक्तीच प्रभावी आहे. विठ्ठलाच्या नगरवर्णनांत, स्थलवर्णनांत वा निसर्गवर्णनांत सूक्ष्मता, संपन्नता व स्वतंत्रता हे गुण आढळत नाहीत. पुराणांतील कथानकातसुद्धा नवीन प्रसंग कल्पून त्यांचे मुळातील प्रसंगांशी औचित्यपूर्ण एकजीवित्व दर्शविणे वा मुळच्या प्रसंगांत फेरफार करणे यामधूनही कवीच्या प्रतिभेची साक्ष पटत असते. पण जेव्हा विठ्ठलाच्या काव्यांतील प्रसंगांची आपण कसून तपासणी करू लागतो तेव्हा आपल्यास विठ्ठलाचे प्रतिभाशालित्व सिद्ध करता येईल असे एकही स्थळ आढळत नाही.

**विठ्ठलाने केलेला ऋणनिर्देश**—विठ्ठलाने आपल्या सीतास्वयंवर काव्याला आधारभूत आणि साह्यभूत असलेल्या काही संस्कृत ग्रंथांचे निर्देश प्रामाणिकपणाने ठिकठिकाणी पुढीलप्रमाणे केले आहेत—

(१) " टिका मूळोत्धारें, प्रथम धरिली संस्कृत कथा " (सर्ग १-१०)

(२) " वाल्मीकिची प्रगट संस्कृत गोड वाचा,
सीतास्वयंवर कथा उलथा तयाचा " (सर्ग २–५८)

(३) " कांही 'श्रीहनुमंतनाटककथा' कांही 'रघूवंशि'ची ।
कांही आदिकविप्रमेयरचना, कांही गिरा देशिची " (स. ३–१)

(४) " वाल्मीकोदित बाळकांड इतुकें रामायणीं वाचिलें " (स. ७–४५)

यांवरून वाल्मीकिरामायणातील बालकांड, कालिदासाचा रघुवंश, आणि 'श्रीमद्धनुमन्नाटक[१]' या संस्कृत ग्रंथांचा उपयोग केल्याचे तो मान्य करतो असे दिसून येते. सीतास्वयंवरप्रसंगावर त्याला काव्यरचना करावयाची असल्याने या सर्व ग्रंथांतील काही भागांचाच त्याने अनुवाद केला आहे. वाल्मीकिरामायणाच्या बालकांडातील १८ ते २२, २६ ते ३१, ३८ ते ४४, ४८ ते ५०, आणि ६६ ते ७७ अशा तेहतीस सर्गांचा आधार त्याने घेतला आहे. रघुवंशाचा उपयोग फक्त स्वयंवरप्रसंगी असल्याने सहाव्या सर्गाचा काही व इतर भागाचा क्वचित त्याच्यावर परिणाम झालेला दिसतो. हनुमन्नाटकातील मुख्यतः पहिल्या अंकातील (रामाने केलेला धनुर्भंग, राम–परशराम संवाद इ.) व इतरत्र क्वचित इतर काही अंकांतील श्लोकांची भाषान्तरे विठ्ठलात आढळतात.

पण या तीनही ग्रंथांत न आढळणारे काही प्रसंग व कल्पना त्याने अन्य संस्कृत व मराठी ग्रंथांतून घेतल्या आहेत. आनंदरामायणातील वा अध्यात्मरामायणातील काही भागाचा (राम-गुह्यक-संवाद) त्याने स्वतंत्र-रीत्या केलेला अनुवाद (सर्ग ३–१८) पाहून रामायणविषयक इतरही

---

१. 'ह्या अनामिक व अनेककर्तृक नाटकाला एक कर्ता नसल्याने त्याचा लेखक म्हणून रामभक्त हनुमंताचे नाव मोठ्या कल्पकतेने तेथे घालण्यात आले आहे.'
—डॉ. के. ना. वाटवे, 'प्राचीन मराठी पंडिती काव्य', पृ. ६९.

काही संस्कृत ग्रंथ त्याने पाहिले असावेत असा तर्क करता येतो. ( कदाचित हा भाग एखाद्या कीर्तनातही त्याने ऐकलेला असेल. )

**या लेखाचे प्रतिपाद्य**— आपल्या लेखनाला ‘ कांही गिरा देशिंची ’ साह्यभूत झाल्याचे विठ्ठलाने मोघम विधान केले आहे. मराठी काव्यग्रंथांचा वा कवींचा स्पष्ट उल्लेख त्याने कोठेच केलेला नाही; आणि म्हणूनच त्यानं घातलेल्या या ‘ कूटा ’चा उलगडा करण्याचा प्रयत्न मी यथाशक्ती करणार आहे.

विठ्ठलावर एकनाथ व नागेश यांचा परिणाम झाला असावा असे कै. गुरुवर्य प्रा. पंगूंचे[1] मत आहे. मात्र एकनाथांच्या ‘ रुक्मिणी-स्वयंवरा ’-व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही ग्रंथाचा उल्लेख ते करीत नाहीत. पण ‘ सीतास्वयंवर ’ लिहिताना विठ्ठलापुढे नाथांचे रुक्मिणीस्वयंवर नसून त्यांचा भावार्थरामायण ( त्यातील मुख्यतः बालकांड ) हा ग्रंथ होता असे माझे मत आहे, आणि ज्यांनी भावार्थरामायण पाहिले असेल त्यांचेही मत माझ्याप्रमाणेच पडेल. ( खुद्द प्रा. पंगूंनीही हे नंतर मान्य केले होते. ) भावार्थरामायण व विठ्ठलकृत सीतास्वयंवर यांच्यांतील साम्य इतके स्पष्ट असताना एकाही टीकाकाराने नाथांच्या सदर काव्यग्रंथाचा निर्देश करू नये याचे आश्चर्य वाटते.

एकनाथांप्रमाणेच विठ्ठलावर मुक्तेश्वराचा परिणाम झाला आहे, हीही गोष्ट आतापर्यंत स्पष्टतेने मांडली गेलेली नाही. ती मांडण्याचाही माझा उद्देश आहे.

मात्र विठ्ठलावर नागेशाचा मुळीच परिणाम झालेला नाही असे निश्चित विधान करावे असे वाटते. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास अशा श्रेष्ठ विभूतीच दुसऱ्यांवर प्रभाव पाडू शकतात आणि त्यांना प्रोत्साहक ठरतात. मुक्तेश्वर, मोरोपंत यांच्यासारख्या शैलीकार आणि वाङ्मय प्रान्तात पराक्रम करणाऱ्या व्यक्तीही प्रभावी ठरू शकतात. इतरांवर परिणाम करण्याइतके जोरदार व्यक्तित्व वा कवित्व नागेशात मुळीच आढळत नाही. विठ्ठलाप्रमाणे बऱ्याच अंशाने त्याचीही अन्य वाङ्मयमल्लांवर भिस्त आहे.

१. विठ्ठल बीडकरकृत ‘ सीतास्वयंवर ’— संपादक : प्रा. द. सी. पंगु.

शिवाय नागेश-विठ्ठलांच्या काव्यांची तुलना आणि त्यांच्या सीतास्वयंवर-रचनांचे काल, दोन्हीही नागेशाचा विठ्ठलावर परिणाम झालेला आहे या विधानास पुष्टी देत नाहीत.

माझी ही विधाने आता थोड्या विस्ताराने मांडतो.

## ( १ ) एकनाथांचा विठ्ठलावरील पगडा

**सीतेच्या पूर्वावताराची व जन्माची कथा**— विठ्ठलाने दिलेली ही कथा वाल्मीकिरामायणात नाही. पण एकनाथांनी बालकांड अ. १५ ओव्या ७४ ते १४० येथे ती दिली आहे. "सीतेचें जन्मलक्षण । यासि मूळ स्कंदपुराण । काळिकाखंडीं हें निरूपण । समूळ संपूर्ण लिहिलेंसे ।।१४०।। " असा त्यांनी आधारही दिला आहे. विठ्ठलाने स्कंदपुराण, आनंदरामायण या संस्कृत ग्रंथांचा उल्लेख केला नसल्याने ही कथा सांगताना एकनाथांचा आधार घेतला असावा. पण त्याने 'वेदवती' (सर्ग १-१२, ७-१) हे नाव वापरून घोटाळा केला आहे. नाथांनी आपल्या कथेत 'वेदवती' हे नाव कोठेही वापरलेले नाही. प्राचीन चरित्रकोशात 'सीता-२' व 'वेदवती' या दोन नावांवर आढळणाऱ्या चरित्रांवरून 'मातुलिंगी' व 'वेदवती' या दोन भिन्न व्यक्ती दिसतात. विठ्ठलाने मात्र या दोनही नावांचा एकाच व्यक्तीसाठी उपयोग केल्याने टीकाकारांना पंचाईत पडली. 'काव्य-संग्रह'कार निदान 'ही जन्मकथा कदाचित अद्भुतरामायणात असेल' असे लिहून स्वतःची सोडवणूक करून ठेवतात. पण प्रा. पंगू मात्र विठ्ठलाची कथा व वेदवतीचा वृत्तान्त 'यांत थोडा फरक आहे' एवढेच म्हणतात. वेदवती हे नाव वापरण्यात विठ्ठलाची झालेली चूक दोघांच्याही लक्षात आली नाही. विठ्ठलाने कथा दिली आहे ती मातुलिंगी, अग्निगर्भा, रत्नावती, धरणीजा, जानकी, पद्मा या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या सीतेची व तिच्या मातुलिंगी या पूर्वावताराची; वेदवतीची नव्हे. नाथांनी पद्मावती, जनकात्मजा, धरणिजा, सीता ( अ. १५ ) ही नावे दिली आहेत. वेदवती हे नाव वगळल्यास विठ्ठल पुढील नावे वापरतो- मातुळंगी ( १-११ ), रत्नज्योति ( १-२३ ), पद्मा, धरानंदिनी, सीता, मिथुळाधिराजतनया ( ७-१ ).

**शुभशकुनांचे वर्णन—**

“ कांताशिरीं सजळ कुंभ शुभप्रयाणं।
होती पुढे शकुन वायस सव्यपाणी ।
जाती मयूर नकुळादि कुरंग मार्गे
तैसेचि तास हरिणीगण वामभागें ॥ ” ( २–१२ )

यातील ‘ तास ’ शब्दावर टीप देताना प्रा. पंगूंनी ‘ सव्य जाती वायस । अपसव्य जाती तास ’ हा महाराष्ट्र शब्दकोशातून उतारा घेतला, पण त्यापुढील ‘ भा. रा. बाल. १२. २४ ’ हा संदर्भ दिला नाही. तो त्यांनी लक्षात घेतला असता तर सामराजाच्या रुक्मिणीहरणातील उतारा ( टीपा, पृ. २४ ) देण्याऐवजी भावार्थ–रामायणाच्या बालकांडातील पुढील उतारा त्यांनी दिला असता:—

‘ श्रीरामासीं करितां प्रयाण । स्वयें दशरथ पाहे शकुन । दोघे द्विज प्रसन्नवदन । फळेंसीं पूर्ण भेटले ॥ २१ ॥ पूर्ण फळेंसीं सालंकृता । पुढें भेटल्या पंचयोषिता । दधि क्षीर नवनीत माथां । गोपवनिता भेटल्या ॥ २२ ॥ अपूप अमृतफळ घागरी । दध्योदनेंसीं वायन करीं । कडे कुमर हातीं नोवरी । पुढें नारी भेटली ॥ २३ ॥ सव्य जाती वायस । अपसव्य जाती तास । सन्मुख भेटला राजहंस । मुक्ताफळांचा घोंस मुखीं धरूनी ॥ २४ ॥ दक्षिणे जाती मृग कृष्णवर्ण । वामांगगामी मृगी पूर्ण । भारद्वाजाचें वाम उड्डान । नकुळही आपण वामांगीं सरके ॥ २५ ॥ अ. १२ ॥ ”

**अहिल्योद्धाराची कथा—**एकनाथ व विठ्ठल यांनी लिहिलेल्या या कथेत अनेक साम्यस्थळे आहेत. ती सारी देत नाही. त्यांतील एकाच साम्यस्थळाविषयी थोडा विस्तार करतो. इंद्र व अहल्या यांना शापिल्यानंतर गौतमाला पश्चात्ताप होतो, आणि नाथ व विठ्ठल ( सर्ग २, श्लोक ४१ ते ४६ ) दोघेही विचित्र अन् घातकी तत्त्वज्ञान गौतमाच्या तोंडून वदवतात.

एकनाथ लिहितात, “ अहल्या इंद्रा अति प्रीती । सुखभोग भोगितां एकांतीं । तेव्हा कां मज नुपजे शांति । स्त्रीकामनावृत्ती नाडिलें क्रोधें ॥ ८८ ॥ रतिसंभोग एकांतवासीं । इंद्र असतां अहल्येपासीं । अनुद्वेगें त्यागोनी

त्यासी। मी कां तपासि न वचेंची ॥ ८९ ॥ सर्वांतरात्मा भोक्ता एक। ऐसा जाणता जो मी देख। त्या मज इंद्रसंभोगाचें दुःख। ज्ञानेंसीं विवेक गिळिला क्रोधें ॥ ९० ॥ अ. १४ ॥ बालकांड."

यानंतर नाथांनी स्त्रीलोभावर व क्रोधावर जो ताशेरा उडविला आहे तो पारमार्थिकांचा स्वभावधर्म म्हणून एक वेळ क्षम्य ठरेल, पण "'सर्वांतरात्मा भोक्ता एक' असे जाणणाऱ्या मला 'इंद्रसंभोगाचें दुःख' व्हायला नको होते." हे गौतमाचे बोलणे निषेधार्ह आहे. त्रिगुणातीत झालेल्यांना विधिनिषेधांची पर्वा नसते, अथवा ब्राह्मी स्थितीप्रत पोचलेल्यांना समाजशास्त्राचे, नीतिशास्त्राचे नियम लागू नसतात असे कदाचित माझ्या आक्षेपाच्या निराकरणार्थ उत्तर मिळेल. पण मी येथे मुख्यतः मानवस्वभावाच्या दृष्टीने विचार करतो. मी प्रथम जेव्हा विठ्ठलाच्या काव्यातील अशा प्रकारचा भाग वाचला तेव्हा मी त्याच्यावर अतिशय चिडलो. विठ्ठल हा काही परमार्थमार्गातील मुरब्बी नव्हे. तेव्हा त्याने केलेला हा अद्वैत तत्त्वज्ञानाचा उपयोग निंद्य आहे असे मला वाटले. पण पुढे हे विचार खुद्द विठ्ठलाचेच असतील काय या शंकेने मी बेचैन झालो. मग रामायणविषयक निरनिराळी आख्याने चाळत'ना मला एकनाथात वरील भाग आढळला. पण एकनाथ असले म्हणून काय झाले? हे जग, त्यातील व्यक्ती नि वस्तू या सर्वच जर खोट्या, त्यांनी केलेली पापे, त्यांचे क्रोधमोहादी विकार जर सारेच मिथ्या, तर मग गौतम खोटा, त्याचा पश्चात्ताप खोटा, त्याची तपश्चर्या खोटी आणि त्याचे परमार्थसाधनही खोटे नाही का?

शिवाय राम सीतास्वयंवरास निघाला असताना त्याला ही कथा ऐकविण्यात वाल्मीकीचा हेतू कोणता होता हा प्रश्नही विचारात घेण्यासारखा आहे. नाथांच्या गौतमाने विवेचिलेले आणि विठ्ठलाच्या गौतमाने फोडणी देऊन पुरस्कारिलेले हे तत्त्वज्ञान पाहून पुढे सीताप्राप्त्यर्थ एवढे प्रचंड हत्याकांड निर्माण करणारा राम वेडा ठरतो. एक वेळ लग्न केल्यामुळे आपल्यावर हा प्रसंग ओढवला म्हणून आपण स्त्रीलोभात पडलोच नसतो तर बरे झाले असते असा पश्चात्ताप गौतमास होता तर तो स्वाभाविक

ठरता. परंतु अद्वैत तत्त्वज्ञानाच्या आधाराने इंद्र व अहल्या एकच आहेत असे मांडलेले मत प्रस्तुत संदर्भात जगावेगळे आणि घृणास्पद नाही काय ? कृष्ण-रुक्मिणी आणि रामसीता यांच्या मीलनाच्या कथा आध्यात्मिक रूपकद्वारा सांगण्याच्या एकनाथी पद्धतीचा हा अतिरेकी परिपाक तर नसेल ना ?

विठ्ठलाने नाथांच्या या विवेचनाचा अनुवाद करून त्यात आणखी थोडी भरही ( सर्ग २ ) घातली आहे.

“ कौमारदेहीं सुरतानुरागी, चंद्राग्निगंधर्व तिघे विभागी ।
येकेक संवत्सर दोनि भोगी, दुर्बोध याचा धरि कोण योगी ? ।।४३।।
मनश्चंद्रमा अर्यमा नेत्र ज्याचे, मुखापासुनी भूत इंद्राग्नि त्याचे ।
जगत्प्राण जो प्राण संपूर्ण गात्रीं विराटस्वरूपीं हरी देहमात्रीं ।। ४४ ।। ”

यांपैकी ४३ व्या श्लोकातील कल्पना विठ्ठलाला पुढीलसारख्या एखाद्या स्थळावरून सुचली असावी. ऋग्वेदातील सूर्याविवाह-सूक्तात एक ऋचा अशी आहे—

“ सोमः प्रथमो विविदे गंधर्वो विविद उत्तरः ।
तृतीयोऽग्निष्टे पतिस्तुरीयस्ते मनुष्यजाः ।। ४० ।। ”
( ऋग्वेद मंडल १०, सूक्त ८५ )

अत्रिसंहितेतही असाच उल्लेख आढळतो—

“ पूर्वं स्त्रियः सुरैर्भुक्ताः सोमगंधर्ववन्हिभिः ।
भुंजते मानवाः पश्चात्न ता दुष्यंति कर्हिचित् ।। १९० ।। ”

याचा अर्थ स्पष्ट करताना इतर संदर्भांच्या आधारे श्री. द. वा. निमकर[1] लिहितात, “ या वचनांकडे पाहिले तर सोम, गंधर्व व अग्नी यांचा भोगसंबंध, विशेष लक्षणांनी होत जाणाऱ्या मुलीच्या देहविकासाशी घातलेला दिसतो. रोमदर्शन, कुचोद्भव व ऋतुप्राप्ती ही ती लक्षणे असून,

१. हे व असेच इतर काही संदर्भ आणि विशेष स्पष्टीकरण यांसाठी जिज्ञासूंनी श्री. द. वा. निमकर यांच्या ‘ हिंदु लग्नसंस्था ’ या ग्रंथातील दुसऱ्या प्रकरणामध्ये २२ ते २५ हे परिच्छेद पाहावेत.

त्यांपैकी प्रत्येकाशी या तीन देवतांचा निरनिराळा संबंध लाविला आहे." (प्र. २, परि. २२)

याच संदर्भात ऋग्वेदातील आणखी एका स्थळाचा उल्लेख करिता येईल. ऋग्वेदात (१·६६-४) 'जारः कनीनां' असे अग्नीचे वर्णन आढळते. "परंतु तेथे 'जार' हा शब्द 'व्यभिचारी' या अर्थी नसून, कन्यांचे कन्यात्व नष्ट करणारा अशा अर्थी आहे...कन्यांचा विवाह करावयाचा असता, तेथे अग्नी प्रदीप्त करून हवन करतात व त्या अग्नीसमोर पतिपत्नींचा करार होत असतो. यामुळे अग्नी हा कन्यांचे कन्यात्व नष्ट करणारा (जार) आहे..."(स्वाध्याय मंडळ प्रकाशित वाल्मीकिरामायण, बालकांड, पृ. ५२८)

यांपैकी कोणताही अर्थ स्वीकारला वा अन्य कोणताही बसविला तरी चालेल; पण व्यभिचाराची कल्पना येथे खास नाही. विठ्ठलाने मात्र ती मानली आहे, आणि म्हणूनच गौतमाच्या तोंडी तो हे उद्गार घालतो.

**सीतेची प्रार्थना**— हा भाग विठ्ठल व नागेश या दोघांनीही एकनाथांवरून घेतला असावा. रावणाची गर्वोक्ती ऐकून एकनाथांची सीता निरनिराळ्या देवतांना पुढीलप्रमाणे प्रार्थना करते— "ते देखोनियां सीता। थोर गजबजली चित्ता। म्हणे अगा हे उमाकांता। तुझें चाप सर्वथा न उचलो यासी ॥ १०५ ॥ माते धरित्री ये वेळीं। रावणा नेट नेदी पायांतळीं। त्यासि तों न्यावें रसातळीं। धनुष्याच्या मुळीं घालीं भार ॥ १०६ ॥ आपला धराभार समस्त। घालावया धनुष्या आंत। रावणाचा चके हात। तैसा कार्यार्थ साधावा ॥ १०७ ॥ रावणातें पूर्ण छळीं। ते वेगिं पावो कंकाळी। आमुची कुलदेवता भद्रकाळी। धनुष्य समुळी धरून राखो ॥ १०८ ॥ इंद्रियाधिष्ठात्री देवता। मज साह्य होवोत समस्ता। धनुष्य नुचलो लंकानाथा। ऐसी अशक्तता यासी यावी ॥ १०९॥ रावणाच्या शरीरीचे प्राण। मज साह्य व्हावे संपूर्ण। यासी न चढे चाप गुण। तैसा क्षीण करावा ॥ ११० ॥ आपलें चाप विसरोन। केउता गेला त्रिनयन। रावणाचें काळें वदन। करावें संपूर्ण श्रीशकरें ॥ १११ ॥ (अ. १८)."

एकनाथांत प्रार्थना एकाच वेळी असली तरी या दोघांनी प्रार्थना (प्रत्येकी दोन ठिकाणी. विठ्ठल–सर्ग ४, श्लो. ३७ ते ४२ व स. ५, १२-१३; नागेश–३१३ ते ३१९ व ३३९-३४० ) घालण्याची कल्पना नाथांकडून घेऊन आपापल्या शक्तीप्रमाणे तीत भर घातली असावी.

**सूर्यवंशावळी**— येथे टीपा देताना काव्यसंग्रहकारांप्रमाणेच प्रा. पंगूही ‘ बालकांड सर्ग ७० पाहा ’ असे म्हणतात. पण या ठिकाणची वंशावळी वाल्मीकिरामायणाहून भिन्न व त्रोटक आहे. ती सांगताना विठ्ठलाने ( स. ६–३७,३८ ) फक्त भावार्थ रामायणच आपल्यासमोर ठेवले असावे.

प्रा. पंगूंच्या पाठाप्रमाणे ३७ व्या श्लोकाच्या पहिल्या ओळीत मनू व इक्ष्वाकू हे दोन नसून एकच असा अर्थ निघतो व त्याप्रमाणे त्यांनी तो टीपांत दिलाही आहे. सर्वसंग्रह व काव्यसंग्रह यांच्या पाठभेदांनीही समाधान होत नाही; परंतु वस्तुतः ते दोन आहेत. त्याप्रमाणे मानल्यास दशरथा-पर्यंतच्या वंशावळीत एकनाथ ( अ. २२–५७ ते ८० ) व विठ्ठल दोघांनी ही वीस राजांची नावे दिली आहेत. त्यांतील एकोणीस नावे दोन्ही ठिकाणी तीच आहेत. फरक एका नावापुरताच म्हणजे एकनाथात ‘ शिबी ’ तर विठ्ठलात ‘ मुचकुंद ’ आहे.

**विवाहविधी**—विवाहविधी, मिरवणूक, दारूकाम, भोजनसमारंभ इत्यादींचे वर्णन विठ्ठलाने सातव्या सर्गाच्या २ ते ९, २५ ते ३२ व ४४ या श्लोकांत संक्षेपाने केले आहे. त्यावरील नाथांचा ( अ. २३ ते २५ ) परिणाम स्पष्ट आहे. विस्तारभयास्तव त्याची अधिक चर्चा करीत नाही. एका प्रसंगाबद्दल मात्र लिहिणे जरूर आहे. तो प्रसंग म्हणजे—

**वेश्यासंन्यासीप्रसंग** —विठ्ठलाने ( स. ७–११, १२ ) वर्णिलेला हा प्रसंग प्रा. पंगू म्हणतात त्याप्रमाणे एकनाथी रुक्मिणीस्वयंवराच्या १८ व्या प्रसंगातील २६ ते ३२ ओव्यांचा अनुवाद नव्हे. तो नाथांनी वर्णिलेल्या पुढील प्रसंगाचा ( भावार्थरामायण, बालकांड अ. २७–३९ ते ५३ ) अनुवाद आहे. त्यातील काही ओव्या—

“ श्रीराम जातां निजगति गजरीं । पाहों न येती अग्निहोत्री । पाहतां विटाळ होईल गात्रीं । तंव राम दुरीं अंतरला ॥ ३९ ॥... अनुलक्षोनि

श्रीरामासी । पिंगळा वेश्या धावे उल्लासी । मार्गी झगटली संन्याशासी । हें लक्ष तिसी असेना ॥ ४४ ॥ मज कां आतळी हे रांड । रागें संन्यासी ठोकी दंड । येरी पाहतां श्रीरामाचें तोंड । दंडें उदंड सुखी जाली ॥४५॥ स्वामी तुमच्या दंडाचा घाव । तेणें दंडिला माझा अहंभाव । तो दंडें दंडीना तुम्हांसि पाहो । पाहतां रामराव विटाळ देखा ॥ ४६ ॥...ऐसी विवादतां वेश्या संन्याशासी । श्रीराम गेला स्वयें स्वाश्रमासी । संन्यासी करितां मृत्तिका-स्नानासी । आली हातासी मृत्तिका ॥ ५० ॥ ... वर्णाभिमान आश्रमाभिमान । कर्माभिमान धर्माभिमान । न वचतां सर्वाभिमान । रघुनंदन भेटेना ॥ ५२ ॥ ऐसें बोलतां सद्युक्तीसी । पिंगळा वेश्या कोण म्हणसी । जे अवधूतें चोविसां गुरूंसी । यदूपासीं सांगितली ॥ ५३ ॥ ”

हाच प्रसंग विठ्ठल सांगतो तो असा—

“ वेश्या आणि पतिव्रता त्रिभुवनीं रूपागळी पिंगळा,
ते नाचे रघुनायकापुढति हो ! कुंदेंदु तो चांगला; ।
संन्याशाप्रति लागतां मग ढका दंडें तया हाणिती;
‘ आम्हांलागुनि कां विटाळ करितां,’ त्या मस्करीं हासती ॥११॥
नाही वृत्ति निमग्न तोंवरि कदा संन्यास घेवों नये,
कर्मीं जोंवरि बद्ध तोंवरि कसें सायुज्य हातासि ये ? ।
मेल्या मुक्ति घडेल काय न घडे या संशयीं जो पडे
दोषादोष विटाळ त्याप्रति, कदां श्रीराम ना सापडे ॥ १२ ॥ ”

एकनाथांनी हा प्रसंग अयोध्येतील मिरवणुकीच्या वेळी वर्णिला आहे; पण विठ्ठलाने तो मिथिलेत नवरदेव वधुगृहाकडे निघाले असताना घातला आहे. विदेहाच्या नगरीचे वर्णन करीत असताना नाथांनी याच कांडातील पंधराव्या अध्यायात “ स्वभावें वस्ती करितां नगरीं । पिंगळा वेश्या समाधी वरी । ते विदेहाची विदेहपुरी । कोणें थोरी वर्णावी ॥ १९ ॥ ” असा पिंगलेचा केलेला निर्देश विठ्ठलाच्या स्मरणात असेल म्हणून त्याने हा प्रसंग मिथिलेतला म्हणून वर्णिला असावा. शिवाय नाथांच्या ५३ व्या ओवीतील उल्लेखावरून ही वेश्या मिथिला नगरीतीलच दिसते ( पहा- प्राचीन चरित्रकोश, पिंगला २ ). तिचे वर्णन अयोध्येतील मिरवणुकीच्या

वेळी कसे अशी शंका येऊन विठ्ठलाने नाथांची ही चूक दुरुस्त केली असावी.

ही प्रमुख स्थळे झाली. यांशिवाय आणखी काही बारीकसारीक प्रसंग, ‘ धनुर्याग सीतास्वयंवर ’ आणि ‘ चतुर्थ होम ’ इत्यादी शब्दसमूह आणि काही शब्द व कल्पना दाखविता येतील की जेथे विठ्ठलावरील एकनाथांचा पगडा दिसून येईल.

## ( २ ) मुक्तेश्वराचा परिणाम

अनेक वृत्तात्मक रचनेची सुरुवात मुक्तेश्वराने केली. काही शब्दबंध साधण्याची त्याची हौस त्याच्या रामायणात आढळते. स्वकालीन राजे, वस्त्रे, हत्यारे, वाद्ये इत्यादींचे उल्लेख करून कालविपर्यासाचा दोष मुक्तेश्वर अनेक ठिकाणी पत्करतो. या सर्व गोष्टींचा परिणाम विठ्ठलावर झालेला आहे. एकनाथांची कविता पाहणाऱ्या विठ्ठलाने नाथांच्या या सुप्रसिद्ध नातवाचीही कविता पाहिली असली पाहिजे. विठ्ठलावरील मुक्तेश्वराच्या परिणामाची विस्तृत चर्चा न करता काही ठळक गोष्टीच उल्लेखितो.

**स्वयंवरार्थ जमलेले राजे**—विठ्ठलाने सर्ग ४-१३ ते १९ येथे स्वयंवरार्थ जमलेल्या राजांची यादी दिली आहे. ती त्याने संस्कृत ग्रंथ व मुक्तेश्वर यांवरून तयार केली असावी. विशेषतः काही म्लेंच्छ व परदेशी राजांची नावे त्याने मुक्तेश्वराच्या आदिपर्वातील व सभापर्वातील याद्यांवरून घेतली असावीत अशा अर्थाचे प्रा. पंगूंचे विधान मान्य होण्यासारखेच आहे.

**देवांना करावे लागलेले रावणाचे दास्य**—या दास्याचे वर्णन ‘ कोणाच्या तोंडून ’ एवढा प्रश्न वगळला तर अनेक कवींत सारखेच आढळते. याचे मूळ हनुमन्नाटकाच्या आठव्या अंकात आढळते. तेथे रावण अंगदाला गर्वाने म्हणतो,

> “ इंद्रं माल्यकरं सहस्रकिरणं द्वारिप्रतीहारकं
> चंद्रं छत्रधरं समीरवरुणौ संमार्जयंतौ गृहान्
> पाचक्ये परिनिष्ठितं हुतवहं किं मद्गृहे नेक्षसे
> रक्षोभक्ष्यमनुष्यमात्रवपुषं तं राघवं स्तौषि किम् ॥ २३ ॥ ”

एकनाथांनी भावार्थरामायणाच्या युद्धकांडातील आठव्या अध्यायात अंगदशिष्टाईच्या वेळी सदर संस्कृत श्लोक उद्‌धृत केला आहे आणि त्यावर ‘टीका’ लिहिताना ५५ ते ६६ या ओव्यांत रावणाच्या तोंडी अशी बढाई घातली आहे. मात्र येथे विठ्ठलावर नाथांपेक्षा मुक्तेश्वराचाच परिणाम झाला आहे असे दिसते. कारण यात काही भर घालून आपल्या रामायणाच्या युद्धकांडात मुक्तेश्वराने वर्णन केले आहे. मुक्तेश्वराचा रावण अंगदास म्हणतो—

“ अरे ! मर्कटा ! देख हा इंद्र माळी; शशी छत्रधारी, रवी दीप जाळी;
घरीं नीर वाहे पती पश्चिमेचा; मळक्षाळिता वन्हि तेजाळ कैंचा ? ॥६८॥
गणाधीश घेवोनियां दंडकाठी, पशू रक्षितां नावरे श्वास पोटीं;
जगत्प्राण तो वायु हा केर लोटी; सटी शांतवी बाळ स्नेहाळ मोठी ॥६९॥
कराळी तराळीण हे भद्रकाळी; निशीं जागणें सर्वदा क्षेत्रपाळीं;
उभा नीच नापीक मल्हारि पाहें;वदे मोकळा कोण तो देव आहे ?॥७०॥”

विठ्ठलाने चौथ्या सर्गाच्या २२ व २३ श्लोकांत सीतास्वयंवराच्या वेळी रावणाने मारलेली बढाई वर्णिली आहे. ती अर्थातच वेळ बदलून या वेळी त्याने घातली असली, तरी तिच्यावरील मुक्तेश्वराची छाया उघड आहे.

विठ्ठल–नागेशांच्या पूर्वी रामदासांनीही आपल्या लघुरामायणात ( ११ ते १५ ) असेच वर्णन केले आहे.

**भुतांखेतांची यादी**— रावणाला धनुष्य उचलू नये म्हणून सीतेने जी प्रार्थना केली तींतील एक श्लोक ( ४–४१ ) असा—

“ अष्टौ भैरव आठ कोटि गणना वेताळ भूतावळी,
भूत प्रेत पिशाच बिभ्रतितनू झोटिंग मुंजे बळी,
कृष्मांडादिक पूतना दृढबळी श्रीशाकिनी डाकिनी,
क्रूरा क्रूरतरा धरा धनु महामारी तुम्ही या दिनीं ॥ ”

यात भुतांखेतांचे निर्देश आढळतात. ‘झोटिंग’ हा शब्द वापरून तर विठ्ठलाने कालविपर्यासाचा दोष स्वीकारलाच आहे; पण त्याच्यापूर्वी मुक्तेश्वरातही हा दोष आणि अशा प्रकारची यादी आढळते.

" जपे रावणी वीर प्रेतास्त्र ओठीं; भुतें चालिली ग्यासुरें लक्ष कोटी ।
महाकाळ वेताळ खंकाळ म्हैसे घसे घोरसे घर्घरें मेघ त्रासे ।। २२२ ।।
त्वरें धावती यक्षिणी मुक्तकेशा; सळें डाकिनी शाकिनी मृत्युवेशा ।
महापिंग मैराळ, झोटिंग, पीसे भिसे मोकळे भासती जैंवि रीसें ।।२२३।।"
( मुक्तेश्वरकृत रामायण–युद्धकांड )

**बारा राशींचा उल्लेख**—सीतास्वयंवरात विठ्ठलाने दोन ठिकाणी ( स. ५–३२ व स. ७–२७ ) एकेका श्लोकात द्वादश राशींचे प्रकट वा सूचक उल्लेख केले आहेत. पण विठ्ठलापूर्वी आणि मराठीत प्रथमच ही द्वादश-राशीन्यासाची कल्पना मुक्तेश्वराने आणलेली आहे. मुक्तेश्वराने इतरही काही चित्रकाव्ये निर्माण केली आहेत. पण येथे फक्त द्वादशराशीन्यासाचे तेवढे उदाहरण उद्धृत करतो. मात्र मुक्तेश्वराने हा प्रकार एकाऐवजी तीन सलग श्लोकांत साधला आहे. त्याच्या रामायणाच्या युद्धकांडातील ही रचना अशी—

" **धनुष पुरहराचें** भंगिलें विश्वमान्या
अवनिभुज**सिंहा**ची लाधली दिव्य **कन्या** ।
**मिथुन** वधुवरांचें शोभलें हेमधामीं
हवनपुजन तोषें तोषला **मेष**गामी ।। ४७३ ।।

प्रबळ **मकरमीनीं** माजले **कर्क** मोटे,
भरुनि दगड सिंधू लंघिला पायवाटे ।
निवटुनि दश मुंडें **कुंभ**कर्णादि संगीं
अ**तुळ** बळ तुळाव्या नाठवे आन वेगीं ।। ४७४ ।।

तनू चिंतितां त्या रघूराजयाची
हरे वेधना या भवा**वृश्चिका**ची ।
स्मरा सादरें सर्वदा राम वाचे,
रुळे अंकणा क्रूर तो काळ साचें ।। ४७५ ।। "

वरील ठळक शब्दांवरून मुक्तेश्वराने अकरा राशींचा कसा प्रकट उल्लेख केला आहे हे समजून येईल. फक्त ' वृषभ ' राशी तेवढी त्याने सूचकतेने उल्लेखिली असून ती पुरहर ( = **वृषभ**ध्वज ) या शब्दात आहे.

मुक्तेश्वराचा हा द्वादशराशीन्यास यापूर्वी कोणीही लक्षात घेतलेला नव्हता. अर्थातच या कूटरचनेचे श्रेय विठ्ठलाच्या आधी मुक्तेश्वराला देणे आवश्यक आहे. मुक्तेश्वराकडून कूटरचनेची ही दीक्षा विठ्ठलाने घेतली असली पाहिजे.[1]

## ( ३ ) विठ्ठल नागेशाचा ऋणी नाही

विठ्ठलकृत सीतास्वयंवराच्या प्रस्तावनेत "एकनाथांच्या काव्याबरोबरच इतर कोणाची नसली तरी नागेशाची कृती त्याने डोळ्याखालून घातली असावी असे अनुमान निघते ( पृ. २६-२७ )" असे म्हणून प्रा. पंगूंनी याविषयी मुख्यतः तीन कारणे दिली आहेत, त्यांचा प्रथम विचार करू.

**राम-गुह्यक संवाद**—तिसऱ्या सर्गात विठ्ठलाचा गुह्यक रामास म्हणतो—

"पदकमळरजानें मुक्त पाषाणदेही
रुषिमहिषि अहल्या पावली साक्षि तेंही, ।
उपल युवति होती वस्ति विंध्याचळाची,
रघुपति! पुरवीली वासना तापसांची ॥ १७ ॥

रघुपति! करवेना स्त्री दुजी दुर्बळातें,
अणुभरि तरि नाही भेद काष्ठोपळातें. ।
धुविन चरणरेणू, तीर्थ घेईन जेव्हां,
बसविन मग नौकेमाजि देवासि तेव्हां. ॥ १८ ॥"

हा भाग प्रा. पंगू म्हणतात त्याप्रमाणे नागेशावरून मुळीच घेतलेला नाही. १७ वा श्लोक हनुमन्नाटकाच्या तिसऱ्या अंकातील पुढील श्लोकाचा अनुवाद आहे—

---

१. रा. ब. दादोबा पांडुरंगांच्या आत्मचरित्रात (सं. अ. का. प्रियोळकर) पृ. ८६ वर तळटीपेत 'बारा राशींवर श्लोक' आठवत असल्याचे दादोबा सांगतात. पण हा भाग अपुराच दिसतो.

पदकमलरजोभिर्मुक्तपाषाणदेहाम्
अलभत यदहल्यां गौतमो धर्मपत्नीम्
त्वयि चरति विशीर्णग्रावविंध्याद्रिपादे
कति कति भवितारस्तापसा दारवंतः ॥ १९ ॥

यावरूनच कल्पना घेऊन नागेशाने आपला विनोदी भाग ( १३२ ते १५७ ) विस्ताराने वर्णिला असावा. एकनाथांनीही वरील श्लोकाचा अनुवाद ( अ. १५-४, ५ ) केला आहे.

विठ्ठलाच्या अठराव्या श्लोकाने मात्र प्रा. पंगूंची सुंदर दिशाभूल केली आहे. नागेशाने त्यांना बरेच भारून टाकल्याने या श्लोकाचा अर्थ ते असा देतात—"हे रामा ! माझ्यासारख्या दुर्बळाला दुसरी बायको करणे शक्य नाही. आपण दगडाची स्त्री बनविता, तर आपण माझ्यासाठी लाकडातून स्त्री निर्माण करावी. कारण दगड व लाकूड हे जडत्वाच्या दृष्टीने सारखेच, त्यांत अणुमात्र भेद नाही...इ."

पण विठ्ठल या ठिकाणी वाल्मीकी, नाथ, नागेश यांपैकी कोणाचाच आधार घेत नाही. हनुमन्नाटकात ( अं. ३-२० ) 'नावेची स्त्री बनेल' अशा प्रकारची भीती सीतेच्या तोंडी आहे. पण या श्लोकाचाही तो अनुवाद करीत नाही. तो अनुवाद करतो तो आनंदरामायणातील ( सार. सर्ग ३ ) किंवा अध्यात्मरामायणातील ( बालकांड, स. ६ ) पुढील भागाचा—

नाविक म्हणतो—

"आदावहं क्षालयित्वा पादरेणूंस्तव प्रभो ॥ २४ ॥
पश्चान्नौकां स्पर्शयामि तव पादौ रघूद्वह ।
नौचेत्त्वत्पादरजसा स्पृष्टा नारी भविष्यति ॥ २५ ॥......
......अस्ति मे गृहिणी गेहे किं करोम्यपरां स्त्रियम् ॥ २७ ॥"
( आनंद रामायण )

"क्षालयामि तव पादपङ्कजं नाथ दारुदृषदोः किमन्तरम् ।
मानुषीकरणचूर्णमस्ति ते पादयोरिति कथा प्रथीयसी ॥ ३ ॥

पादाम्बुजं ते विमलंहि कृत्वा पश्चात्परं तीरमहं नयामि ।
नोचेत्तरी सद्युवती मलेन स्याच्चेद्विभो विद्धि कुटुम्बहानिः ।। ४ ।। "

( अध्यात्मरामायण )

याच भागाचा अनुवाद मुक्तेश्वराने आपल्या रामायणात केला आहे; पण तो त्याने अयोध्याकांडात ( ५७–५९ ) घातला आहे.

वरील संस्कृत उताऱ्यांवरून प्रा. पंगूंचा अर्थ कसा चुकीचा व उलटा आहे याची स्पष्ट कल्पना येते. आनंदरामायण, अध्यात्मरामायण आणि विठ्ठल यांच्या नाविकाची भीती कोणीकडे आणि प्रा. पंगूंच्या नाविकाची ही अभिलाषा कोणीकडे !

**घोड्यांच्या विविध जातींची नावे**— सहाव्या सर्गातील दोन श्लोकांत विठ्ठलाने घोड्यांच्या जातींची नावे दिली आहेत ती अशी—

" अरब्बी इराखी हरी पंचरंगी । विराजेति कच्छी प्रयाणप्रसंगीं, ।
महाधीर गंभीर ते घोर आंगें । बळें धावतां टाकिती वायु मागें ।। ११ ।। "

आणि

" वाजी बोर चितोड नीळ तुरकी श्रीपंचकल्याण जे,
सारंगे जरदे कुमाइत महा देखोनि राजा भजे;
पायीं तोडर गर्जती, नभ खुरीं झेपावती चालिले,
नाना ते पुट पर्वती, नृपतिने जिंतूनियां आणिले. ।। १५ ।। "

आता नागेशातील नावे पहा—

" अरब्बी, बदक्षान, ताजी, तुरकी, ।
रुमी, पर्वती, घुट्ट, कच्छी, इराखी, ।।
फिरंगी तथा येंबिये दक्ष माहा, ।
असे राघवाचे घरीं अश्व पाहा ।। २९७ ।।
सुरंग सारंग, सुभेद, नीळे, ।
जे पंचकल्याण, विशेष काळे, ।।
जर्दे, बनोजी, अबलख्ख, तेजी ।
नृपाघरीं ते बहुवेग वाजी ।। २९८ ।। "

वरवर पाहिल्यास या ठिकाणी विठ्ठलाने नागेश पाहिला असावा हे प्रा. पंगूंचे विधान मान्य करावेसे वाटेल. पण याचा थोडा खोल विचार केला पाहिजे.

या दोन उताऱ्यांची तुलना केल्यास 'अरब्बी, इराखी, कच्छी, नीळ, तुरकी, पंचकल्याण, सारंग, जरदा, पर्वती' ही नावे दोघांत सारखी दिसतात. ही नावे याच सुमारास (श. १५९८–९९) तयार झालेल्या राजव्यवहारकोशात (५ चतुरंग वर्गः, श्लो. १६४–१७०) आढळतात. या घोड्यांच्या जाती तत्काली प्रसिद्ध होत्या, आणि म्हणूनच त्या या तिन्ही ठिकाणी आढळतात. राजव्यवहारकोशात नसलेली 'बदक्षान, रुमी, घुट्ट, फिरंगी, येंबिये, सुभेद, बनोजी' अशी काही नावे नागेशात दिसतात. ही संख्या काही लहान नाही. नागेशाची कृती विठ्ठलाने डोळ्याखालून घातली असती तर राजव्यवहारकोशात नसलेल्या म्हणजेच विशेष प्रसिद्ध नसलेल्या पण नागेशात आढळणाऱ्या या नावांपैकी काही नावांचा तरी उपयोग त्याने खास केला असता. नागेशाहून निराळी अशी विठ्ठलात आढळणारी 'कुमाइत, बोर' (६–१५) व पुढे दशरथाच्या भेटीस जनक निघाल्या-वेळी असणारा 'कोतल' (६–२९) ही नावेही राजव्यवहारकोशात आढळतात. याचाच अर्थ असा की, तत्काली प्रसिद्ध असलेल्या नावांचा तेवढा व्यापारी पेशाच्या विठ्ठलाने उल्लेख केला, पण 'चौकसपणाने' नागेशाने मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग ज्या अर्थी त्याने केलेला नाही त्या अर्थी नागेशाची कृती त्याने पाहिलेली नसावी.

आता घोड्यांची ही नावे देण्याची कल्पना विठ्ठलाला कशी सुचली असेल असा एक प्रश्न उद्भवणे संभवनीय आहे. त्याबद्दल पुढील अनुमाने बांधल्यास ती अगदीच काल्पनिक ठरणार नाहीत. राजे, वाद्ये, शस्त्रे, वस्त्रे इत्यादींच्या याद्या देण्याची मुक्तेश्वराला सवय आहे; त्यावरून घोड्यांचीही यादी द्यावी असे विठ्ठलाला वाटले असेल. शिवाय मुक्तेश्वराचे बरेच वाङ्मय अनुपलब्ध असावे असा तर्क करता येतो. कदाचित विठ्ठलाला उपलब्ध

पण आज आपल्यास अनुपलब्ध असणाऱ्या एखाद्या मुक्तेश्वरी काव्यात घोड्यांच्या जातींची यादी असेलही.[१]

सुमंताने सिद्ध केलेल्या चमूचे वर्णन करताना विठ्ठलाने या अश्वजातींचा निर्देश केला आहे; तर नागेशात रामवर्णनप्रसंगी दासी सीतेला ही नावे ऐकवते, हा फरकही लक्षात घेण्यासारखा आहे.

**मंगलाष्टके**— सातव्या सर्गाच्या १७ ते २४ श्लोकांत विठ्ठलाने जी आठ मंगलाष्टके रचिली आहेत ती 'त्याने नागेशाच्या तशाच मंगलाष्टकांना आपल्या ज्योतिषविषयक चमत्कृतीची थोडी जोड देऊन रचिलेली दिसतात' असे प्रा. पंगू लिहितात; पण त्यांचे हेही विधान मान्य होण्यासारखे नाही.

नागेशात मंगलाष्टके सहा आहेत तर विठ्ठलात आठ आहेत. दोघांच्या मंगलाष्टकांतून ज्या देवतांच्या आशीर्वादाची याचना केली गेली आहे त्यांत गणेश, विष्णू व शंकर या तीन देवता दोहींकडे आहेत. पण नागेशकृत देवतावर्णन व विठ्ठलकृत देवतावर्णन यांत थोडेसुद्धा साम्य नाही. एक उदाहरण देतो त्यावरून हे स्पष्ट होईल. गणेशवर्णन—

" विघ्ना वारितसे, सुखी करितसे, विद्या सदा देतसे, ।
शुंडादंड विशेष चाळवितसे, जो दाखवी भावसे, ॥
शेंदूरानन तुंड ज्यास विलसे, मोरेश्वरीं जो वसे, ।
श्रीमन्मंगळमूर्ति तो बहुबळें, कुर्यात् सदा मंगळं ॥ ४०९ ॥ "
(नागेश).

" मत्तेभानन षट्पदाकुलगलद्गंडांत दानोदकें, ।
हस्तीं पाश वराभयांकुशपदा, संहृष्ट जो मोदकें, ॥
कांची वस्त्र कटीं, त्रिनेत्र निडळीं, चंद्रार्ध, कंठीं फणी, ।
ऐसा मंगलमूर्ति तो सुरगणीं, कुर्यात् सदा मंगलम् ॥ १७ ॥ "
(विठ्ठल).

---

१. 'संतोष मुनि कृष्णदासा'च्या 'रुक्मिनी-सैंवरा'त (सं. ना. ब. जोशी) चौदाव्या प्रसंगात (ओ. १७–३०) घोड्यांच्या अनेक जातींची नावे आली आहेत.

आणखी एक गोष्ट अशी की, विठ्ठलाने आपल्या रुक्मिणी-स्वयंवरातही आठ मंगलाष्टके घातली आहेत (सर्ग ७–३१ ते ३८). रुक्मिणी-स्वयंवरातील मंगलाष्टकांची छाया त्याच्याच सीता-स्वयंवरातील मंगलाष्टकांवर पडलेली आहे. रुक्मिणी-स्वयंवर सीता-स्वयंवरापूर्वी तीन वर्षे त्याने रचिलेले असून तेथेही नागेशाचा परिणाम मुळीच आढळत नाही. हा तत्कालीन रूढीचा परिणाम असावा. विवाहसमयी मंगलाष्टके गायची पद्धत केव्हापासून सुरू झाली हे जरी निश्चित सांगता आले नाही, तरी सर्वांना मान्य होण्यासारखे एक निःशंक विधान करता येईल ते असे की, मराठी कवींत आलेली मंगलाष्टके व त्यांना स्फूर्ती देणारी काही संस्कृत मंगलाष्टके पाहून असे वाटते की शिवकालात ही पद्धती सर्वत्र लोकप्रिय व रूढ होती.

विठ्ठलाच्या रुक्मिणी-स्वयंवरातील ‘ लक्ष्मी कौस्तुभ... ’ (७–३२) हे चतुर्दश रत्नांचा उल्लेख असणाऱ्या ‘ लक्ष्मीः कौस्तुभ ’ या संस्कृत मंगलाष्टकाचे भाषान्तर व ‘ गंगा भागिरथी कालिंदतनया ’ (७–३४) हा ‘ गंगा सिंधु ’ इत्यादी नद्यांचे उल्लेख असणाऱ्या संस्कृत मंगलाष्टकाचा अनुवाद आहे. विठ्ठलाच्या इतरही (दोन्ही ठिकाणच्या) मंगलाष्टकांत संस्कृत मंगलाष्टकांतील काहींच्या छाया पडलेल्या व काहींचा परिणाम झालेला आढळतो.

शिवाय मंगलाष्टके फक्त नागेश–विठ्ठलांतच असती तर गोष्ट निराळी. पण मराठीतच वामनपंडित व वेणाबाई यांच्या सीतास्वयंवरांत मंगलाष्टके आहेत. वामनपंडितांच्या सीता-स्वयंवरात ८९–९३ या पाच श्लोकांची रचना मंगलाष्टके म्हणूनच त्यांनी केली असावी. ही रचना नेहमीच्या मंगलाष्टकांप्रमाणे शार्दूलविक्रीडित वृत्तात असून त्यात ‘ वैवाहिकें मंगळें गातों रामरसें ’ (९२) असे म्हटले आहे. उदाहरणादाखल एक श्लोक—

“ ब्रह्मा वृद्ध; सकाम कामरिपु तो रुद्र स्मशानीं वसे;
दैत्यत्रस्त सुरेंद्र; इंद्रगुरुही इंद्राभिमानी असे; ।
दुर्वासादि अशान्त; शांत मजही जो कांत इच्छीच ना;
माळा हे कमळा, विचारुनि, गळां घाली जगज्जीवना ॥८९॥ ”

वेणाबाईच्या सीतास्वयंवरात (समास दहावा) आठ मंगलाष्टके आहेत, त्यांतील पहिले—

" आरंभीं वदती महा गणपती हे शारदे सुंदरी।
शूभे वाणि वदे सुवेळ विलसे तूं मंगळे माधुरी॥
रामा जानकि माळ घेउनि करीं ऊभी असे सुंदरी।
तों ते सादर वैखरी शुभ वदे सीतावरं मंगळं ॥ १ ॥ "

वामनपंडित (शके १५३०–१६१७) व वेणाबाई (शके १५५०–१६००) या दोघांच्या सीतास्वयंवररचना कोणत्या शकांत झाल्या हे निश्चित सांगणे कठीण आहे. पण त्या नागेश–विठ्ठलांच्या काव्यांपूर्वी झाल्या असाव्यात असे म्हणता येईल. तेव्हा मंगलाष्टके योजण्याची कल्पना विठ्ठलाने नागेशापासून घेतली असे म्हणण्यापेक्षा या दोघांनीही ती या पूर्वकवींपासून घेतली असावी हे म्हणणेच अधिक सयुक्तिक ठरणार नाही काय ?

**प्रा. पंगूंचे काही किरकोळ मुद्दे**— प्रा. पंगूंच्या मुख्य विधानांचे अशा रीतीने खंडन केल्यानंतर त्यांच्या याच बाबतीतल्या आणखी काही किरकोळ मुद्द्यांचाही विचार करू.

'विठ्ठलाची बहुश्रुतता' या मथळ्याखाली लिहिताना प्रा. पंगू म्हणतात, "पण आपण जे जे पाहिले ते ते आपल्या ग्रंथात प्रसंग साधून कोठे तरी समाविष्ट करून टाकण्याचा, विठ्ठलाला मुळी अभिनिवेशच नसल्यामुळे, त्याने (अ) दशरथाच्या पागेतील घोड्यांच्या जाती, (आ) त्या घोड्यांचे दागिने, किंवा (इ) राम-लक्ष्मणांच्या विवाहप्रसंगी वाजवण्यात आलेली वाद्ये, अथवा (ई) नांदी-श्राद्ध, देवक, गोदान यांसारखे लग्नविधींतील याज्ञिक प्रकार, यांचे थोडे अधिक तपशीलवार वर्णन करून जो बहुश्रुतपणाचा काहीसा डौल आणला आहे, तोदेखील त्याने नागेशाच्या सीतास्वयंवरातील तत्सदृश वर्णनाचा केलेला तर्जुमा असण्याचाच संभव आहे हे लक्षात आल्यावर, उसना असल्याचेच प्रत्ययास येते." [अ, आ, इ, ई ही अक्षरे माझी.] येथील विधान जितके धाडसी तितकेच गुळमुळीत आहे. (अ) मुद्द्याचा विचार

वर झालाच. ( ई ) विषयी एवढेच लिहितो की हा भाग लिहिताना विठ्ठलापुढे एकनाथ होते. आता प्रश्न राहिला ( आ ) आणि ( इ ) या दोन मुद्द्यांचा.

( आ ) घोड्यांच्या दागिन्यांचे वर्णन नजरेत भरेल असे नागेशात नाहीच मुळी.

“ चामरीं अति सुशोभित वाजी, ।
ज्यासमोर रिपुचे शत वाजी ॥
साजताति पर ते हुमियांचे, ।
देखतां बळ गळे भुमि यांचें ॥ २९५ ॥ ”

नागेशाच्या या श्लोकात चामर व हुमिया ( हुमा ) या दोनच अश्वभूषणांचा उल्लेख आहे, आणि हे दोन्हीही शब्द विठ्ठलात नाहीत.

( इ ) नागेशात दमामे, कर्णे, नफेऱ्या, नगारे, तुतारे, बांके ( १६८, १६९ ) व नौबत ( १७४ ) एवढ्याच वाद्यांचा उल्लेख आहे. त्या मानाने मुक्तेश्वरात ही वाद्यांची नावे विखुरलेली असली तरी अधिक आहेत. तुरे, दुंदुभी ( युद्धकांड १०१ ), घंटा, तंत्री, ताळ, लेणू ( वेणू ? ), मृदंगे, भेरी, शंख ( उत्तरकांड ४७१ ), सनया, नफेरिया, बुरंगे, पावे, नरगे, जेगट, शृंगे ( वनपर्व अ. १२–५९ ), चौडंक ( वनपर्व अ. १४–१२ ) इत्यादी वाद्यांचे उल्लेख मुक्तेश्वर करतो. विठ्ठलात पुढील वाद्ये दिसतात— दुंदुभी ( १–४३ ), शंख, भेरी, नफेरी, तुरे ( २–११ ), नगारे, मृदंग, वीणा, दमामे, डफ, शृंग, बुरंग, चौडुक, झल्लरी, वेणू ( ६–२४ ). यांवरून वाद्योल्लेखाच्या बाबतीत विठ्ठल असलाच तर मुक्तेश्वरावर कसा विसंबून आहे हे कळून येईल.

**नागेशाचे सीतास्वयंवर विठ्ठलाने पाहिले नसावे**— याबद्दल आता आणखी काही कारणे देतो. ( १ ) मुक्तेश्वरातील परकीय राजांची नावे पाहून कालविपर्यासाचा दोष पत्करणाऱ्या विठ्ठलाने नागेशाचे काव्य पाहिले असते तर चव्हाण, राणे, तुंगार, मोरे, गोरे इत्यादी राजांची नावे जरूर वापरली असती. ( २ ) मोर, बोर, हयकोल, अहिदोरा, जेहगीर इत्यादी नागेशातील अलंकारांचे निर्देश विठ्ठलात नाहीत. ( ३ ) नागेशाने उल्लेखिलेली बागदार, समशेर, पुराणी, जमदाडे इत्यादी हत्यारे विठ्ठलात

दिसत नाहीत. ( ४ ) विठ्ठलाचे शब्द, शब्दप्रयोग व यमके आणि नागेशाचे शब्द, शब्दप्रयोग व यमके यांच्यात साम्य नाही. ( ५ ) नागेशाने योजिलेले ' मकरकशीर्षा ' हे वृत्त विठ्ठलाने वापरलेले नाही. इत्यादी.

**विठ्ठल व नागेश यांच्या ' सीतास्वयंवर '-रचनेचा काल—** विठ्ठलाने आपल्या बहुतेक काव्यग्रंथांचे रचनाशक देऊन संशोधकांकडून या बाबतीत होणारी स्वतःची ओढाताण बरीचशी वाचविली आहे. त्याचे सीतास्वयंवर शके १५९९ त निर्माण झाले ( स. ७-४७ ) हे वादातीत आहे. प्रश्न राहतो तो नागेशाच्या सीतास्वयंवराच्या रचनाकालाचा.

सीतास्वयंवराच्या प्रस्तावनेतील ( सन १९३७ ) नागेशाच्या काला-संबंधीचे प्रा. पंगूंचे मत स. १९४४ मध्ये प्रसिद्धिलेल्या ' प्राचीन मराठी कविपंचका 'त बदललेले आहे. हे बदललेले मतच त्यांना मान्य असले पाहिजे. ' प्राचीन मराठी कविपंचका 'त ते लिहितात, " म्हणून काव्य-रचनेचा हा व्यापार त्याने ( नागेशाने ) आपल्या वयाच्या साठ वर्षांपर्यंत चालू ठेविला व याच वर्षी त्याने आपली शेवटची कृती ' सीतास्वयंवर ' निर्मिली असे मानल्यास, शके १५४०-१६१५ हा अदमासाने नागेशाचा काल ठरतो." ( पृ. ९१ ). येथे शके १६०० हा नागेशाच्या सीता-स्वयंवररचनेचा काल गृहीत करूनच प्रा. पंगू त्याची आयुर्मर्यादा ठरवू पाहतात. शके १५९६-९७ त रचल्या गेलेल्या सामराजाच्या रुक्मिणी-हरणाचा नागेशावर झालेला परिणाम लक्षात घेतल्यास सीतास्वयंवररचनेचा काल आणखी ३-४ वर्षे पुढे ढकलावयालाही हरकत नसावी. पण प्रा. पंगूंच्या मताप्रमाणे शके १६०० सुद्धा धरायला सध्या प्रत्यवाय नाही. पण मग शके १६०० त निर्माण झालेले नागेशाचे सीतास्वयंवर, शके १५९९ त सीतास्वयंवराची रचना करणाऱ्या विठ्ठलाने डोळ्याखालून घातले असावे, असे प्रा. पंगू कोणत्या आधारावर म्हणतात ?

**टीकाकारांना व संशोधकांना विनंती—** विठ्ठल-नागेशांच्या काव्यांत आणखी काही अशी स्थळे आढळतात की, जेथील किंचितशा साम्याने ' विठ्ठलाने नागेशाचे काव्य पाहिलेच असावे ' अशा सिद्धान्ताला पोचण्याचा मोह टीकाकारांना होईल. विठ्ठल व नागेश हे समकालीन असल्यामुळे व

एकाच प्रसंगावर त्यांनी रचना केली असल्याने काही साम्यस्थळे आढळणे अशक्य नाही, ही गोष्ट त्यांनी लक्षात ठेवावी. शिवाय हा काळ कथा, कीर्तने, पुराणे यांच्या गजरांनी आणि गर्जनांनी दुमदुमलेला असा होता. तेथे ऐकलेल्या एकाच गोष्टीचा वापर दोघांनीही केला असणे संभवनीय आहे. थोड्या पुढच्या काळात गाजलेल्या अमृतराय या कीर्तनकाराची कविता पाहिली तर कीर्तनपद्धतीची काहीशी कल्पना येते. सीतास्वयंवरावर अमृतरायाचे ( शके १६२०–१६७५ ) जे दोन कटाव प्रसिद्ध आहेत त्यांपैकी एकात स्वयंवरार्थ जमलेल्या राजांची तर दुसऱ्यात ' जपी तपी संन्याशी ' इत्यादींची विस्तृत यादी आहे. अशा याद्या वा बारीक-सारीक प्रसंग, नावे इ. गोष्टी विठ्ठल–नागेशांनी या लोकांच्या तोंडून ऐकल्याही असतील. ही बाजू लक्षात घ्यावी अशी विनंती करून सध्या ' इत्यलम् ' म्हणतो.

[ ' सह्याद्री 'च्या मार्च १९५२ च्या अंकात हा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर एप्रिलच्या अंकात प्रा. पंगूंनी विठ्ठलाने नागेशाचे काव्य पाहिलेच असावे असे मत मांडले. त्याच अंकात माझे प्रत्युत्तरही प्रसिद्ध झाले. तेथे प्रा. पंगूंची व माझी मते एकत्र होती. ती सोय येथे नाही. म्हणून प्रा. पंगूंचे विचार कळावेत या हेतूने माझ्या पुढील लेखनात त्यांचा जरूरीपुरता समावेश केला आहे. ]

विठ्ठलावर एकनाथ-मुक्तेश्वरांचा परिणाम झाला आहे हे माझे मत प्रा. पंगूंनी मान्य केले आहे. ' विठ्ठल नागेशाचा ऋणी नाही ' या माझ्या सिद्धान्ताच्या पुष्ट्यर्थही मी जे विवेचन केले आहे त्यापैकी ' घोड्यांच्या जातींची नावे ' व ' मंगलाष्टके ' या दोन मुद्द्यांव्यतिरिक्त बाकीचे सारे मुद्देही त्यांनी मान्य केलेले दिसतात.

एका कवीचा दुसऱ्या कवीवर परिणाम झाला आहे हे सिद्ध करताना पहिल्या कवीच्या अनन्यसाधारण विशेषांचाच प्रामुख्याने विचार करावा लागतो. नागेशाचे हे विशेष म्हणजे मराठा राजांची नावे, अलंकार-शास्त्रादींचे विशिष्ट निर्देश, डोक्यावर शिळा घेऊन येणाऱ्या ऋषींचे पाल्हाळिक विनोदी वर्णन, कुरूप स्त्रियांची वर्णने, काही नावीन्यपूर्ण अलंकार, विशिष्ट यमके व वृत्ते हेच होत. यांच्या छाया विठ्ठलात आढळल्या

असत्या तर प्रा. पंगूंचे म्हणणे मानता आले असते. मंगलाष्टके व घोड्यांची नावे घालणे हे नागेशाचे स्वतःचे विशेष नव्हेतच मुळी.

विठ्ठलावर नागेशाचा परिणाम झालेला नाही हे जसे माझे एक विधान आहे, तसेच विठ्ठल बहुधा उसनवारीवरच भागवतो असेही माझे दुसरे एक विधान आहे. केवळ नागेशाचे काव्य विठ्ठलाच्या सीता-स्वयंवरानंतरचे अथवा विठ्ठलाने नागेशाचे काव्य पाहिले नाही एवढे म्हणून स्वतः माझेच समाधान होण्यासारखे नाही. म्हणून विठ्ठल-नागेशांत जी जी साम्यस्थळे आढळतात त्यांची मूलस्थाने वा तत्सदृश स्थाने मला इतरत्र धुंडाळावी लागली आहेत. प्रा. पंगूंनी विठ्ठलाने नागेशाचे सीता-स्वयंवर पाहिले असले पाहिजे या आपल्या विधानास उपोद्बलक म्हणून जे चौदा मुद्दे पुढे आणले आहेत त्यांचा– ते अत्यंत गौण आहेत असे माझे मत असले तरी– आता क्रमशः विचार करू.

( १ ) जनकाकडून स्वयंवराची आमंत्रणपत्रिका आल्यानंतर विश्वामित्राने राम-लक्ष्मणांना अयोध्येस परत जाण्यास सांगितले, असे विठ्ठल-नागेश लिहितात. याबद्दल समाधानकारक आधार मला मिळालेला नाही. पण तरीही या साम्यस्थळाबद्दल काही थोडे लिहिता येण्यासारखे आहे.

विश्वामित्राने केवळ मखरक्षणार्थच राम-लक्ष्मणांना आणले होते. तेवढे काम होताच त्यांना इतरत्र गुंतविणे इष्ट नव्हे असे त्याला वाटणे साहजिक आहे. राम-लक्ष्मणांना तेथे न्यावे असे त्याला मनातून वाटत असले तरी रामाला जाऊ देताना दशरथाने केलेली खळखळ त्याने पाहिलेली होती. तेव्हा विठ्ठलाच्या विश्वामित्राचे उद्‌गार तसे अप्रस्तुत वा अस्वाभाविक वाटत नाहीत. पराक्रमी व दशरथप्रिय रामाने मग "राजा न कोपे अणुमात्र कांही ( २–९ )" असे विश्वासाने सांगून 'भूमंडळींचे क्षितिपाळ' पाहण्याची इच्छा व्यक्त करावी हा भागही नैसर्गिक वाटतो. हा भाग विठ्ठलाने कोठून घेतला हे समजत नाही; पण तो त्याच्या या कथानकात सुंदरपणे बसतो यात शंका नाही.

पण नागेशाचे तसे नाही. राम-लक्ष्मण विश्वामित्राकडे यज्ञसंरक्षणार्थ आले होते वगैरे पूर्ववृत्त सांगण्याची गरज नागेशाला मुळीच वाटत नाही ! त्याचा

...संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ४८७२० दि: ...
...२०२८ ... नों. दि. ...

विश्वामित्र राम–लक्ष्मणांना " दोघी जनीं स्वीय गृहासि जावें ( ६२ ) " अशी आज्ञा फर्मावितो. उत्तरादाखल त्याच्या रामाने मोठे मासलेवाईक उद्गार काढले आहेत. राम म्हणतो, "...कशी असे सुलोचनी, पडेल येहि लोचनीं ( ६४ )." रामाचा हा नागेशाने सुचविलेला धीटपणा विठ्ठलाच्या राजपुत्र-सुलभ क्षितिपालदर्शनोत्सुक कुतूहलापेक्षा अगदी निराळ्या जातीचा नाही काय ?

विठ्ठलात आढळणाऱ्या या सुंदर व स्वाभाविक प्रसंगाचा नागेशाने आपल्या वृत्तीला अनुरूप बदल करून प्रस्तुत अनुवाद आणि विपर्यास केला असेल काय ? [ हा प्रसंग रंगवताना दोघांच्याहीपुढे जनीजानर्दनांचे " जानकीसैंवर " असावे. ]

**( २ ) विजया हे जानकीच्या दासीचे नाव.** ' सखी विजया उत्तमा ' ( स. ४–४५ ) असा विजया या दासीनामाचा उल्लेख वेणाबाईने केला आहे. [ कुमारसंभवात पार्वतीच्या दासीचे नाव ' विजया ' आहे. –सर्ग ८, ४९ व ९० ]. नागेशाने ' जया ' असे दुसरेही दासीनाम ( १९३ ) वापरले आहे. वेणाबाई–विठ्ठलांत जया नाही. [ जनीजनार्दनांच्या " जानकी-सैंवरां "त जया व विजया अशी सीतेच्या दासींची नावे आहेत. ]

**( ३ ) अश्वनामे देण्याची तऱ्हा** नागेशापासूनच विठ्ठलाने घेतली असली पाहिजे, मुक्तेश्वराच्या अनुपलब्ध काव्यावर भिस्त न ठेवता ' स्थितस्य गति-श्चिंतनीया ' असे प्रा. पंगूंना वाटते. राजव्यवहारकोशात व विठ्ठलात न आढळ-णाऱ्या घोड्यांच्या सात जाती ज्या अर्थी नागेशात आढळतात, त्या अर्थी त्याचे सीतास्वयंवर या दोन्ही ग्रंथांनंतरचे असावे असे मला वाटते. मुक्ते-श्वराच्या अनुपलब्ध काव्याचा विचार करावयाचा नसेल तर विठ्ठलाने ही नावे राजव्यवहारकोशावरून घेतली असावीत असे म्हणता येईल; कारण विठ्ठलाने वापरलेली सारीच नावे सदर कोशात आहेत.[1]

विठ्ठलाने घोड्यांचा उल्लेख दशरथसेनेचे वर्णन करताना केला आहे. नागेशात मात्र सीतेची दासी ही माहिती सीतेला देते. विठ्ठलाची स्वाभा-विकता व योजकता नागेशात नाही. नागेशाने मुद्दाम तर जागा बदलली

---

१. तऱ्हाच पहायची तर ' संतोष मुनि कृष्णदासा 'च्या ' रुक्मिनी–सैंवरा 'त पहावी.

नसेल ? ही नावे म्हणजे ‘ विठ्ठलात भर घालून नागेशाने वाढविलेली आवृत्ती ’ वाटत नाही काय ?

( ४ ) नागेशाने देवतांना उद्देशून जशी मंगलाष्टके रचिली तशीच विठ्ठलानेही रचिली, तपशिलात जाण्याचे कारण नाही, वामन–वेणाबाईंची मंगलाष्टकाची पद्धती भिन्न आहे, विठ्ठलाच्याच रुक्मिणीस्वयंवरात देवतांना उद्देशून मंगलाष्टके नाहीत म्हणून रुक्मिणीस्वयंवर रचताना विठ्ठलास ‘ नागेशाचे काव्य पाहता आले नसावे, व ते त्याने आपले सीतास्वयंवर रचताना शेवटी पाहिले असावे ’ असे प्रा. पंगूंचे मत आहे.

कोणतेही संशोधकी विधान करताना तपशिलात शिरले पाहिजे असे मला वाटते.

वामन-वेणाबाईंचे उल्लेख केवळ मंगलाष्टके काव्यात घालण्याच्या पद्धतीबद्दल होते. या ठिकाणी आणखी एक गोष्ट सांगतो की, ‘ आनंदरामायणा ’-तही सीता–रामविवाहप्रसंगी एक मंगलाष्टक आढळते ( सारकांड, तृतीय सर्ग, ३१६ ).

प्रा. पंगूंना विठ्ठलाचे रुक्मिणीस्वयंवर नागेशाच्या सीतास्वयंवरापूर्वी रचले गेल्याचे मान्य आहेच. तेव्हा या ठिकाणी त्यांनी घेतलेले दोन्हीही आक्षेप कसे फोल आहेत हे सांगणे सुलभ झाले आहे.

विशिष्ट देवतेचे वर्णनच पाहिजे असेल तर विठ्ठलाच्या रुक्मिणीस्वयंवरातील पुढील मंगलाष्टक पहावे—

“ श्रीवत्सांकित भूषणें तुळसिचीं, आपाद माळा रुळे,
माथां रत्नकिरीट, कौस्तुभ गळां, सूर्यप्रभे नातुळे; ।
केयूरांगद कुंडलें सुरशना हस्तांबुजीं आयुधें,
लक्ष्मीयुक्त मुरारि तो वधुवरां कुर्वंतु वो मंगलम् ॥ २१ ॥ ”
( स. ७ )

वरील चतुर्थ चरण व नागेशाच्या सीतास्वयंवरातील ४११ व्या श्लोकाचा ‘ तो लक्ष्मीसहवर्तमान, सकळं कुर्यात् सदा मंगळं ’ हा चौथा चरण यांची तुलना करण्यासारखी आहे. आणि ‘ कुर्यात् सदा मंगलम् ’ असा वाक्यप्रयोगच हवा असेल तर विठ्ठलाच्या रुक्मिणीस्वयंवराच्या सातव्या सर्गातील

३२ ते ३८ ही सात मंगलाष्टके पहावीत. तेव्हा यावरून नागेशच विठ्ठलाचा ऋणी आहे असे म्हणता येणार नाही काय ?

( ५ ) स्वयंवरार्थ जमलेल्या राजांची यादी देणे हा संस्कृत व प्राचीन मराठी कवींचा एक संकेतच आहे. नागेशाने उल्लेखिलेल्या मराठा राजांची नावे विठ्ठलात नाहीत असे मी मागे म्हटलेच आहे. याव्यतिरिक्त नागेशाने दिलेली व विठ्ठलातही आढळणारी राजांची नावे इतरत्र संस्कृत व मराठी काव्यांत आढळतात.

( ६ ) स्वयंवरार्थ जमलेली राजसभा माडीवरून पाहणारी सीता विठ्ठल–नागेश सोडल्यास अन्यत्र आढळत नाही हे प्रा. पंगूंचे विधान बरोबर नाही. अशी सीता खालील निदान दोन ठिकाणी आढळते—

( अ ) “ ...एतस्मिन्नंतरे सर्वाः सुमेधाद्याः स्त्रियश्च ताः ।। ९७ ।।
गवाक्षजालरन्ध्रैश्च प्रासादोपरि संस्थिताः ।
ददृशुः सुकुमारांगं रामं पंकजलोचनम् ।। ९८ ।।
...एतस्मिन्नंतरे सीता रामं दृष्ट्वा सभांगणे ।
दिव्यप्रासादसंरूढा सखीभिः परिवेष्टिता ।। १११ ।। ”

—आनंदरामायण, सारकांड, तृतीय सर्ग.

( आ ) “ तंव ते रत्नमणींचें मंदिर । नवखणाचें दामोदर ।।
लक्षानलक्ष जाळांधर । सूक्ष्म दृष्टि परभासे ।। ४२ ।।...
तेथे पाइरिया त्या साधका । येकाहूनि येक अधिका ।।
चढे चढे मंगळिका । अष्ट जिनसी सारुनी ।। ४४ ।।
नवमे खणीं मनोरमा । जानकी पाहों आली रामा ।।
सखी विजया उत्तमा । तिसी बोलती जाली ।। ४५ ।। ”

—वेणाबाईकृत सीतास्वयंवर, समास ४.

( ७ ) स्वयंवरासाठी जमलेल्या लोकांत अनेक पेशांचे व जातींचे लोक दोघांनी उल्लेखिले आहेत. अशा वर्णनाची तऱ्हाच पाहायची झाली तर वेणाबाईच्या सीतास्वयंवरातील तिसऱ्या समासाच्या १० ते १६ व ८१ ते

८८ या ओव्या पाहाव्यात. शिवाय विठ्ठलाच्या सीतास्वयंवरातील ( स. ३–२७, २८ ) वर्णनाप्रमाणेच त्याच्याच रुक्मिणीस्वयंवरातील ( स. १ ) पुढील श्लोक पाहावेत—

“ मुमुक्षु तडितापडी जटिल कंदमूलाशनी
दिगंबर शिवालयीं धरुनि बैसले आसनीं, ।
उपासक उपासना धरुनि राहिले साधनीं,
अखंड मठमंडपीं वसति मंत्र आराधनीं ।। ३७ ।।

वेदांती अग्निहोत्री भट गणक महावैद्य गोपाळ मंत्री,
संन्यासी पाणिपात्री जपति हरि मुनी द्वारका मोक्षदात्री, ।
सद्विद्याभ्यास रात्रिंदिवस गुरुमुखें साधिती सांख्यशास्त्री,
निर्वैरें पुण्य धात्री वसति जन सुखें अर्जिती कृष्णमैत्री ।। ४२ ।।

व्यव्हारे जन उदिमी सराफ चाटे
सर्वांतें शतमखसौख्य तुच्छ वाटे; ।
इत्यादि द्विज नृप वैश्य शूद्र पाहे
स्वानंदें वसति, म्हणा ‘ प्रहर्षिणी ’ हे ।। ४४ ।। । ”

( ८ ) नागेशाचा ‘ कोंकणस्थ ’ नृपतीचा ( २६९ ) आणि विठ्ठलाचा ‘ कोंकण ’प्रभूचा उल्लेख ( ४–१६ ).

‘ कंकणदेशी महावीर ’ ( सी. स्व. ३–९० ) हा वेणाबाईचा उल्लेख कोकण देशाच्या राजाबद्दलच नाही काय ? नरेन्द्र या महानुभाव कवीच्या रुक्मिणीस्वयंवरात पश्चिम दिशेच्या राजांच्या वर्णनात ‘ गंध सुगंध क्षेत्री ( क्षत्रिय ) कोंकणे ( २७६ )’ असा निर्देश आहे. कोकण देश व तेथील राजे ही बाब अर्थातच पुष्कळ जुनीपुराणी आहे. मला आठवले तेवढे उदाहरण येथे दिले आहे.

( ९ ) वाणीला आवाहन. वाणीला आवाहन करताना नागेशाची भूमिका पश्चात्तापाची व क्षमायाचनेची आहे. विठ्ठलाची तशी नाही. शिवाय अनेक कवी वाणीला आवाहन करतात. हाही एक संकेतच आहे. वेणाबाईने

केलेले आवाहन उदाहरणादाखल पहा—

" मंगळोत्छाव वाग्देवते । तां वदावें रसाळ कथे ॥
श्रोतया वक्तयाचे माथे । आनंदें डोलवी ॥ ६ ॥ स. १ ॥ "

—सीतास्वयंवर.

( १० ) धुळीने सूर्य आच्छादणे ही कल्पना दोघांतही असणे ( ना. १७३, वि. ६–२६ ). धुळीने आकाश वा सूर्य व्यापणे, धुराने सूर्यबिंब न दिसणे या कल्पना इतक्या सर्वसामान्य आहेत की येथे अमक्याचा तमक्यावर परिणाम झाला आहे असे कसे म्हणता येईल ? तरी पण उदाहरणे देतो—

" रजोभिः स्यंदनोद्धूतैर्गजैश्च घनसंनिभैः ।
भुवस्तलमिव व्योम कुर्वन्व्योमेव भूतलम् ॥ २९ ॥ "

—रघुवंश, स. ४.

" झालासे भडमार, उद्भटबृहद्यंत्राग्निधूमें दिशा ।
वर्णें धूसर, सूर्यबिंब न दिसे, भ्रांतासि भासे दृशा ॥ २ ॥ "

—विठ्ठलकृत रुक्मिणीस्वयंवर, स. ५.

( ११ ) व ( १४ ) दोघांत आलेल्या समान यमकांची तीन उदाहरणे प्रा. पंगू देतात. विठ्ठलाच्या ( ३६३ × २ = ) ७२६ व नागेशाच्या ( ४१५ × २ = ) ८३० यमकांमधून प्रा. पंगूंनी तीन साम्यस्थळे शोधून काढली आहेत. पण ' सज्जनांचे – सज्ज नाचें ' ( ना. ८, २९६ ) अशा प्रकारचे यमक विठ्ठलात नाहीच. ' न तोले – काय बोले ' हे यमक ( ना. ३६८, वि. ३–४९ व ४–३६ ) इतके सामान्य, साधे व क्षुद्र आहे की, असले यमक लक्षात ठेवून काव्य रचण्याइतके विठ्ठल व नागेश हे दोघेही भाषादृष्ट्या दरिद्री खास नाहीत. ' निशाणें – सारुनिशाणें ' ( ना. १७१ ) व ' करूनिशानें – निशानें ' ( वि. ६–२९ ) या तिसऱ्या यमकाला ( १४ वा मुद्दा ) किती महत्त्व द्यावे याचाही फारसा विचार

करायला नको. नागेशात ‘ सारुनि ’ व ‘ शाणे ’ हे दोन निरनिराळे शब्द आहेत. (‘ सारुनिशानें ’ व ‘ निशानें ’ असे हे यमक असते तर गोष्ट निराळी. ) विठ्ठलात मात्र ‘ करूनिशानें ’ हा एकच शब्द असून तो ग्रामीण बोलीतील आहे. शिवाय ‘ णे ’ व ‘ ने ’ हा अक्षरांतील फरकही लक्षात घ्यायला काय हरकत आहे? कारण नागेशाच्या ‘ णे ’मुळेच ‘ सारुनि ’ व ‘ शाणे ’ हे दोन भिन्न शब्द झाले व ‘ सारूनिशाने ’ याहून अर्थभिन्नत्वही आले.

( १२ ) शिवधनुष्य उचलणाऱ्या रावणाचे वर्णन करताना दोघांनीही ‘ मांडखुटी ’ असा एकच शब्द वापरणे. यमकांची जी कथा तीच या शब्दाची. एवढ्या मोठ्या काव्यांतून प्रा. पंगूंना हा एकच समान शब्द आढळला. पण तेवढ्यावरून कोणी तरी कोणाचे तरी काव्य पाहिले होते असे म्हणता येणार नाही. शिवाय दोघांपैकी कोणीही हा शब्द बनविलेला नाही. श्रीगोविंदप्रभुचरित्र या पुस्तकात ( लीळा १०८ ) हा शब्द आला आहे त्यावरून तो यादवकालापासून रूढ होता असे म्हणता येते. फार तर विठ्ठल व नागेश समकालीन व एकाच प्रदेशातील होते असे या शब्दाधारे म्हणता येईल.

( १३ ) ‘तगटी निशाणां ’चा दोघांकडून ( ना. १७१, वि. ६–२९ ) झालेला उल्लेख. यांचा उल्लेख सामराजाच्या रुक्मिणीहरणात ‘ तें आतपत्रादिक राजचिन्हें । शोभेति तैसीं तगटीं निशाणें ’ ( ७–५३ ) असा आढळतो. स्वारीच्या वा नगरीच्या वर्णनात यांचा निर्देश येणे स्वाभाविक नाही काय ?

प्रा. पंगूंनी दाखविलेल्या या साम्यस्थलांव्यतिरिक्त आणखीही काही साम्यस्थळे मी दाखवू शकेन. पण असल्या साम्यांना फारसे महत्त्व देता येत नाही असे माझे मत असल्याने प्रारंभी मी त्यांवर लिहिले नव्हते. कथा–कीर्तन–प्रवचनांचे प्राचुर्य, कवींचे समकालीनत्व अन् विषयाचे एकत्व यांमुळे साम्ये आढळणे शक्य आहे एवढेच फक्त म्हटले होते. प्रा. पंगूंना ही महत्त्वाची वाटल्याने हा आणखी तपशील लिहावा लागला.

विठ्ठलाने नागेशाचे काव्य पाहिलेले नाही हे माझे ठाम मत आहे. त्याबरोबरच नागेशाने[1] मात्र विठ्ठलाचे काव्य वाचले असावे असे मला वाटते. तेव्हा कालविसंवाद टाळण्यासाठी नागेशकृत सीतास्वयंवराला पुन्हा मागे रेटण्यापेक्षा त्याला आणखी थोडे पुढच्या काळात आणून विठ्ठलावर त्याचा परिणाम झाला आहे ही मिथ्या कल्पना सोडून देणेच अधिक रास्त होईल.

---

१. ‘ मोरोपंत चरित्र आणि काव्यविवेचन ’ या ग्रंथात एकविसाव्या प्रकरणात ( पृ. ५३४ ) पांगारकर एका ‘ नागकवी ’ची माहिती देताना लिहितात– “ नागकवि ( नागोजी शिवदेव तोतडे, प्रवरातीरवासी ) याने शके १६१६ मध्ये सीतास्वयंवरनामक सुंदर काव्य रचिले.” या ग्रंथातील म्हणून यमकाची जी चार उदाहरणे पांगारकरांनी उद्धृत केली आहेत ती नागेशाच्या सीतास्वयंवरात ( १ ) श्लो. ४ चा पूर्वार्ध व ७ चा पूर्वार्ध, ( २ ) २८ चा पूर्वार्ध, ( ३ ) श्लोक ३३ व ( ४ ) श्लोक ३६ येथे आहेत. पण पांगारकरांनी दिलेले कवीचे समग्र नाव चंद्रावळीकर्त्या नागेशाच्या नावाशी जुळत नाही. यामुळे पांगारकरांनी दिलेली माहिती गोंधळात टाकणारी आहे. कै. आजगावकर, भावे, पंगू शके १६१६ मधील ज्या प्रतीचा ( नक्कल ) उल्लेख करतात ती कोणती ?

मोर जोशास ( नागेशाचा पिता ) ज्या यशवंतराव कोकाट्याचा आश्रय होता असे नागेशाने म्हटले आहे त्या कोकाट्याचा निर्देश शाहिस्तेखान पुण्यास आल्यावेळी त्याच्याबरोबर जे सरदार होते त्यांच्या यादीत ‘ युगप्रवर्तक शिवाजी ’ या पुस्तकात वा. कृ. भावे यांनी केला आहे.

: २ :

# मुक्तेश्वरचरित्राविषयी पुनर्विचार

कविवर्य मुक्तेश्वराच्या चरित्राविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. खुद्द मुक्तेश्वराने ठिकठिकाणी जी आत्मपर हकीकत नमूद केली आहे तिच्या अर्थाविषयी संशोधकांत मतभेद आहेत. हे विवाद्य प्रश्न मुख्यतः पुढील होत.—

(१) मुक्तेश्वराचा गुरू कोण ?

(२) मुक्तेश्वराच्या मातापित्यांची नावे किती व कोणती ?

(३) मुक्तेश्वर हे कवीचे जन्मनाम की मुद्रानाम ?

(४) मुद्‌गल हे मुक्तेश्वराचे जन्मनाम की उपनाम ?

या सर्व प्रश्नांचा विचार करून पूर्व संशोधकांच्या मतांवरील टीकेसह प्रा. प्रियोळकरांनी आदिपर्वाच्या प्रस्तावनेत आपली मते जोरदारपणे पुढे आणली आहेत. आपल्या मतांवरील प्रतिकूल टीकांकडे दुर्लक्ष करणे, त्यांचा नामनिर्देशही न करणे ही प्रा. प्रियोळकरांची पद्धती संशोधनक्षेत्रात निरोगी-पणाची मानता येणार नाही. भले ते दुर्लक्ष करोत, पण सत्यसंशोधनासाठी विरोधी मत नोंदून ठेवणे आवश्यक आहे. म्हणूनच वरील चार प्रश्नांविषयीचे माझे विचार येथे मांडत आहे.

(१) **मुक्तेश्वराचा गुरू कोण**—मुक्तेश्वराचा गुरू 'लीलाविश्वंभर' ऊर्फ 'विश्वंभर' म्हणजे मुक्तेश्वराचा पिता किंवा कोणी मानवी व्यक्ती नसून खुद्द श्रीदत्तात्रेय ही देवता होय असे प्रा. प्रियोळकर म्हणतात. त्यांच्या विवेचनाचा रोख असा—सभापर्वाच्या उपसंहारात 'तो मुद्‌गल चिंतामणीसुत । लीलाविश्वंभर जगविख्यात' असा पाठ पूर्वी मानला गेला होता. हा पाठच 'लीलाविश्वंभर' म्हणजे मुक्तेश्वराचे आईवडील या कल्पनेच्या मुळाशी आहे असे त्यांना वाटते. या कल्पनेच्या खोटेपणाची शंका प्रथम बा. अ. भिडे यांना आली होती; पण त्यांच्याजवळ स्वतंत्र

पुरावा नव्हता. हा पुरावा वरील ओवी–अर्धाच्या शुद्ध पाठाच्या रूपाने प्रियोळकर पुढीलप्रमाणे देतात,—

“ तो मुद्‌गल चिंतामणिसुत । लीलाविश्वंभरानुग्रहीत ।
व्यासभारतींचा अर्थ । महाराष्ट्र बोलिला ॥ ”

या शुद्ध पाठावरून ‘ लीलाविश्वंभर ’ हे चिंतामणीचे ( मुक्तेश्वराच्या वडिलाचे ) दुसरे नाव या कल्पनेचा आधारच नष्ट होतो असे सांगून लीलाविश्वंभर म्हणजे मग अन्य कोण या संशोधनाकडे ते वळतात.

मुक्तेश्वर जेव्हा ‘ विश्वंभर ’ किंवा ‘ लीलाविश्वंभर ’ म्हणून नमन किंवा निर्देश करतो, त्या वेळीं त्याच्यापुढे कोणतीही मानवी व्यक्ती असेल असे त्यांना वाटत नाही. ते म्हणतात, “ विश्वंभराच्या किंवा लीलाविश्वंभराच्या परब्रह्मस्वरूपाची मुक्तेश्वर दोन प्रकारे कल्पना करतो. पहिले पंचायतनस्वरूप व दुसरे त्रिमूर्तिस्वरूप. त्रिमूर्तिस्वरूप हाच मुक्तेश्वराचा खरा लीलाविश्वंभर होय. लीलाविश्वंभर म्हणजे दत्तात्रेय हे त्याने वारंवार ठिकठिकाणी सांगितले आहे.”

मुक्तेश्वर दत्तोपासक होता, एकनाथाचा गुरू जनार्दन श्रीदत्तात्रेयाला गुरू मानी, देवालाच गुरू मानण्याचा प्रघात एकनाथाचा होताच, यावरून मुक्तेश्वराने दत्तात्रेयाला गुरू मानावे हे प्रियोळकरांना स्वाभाविक वाटते. पुढे ते लिहितात, “ मुक्तेश्वराच्या पूर्वी विश्वंभर किंवा विशेषतः लीलाविश्वंभर ही संज्ञा श्रीदत्तात्रेयाला लावता येत असे, असे जर निश्चितपणे दाखविता आले तर ‘ लीला ’ ही मुक्तेश्वराची आई किंवा गुरुपत्नी होती, आणि ‘ विश्वंभर ’ हे त्याच्या बापाचे किंवा मानवी गुरूचे नाव होते ही लोकांच्या डोक्यातील भ्रामक कल्पना कायमची नष्ट करता येईल, अशी आशा आहे.”

दासोपंत गीतार्णवात आरंभी दत्तात्रेयास ‘ विश्वंभर ’ म्हणतो. ‘ श्रीदासोपंताची पदे ’ या ग्रंथातील २९२, १३९४, १३८९ व १५९१ ह्या चार पदांतील काही भाग प्रा. प्रियोळकरांनी प्रस्तावनेत उद्‌धृत केला आहे. या सर्व पदांतील ‘ लीलाविश्वंभर ’ या शब्दाचा अर्थ दत्तात्रेयच आहे यात

शंका नाही. ब्र. टेंभेस्वामी ऊर्फ वासुदेवानंदसरस्वती यांनी दत्तात्रेयाच्या सहाव्या अवतारातील नाव ' लीलाविश्वंभर ' होते असे म्हटले असल्याचा आधारही प्रियोळकर देतात. एवंच, लीलाविश्वंभर म्हणजे दत्तात्रेय हाच मुक्तेश्वराचा गुरु असा त्यांचा निर्णय आहे.

**मुक्तेश्वराचा गुरू श्रीदत्तात्रेय नव्हे.** पारमार्थिक गुरुशिष्यसंबंधात गुरूचे वर्णन परब्रह्म, परमेश्वर वा उपास्य दैवत म्हणूनच केले जाते. सर्वच शिष्यांची भूमिका

' गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुरेकः परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ '

अशी असते. त्या बोलण्यावरून प्रत्यक्ष एखाद्या देवतेनेच त्या व्यक्तीस अनुग्रह दिला होता असे मानणे चुकीचे ठरेल. ' यदक्षरमनाख्येयमानंदमज-केवलं । श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं दैवतमाश्रये ॥ १ ॥ ' असे ज्ञानेश्वरांनी आपले गुरु निवृत्तिनाथ यांचे वर्णन अमृतानुभवाच्या प्रारंभी केले आहे. याच भावनेने स्वतः दत्तोपासक असल्यामुळे मुक्तेश्वर आपल्या गुरूचे श्रीदत्तात्रेय म्हणून अनेक ठिकाणी वर्णन करतो. " गुरू व उपास्य यांची अभिन्नता हे गुरुपरंपरेचे वर्म ध्यानी आणता लीलाविश्वंभरपदाने गुरूचा व दत्ताचा उल्लेख मुक्तेश्वराने केला आहे." हे पांगारकरांचे मत अगदी बरोबर आहे. शिवाय आपल्यास अनुकूल तेवढी स्थळेच निवडून तेवढ्या-वरून दत्तात्रेय हाच मुक्तेश्वराचा गुरु मानण्यात प्रियोळकरांची मोठी फसगत झाली आहे.

आपल्या गुरूचे देवतेप्रमाणे वर्णन करताना मुक्तेश्वरात एकसारखेपणा नाही. केव्हा तो गुरुस्वरूपाची कल्पना पंचायतन-स्वरूपात करतो तर केव्हा त्रिमूर्तिस्वरूपात करतो, तर अनेकदा दत्तात्रेय म्हणूनच करतो. मुक्तेश्वराचा दत्तात्रेय जसा शिवस्वरूपी आहे तसाच ' गुरुचरित्रा 'तही काही ठिकाणी ( अ. ४४-२७, ५१-५४ ) आढळतो. गुरूचे वर्णन करताना दत्तात्रे-याच्या एका विशिष्ट रूपाचेच वर्णन मुक्तेश्वरात नाही. मुक्तेश्वराला देवाने खरोखरच अनुग्रह दिला असता तर तो ज्या स्वरूपात दिला असता त्या

विशिष्ट स्वरूपाचे एकदा तरी भरघोस वर्णन मुक्तेश्वराने केले असते व त्याच वर्णनाची पुनरुक्ती टाळणे मग त्याला अशक्य झाले असते. पण तसा प्रकार नाही आपल्या मानवी गुरूचे दत्तात्रेयाच्या निरनिराळ्या स्वरूपांत वर्णन करणे एवढाच मुक्तेश्वराचा उद्देश आहे. प्रियोळकर एका ठिकाणी लिहितात, “ शिवाय देवालाच गुरू मानण्याचा प्रघात एकनाथाचा होताच. पांडुरंगाला व गजाननालाही त्याने सद्‌गुरू म्हटले आहे ( शोध पृ. १५ )”. हे खरे असले तरी एकनाथांचा गुरू पांडुरंगही नव्हे किंवा गजाननही नव्हे. त्याचप्रमाणे दत्तात्रेय हाही मुक्तेश्वराचा गुरू नव्हे.

हीही गोष्ट तितकीच किंबहुना अधिकच महत्त्वाची आहे की सर्वच ठिकाणी गुरूचे वर्णन देवतास्वरूपात मुक्तेश्वराने केलेले नाही. गुरू व उपास्य देवता ( दत्तात्रेय ) यांच्यांत स्पष्टपणे भिन्नता दर्शविणारी अनेक स्थळे मुक्तेश्वरात आढळतात.

‘ ॐ नमो लीलाविश्वंभर स्वामी । तुझिये स्वरूपपरब्रह्मीं ।
पंचायतन पंचनामीं । कल्पिजेती अवयव ।। १ ।। आदि. अ. १।। ”

देवतेला ‘ स्वामी ’ म्हटले जात नाही. तसेच येथे ‘ कल्पिजेती ’ हे क्रियापद महत्त्वाचे आहे. लीलाविश्वंभरस्वामीच्या स्वरूपात पंचायतन कल्पावे किंवा कल्पिले जाते असेच मुक्तेश्वर म्हणतो. म्हणजेच त्याच्या गुरूचे वास्तविक स्वरूप तसे नाही.

विराटपर्वाच्या उपोद्‌घातात मुक्तेश्वर म्हणतो—

“ जो श्रेष्ठ बोलिजे श्रेष्ठीं । तो बैसोनी मायादेवीच्या पाठीं ।
ब्रह्मा विष्णु महेश पोटीं । जन्मविलीं बाळकें ।। १ ।।

कवतुकार्थ ठेवुनी नांवें । रंजवी साकारतेच्या भावें ।
अव्यक्तपालखीं स्वभावें । थापडोनी पहुडवी ।। २ ।।

तया आदिपुरुषा, स्वामी । लीलाविश्वंभर गुरुनामीं ।
नमस्कारोनी मनोधर्मीं । सावध म्हणे श्रोतया ।। ३ ।। ”

"लीलाविश्वंभर स्वामी या गुरूच्या नावात त्या आदिपुरुषाला ( पहिल्या दोन ओव्यांतील त्रिमूर्ती दत्तात्रेयाला किंवा परमेश्वराला ) मनोभावाने नमन करून श्रोत्यांना 'सावध' म्हणत आहे" हा तिसऱ्या ओवीचा अर्थ आहे. येथे 'लीलाविश्वंभरस्वामी' व 'आदिपुरुष ( त्रिमूर्ती दत्तात्रेय किंवा परमेश्वर )' हे भिन्न होत हे अगदी स्पष्ट आहे.

आता मुक्तेश्वराने दर्शविलेली अभेदभक्ती पहा—

"ॐ नमो विश्वंभरा देवा । अभेदभावें तुझी सेवा ।
तूंच विश्वाससी जीवा । प्रतीति बाणे निधारें ॥ १ ॥ वन. अ. १॥"

"म्हणवुनी देवतारूपें वहिला । एक गुरुचि म्यां स्तविला ।
अभेदभक्तीचेनि भुलला। आज्ञापितु निजमुखें ॥४१॥आदि.अ.१॥"

ही 'अभेदभक्ती' ( गुरू व उपास्य एकच होत ही भावना ) मुक्तेश्वराने अनेक ठिकाणी प्रकट केली आहे. भेद असल्याशिवाय अभेदभक्तीला जागाच नाही. म्हणजेच गुरू व देवता यांच्यांत भिन्नत्व आहे. याविषयी बा. अ. भिडे लिहितात, " आपला गुरू 'विश्वंभर' किंवा 'लीलाविश्वंभर' यास दत्तावतार समजून किंवा त्याचा दत्ताशी अभेद कल्पून त्यास एकनिष्ठेने नमन केल्याचा, त्याची कृपा याचिल्याचा किंवा त्यास ग्रंथ अर्पण केल्याचा उल्लेख मुक्तेश्वरी ग्रंथांत असंख्य वेळा दिसून येईल ( मुक्तेश्वर पृ. ५, आ. २ री )."

वनपर्वाच्या ८ व्या अध्यायातील पुढील ओवी तर या बाबतीत निःसंदिग्धपणे निर्णायक स्वरूपाची आहे.—

"लीलाविश्वंभर ईश्वरू । कविगुरूचा आदिगुरू ।
त्याचेनि प्रसादें मुक्तेश्वरू । निरोपीतसे संतांतें ॥ २२५ ॥ "

हा उल्लेख एकनाथांच्या "माझे निजगुरूचाही गुरू। श्रीदत्त परम गुरू" ( भागवत अ. २३–१००० ) या उल्लेखाप्रमाणे सुस्पष्ट नाही काय ? 'लीलाविश्वंभर ईश्वरू' म्हणजे येथे दत्तात्रेय असून तो 'कविगुरूचा

आदिगुरू ' असे मुक्तेश्वर स्वच्छ म्हणतो. आता हा ' कविगुरू ' ' आदिगुरू लीलाविश्वंभर ईश्वरू ' म्हणजे दत्तात्रेय याहून वेगळा नाही काय ? हे एकच स्थळ प्रियोळकरांच्या एतद्विषयक लिखाणाचे पूर्ण खंडन करण्यास समर्थ आहे. मुक्तेश्वराने केलेल्या या निःसंदिग्ध उल्लेखाकडे आतापर्यंत कोणाचे लक्ष जाऊ नये हे मोठेच आश्चर्य होय.

ज्या एका ओवी-अर्धाचा निर्देश वारंवार होतो तो ' तो मुद्गल चिंतामणिसुत । लीलाविश्वंभरानुग्रहीत ' ( सभा. उपसंहार ३ ) हा होय. ' लीलाविश्वंभरानुग्रहीत ' हा आपण संपादिलेल्या ग्रंथात नमूद केलेला पाठभेद ' लीलाविश्वंभर विख्यात ' या पाठाऐवजी प्रा. पंगूंनी त्या वेळी का स्वीकारिला नाही समजत नाही. ' लीलाविश्वंभरानुग्रहीत ' असा शब्द वनपर्व १–१६४, ४–१६२, सभापर्व २–१३३ अशा आणखी काही ठिकाणी आढळतो. प्रियोळकरांनी यांतील दोन स्थळे (वन. अ. १, सभा. अ. २ ) नमूद केली आहेत. हा पाठभेद स्वीकारिला पाहिजे असे माझे मत असले तरी त्यामुळे लीलाविश्वंभर म्हणजे मुक्तेश्वराचे वडील चिंतामणी नव्हेतच असे ठरले पाहिजे असे नाही. मुक्तेश्वराचे वडील चिंतामणी हेच त्याचे गुरू लीलाविश्वंभर हे पुढील आधारांवरून पटावयाला हरकत नसावी.

**मुक्तेश्वराचे गुरू त्याचे वडीलच.** ' विश्वंभराच्या आरती'त शेवटी ' शरण मी तुज आतां । पायीं ठेवियला माथा । संतोषें सुत रक्षी । गुरु विश्वंभर नाथा ॥ ६ ॥ ' ( काव्यसं. मुक्तेश्वरकृत स्फुट काव्ये, पृ. २९४ ) अशी भाषा मुक्तेश्वर वापरतो. हा आधार देऊन मुक्तेश्वराचे वडील चिंतामणी ऊर्फ विश्वंभर हेच त्याचे गुरू होत असे पांगारकरांनी म्हटलेही आहे. ही आरती निश्चितपणे मुक्तेश्वराचीच असे बा. अ. भिडे मानीत नाहीत. या आरतीच्या मुक्तेश्वरकर्तृकत्वाविषयी प्रियोळकरांनाही शंका आहे. ते लिहितात, " या आरतीचा कवी म्हणून मुक्तेश्वराचे तीत नाव नाही. विश्वंभराला ती उद्देशून आहे म्हणून ती मुक्तेश्वराच्या नावावर घातली आहे एवढेच " ( शोध, पृ. २९ टीप ). तथापि अधिक शोध व्हायला हवा असेही ते म्हणतात. शिवाय मुक्तेश्वराच्या उपलब्ध वाङ्मयाची त्यांनी

जी यादी दिली आहे तीत या आरतीचा समावेश ( शोध, पृ. ३० ) आहे, हेही लक्षात घ्यावे. या आरतीत शेवटी ‘ सुत ’ शब्द आल्याने ‘ मुक्तेश्वर ’ हे आपले नाव घालण्याची कवीला आवश्यकता वाटली नसावी. ‘ मुक्तेश्वर ’ अशी शेवटी मुद्रा नसलेले काही अध्याय मुक्तेश्वरी भारतातही आढळतातच. तसाच प्रकार येथेही असावा. अन्य उल्लेखांनीच अशा ठिकाणचे मुक्तेश्वरकर्तृकत्व मान्य करावे लागते. ‘ एकनाथ-चरित्रा ’चा आरंभ मुक्तेश्वराने असा केला आहे—

“ ॐ नमो जी ! विश्वंभरू । तो देव दत्तात्रय जगद्‌गुरू ।
जनार्दना अभयकरू । कटाक्षेंसी बाणला ॥ १ ॥

त्याचे चरणीं एकनाथें । सुमन ठेविलें पुरुषार्थें ।
सेवा आरंभिली भावार्थें । ‘ जनी जनार्दन ’ म्हणवुनी ॥ २ ॥ ”

येथे ‘ दत्तात्रय → जनार्दन → एकनाथ ’ अशी एकनाथांची गुरुपरंपरा त्याने दिली आहे. याच काव्याच्या अखेरीस तो लिहितो—

“ एका जनार्दनीं स्वार्थ । मुक्तेश्वराचा मुख्य परमार्थ ।
धरूनि मूळचें सूत्र । लीलाविश्वंभर म्हणाविलें ॥ ९१ ॥...

चरित्र देखोनि मुक्तेश्वर । बोलिले देवभक्ताचा विचार ।
सर्वही लीलाविश्वंभर । त्याचा पार तो जाणे ॥ ९४ ॥ ”

यांतील ९१ व्या ओवीचा अर्थ पुढीलप्रमाणे होईल असे वाटते.–‘ एका जनार्दनी ( ज्याचा ) स्वार्थ ( तोच ) मुक्तेश्वराचा मुख्य परमार्थ ( म्हणजे गुरू, त्याने ) मूळचे सूत्र ( गुरुपरंपरेचे ) धरून ( स्वतःला ) लीलाविश्वंभर म्हणविले.’ कर्तरी सुरुवात व कर्मणी अखेर अशी वाक्यरचना जुन्या वाङ्मयात आढळते. हा अर्थ मानिल्यास आद्यंतीच्या या ओव्यांवरून ‘ दत्तात्रय → जनार्दन → एकनाथ → लीलाविश्वंभर → मुक्तेश्वर ’ अशी ही मुक्तेश्वराची गुरुपरंपरा ठरते. भीमस्वामीने विश्वंभरास–मुक्तेश्वराच्या वडिलास–एकनाथापासून अनुग्रह मिळाल्याची हकीकत ‘ भक्त-

लीलामृता 'त सांगितली आहे– " विश्वंभर नामें विप्र एक आला। कोणी नाहीं त्याला मागेंपुढें ॥३॥...मोठे मोठे आले न देवोनि तयांसी । ( कन्या लीला ) देवोनिया यासी लग्न केलें ॥ ७ ॥ घरींच ठेविलें भजन-कीर्तन। अनुग्रह जाण दिला तया ॥ ८ ॥ " ( रामदास आणि रामदासी, भाग २ रा, आ. २ री, पृ. ८५ ). मुक्तेश्वराने वर दिलेल्या गुरुपरंपरेवरून भीमस्वामीची माहिती बरोबर दिसते. मुक्तेश्वराच्या वर दिलेल्या ९४ व्या ओवीच्या दृष्टीने मुकुंदराजकृत 'विवेकसिंधू 'च्या 'गुरुमाहात्म्यकथन' या अठराव्या प्रकरणातील पुढील ओव्या पाहणे इष्ट ठरेल.

" तैसा ईश्वरेंसीं गुरुशिष्यसंवादु । जयासि घडे दैवें सिद्ध ।
तो जाणावा प्रसिद्धु । ईश्वरअवतार ॥

यापरि शिष्यपरंपरा । ते जाणावे ईश्वरावतार ।
ज्ञानासि अंकुर टांकुर । आथीच ना ॥

असो हा मतिप्रकाशु । शिष्यें जाणावा गुरुवंशु ।
तेथें करावा विश्वासु । ईश्वरबुद्धि ॥ "

यांतील पहिल्या ओवीवर टीप देताना श्री. गो. रा. गोगटे लिहितात, " याप्रमाणे ईश्वरापासून एकाला व त्या एकापासून परंपरेने शिष्यप्रशिष्यांना ज्ञानप्रकाश मिळाला तर सगळेच ईश्वरावतार समजावे " यावरून ९४ व्या ओवीत मुक्तेश्वराने 'सर्वही लीलाविश्वंभर' असे का म्हटले आहे याचा उलगडा होतो.

याच संदर्भात आणखी एक ओवी नमूद करावी असे वाटते. वनपर्वाच्या आरंभी मुक्तेश्वराने एकनाथांस नमन केले आहे. प्रियोळकरांनी जुन्या हस्तलिखितांवरून या ओवीचा अन्य पाठ 'शोध' पृ. १५ वर दिला आहे तो असा– " मुक्तीश्वर एकनाथ । त्यांतें साष्टांग प्रणिपात । गुरुस्वामी म्हणोनि हेत । साष्टांग वंदावें ॥४॥ ". आदिपर्व अ. १–७७ 'येथे मातृजनक जनार्दनी । एकनाथ नमियेला' असा उल्लेख करून एकनाथांशी असलेले आपले व्यावहारिक नाते जसे मुक्तेश्वर सांगतो तसेच वनपर्वातील वरील

ओवीत नाथांशी असलेले आपले पारमार्थिक नाते ' गुरुस्वामी ' ( गुरूचा स्वामी–गुरू ) या षष्ठीतत्पुरुष समासाने तो उल्लेखितो असे दिसते.

' शुकरंभासंवादा 'च्या उपसंहारात मुक्तेश्वर 'चिंतामणी' चरणी सायुज्य-मुक्ती मागतो. पहा—

" जाणें नेणें मी यया । कळस वाहिला तृतीयोध्याया ।
ध्वज बांधिला दत्तात्रेया । दर्शनें मोक्ष जगातें ।। २ ।।
अर्चित कैवल्याचा दानी । यालागीं नाम चिंतामणी ।
सायुज्यमुक्ति तयाचे चरणीं । मुक्तेश्वर तेथें मागे ।। ३ ।। "

या तिसऱ्या ओवीत ' चिंतामणी ' या आपल्या पित्याच्या नावाचा निर्देश करून मुक्तेश्वराने त्यावर कोटीही केली आहे. दत्तात्रेयाचे चिंतामणी असे नाव कोठे असेल असे वाटत नाही. पण मग पित्याचे वर्णन ' अर्चित कैवल्याचा दानी ' असे कवीने का केले ? किंवा ' सायुज्यमुक्ति तयाचे चरणीं ' का मागितली ? या गोष्टी देवता व गुरू यांच्या बाबतींतच संभवतात. येथे दत्तात्रेय या देवतेचा काही संबंध नाही. अर्थातच मुक्तेश्वराचे वडील चिंतामणी हेच त्याचे गुरू असल्याने कवीने त्यांच्या चरणी सायुज्य-मुक्तीची मागणी केली आहे. तेव्हा मुक्तेश्वराच्याच लिखाणावरून त्याचे वडील चिंतामणी हेच त्याचे गुरू व चिंतामणीचेच नाव ' विश्वंभर वा लीला-विश्वभंर ' हे सिद्ध होते.

मुक्तेश्वराच्या वडिलांचे नाव ' विश्वंभर ' असेही होते असे या घराण्याच्या वंशावळीत नमूद आहे. मजकडे असलेली वंशावळ ता. २७-९-१८९९ रोजी कुरुंदवाडच्या 'हरिहर' प्रेसमध्ये छापून घेतली आहे. आपल्या ' शोधा 'त प्रियोळकरांनी वंशावळीचा कोठेच निर्देश केलेला नाही. वंशावळीवर त्यांचा विश्वास नाही की वंशावळ त्यांना मिळाली नाही ? छापील वंशावळ अशी—

श्रीमुक्तेश्वर माहाराज ( कवी व साधू ) यांचे घराण्याचा वंशवृक्ष

भुजंगपंत ( अत्रिगोत्री )
|
चिंतोपंत ( विश्वंभर ) ह्यांस श्रीएकनाथस्वामी पैठणकर यांणी आपली मुलगी गंगाबाई ( लीलाबाई ) दिली होती.
|
मुक्तेश्वरबुवा ( कवी व साधू )
|
निरंजन
|
आकाणा गोसावी
|
मुक्तेश्वरबुवा हे तेरवाड गांव इनाम संपादन करणार ( इ. स. १७२७ )

- निरंजन
- बकूबाई ... ही बाजी नाईक भारद्वाज गोत्री यांस दिली.
  - निरंजन
  - एकनाथ[1] बिन बाजी नाईक.

निरंजन ... निरंजन

ह्यांस राजशक ८५ ( इ. स. १७५८ ) साली करवीर सरकारनें दत्तक मंजूर करून त्याप्रमाणें इनामपत्रें पुन्हां करून दिलीं.

---

१. याचेच दोन पुत्र आबाजी व विश्वंभर. पण या वंशावळीत पुढे एकनाथ बिन बाजी नाईकाचा वंश दिलेला नाही. निरंजनबुवाचा वंश पुढे १८९९ पर्यंतचा दिला आहे.

आणखीही एका अनुमानाने मुक्तेश्वराच्या वडिलाचे नाव ‘ विश्वंभर ’ असणे शक्य आहे असे म्हणता येईल. आपल्या घराण्यात होऊन गेलेल्या व्यक्तींची नावे वंशजांना देण्याची परंपरा आपल्याकडे आहे. एकनाथ, मुक्तेश्वर, निरंजन या नावांप्रमाणे ‘ विश्वंभर ’ हे नावही या घराण्यात काही व्यक्तींना ठेविल्याचे आढळते. राजवाड्यांना ज्या भाऊराव तेरवाड-करांच्याकडून दोन सनदा प्रसिद्ध करण्यासाठी मिळाल्या त्यांच्या द्वितीय चिरंजीवांचे नाव विश्वंभर आहे. पण हे अलीकडचे झाले. मागील काळातही असे नाव आढळते.

तेरवाड गाव इनाम मिळविणाऱ्या मुक्तेश्वराच्या ( कवी मुक्तेश्वराचे हे पणतू ) बकूबाई या एकुलत्या कन्येला दोन पुत्र. एक निरंजन हा मातृजनक मुक्तेश्वरास दत्तक म्हणून अत्रिगोत्री व दुसरा एकनाथ मूळ घराण्यात राहिला म्हणून भारद्वाजगोत्री. या दोघांचेही वंशज पुढे तेरवाड संस्थानचे मालक झाले, इनामदार ठरले. मग दोघांची गोत्रे भिन्न असली तरी ते सर्व कवी मुक्तेश्वराचे वंशज असे स्वतःला म्हणवितात व इतरांकडून मानिले जातात. वरील भारद्वाजगोत्री एकनाथास दोन पुत्र– एक आबाजी व दुसरा विश्वंभर.

या विश्वंभर एकनाथाचा जन्म भीमस्वामीकृत ‘ भक्तलीलामृत ’ या ग्रंथाच्या निर्मितीहून ( शके १७१९ ) पूर्वीचा आहे. म्हणजे कवी मुक्ते-श्वराच्या वडिलाचे विश्वंभर हे नाव भीमस्वामीच्या या ग्रंथात प्रथम आढळत असले तरी त्यावरून विश्वंभर एकनाथाच्या नावाची कल्पना घेतली असेल असेही म्हणता येणार नाही. विश्वंभर एकनाथाच्या जन्माचा निश्चित शक सांगता आला नाही तरी तो शके १७१९ पूर्वी काही वर्षे जन्मला होता हे पुढील पुराव्यावरून निर्विवादपणे सिद्ध होते.

कोल्हापूरच्या श्रीराजा शिवछत्रपतींकडून ‘ निरंजन बिन मुक्तेश्वर गोसावी ’ यास शके १७१९ त[१] एक पत्र गेले होते, त्या पत्रातील

१. नंतर याच वर्षी ‘पौष बहुल त्रयोदशी रविवासरे’ याच छत्रपतींनी निरंजन गोसाव्यास पुन्हा एक इनामपत्र–तिसरे–करून दिले आहे. त्याचीही एक छापील प्रत मजकडे आहे.

आवश्यक तेवढा भाग– इनामपत्रांहून हे पत्र भिन्न आहे– येथे देत आहे– "स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२४ पिंगल नाम संवत्सरे आषाढ बहुल चतुर्थी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपती स्वामी यांनीं वो राजश्री निरंजन गोसावी बिन् मुक्तेश्वर गोसावी वाा मौजे तेरवाड प्राा रायबाग यासी दिल्हें पत्र ऐसे जे. तुम्ही करवीरचे मुक्कामी स्वामीसंनिध विनंती केली कीं... प्रस्तुत आमचे पूर्वसंमांधिक बंधू एकनाथ बिन बाजी नाईक भारद्वाज गोत्री हे मौजे मजकुरी सुखवस्तु राहिले होते. कांहीं दिवसांनीं संस्थानची चाकरी सांगितली. चाकरी संमधें वेतनांत जमीन दिल्ही. ती अनभवून इमानें इतबारें चाकरी करून जमीन अनभवावी ऐसें पत्र लिहून दिल्हें. त्याप्रमाणें एकनाथ गोसावी चाकरी करीत आले. एकनाथ गोसावी यांचा काल जाहला. आलिकडे त्यांचे पुत्र आबाजी गोसावी याणीं[1]...... तारीख १७ मोहरम सुाा समान तिस्सैन मया व अल्लफ." या पत्रावरून एकनाथ बिन बाजी नाईक शके १७१९ पूर्वी कैलासवासी झाले, व त्यांचे थोरले पुत्र आबाजी चांगले करतेसवरते झाले होते असे दिसते. म्हणजेच एकनाथ बिन बाजी नाईकाचा दुसरा पुत्र व आबाजी एकनाथाचा धाकटा बंधू विश्वंभर एकनाथ हा या वेळी निदान १५–२० वर्षांचा तरी असला पाहिजे.

२. **मुक्तेश्वराच्या मातापित्यांची नावे किती व कोणती ?**— या बावतीत प्रा. प्रियोळकर म्हणतात, "मुक्तेश्वर आईला लीला संबोखितो किंवा बापाला विश्वंभर म्हणतो, असे म्हणावयाला त्याच्या काव्यात तरी आधार आहे असे मला वाटत नाही." (शोध, पृ. ८). मुक्तेश्वराच्या वडिलाचे नाव चिंतामणी ऊर्फ विश्वंभर असून तोच त्याचा गुरू होय हे मुक्तेश्वराच्या काव्यातील उल्लेखांवरूनच मुख्यतः यापूर्वी आपण विस्ताराने पाहिले. मुक्तेश्वर आईला लीला म्हणतो असे त्याच्या उपलब्ध काव्यावरून निश्चितपणे मानता येत नाही, इतकेच काय स्वतः मुक्तेश्वर आपल्या आईच्या कोणत्याच नावाचा उल्लेख करीत नाही हे खरे असले तरी इतर

१. पुढे उभयतांतील तंट्याची हकीकत आहे ती अनावश्यक म्हणून येथे देत नाही.

प्रमाणांनी त्याच्या मातेची नावे आपल्यास निश्चित करता येतील. निश्चित अंतःप्रमाणाच्या ऐवजी बाह्य प्रमाणांवर भिस्त ठेवणे भाग आहे.

एकनाथांस दोन मुली होत्या. एक मुक्तेश्वराची आई. दुसरीविषयी निश्चित विधान करणे कठीण आहे. त्रिवंदूरस्थ ( तिरुवेळंदूर ) माधव कवी मुक्तेश्वराचा मावसभाऊ असेल असे वाटत नाही. कालदृष्ट्या एकनाथ व माधव यांत फार मोठे अंतर आहे. एकनाथांच्या दुसऱ्या मुलीच्या संबंधात मतभेद आहेत म्हणून त्या प्रश्नात न शिरता आपण मुक्तेश्वराच्या आईच्या नावांचाच तेवढा येथे विचार करू. एकनाथकन्येचे गंगा हे नाव मुक्तेश्वराच्या पणतवाने छत्रपतींना लिहिलेल्या पत्रात आले असल्याने ते सासरचेच असण्याची शक्यता जास्त. आपल्याकडे स्त्रियांच्या माहेरची नावे कालावधीने लुप्त होतात. पुढच्या पुढच्या पिढ्यांना आपल्या पूर्वज स्त्रियांची माहेरची नावे स्मरणात ठेवण्याची गरजही नसते. मातृश्राद्धाच्या वेळी आई, आजी व पणजी अशा तिघींची जी नावे उच्चारली जातात ती सासरचीच असतात. म्हणून मुक्तेश्वराच्या आईचे गंगा हे नाव सासरचेच असणार हे उघड आहे. शिवाय मुक्तेश्वराच्या वडिलाचे नाव ‘ विश्वंभर ’ असल्यानेही गंगा हे सासरकडीलच नाव असावे. कारण ‘ विश्वंभर ’चा अर्थ शंकर असाही आढळतो[१] व तोच या घराण्याला मान्य असावा. आता महीपती व केशव हे एकनाथ-चरित्र लिहीत असल्याने व त्यांना नाथकन्यांच्या सासरांची फारशी माहिती नसल्याने त्यांनी दिलेली नावे माहेरची मानली पाहिजेत. मुक्तेश्वर हा ज्येष्ठ कन्येचा पुत्र, व ज्येष्ठ कन्येचे नाव गोदा, म्हणून गोदा हे मुक्तेश्वराच्या आईचे माहेरचे नाव असावे. गोदाकाठच्या नाथांनी आपल्या कन्येचे नाव ‘ गोदा ’ ठेवणे स्वाभाविक वाटते. म्हणून माहेरी ‘ गोदा ’ तीच सासरी ‘ गंगा ’. कदाचित ही दोन्ही नावे माहीत झाल्याने तर केशव–महीपतींनी नाथांना दोन कन्या होत्या असे म्हटले नसेल ना ? दुसऱ्या कन्येविषयीची त्यांची मुग्धता एरवी उलगडत नाही.

---

१. ‘ तो साक्षात हा कैलासवासी विश्वंभर ’ ॥ ३ ॥ अ. ४२ ॥ शिवदास गोमाकृत काशीखंड. तथेच परत अ. ४–१६. शंकर या अर्थाने ‘ विश्वंभर ’ शब्दाची योजना अन्यत्रही आढळेल.

'लीला' हे नाव भीमस्वामीने नाथांच्या कन्येचे, विश्वंभराच्या पत्नीचे व मुक्तेश्वराच्या आईचे अशा तीनही नात्यांनी दिलेले आहे. माझ्याकडे असलेल्या वंशावळीच्या सर्व प्रतींत (एक छापील व दोन हस्तलिखित) 'गंगाबाई (लीलाबाई)' असाच मजकूर आहे. म्हणजे मुक्तेश्वराच्या आईची तीन नावे– माहेरी गोदा, सासरी गंगा, व आधी माहेरी आणि नंतर सासरीही माहीत असलेले लीला – मानली पाहिजेत.

यावरून मुक्तेश्वराच्या वडिलांची नावे दोन– चिंतामणी व विश्वंभर— आणि आईची नावे तीन– गोदा, गंगा व लीला– हे पटावे.

ज्ञानदेवांच्या 'बापरखुमादेवीवरु विठ्ठलु' या श्लिष्ट उल्लेखाप्रमाणे मुक्तेश्वरानेही 'लीलाविश्वंभर' असा श्लिष्ट निर्देश केला असणे शक्य नाही काय? या एकाच पदाने उपास्य दत्तात्रेय, गुरू (तोच पिता) व माता या सर्वांचे स्मरण मुक्तेश्वराला साधता आले आहे असे वाटते.

## ३. मुक्तेश्वर हे कवीचे जन्मनामच

"लीलाबाईचीया नारळ वोटींत । कृपेनें म्हणत पुत्र होय ॥ ९ ॥
जाला पुत्र त्याचें नांव मुक्तेश्वर । भारत अपार केलें ज्यांनीं ॥१०॥"

—भीमस्वामीकृत भक्तलीलामृत.

मुक्तेश्वर हे कवीचे जन्मनाम नसावे असे प्रियोळकरांना वाटावे हे नवलच! पूर्वीचा समाज भाविक असल्याने व विशेषतः ज्यांच्या ठिकाणी भगवद्भक्ती मुरलेली असते असे लोक आपल्या मुलांबाळांची नावे अशा प्रकारे ठेवीत. विठ्ठलपंताने आपल्या मुलांना निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ता अशी मोक्षसिद्धिनिदर्शक पारमार्थिक नावे दिली होतीच. कवी मुक्तेश्वरानेही आपल्या मुलाचे नाव 'निरंजन' ठेवले होते. मुक्तेश्वराच्या नामकरणात एकनाथांचा, विश्वंभरबुवाचा काही हात असलाच पाहिजे; कारण एकनाथ, विश्वंभर ही सर्व माणसे अनुग्रहीत होती, भगवद्भक्ती त्यांच्या रोमरोमात भिनली होती.

एकनाथी भागवताच्या अखेरच्या भागावरून शके १४९५-९६ च्या ,मारास एकनाथ काशीक्षेत्री रहात होते हे स्पष्ट आहे. पहा—

“ग्रंथारंभ प्रतिष्ठानीं । तेथ पंचाध्यायी संपादूनी ।
इतर ग्रंथाची करणी । आनंदवनीं विस्तारिली ॥ ५२७ ॥

अविमुक्त महास्मशान । वाराणसी आनंदवन ।
एकासचि नांवें जाण । ऐका लक्षण त्याचेंही ॥ ५२८ ॥

अतिशयें जेथ मुक्ती । अधमोत्तमां एकी गती ।
पुढती नाहीं पुनरावृत्ती । अविमुक्त म्हणती या हेतू ॥ ५२९ ॥...

तया वाराणसी मुक्तिक्षेत्रीं । मणिकर्णिका महातीरीं ।
पंचमुद्रापीठामाझारीं । एकादशावरी टीका केली ॥ ५३५ ॥ ...

शालिवाहन शकवैभव । संख्या चौदाशें पंचाणव ।
श्रीमुख संवत्सराचें नांव । टीका अपूर्व तें जाहली ॥५५५॥ अ. ३१”

या काशीमधील वास्तव्यात निरनिराळ्या देवदेवतांचे दर्शन त्यांनी घेतले असले पाहिजे. त्यांत ‘अविमुक्तेश्वर’ या देवतेच्या महत्त्वाचा त्यांच्यावर फारच परिणाम झाला असावा आणि नाथांतल्या कवीला व भक्ताला हे नाव आवडले असावे. स्कंदपुराणान्तर्गत काशीखंडाच्या (४ थे खंड) पूर्वार्धातील ३९ व्या अध्यायात या अविमुक्तेश्वराचे महत्त्व पुढीलप्रमाणे वर्णिले आहे—

“मंदराद्रिं गतेनापि क्षेत्रं नैतत्पिनाकिना ।
विमुक्तं लिंगरूपेण अविमुक्तं मतः स्मृतम् ॥ ७३ ॥

पुरानंदवनं नाम क्षेत्रमेतत्प्रकीर्तितम् ।
अविमुक्तं तदारभ्य नामास्य प्रथितं भुवि ॥ ७४ ॥

नामाविमुक्तमभवदुभयोः क्षेत्रलिंगयोः ।
एतद्द्वयं समासाद्य न भूयो गर्भभाग्भवेत् ॥ ७५ ॥

अविमुक्तेश्वरं लिंगं दृष्ट्वा क्षेत्रेऽविमुक्तके ।
विमुक्त एव भवति सर्वस्वात्कर्मबंधनात् ॥ ७६ ॥

अर्चंति विश्वे विश्वेशं विश्वेशोऽर्चति विश्वकृत् ।
अविमुक्तेश्वरं लिंगं भुवि मुक्तिप्रदायकम् ॥ ७७ ॥
पुरा न स्थापितं लिंगं कस्यचित्केनचित्क्वचित् ।
किमाकृति भवेल्लिंगं नैतद्वेत्त्यपि कश्चन ॥ ७८ ॥...
आदिलिंगमिदं प्रोक्तमविमुक्तेश्वरं महत् ।
ततो लिंगांतराण्यत्र जातानि क्षितिमंडले ॥ ८० ॥
अविमुक्तेश नामापि श्रुत्वा जन्मार्जितादघात् ।
क्षणान्मुक्तो भवेन्मर्त्यो नात्र कार्या विचारणा ॥ ८१ ॥
अविमुक्तेश्वरं लिंगं स्मृत्वा दूरगतोऽपि च ।
जन्मद्वयकृतात्पापात्क्षणादेव विमुच्यते ॥ ८२ ॥...
अनादिमदिदं लिंगं स्वयं विश्वेश्वरार्चितम् ।
काश्यां प्रयत्नतः सेव्यमविमुक्तं विमुक्तये ॥ ८७ ॥...
अविमुक्ते महाक्षेत्रे विश्वेशक्षमधिष्ठिते ।
यैर्न दृष्टं विमूढास्तेऽविमुक्तं लिंगमुत्तमम् ॥ ९३ ॥...
धन्यं तन्नेत्रनिर्माणं कृतकृत्यौ तु तौ करौ ।
अविमुक्तेश्वरं[1] येन याभ्यामैक्षिष्टयः स्पृशेत् ॥ ९५ ॥ ”

काशीत असताना व पैठणास परतल्यानंतर नाथांच्या मनात अविमुक्तेश्वराचे हे महत्त्व घोळत असले पाहिजे व याच सुमारास कविवर्य मुक्तेश्वराचा जन्म झाला असावा आणि ‘अविमुक्तेश्वरा’चा ‘मुक्तेश्वर’ हा रूढ संक्षेप लक्षात घेऊन कवीला हे नाव मिळाले असावे. भावार्थरामायण-रचनेचा विचार जेव्हा नाथांच्या मनात येत होता ( शक १५०६–०७ चा सुमार, कदाचित याच्याहीपेक्षा एखादे वर्ष आधी ) तेव्हा हरिपंडितास झालेल्या तृतीय पुत्राचे नाव म्हणूनच रघुनाथ वा राघोबा असे ठेवले गेले असावे असेही वाटते.

१. गुरुचरित्रात काशीच्या या अविमुक्तेश्वराचा उल्लेख अ. ४१ ओ. १८३ व २६१ आणि अ. ४२ ओ. ६५ या ठिकाणी आहे. शिवदास गोमाच्या काशीखंडनामक मराठी ग्रंथात ४२ वा अध्याय ‘अविमुक्तेश्वरमाहात्म्यवर्णन’ या नावाचा आहे.

नाथांच्या काशीतील मुक्कामानंतर लौकरच ( १४९५ शकानंतर ) मुक्तेश्वराचा जन्म झाला असावा. ‘प्राचीन मराठी कविपंचका’त प्रा. पंगूंनी मुक्तेश्वराचा जन्मशक १४९६ मानला आहे तो या दृष्टीनेही योग्य वाटतो. ‘श्रीएकनाथदर्शना’च्या पहिल्या खंडात म. म. द वा. पोतदारांनी ‘एकनाथाचे हस्ताक्षर असेच असेल काय?’ हा जो लेख लिहिला आहे त्यात ‘काल्पनिक पण सुसंगत वाटणारा नाथचरित्राचा आराखडा’ बसविण्याचा प्रयत्न केला आहे. नाथांचा नातू– हरिपंडिताचा तिसरा पुत्र– राघोबा नाथनिर्याणाच्या वेळी निदान १५–२० वर्षांहून लहान नसावा असे त्यांना वाटते. राघोबा नाथांच्या चिरंजीवाचा तृतीय पुत्र. हरिपंडिताहून मोठी जी नाथकन्या तिचा मुक्तेश्वर हा पुत्र. साहजिकच मुक्तेश्वर हा या राघोबाहूनच काय पण हरिपंडिताच्या ज्येष्ठ पुत्राहूनही वयाने मोठा असला पाहिजे. म्हणजे नाथांच्या निर्याणाच्या वेळी मुक्तेश्वर २०–२५ वर्षांचा असावा. प्रा. पंगूंनी मानिलेल्या जन्मशकाशी याचाही मेळ बसतो. सारांश, नाथांच्या काशीवासानंतर लौकरच मुक्तेश्वराचा जन्म झाला ही गोष्ट मान्य व्हावी. आपल्या नावामागचा हा इतिहास मुक्तेश्वराला माहीत होता असे आदिपर्वाच्या चौथ्या अध्यायातील पुढील ओवीवरून वाटते—

“ इति श्री भारत आदिपर्वणि । अविमुक्तेश्वर[1] शूलपाणी ।
त्याचेनि प्रसादें हे वाणी । सुखी करो श्रोतिया ।। १८८ ।। ”

‘मुक्तेश्वर’ हे कवीचे मुद्रानाम अशी प्रा. प्रियोळकरांची झालेली समजूत कशी चुकीची आहे ते आता पाहू. आदिपर्वाच्या प्रथमाध्यायात मुक्तेश्वर लिहितो,

“ मुक्तेश्वर जो मी अवधूत । माझेनि नामें मुद्रांकित ।
कथा विस्तारीं भारत । महाराष्ट्रपदबंधीं ।। ४४ ।। ”

यावरून प्रियोळकर म्हणतात, “ अशा प्रकारे आपले नाव धारण करून मराठी भाषेत भारत सांगण्यासंबंधी अवधूत असा जो मुक्तेश्वर त्याने आज्ञा केल्यावरून आपण हा ग्रंथ लिहीत असल्याचे हा कवी सांगत आहे. भिडे

१. येथे प्रियोळकरांनी स्वीकारलेला ‘कवि मुक्तेश्वर’ हा पाठ उघड उघड चुकीचा आहे.

यांनी हा मुद्दा सुचविला होता, परंतु त्याच्याकडे कोणी लक्षच दिलेले दिसत नाही." ( श्रीमुक्तेश्वराचा शोध, पृ. १९ ).

'अविमुक्तेश्वर' या काशीतील देवतेवरून कवीला हे नाव प्राप्त झाले असावे हा माझा तर्क मी वर नमूद केला आहेच. पुढे मुक्तेश्वरानेही काशीयात्रा केली असली पाहिजे व तोही मग या अविमुक्तेश्वराचा वारंवार मुक्तेश्वर असाच उल्लेख करीत राहिला असला पाहिजे. वर उद्धृत केलेल्या ४४ व्या ओवीवरून प्रियोळकरांनी जे विधान केले आहे ते वरवर पाहिल्यास खरे वाटण्याचा दाट संभव आहे; पण येथे एवढी एकच ओवी वाचून चालणार नाही. पूर्वापर संबंध लक्षात घेतला पाहिजे. त्यासाठी या पहिल्या अध्यायातील ४१ ते ५८ अशा ओव्या एकाच वेळी वाचून मग प्रियोळकरांच्या मताला मान्यता द्यायची की नाही हे ठरविले पाहिजे. ४१ वी ओवी अशी—

" म्हणवुनी देवतारूपें वहिला । श्रीगुरु म्यां स्तविला ।
अभेदभक्तिचेनि भुलला । आज्ञापितु निजमुखें ॥ "

म्हणजे येथे मुक्तेश्वराचा देवतारूप ( म्हणजे कोणी देवता नव्हे ) श्रीगुरू– विश्वंभर– त्याला आज्ञापीत आहे असे खुद्द मुक्तेश्वरच सांगतो. " गुरूच्या कारुण्यरूपी वसंतवाताने आपल्या मूढ मनाच्या निष्फळ लतेला स्फूर्तीचे पल्लव फुटले आणि कवित्वफळांचा भारही आला " असा त्या गुर्वाज्ञेचा सुपरिणाम ४२ व्या ओवीत निवेदून गुरूने केलेली आज्ञा व उपदेश ४३ व्या ओवी-पासून ५७ व्या ओवीअखेर कवी सांगतो. 'ऐसें गुरुवाक्य होतां क्षणीं' अशी ५८ व्या ओवीची सुरुवात आहे. म्हणजे या ठिकाणी मुक्तेश्वर या नावाची देवता मुक्तेश्वराला आज्ञा करीत नसून मुक्तेश्वराचा गुरूच त्याला अशी आज्ञा करीत आहे हे अगदी स्पष्ट व उघड आहे. आता मुक्तेश्वराच्या गुरूचे नाव तर विश्वंभर. तेव्हा या ४४ व्या ओवीचा अर्थ कसा करावयाचा ? त्यासाठी नाथभागवतातील ( अ. ३१ ) पुढील ओव्या प्रथम पाहू—

" जेथ मी म्हणों जाय कविता । ते जनार्दनचि होय तत्त्वतां ।
माझें मीपण धरावया पुरता । ठाव रिता नुरेची ॥ ५१२ ॥

माझें जें कां मीपण । जनार्दन जाहला आपण ।
एका जनार्दना शरण । ग्रंथ संपूर्ण तेणें केला ॥ ५१४ ॥

हेही बोल बोलतां जाण । खुणां वारी जनार्दन ।
झाडा सूचितां संपूर्ण । वेगळेंपण अंगीं लागे ॥ ५१५ ॥

आता वेगळा अथवा एक । अवघा जनार्दन स्वयें देख ।
तेणें ग्रंथार्थाचे लेख । अत्यंत चोख विस्तारिले ॥ ५१६ ॥...

हा ज्ञानग्रंथ चिद्रत्न । यथार्थ अर्थविला संपूर्ण ।
माझेनि नांवें श्रीजनार्दन । ग्रंथकर्ता आपण स्वयें जाहला ॥ ५६० ॥ "

हीच भावना मुक्तेश्वराने थोड्या निराळ्या रीतीने बोलून दाखविली आहे. 'माझ्या नावाने जनार्दनाने लिहिले' असे एकनाथ सांगतात, तर 'माझा गुरूच स्वतः मुक्तेश्वर अवधूत (शंकर). त्याच्या नावाने मी लिहिले' असे मुक्तेश्वर सांगतो. पुढे ४५ व्या ओवीत मुक्तेश्वराचा गुरू म्हणतो, "येथें मी कर्ता लिहिता आंगें । संतप्रार्थना त्वां कीजे." ७१ व्या ओवीतही 'श्रीगुरुआज्ञेच्या आदेंरें' असेही मुक्तेश्वर म्हणतो. यावरून ४४ व्या ओवीचा अर्थ येथें एवढाच घ्यायचा की, 'मुक्तेश्वर' अशी मुद्रा काव्यान्ती असली तरी त्याची जबाबदारी वा कर्तृत्व आपण स्वीकारले आहे असे गुरूने कवीला आश्वासन दिले. शिवाय मुक्तेश्वर हे एका देवाचे (शंकराचे) नाव असल्याने 'तोच मी' असेही गुरूने म्हटले. प्रियोळकर म्हणतात तसा अर्थ मागचा पुढचा संदर्भ पाहता मुळीच निघत नाही. मुक्तेश्वर नावाच्या देवतेची कवीने पूजाअर्चा केली, ती देवता प्रसन्न झाली व 'माझे नाव धारण कर' अशीं तिने आज्ञा केली ही सगळी प्रियोळकरांची कविकल्पना—नव्हे, गैरसमजूतच दिसते. भिड्यांचीही अशीच गैरसमजूत झाली होती. ग्रंथकर्तृत्व गुरूकडे देण्याच्या प्रवृत्तीतूनच वरील ओवी निर्माण झाली आहे. या विवेचनावरून या ओवीचा अर्थ 'जमविताना' पूर्वापर संदर्भ लक्षात न घेतल्याने प्रियोळकरांची कशी विलक्षण समज झाली आहे व त्यामुळे त्यांनी उभविलेला 'शोध' कसा पायाविरहित आहे याची वाचकांना खात्री पटेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत



मुक्तेश्वरदेवतेची देवालये कोठे कोठे आहेत याची एक यादी प्रियोळकरांनी दिली आहे तिची म्हणूनच जरुरी नव्हती. तथापि त्या यादीत भर घालण्यासाठी सहजासहजी लक्षात आलेली स्थळे येथे नमूद करतो. ‘ सरदेसाई स्मारक ग्रंथा ’तील ‘ रामटेक येथील रामदेवराव यादवाच्या काळचा शिलालेख ’ या म. म. मिराशी व ल. रा. कुलकर्णी यांच्या लेखात पृ. १२८ वर ‘ पश्यन्ति मुक्तीश्वरनामधेयं शिवं शिवानाथमिहाचलेंद्रे ’ ( शिलालेखातील ४५, ४६ ओळी ) व पृ. १३३ वर ‘ मुक्तीश्वर– रामलक्ष्मणांच्या देवळांना प्रदक्षिणा घालताना पश्चिमेस याचे मंदिर लागते ’ ( शिलालेखात उल्लेखिलेल्या देवतांची, नद्यांची व तीर्थांची लेखकांनी दिलेली यादी ) असा मुक्तीश्वर देवतेचा उल्लेख आहे. कोल्हापूर हे दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असल्याने येथेही काशीप्रमाणे अनेक देवता आहेत. गंगावेश मोटरस्टँडपासून जवळच ‘ ऋणमुक्तेश्वरा ’चे एक प्राचीन देवालय आहे. उज्जयिनी येथील ज्या मुक्तीश्वर व अविमुक्तेश्वर या देवतांचा प्रियोळकरांनी उल्लेख केला आहे त्यांसंबंधीच्या कथा स्कंदपुराणान्तर्गत ५ व्या अवन्तीखंडातील ‘ चतुरशीति लिंगमाहात्म्य ’ नामक दुसऱ्या भागात अ. २५ ‘ मुक्तीश्वरमाहात्म्य ’ व अ. ७८ ‘ अविमुक्तेश्वरमाहात्म्य ’ या ठिकाणी आल्या आहेत व तेथूनच त्या ‘ उज्जयिनीमार्गदर्शिका ’ या पुस्तकात घेतल्या गेलेल्या दिसतात. ‘ भक्तलीलामृत ’कार भीमस्वामीही आपल्या अवन्तिवर्णनात मुक्तेश्वर व तिळभांडेश्वर या देवतांचा निर्देश करतात.

**तिळभांडेश्वर**— अविमुक्तेश्वर किंवा मुक्तेश्वर या देवतेप्रमाणेच तिळभांडेश्वर या मुक्तेश्वराने उल्लेखिलेल्या देवतेचा शोध करतानाही प्रियोळकर भलतीच ठिकाणे निष्कारण धुंडीत आहेत. म्हणून म्हणावेसे वाटते—

> “ देवांत विश्वेश पुरींत काशी । नदींत गंगा भवमृत्युनाशी ।
> असोनि ऐसें त्रय एक ठाया । कां व्यर्थ हे तापविती स्वकाया ॥ ”

उज्जयिनी ( शोध, पृ. २२ ) व नाशिक ( प्राक्कथन, पृ. १८ ) येथील या देवतेचा उल्लेख प्रियोळकर करतात. त्यावरून मुक्तेश्वरास ते तेथे

नेऊनही आणतात! नवशक्तीतील उत्तरात 'काशीमध्ये तिळभांडेश्वर असल्याचे कळते' एवढेच ते लिहितात. हा मुक्तेश्वराने उल्लेखिलेला तिळभांडेश्वर काशीचाच होय. या देवतेचे नाव असलेली आदिपर्वातील ओवी–

"प्रत्यक्ष कासीविश्वेश्वर। स्वल्पाकृति मान्य थोर।
विशाळ तिळभांडेश्वर। कोणें प्रथम वंदिजे ॥ १०९ ॥ अ. ११॥"

गुरुचरित्रात काशीतील या देवाचा निर्देश आहे– "तिळभांडेश्वर देखा। पूजा करोनि पुढे ऐका। रेवाकुंडीं स्नान निका। मानस सरोवरीं मग स्नान ॥ १९५ ॥ अ. ४१"

'आमचे पुण्यक्षेत्र (काशी)' या पुस्तकात विश्वनाथ बापूजी धोपेश्वरकर या देवाची माहिती पुढीलप्रमाणे देतात– "मानस सरोवर सोडून तिलभांडेश्वराचे आपण दर्शन घेऊ. हे शिवालय अंमळ दूर आहे. तिलभांडेश्वर प्रेक्षणीय असून पिंडीचा परिघ सुमारे १५ फूट आहे. उंची पाच फूट आहे. येथे काही प्राचीन शिलालेख दृष्टीस पडतात. प्रदक्षिणेचे मार्गात एक शंकराची ध्यानस्थ मूर्ती पाहण्यासारखी आहे" (पृ. १००). नाशिकचा तिळभांडेश्वर 'The ling is a plain stone pillar two feet high and five feet round' (प्राक्कथन, पृ. १८) या वर्णनावरून काशीच्या तिळभांडेश्वराहून किती तरी लहान आहे. 'विशाळ' हे मुक्तेश्वरी विशेषण काशीतील देवालाच साजते. शिवाय काशीविश्वेश्वराबरोबरच मुक्तेश्वराने याचा उल्लेख केला असल्याने तो काशीचाच याविषयी शंका राहात नाही.

**(४) मुद्गल हे मुक्तेश्वराचे आडनावच** — नावे व आडनावे यांचा जो थोडाफार अभ्यास नियोळकरांनी केला आहे त्याचा हवाला देऊन ते म्हणतात, "जुन्या काळी व्यक्तिनामेच मुख्यतः वापरात होती. कुलनामांचा त्या काळी फारसा प्रचार नसे" (शोध, पृ. १८). येथे 'मुख्यतः', 'फारसा' हे शब्द वापरून त्यांनी जपूनच लिहिले आहे हे स्पष्ट आहे.

महानुभावांच्या 'लीळाचरित्र' या ग्रंथात उपासनी, दीक्षित, पींपळे, पाठक, घाटे अशी अनेक उपनामे आढळतात. 'श्री गोविंदप्रभुचरित्रा'च्या

प्रस्तावनेत डॉ. वि. भि. कोलते लिहितात, “ तेराव्या शतकात ‘ दरणा ’ आडनावाची पुष्कळ घराणी वऱ्हाडात होती.” ऐतिहासिक कागदपत्रांतही उपनामांचा उल्लेख अनेक ठिकाणी येतो. मराठी कवींतही कुंभार, सोनार, पाठक, साखरे, क्षीरसागर अशी आडनावे दिसतात. यांतील सारीच काही व्यवसायनिदर्शक नाहीत. शिवाय आजही बरीच व्यवसायनिदर्शक नावे आडनावाप्रमाणे वापरली जातात.

आपल्या प्राचीन मराठी कवींत प्रत्येक अध्यायाच्या वा प्रसंगाच्या शेवटी स्वनाम घालण्याची प्रवृत्ती आढळते. अशा ठिकाणी आत्मपर उल्लेख ते करीत नाहीत. पण याबरोबरच आणखी एक प्रवृत्ती अशी आढळते की, काही ठिकाणी हे कवी स्वतःचे नाव, पितृनाम, मातृनाम, कुलनाम, गोत्र, ग्राम, प्रान्त, गुरुनाम, गुरुपरंपरा, वंशेतिहास, रचनाकाल, रचनास्थल इत्यादी आत्मपर माहिती देत असतात. मुक्तेश्वरात या दोनही प्रवृत्ती आढळतात. स्वनाम घालण्याच्या ठिकाणी कुलनामनिर्देश बहुधा होत नाही हे खरे आहे. दुसऱ्या प्रकारच्या प्रवृत्तीत मी वर निर्दिष्ट केलेल्या सर्वच गोष्टींविषयी प्रत्येक कवी माहिती देतो असे नाही. त्यांतील काही बाबी नसतातही. पण आत्मवृत्तकथनाची ही प्रवृत्ती काही कवींत आढळते. कुलनामाचा निर्देश असणारी काही स्थळे देतो म्हणजे याची कल्पना येईल.

( १ ) गुरुचरित्राचा कर्ता ‘ सरस्वती गंगाधर ’ अध्यायाच्या अखेरीस ‘ सरस्वती गंगाधर ’, ‘ गंगाधराचा नंदन ’ असा उल्लेख करतो. पण त्याने केलेले हे आत्मवृत्तकथन पाहा—

“ ऐसें सकळिकां विनवोनी । मग ध्याइले पूर्वज मनीं ।
उभय पक्ष जनक जननी । महात्म्य पुण्य पुरुषांचें ॥ ३७ ॥

आपस्तंब शाखेसी । गौत्र कौंडिण्य महाऋषी ।
साखरे नाम ख्यातीसी । सायदेवापासाव ॥ ३८ ॥

त्यापासूनी नागनाथ । देवराव तयाचा सुत ।
सदा श्रीगुरुचरण ध्यात । गंगाधर जनक माझा ॥ ३९ ॥ इत्यादी
अ. १ ”

( २ ) विठ्ठल बीडकर स्वतःचा निर्देश विठ्ठल, विठ्ठलदास असा प्रत्येक सर्गान्ती करीत असला तरी ‘ रुक्मिणीस्वयंवरा ’च्या उपसंहारात तो लिहितो—

“ श्रीमद्रुक्मिणिचें स्वयंवर निकें संपूर्ण हें वाचिजे ।
ऋग्वेदोत्तम आश्वलायन महाशाखांबुधी जाणिजे ।
वर्णी विठ्ठल क्षीरसागरकुलालंकारचूडामणी ।
पद्यें प्राकृत सप्त सर्ग तिनशें त्रेपन्न चिंतामणी ।। २ ।। ”

( ३ ) नागकवी, नागजोशी कवी, श्रीनागेश कवीश्वर, नागेश, नागदेव, नागजोशी, नागेंद्र असे उल्लेख नागेश कवी आपल्या काव्यात निरनिराळ्या स्थळी करतो. यांपैकी काही ठिकाणी तो जोशी हे उपनाम वापरतोच. ‘ चंद्रावळीवर्णना ’त तो आत्मवृत्तही देतो—

“ पिता मोर जोशी महाख्यात आहे ।
तथा जानकी नाम मातेसि आहे ।।
अहो थोरल्या दोन्हि बंधूसि साचें ।
असें नाम मल्हारिचें, त्र्यंबकाचें ।। १ ।।
तया धाकुटा तोच नागेश पाहे ।
कवित्वीं जया ज्ञान संपूर्ण आहे ।।...”

( ४ ) ‘ अवचितसुत काशी ’ असा स्वतःचा सर्वत्र निर्देश करणारा कवी आपल्या ओवीबद्ध ‘ द्रौपदीस्वयंवरा ’त स्वतःचा कुलवृत्तान्त सांगतो—

“ देशवदन आमुची वृत्ती । निशारमण वंशाधिपती ।
कुल तरी सोळंखी आदि म्हणती । गोत्र सांगती अत्रि ऐसें ।। ९४।।
वास तरी गौतमप्रदेशीं । आम्ही मराठे सोमवंशी ।
दोनच पुत्र पित्यासी । त्रिंबक, काशी नामें त्यांचीं ।। ९५ ।।
अवचित आमुचा पिता । तो नगर झाला वसविता ।
भारम नाम ग्राम होता । वस्ती केली बहुसाल ।।९६।। प्र. २९।। ”.

(५) बहिणाबाईसारखी स्त्रीही आत्मनिवेदन करीत असताना दोहीं-कडील कुलनामांचा उच्चार करिते—

“ आऊजी कुलकर्णी लेखक ते स्थळीं।
तयाचिये कुळीं जन्म माझा ॥ १ ॥
जननी जानकी, पिता आऊदेव।
देवगांव नांव स्थळ त्यांचें ॥ २ ॥
कन्यादान घडो हा अर्थ पाहोन।
करावया लग्न द्विज आले ॥ १ ॥
तंव आकस्मात प्राक्तनासारिखा।
‘ शीऊरा ’चा सखा एक आला ॥ २ ॥
पूर्वील सोयरा लग्नाचा इच्छिक।
विवेक पाठक रत्न नामी ॥ ३ ॥
मौनस गोत्र माझ्या पित्याचें वरिष्ठ।
भ्रतारही श्रेष्ठ गौतम तो ॥ १ ॥ इ० ”

अशी आणखीही काही उदाहरणे देता येतील. वरील दोन्ही प्रवृत्ती मुक्तेश्वरातही आढळतात. मुक्तीश, मुक्तेश, मुक्तीश्वर, मुक्तेश्वर असे उल्लेख तो अध्यायाच्या वा काव्याच्या शेवटी करतो. जी स्थळे वादविषय झाली आहेत त्या स्थळी तो इतरांप्रमाणे आत्मवृत्तकथन करीत आहे ही गोष्ट लक्षात आली म्हणजे ‘ मुद्गल ’ हा उल्लेख तो कुलनाम म्हणूनच करीत आहे हे पटेल.

(१) “ सुचिरसहजवासें गौतमीच्या तटाकीं।
अतुट भजनपंथें पंथ टाकीत टांकी ॥
द्विजकर कवि नामा मुद्गल आत्रिगोत्रीं।
विमळ वचनमुक्तें लेववी संतश्रोत्रीं ॥ ४६४ ॥ ”

—कौतुहल नाटक रामायण, ६ युद्धकांड.

(२) “ गोदावरी तटनिवासी। अत्रिगोत्री ऋषी।
चिंतामणी गुणैकराशी–। पासाव जन्म जयाचा ॥ २ ॥

तो मुद्गलचिंतामणीसुत । लीलाविश्वंभरानुग्रहीत ।
व्यास भारतींचा अर्थ । महाराष्ट्र बोलिला ।। ३ ।। ”

—सभापर्व, उपसंहार.

अशा दोन स्थळी मुक्तेश्वराने ‘ मुद्गल ’ हा शब्द वापरला आहे. या दोन्ही ठिकाणी त्याने इतरही माहिती दिली आहे म्हणजेच तो या ठिकाणी आत्मवृत्तकथन करीत असल्याने कुलनामाचा उच्चार होणे स्वाभाविक ठरते. त्याने एखाद्या अध्यायाच्या शेवटी ‘ मुद्गल ’ या शब्दाचा उपयोग केला असता ( आत्मपर माहिती जेथे दिलेली नाही अशा ठिकाणी ) तर प्रियोळकरांच्या विधानाचा अधिक विचार करावा लागला असता.

महाभारतरचनाकाली ‘ मुक्तेश्वर ’ हे आपल्या आराध्यदेवतेचे नाव कवीने धारण केले असावे असे प्रियोळकरांचे मत आहे. संक्षेपरामायणात ‘ मुक्तेश ’ असा आलेला उल्लेख अर्थातच त्यांना प्रक्षिप्त मानावा लागला आहे. पण मी आतापर्यंत केलेल्या विवेचनामुळे ते पटत नाही. रामायण-रचनेनंतर मुक्तेश्वर महाभारतरचनेकडे वळला हे सर्वांना मान्य आहे. रामायण रचनाकाली मुक्तेश्वराने निदान पंचविशी ओलांडिली असली पाहिजे. प्रियोळकरांच्या मताप्रमाणे मग या वेळेपर्यंत तो ‘ मुद्‌गल ’ या नावानेच ओळखला गेला असला पाहिजे. पण मग हे त्याचे जन्मनाम अजिबात कोणाला ठाऊक नसावे हे आश्चर्य नाही काय ? रामदासांचेही जन्मनाम लुप्त झाले नाही. मग पंचविशीनंतर ‘ मुक्तेश्वर ’ नाव धारण करणाऱ्या या कवीचे मूळ नाव कोणालाही माहीत नसणे कसे शक्य आहे ? चिंतामणी ( विश्वंभर ), गंगाबाई ( लीलाबाई ) अशी जोडनावे वंशावळीत आढळतात. मग ज्याच्यामुळे या घराण्याचे नाव उज्ज्वल झाले त्या मुक्तेश्वराचे मूळ नाव वंशावळीत का नसावे ? या बाबतीत त्यांच्या घराण्यातील व्यक्ती अज्ञानात होत्या असे मानणे अन्यायाचे ठरणार नाही काय ? मुक्तेश्वरानंतर त्याची माहिती देणारे व त्याचा उल्लेख करणारे काही कवी होऊन गेले. यांपैकी एकानेही मुक्तेश्वराच्या ‘ मुद्‌गल ’ नावाचा उल्लेख करू नये किंवा मुक्तेश्वरनामधारणाची कथा सांगू नये याचा अर्थ काय ? कालदृष्ट्या प्रियोळकरांपेक्षा ते मुक्तेश्वराशी अधिक जवळचे नव्हते काय ?

अद्भुत कथांत रंगणाऱ्या भाविक चरित्रकारांनी ही नवलाई अपूर्वाईने आळवली नसती काय ?

बरे, आदिपर्व रचायच्या वेळी कवीने 'मुक्तेश्वर' हे नाव धारण केले होते असे मानले तर मग 'सभापर्वात' 'मुद्गल' या नावाचा त्याने उल्लेख का करावा ? एकदा 'मुक्तेश्वर' नावाने काव्यावर मुद्रा करायची हे 'मुक्तेश्वरा'शेवरून (!) ठरविल्यानंतर पूर्वीच्या नावाचा वापर करण्याची जरुरी नव्हती. 'मुक्तेश्वर' या देवतानामाशी भिन्नत्व दर्शविण्यासाठी मुक्तेश्वराने काही ठिकाणी स्वतःला 'कवी', 'कविकिंकर' असे म्हटले आहे. 'मुद्गल' हे त्याचे नाव असते तर ते त्याने या ठिकाणीही वापरले नसते काय ?

मुक्तेश्वराच्या प्रसिद्ध झालेल्या काव्यास सोडून प्रियोळकरांनी इतरही काही अप्रकाशित स्फुट कवितांचा आधार घेतला आहे. 'चिंतामणिसुतु मुद्गल' या नावावरचे एक पद व 'मुद्गल चिंतामणी' या नावावर असलेली 'हनुमंताची आरती' ही दोन स्फुट काव्ये त्यांनी आधारार्थ पुढे आणिली आहेत. पण यांसारख्या आणखी कविता उपलब्ध झाल्या पाहिजेत व त्या निस्संशयपणे मुक्तेश्वराच्याच हे ठरले पाहिजे. 'चिंतामणिसुतु मुद्गल' या नावावरचे पद मुक्तेश्वराचे मानले तरी 'मुद्गल' हे व्यक्तिनामच मानले पाहिजे असे नाही.

'मुद्गल चिंतामणी' नावावरील 'हनुमंताची आरती' प्रियोळकरांनी दिली आहे. तंजावरच्या सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहातील 'मराठी ग्रंथांची बयाजवार यादी' प्रसिद्ध आहे. तिच्या तिसऱ्या भागात (पा. १७) क्रमांक २०१२–१३ येथे 'चिंतामणी'च्या नावावर 'मारुतीच्या आरती'ची नोंद आहे. या दोन्ही आरत्या परस्पर ताडून भिन्न आहेत की काय हे पाहायला हवे. याच भागात (पा. २५) ४६२ अंकापुढे 'लीलाविश्वंभर' या नावाखाली काही हिंदी व मराठी स्फुट रचना नमूद आहे. 'श्रीरामदासी संशोधना'च्या दोन्ही खंडांत 'लीलाविश्वंभरा'च्या नावावर काही स्फुट काव्ये उल्लेखिलेली आढळतात. ही सर्व स्फुट कविता पुढे आली तर ती मुक्तेश्वराच्या वडिलांची ठरणार नाही कशावरून ?

शिवाय वरील ‘ हनुमंताच्या आरती ’तील ‘ काळ काम रुळे जया अंकणा ’ व मुक्तेश्वरकृत रामायणातील ‘ रुळे अंकणा क्रूर तो काळ साचें ’ एवढ्या साम्यावरून ही आरती मुक्तेश्वराचीच मानणे धोक्याचे ठरेल. ‘ तेणेंचि काळ आकणा घातला ’ ( अ. ८०–३०४ ) अशी भाषा शिवदास गोमाच्या काशीखंडात आहे. कृष्णदास मुद्गलाच्या रामायणात ‘ माझिया प्रतापें यमु आकणा ’ ( ३–५४ ) व नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवरात ‘ मेरु-मंडळीं बहुधान्यकुः जयाचां काळु आंकणा ’ ( २८२ ) अशी भाषा आढळते.

‘ मुद्गल ’ हे आडनाव आजही अनेक ठिकाणी आढळते. विजापूर, सोलापूर इकडे मुद्गल आडनावाची काही घराणी आहेत. सोलापूरच्या द. ब. मुद्गलांनी ‘ सर्वस्व ’ या नावाची एक कादंबरी लिहिली आहे. कै. आजगावकरांना प्रियोळकरांनी, ‘नवशक्ती’त जे उत्तर दिले होते त्यावरून शाकल्य व शांडिल्य या दोन गोत्रांत मुद्गल हे आडनाव आहे हे कळते. हे आडनाव फक्त देशस्थ ब्राह्मणांतच आहे असे नाही. कोल्हापुरात ‘ मुद्गल ’ आडनावाचे एक कापडाचे व्यापारी असून ते साळी जातीचे आहेत. मजकडे असलेल्या शके १८७३ च्या दाते पंचांगातील देवरुखे ब्राह्मणांच्या गोत्रावळीत ‘ मुद्गल ’ आडनाव आहे. ‘ मुद्गल ’ या ग्राम-नावावरून हे आडनाव आले असते तर ते ‘ मुद्गलकर ’ असे असायला हवे होते असेही म्हटले गेले आहे. पण महाराष्ट्रात ग्रामनामापुढे ‘ कर ’ जोडून आडनावे लिहिण्याची पद्धती असली तरी कर्नाटकात तशी नाही. बेळवी, लोकूर, गोकाक, हुदली इत्यादी कर्नाटकी देशस्थ ब्राह्मणांत आढळणारी काही आडनावे त्या त्या गावाच्या नावावरूनच आलेली आहेत. तेव्हा मुक्तेश्वराचे घराणे मूळ ‘मुद्गल’ गावचे असेल तर ते गाव कर्नाटकात असल्याने त्याचे आडनाव याही दृष्टीने ‘ मुद्गल ’ असेच असणे बरोबर आहे.

‘ मुद्गल ’ या आडनावाचे अत्रिगोत्री घराणे आज नाही ( हेही पूर्ण संशोधनान्ती ठरले आहे असे नाही ) हा पुरावा जबरदस्त नव्हे. आडनावात बदल होत असतात हे लक्षात घ्यायला हवे. आज मुक्तेश्वराचे वंशज

‘तेरवाडकर’, ‘इनामदार’ यांतील एक किंवा दोन्ही उपनामे लावितात. पण पूर्वी त्यांना कोणते तरी उपनाम असायला नको काय? या घराण्याचे पूर्वीचे उपनाम ‘मुद्गल’ हेच आहे असे माझे मत झाले आहे.

‘मुद्गल’ हे आडनाव पूर्वी नव्हतेच असे म्हणता येत नाही. शिवदास गोमाच्या काशीखंडात (अ. ८०) ‘मुद्गल’ हे आडनाव म्हणूनच पुढील ठिकाणी आले आहे–“म्हणोनि त्या मनोरगे (?) आज्ञापिलें । माणकेश्वर मुद्गलें मज संस्कृत कथिलें । मग म्या महाराष्ट्र आरंभिलें। जनाचे उपकारास्तव ॥ १२२ ॥” या ग्रंथाचा निश्चित काल माहीत नाही पण तो २५०–३०० वर्षांहून प्राचीन असावा असे वाटते.

मुक्तेश्वर कालातच अत्रिगोत्री मुद्गलाचा पुरावा मिळतो. ऐतिहासिक साधनग्रंथांत ‘मुद्गल’ आडनाव अनेक ठिकाणी आहे. माझ्या नजरेस आलेली काही स्थळे येथे प्रथम सादर करतो. बापूजी मुद्गल हवालदार (शिवचरित्र साहित्य खंड १, लेखांक २७), कृष्णाजी मुद्गल (शि. च. सा. खं. २, ले. ९३), कृष्णाजी मुद्गल व त्याचा भाऊ बहिरो बाबाजी सुरूरकर (शि. च. सा. खं. २, ले. १३४), रा. बापूजी मुद्गल हवालदार व कारकून (सदर खं. ३–१५७), बापूजी मुद्गल देशकुलकर्णी ता। मजकूर (खं. ३–६२५, ६३३, ६३५), गंगाजी मुद्गल हवालदार (म. इ. सा. खं. २०–४१, २४६). पुरंदरे दफ्तर भाग ३ मध्ये गोविंद मुद्गल (देशपांडे ता। खेडेबारे याचा शिवकालीन करिणा, पृ. १४०), बापूजी मुद्गल (सदर करिणा, पृ. १३२, १३३, १३९), मुधाजी बापूजीचा लेक श्यामजी मुदगल (ले. १५९) अशा स्थळी मुद्गल आडनाव दिसून येते. हे सर्व उल्लेख शके १५३२ (शि. च. सा. खं. २–९३) ते शके १६४२ (म. इ. सा. खं. २०–४१) च्या दरम्यानचे आहेत. शि. च. सा. खं. १ च्या प्रस्तावनेत (पृ. २५) द. वि. आपटे लिहितात, “ले. २६ व २७ बापूजी मुद्गल हा पुणे प्रांताचा हवालदार होता. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण तर्फ खेडेबारेचा देशपांडे. याने दादाजी कोंडदेवाच्या मृत्यूनतर कोंढाणा घेण्यास शिवरायास मदत केली. शाइस्तेखानाच्या स्वारीत गाजलेले चिमणाजी व दादाजी हे या बापूजीचेच मुलगे.” पुरंदरे दफ्तर

भाग ३ मधील ले. १५९ मध्ये ‘ मुधाजी बापूजीचा लेक शामजी मुदगल ’ असा उल्लेख असून याच लेखांकात आरंभी मुधाजी बापूजीचा निर्देश ‘ मुधाजी बापूजी अत्रे ’ असा आहे. शके १८७२ च्या डॉ. राजंदेकरांच्या पंचांगात देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांची गोत्रावळी दिलेली आहे. तिच्यात अत्रे हे आडनाव फक्त अत्रिगोत्रात आहे. तेव्हा मुद्गलाचेच आणखी एक आडनाव अत्रे व अत्रे हे अत्रिगोत्री म्हणून मुद्गल अत्रिगोत्री ठरतात. सारांश मुद्गल हे आडनाव अत्रिगोत्रात असून ते अर्वाचीन नव्हे ही गोष्ट प्रियोळकरांनी मान्य करायला हवी. ‘ नवशक्ती ’तील उत्तरात्मक लेखात मुक्तेश्वरकाली अत्रिगोत्री मुद्गल दाखवा असे प्रियोळकरांनी आजगावकरांना आव्हान दिले होते. हे आव्हान स्वीकारूनच त्याचे उत्तर येथे दिले आहे.

**समारोप**—मी केलेल्या या विवेचनावरून मुक्तेश्वरासंबंधी चालत आलेल्या समजुती आधारशून्य नाहीत याची अभ्यासकांना खात्री पटेल असा विश्वास वाटतो. प्रियोळकरांनी उपस्थित केलेल्या विचारांनी मुक्तेश्वर-चरित्राविषयीच्या या पुनर्विचारांना चालना मिळाली. संशोधन हा प्रतिष्ठेचा विषय होण्यापेक्षा सत्यनिर्णयाचा विषय व्हावा एवढीच अपेक्षा आहे.

**पुरवणी : थोडी अधिक माहिती**–हेर्ले येथील विश्वंभर स्वामीच्या समाधीचा उल्लेख प्रा. प्रियोळकरांनी आजगावकरांना दिलेल्या उत्तरात आला आहे.[1] हेर्ले येथील हे स्थान व ज्यांच्याकडे त्याची व्यवस्था आहे त्या श्री. भाऊसाहेब नाईकांकडील कागदपत्र पाहण्यासाठी मी दोन वेळा तेथे जाऊन आलो. श्री. विश्वंभरस्वामींच्या या वृंदावनावर चारीही बाजूंना दगडांवर मजकूर कोरलेला आहे. त्यातील ‘ ॐ श्रीविश्वंभरस्वामी शके १६८९ सर्वजित्संवत्सरे भाद्रपद शुद्ध तृतीया [ एवढा पूर्व बाजूचा मजकूर ] गुरुवार हस्तनक्षत्र तद्दिनी समाधिस्थ...[ उत्तर बाजूच्या मजकुरातील थोडा भाग ] ’ या तिथीचा मोडकजंत्रीवरून विचार करता शके १६८९ त ‘ सर्वजित् ’ संवत्सर, भाद्रपद शुद्ध तृतीया, गुरुवार हा सर्व योग जमतो.

१ आजगावकरांचे टीकालेख ( वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेले ) मला पाहायला मिळालेले नाहीत.

हस्तनक्षत्राचा उल्लेखही अगदी बरोबर आहे असा निर्वाळा मला मिळाला आहे. श्री. दुंडगेकर यांच्या केसरीतील एका लेखावर विसंबून आजगावकरांनी हा शक १५८९ मानलेला दिसतो. पण १५८९ त 'सर्वजित्' नसून 'प्लवंग' संवत्सर आहे. श्री. दुंडगेकरांना आडवा सहा हा आडव्या पाचासारखा वाटला असावा. तथापि पुढील संवत्सर, तिथी, वार, नक्षत्र यांच्या उल्लेखांनी हा शके १६८९ च होय यात शंका राहात नाही. श्री. नाईक यांच्याकडील कागदपत्रांत 'श्रीविश्वंभरबावा', 'श्रीविश्वंभरबावा यांचें वृंदावन' या उल्लेखांपलीकडे अधिक काहीच माहिती नाही. मुक्तेश्वरकृत 'विश्वंभराची आरती' ही येथे म्हणण्यात नाही. शिवाय हे सर्व कागदपत्र शके १६७७ नंतरचे असून शके १६८९ पूर्वीच्या कोणत्याही कागदात विश्वंभरबावाचा उल्लेख नाही. तेव्हा शके १६८९ त दिवंगत झालेल्या या विश्वंभरस्वामीचा एकनाथमुक्तेश्वरांशी नात्याचा संबंध जोडणे अशक्यच आहे. मात्र नाईकघराण्यात एकनाथषष्ठीचा उत्सव होत असतो व वृंदावनाच्या पश्चिम बाजूस 'विठ्ठलकृष्ण बालकृष्ण एकनाथ जनार्दन दत्तात्रय परात्पर परमेष्ठि सदाशिवाय' असा परंपरादर्शक मजकूर असल्याने हा विश्वंभरस्वामी एकनाथांच्या शिष्यपरंपरेतील असला पाहिजे असे म्हणता येते.

**मुक्तेश्वराची निधनतिथी** – मुक्तेश्वराचे वंशज तेरवाड येथे प्रतिवर्षी दत्तजयंतीबरोबर एकनाथषष्ठी ( फाल्गुन वा॥ ६ ) व मुक्तेश्वरपंचमी ( ज्येष्ठ शु॥ ५ ) असे उत्सव करतात. हे उत्सव परंपरेने अखंड चालत आलेले आहेत. अलीकडे लाटकर पंचांगातही ज्येष्ठ शु॥ ५ च्या पुढे 'मुक्तेश्वर महाराज पुण्य दि. ( तेरवाड )' असा उल्लेख होत असतो. पंचांगकर्त्यांना ही माहिती तेरवाडकरांकडून मिळाली असावी. मुक्तेश्वराचा निधनशक ज्ञात नसला तरी या उत्सवावरून त्याचे अवसान वरील तिथीला झाले असे दिसते.

: ३ :

# नामा पाठकाचे अश्वमेधपर्व

जैमिनिकृत अश्वमेधपर्वाच्या आधारे झालेल्या ज्ञात मराठी रचनांत कालदृष्ट्या नामा पाठकाचे स्थान पहिले आहे. या ग्रंथाचे प्रकाशन अद्यापि झालेले नसल्याने त्याविषयी विस्ताराने लिहिता येत नाही. तथापि मला उपलब्ध झालेल्या अध्यायांच्या साह्याने यासंबंधी थोडी चर्चा करीत आहे. इस्लामपूरचे माझे एक स्नेही श्री. बाबूराव रुकडीकर, बी. ए. बी. टी. यांच्या घरची काही बाडे चाळीत असताना नामा पाठकाच्या अश्वमेधाचे ७४ ते ८६ व ११९ असे एकूण चौदा अध्याय मला मिळाले. ते माझ्या स्वाधीन केल्याबद्दल श्री. बाबूरावांना धन्यवाद !

म. म. द. वा. पोतदारांनी भा. इ. सं. मं. त्रैमासिकाच्या सतराव्या वर्षाच्या तिसऱ्या अंकात ‘ एका मराठी अश्वमेधाची काही जीर्ण पाने ’ हा लेख प्रसिद्धिला आहे. त्या पानांतील भाषेचे स्वरूप निःसंशयपणे एकनाथ पूर्वकालीन असल्याने व अक्षरवटिकाही नाथांच्या अगोदरची असल्याने ही पाने नामा पाठकाच्या अश्वमेधातील असावीत असे त्यांचे अनुमान आहे. त्यांनी दिलेल्या पानांपैकी पहिल्या दोन पानांतील भाग जैमिनीच्या अ. ४१ते ४६ मध्ये आलेल्या मयूरध्वजाच्या कथेतील असून तो अ. ४५–४६ मधील भागाचा अनुवाद आहे. तिसऱ्या पानातील मजकूर ‘ कर्मविपाक-वर्णननामक ’ ४८ व्या अध्यायातील थोड्या भागाचा अनुवाद दिसतो. चंद्रहास्याची कथा जैमिनीने अ. ५० ते ५९ यांत सांगितली असून प्रा. पोतदारांनी दिलेल्या चौथ्या पानातील हकीकत अ. ५७–५८ मधील काही भागाचा अनुवाद आहे असे म्हणता येते. मी या लेखासोबत ११९ वा अध्याय प्रसिद्ध करीत आहे. या अध्यायाच्या सुरुवातीचा विषय जैमिनीच्या ६३ व्या अध्यायावरून थोड्याफार फरकाने घेतला आहे. पुढे अश्वमेधाची तयारी झाल्यानंतर “ भेटिमाजी पार्थ। निवेदितसे वृत्तांत। अैकोनी ठेले निवांत। ऋषी समस्त देवगण ॥ ४० ॥ ” व “ जयमीनी

ह्मणे रायासी। पार्थ भेटिमाजी वर्तमानासी। सविस्तर सांगे धर्मरायासी। ते श्रवण कीजे सावकासी ह्मणे नामा ॥ १२५॥" श्यामकर्ण वारूसमवेत पृथ्वीपर्यटन करिताना आपल्यावर आलेल्या प्रसंगांची माहिती अर्जुन धर्मराजाला देतो. अशा रीतीने संक्षेपतः पूर्ववृत्तकथन करून एकंदर ग्रंथाचा सारांश देण्याची नामा पाठकाची ही पद्धती मूळ ग्रंथाहून भिन्न आहे. मुळात वारू परतल्यानंतर श्रीकृष्ण एकटाच पुढे येतो व धर्मराजास अगदी थोडक्यात कोण कोण राजे आले आहेत ते सांगतो, ( अ. ६२ श्लो. १४–२५ ) व पुढच्या अध्यायात ( ६३ ) अर्जुन हीच हकीकत कुंती, देवकी, धृतराष्ट्र व विदुर यांना ( श्लो. २२ ते २९ ) सांगतो. नामा पाठकाने येथे केलेले बदल व विस्तार स्वाभाविक आणि समुचित वाटतात. ११९ व्या अध्यायातील या निवेदनात ओव्या ७२ ते ८५ मध्ये मयूरध्वज व त्याचा पुत्र ताम्रध्वज यांचे उल्लेख असून ओ. १२० ते १२४ मध्ये चंद्रहास व त्याचे दोन पुत्र मकरध्वज व पद्माक्ष यांचे निर्देश आहेत. यावरून म. म. पोतदारांनी निर्देशिलेल्या जीर्ण पानांतील ओव्या या ग्रंथात असणे कसे संभवनीय आहे हे लक्षात येईल. मजकडे असलेल्या अध्यायांत चौथ्या चरणात मध्ये यमक असलेल्या खूपच ओव्या आहेत. मात्र वरील जीर्ण पानांत त्या थोड्या आहेत. शिवाय मजकडील हस्तलिखितातील ओवी अधिक ऐसपैस वाटते. राउळगन, मोहाछाव असे काही शब्दही समान दिसतात पण हे शब्द फार महत्त्वाचे आहेत असे म्हणता येणार नाही. नामा पाठकाचा उपलब्ध झाला तेवढा ग्रंथ कोणी प्रसिद्ध केला असता तर हे अधिक बारकाईने ताडून पाहता आले असते.

**अध्यायसंख्या**— ११९ व्या अध्यायातील हे वृत्तनिवेदन चंद्रहास्याच्या कथेपर्यंतचे आहे. म्हणजे मूळ संस्कृत ग्रंथाच्या ५९ अध्यायांअखेरपर्यंतच्या अनुवादाचे इतिवृत्त येथे आढळते. नामा पाठकाने ही हकीकत आपल्या अश्वमेधात कोणत्या अध्यायापर्यंत आणली होती हे कळायला आज मार्ग नाही. अ. ७४ ते ८६ या तेरा अध्यायांतील कथांचा उल्लेख वरील निवेदनात नाही. एवढ्यावरून हे निवेदन ७४ व्या अध्यायाच्या पूर्वीच्या काही भागापर्यंतचे आहे असे म्हणता येते. मजकडील हस्तलिखितात

अ. ७४ त कनकावतीचा राजा सिंधुकाळ ( काळनदीचा पुत्र ) याचे, अ. ७५ ते ७८ त ताळकेताचे दोन पुत्र ‘ सीह्यकेत ’ व ‘ वज्रकेत ’ यांचे, अ. ७९ ते ८५ त गजासुरपुत्र दुंदुर्भाचे आणि ८६ त बाणासुराचे ( अपूर्ण ) अशी आख्याने आहेत. ही जैमिनीच्या अश्वमेधात नाहीत. शिवाय येथे इतरही काही आख्याने अधूनमधून आढळतात. या सर्वांचा निर्देश पुढे १२० व्या अध्यायात कवीने केला असला पाहिजे. ग्रंथसमाप्तिदर्शक मजकूर या ११९ व्या अध्यायात नसल्याने आणि समग्र ग्रंथाचे संक्षिप्त निवेदन येथे पूर्ण झालेले नसल्याने हा ग्रंथ अजून पुढे लिहिला गेला असला पाहिजे याची खात्री वाटते. म्हणजे या ग्रंथाचे ११९ पेक्षाही काही अधिक अध्याय असले पाहिजेत.

पण कै. भावे आणि पांगारकर दोघेही नामा पाठकाचा हा ग्रंथ ९५ अध्यायांचाच आहे असे सांगतात. श्रीरामदासी संशोधन खंड १ मध्ये ३५९ ( १ ) येथे पाठक नामाकृत अश्वमेधाचा उल्लेख समर्थभक्त देवांनी केला आहे. तथापि त्यांना अधलेमधले असे एकंदर सव्वीस अध्यायच उपलब्ध झाले असून शेवटचा अध्याय ९३ वा आहे. इतर काही ठिकाणी या ग्रंथाचा निर्देश असला तरी अध्यायसंख्या निर्दिष्ट केली गेलेली नाही. यामुळे अधिक विचार होणे जरूर आहे.

अ. ७४ ते ८६ व अ. ११९ यांतील अक्षराचे वळण, शाई व कागद सारखेच आहेत. एकानेच हे सर्व अध्याय लिहिले असले पाहिजेत यात शंका नाही. ‘ संध्यावंदन ’ ऐवजी ‘ संध्यावदन ’ आणि ‘ ख्याती ’ ऐवजी ‘ ख्यांती ’ असे सर्वत्र लिहिले आहे. अनुच्चारित अनुस्वारांना कोणत्याच अध्यायात थारा नाही. द्व, ज्ञ व ऐ ही अक्षरे सर्वत्र अनुक्रमे द्द, ज्ञ्न, अै अशी आढळतात. यांवरून ७४ ते ८६ अध्याय लिहिणाऱ्याचेच हस्ताक्षर ११९ व्या अध्यायातही आहे हे स्पष्ट होते. पण ७४ ते ८६ या अध्यायांच्या शेवटी ‘ नामा पाठक ’ अशी आडनावासह असणारी मुद्रा मात्र ११९ व्यात फक्त ‘ नामा ’ एवढीच आढळते. तथापि दोहोंकडे चार यमकी ओव्या आहेत. ‘ जुझारू, तुरवार, धावण्या, उत्पवन, मुर्छापणे, वळंघले, घोरांधर ’ असे समान शब्द आहेत. शिवाय ११९ व्यातील

१२५ व्या ओवीत 'पाठक' शब्द सामावणे शक्य आहे म्हणून तो लेखकाच्या अनवधानाने लिहायचा राहून गेला असावा असे वाटते. म्हणून या सर्व अध्यायांचा कवी एकच असावा.

**शब्दसंपत्ती**—या हस्तलिखितातील भाषेचे स्वरूप अर्वाचीन झालेले दिसते. कागदावर काही इंग्रजी अक्षरांचे छाप दिसत असल्याने प्रत फार जुनी नसावी, पण तरीही कागद अगदी जीर्ण झाला आहे. प्रा. पोतदारांच्या हस्तलिखितातील भाषेचे व येथील भाषेचे स्वरूप यांत बराच फरक आढळतो. निरनिराळ्या नकलकारांचे हात फिरत फिरत मूळ ग्रंथ या स्थितीला आला आहे. तथापि, मूळ किंवा मुळाबरहुकूम ग्रंथ जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत थांबण्यापेक्षा उपलब्ध साधनांचा विचार व्हावा या हेतूने हा लेख लिहिला आहे. मात्र भाषेचे स्वरूप बदललेले असले तरी येथे दिसणाऱ्या विशिष्ट शब्दांवरून ग्रंथाचे जुनेपण अजमाविता येते.

नोकणे–टोचून बोलणे, चाका-खा-टगे-चकीत होणे, अभारणे–तुष्टणे, यौजणे–योजणे,वोजावणे–सावरणे, कोमाइणे–कोमेजणे,खेवणणे–जडित करणे, थोकणे–थांबणे, वलंगणे–वल्गना करणे, आहळणे–होरपळणे, गुऱ्हाडणे–'गुढारणे'चा वर्णविपर्यय (?), उपलाणणे–नेहमीहून अर्थ भिन्न म्हणजे परतणे, युद्धवेष उतरणे असा दिसतो [पाहा– अस्तमान झाल्यानंतर 'तेव्हा उपलाणीले विरी। ठाई ठाई जाले मेळिकारी ॥ १०६ ॥ अ. ७५', 'सूर्य अस्तमाना गेला। उपलाणीला शैन्यमेळा। अर्जुन अज्ञा करिता जाला। कांबीकाराला ते काळी ॥ ३८ ॥ अ. ७७'], विभांडणे–पराभव करणे, सुखाडणे–सुखी होणे अशी क्रियापदे आणि बीजे करणे–येणे, आटभविनणे–त्रास होणे, उपेणे करणे–वस्ती करणे, घर घेणे–नाश करणे, सूड मागणे असे वाक्प्रचार आढळतात. प्राचीन वाङ्मयात आढळणारे किती तरी जुने शब्द येथे आहेत, उदाहरणार्थ-हतवा–केशर, कुंकू इत्यादीने उठवलेले हस्तचिन्ह, वोळंग–सभा, दळवयि-ई-वाही–सेनापती, दूस–तंबू, अरोगण–भोजन, मेळिकार–शिबिर, सावया–साह्यास, पापर–लाथ, रवंदळी–नाश, साउमा–समोर, मुर्छापणे–मूर्च्छापन्न, सीराव–वर्षाव (पाहा–'सीराव केला बाणाचा' २६। अ. ७८), खंताव्यस्त–चिंतातुर,

खस्ताव्यस्त-कष्टी, वील-विलंब, वेळ, बैसका-बैठक, पष्ट-स्पष्ट, सागळा-पाणी भरण्याचे भांडे, देवडा-अतिशय, आदळ-झोंबी, कडवसा-बाजू, मस-मत्स्य, दादुला-वीर, अगड-खंदक, तट, पुढार-पुढील विचार, बोहरी-नाश, [ काळ, श्रीऋद्धिपूरवर्णन १९५ ], उपाधीके-उपाध्येपण, वोहारे-वधूवर, थडवा-काठ, अगळा-अडसर, पाटोळा-रेशमी वस्त्र, पायाळ-मार्गदर्शक ? [ पाहा-' पुढे पायाळ नारद ' ८९। अ. ८० ], पाणीयाडे-पाणवठा, तळे, भिंडिमाळ-(सं.) भिंदिपाल, वेळाकुळ-कैवारी ?, मोगरे-पायदळ, रक्षणाईत-रखवालदार, रणखेळे-योद्धे, काटीकार-दवंडी पिटणारे, कोतेकार-भालेकरी, घरटिकर-रखवालदार, पांथीकर-पंक्तीस जेवणारा, राहावा-वस्ती, हीणाव-कमीपणा, उठावा-उठाव, अधिकाव-वरचढपणा, कुडावा-संरक्षण, वाटीव-पराक्रम, यावा-सामर्थ्य, करवडी-ओळी, समुदाय, धुई-धुके, अयनि-इच्छा, वागदोर-लगामाच्या दोऱ्या, साट-फटकारा, जुझाट-सुसाट, अदोळणी-आंदोलन, मोह्छाव-महोत्सव, राउळांगण-प्रासाद, राणीवसा, कोवसा-कैवारी, ढाळ-तेज, उचीत-बक्षीस, जुहार-जोहार-नमस्कार, चवक-वचक इ.

शाव्यायन, तुरवार, टाचाघोळ आणि अरणी हे शब्द विशेष लक्षात घेण्यासारखे आहेत. " येक सहस्र रथ सुवर्ण । तीतुकिच मुक्ताफळी भरिले स्यंदन । येक लक्ष दिधले शाव्यायन । मदे संपुर्ण डुल्लती ॥ ६० ॥ अ. ७४ " येथे ' शाव्यायन 'चा अर्थ हत्ती असा आहे. याच अर्थाचा मुक्तेश्वराच्या सभापर्वात ( १२-२२४ ) ' शाव्यायन ' असा आलेला शब्द बरोबर वाटतो. लेखकूने चुकीने तर ' शाव्यायन ' असे लिहिले नसेल ? ' तुरवार ' हा अश्ववाचक शब्द कवीने अनेक ठिकाणी वापरला आहे. त्याची व्युत्पत्ती ' तुर् + वारु ' अशी दिसते. ' टाचाघोळ ' शब्द आपल्यास अगदी नवीन आहे. पायघोळ शब्द आपल्या परिचयाचा. कृष्णाने वृद्ध ब्राह्मणाचे रूप घेतले असताना कवी त्याचे वर्णन करतो- " तुलसिमाळा शोभत । करि कनकझारी मीरवत । टाचाघोळ धोत्र दीसत । द्वीज चालत लगबगा ॥ १३ ॥ अ. ८५." महाराष्ट्र शब्दकोशात ' अरणी ' या शब्दाचे ' ( २ ) रणांगण, रणमैदान, युद्धभूमी, रणक्षेत्र व ( ३ ) ( ल ) पुढारी, सेनाव्यूह ' असे अर्थ दिले आहेत. मराठी व्युत्पत्तिकोशकारही

'रणांगण' असा अर्थ देऊन 'सं. आ + रण' अशी व्युत्पत्ती देतात. पण "ऐश्या मीळाल्या दोन्ही अरणी । तेथे जाली झोटधरणी । राक्षसि दीधलि उठावणी । वीरालागोनी भक्षीती ।। ९ ।। अ. ७६" व "दोन्ही मीळाल्या आरणी । वीरा होतसे झोटधरणी । राक्षेस धावति मुख पसरोनी पांडवसैन्नि हलकाल्लोळ ।। ९७ ।। अ. ७८" या स्थळींच्या उपयोगावरून या शब्दाचा लक्षणेने 'सैन्य, पक्ष' हा अर्थ बरोबर वाटतो. अग्नी निर्माण करणाऱ्या जशा दोन अरणी तसे रणाग्नी निर्माण करणारे, परस्परावर आदळणारे दोन पक्ष हे स्पष्टीकरण योग्य ठरते. शिवाय दोन्ही कोशांत दिलेल्या उदाहरणांतही 'सैन्य, पक्ष' हाच अर्थ ठीक जमतो.

**परकीय शब्द** या हस्तलिखितात फारच थोडे आहेत. त्यांचा थोडा विचार करू. 'दमामा' या वाद्यविशेषाचा उल्लेख काही ठिकाणी आहे. हा शब्द फारशीतून आला असावा असे म्हटले जाते. पण 'नीशाने, रणसिंगे, मोहरी, रणमोहरी, डौर, ढोल, काहळा, रणकाहाळा, शृंग, रणतुरे, भेरी, मृदांग, झल्लरि, गीडबिडिया, दवंडी, पिनाकी' या येथे आलेल्या इतर वाद्यांत एकही परकीय वाद्य नाही. तेव्हा 'दमामा' हा शब्द ध्वनिवाचक (सं. ध्मा ?) मानला तर ?

'आम्ही सपाई नागवलो' (ओ. ३४, अ. ७९) येथील 'सपाई' हा अरबी 'सफाई' वरून आलेला नाही. 'तेया देहा म्हणति भेटि । हे सपाइ नीजीव गोठि' (ज्ञा. १३–१०९२) व 'कैसीं वो माणुसें: सपाइ निपरनसें' (शिशुपाळवध २१६) अशा ठिकाणी तो आलेला आहे. शिशुपाळवधाच्या टीपकारांनी 'सपाइं = पायापासौनि मस्तकापर्यंत' अशी त्याची स्पष्टता केलेली आहे.

'चौबाजारे' (५२–अ. ७४) शब्द मुळात 'चौबारे' असावा. लेखकाने तो 'चौबाजारें' असा लिहिला असण्याचा संभव आहे. इतरत्र हा कवी 'चौमेरी' (४८–अ. ७९), 'चौफेरी' (७१–अ. ७६), 'चौफासी' (९६–अ. ८६) असे शब्द वापरतो.

'कागद' हा फारशी शब्द अ. ७८–८४ त आला आहे.

'अयस'–"तो स्वामी कार्तीक जन्मला । पार्वतिया वाढवीला ।

शंकरास अयस आला। देखिला शडानन ॥ १७ ॥ अ. ८०" येथील 'अयस' शब्द अरबी 'ऐष' ( = सुख, आनंद ) यापासून बनला असेल काय ?

**ग्रंथाधार**

"हा अश्वमेध युध्ध कळस। अठरा पुराणाचा सौरस। तो सांगता जाला व्यासशिष्य। श्रोता सुरस जन्मेजया ॥ १४० ॥ अ. ८१"

"मज मतिचा कैचा प्रकाश। परि श्रीगुरुचा उपदेश।
ह्मणोनी केला सौरस। ईतिहास पुराणीचा ॥ ११७ ॥ अ. ८६"

"हे व्यासमुखिचे उचिष्ट। लाभे भाग्य जरि असे श्रेष्ट।
हरीत भवरोग काळकुट। जाणति पष्ट अनुभवी ॥१२२॥अ.७८"

"आता तारकासुराचा वध। स्वामी कार्तीक करिल प्रसिध्ध।
तो परि(सा) वा अनुवाद। श्रोता सावध होउनी ॥१४६॥अ.७९"

अशा स्थळी केलेल्या उल्लेखांवरून जैमिनीच्या अश्वमेधाचा जसा हा ग्रंथ अनुवाद आहे तसाच इतरही काही पुराणांचा आधार कवीने घेतला आहे असे म्हणता येते. 'हे व्यासमुखिचे उचिष्ट' असे तर कवी म्हणतोच पण 'श्रीगुरुचा उपदेश'ही त्याला महत्त्वाचा वाटतो. ७४ ते ८६ अध्यायांत इतर ज्या ज्या ठिकाणांहून या कथा घेतल्या आहेत त्या त्या ठिकाणांचा कवी साक्षेपाने उल्लेख करतो. दुंदुभी-आख्यान 'हे शिव-पुराणीची कथा' ( अ. ७९–११९ ), कार्तिकजन्मकथा 'हे कार्तीक महात्मीची कथा' ( अ. ८०–११ ), गजाननजन्मकथा 'ऐसि गणेशाची उत्पती। लींगपुराणीची संमती' ( अ. ८०–५१ ), मत्स्याचे आख्यान 'तव बोले भुर्णपिसु। वशिष्ट ऐके कथारसु। मछपुराणीचा ईतिहासु। अति सुरसु सांगीतला' ( अ. ८०–८१ ), असे आधार तो नमूद करतो. शिवाय 'मुनी ह्मणे गा भारता। हे मछपुराणीची कथा। वशिष्ट होय परिसीता। सांगे तत्वता गर्गऋषि।' ( अ. ८२–१०७ ), 'लींगपुराणीचा ईतिहसु। सवाद अगस्ति आणि भुर्णपिसु। पुढे पार्था पडेल सायासु। जगन्निवासु साहकारी' ( ८२–१०८ ), 'हे भविशोत्तर पुराणीची कथा।

अगस्ति सांगे रघुनाथा । यथुनि अवधी पुरलि आता । वीरा समस्ता रणांगणी ' (८२–११०), ' अमिष्य ह्मणोनी मछ गीळीती । हे मछपुराणी वीत्पती । जैसा मछ वीदारी श्रीपती । मछमुर्ति होउनी ' ( ८३–१२६ ), ' वज्र दिधले अमरनाथा । हे लिंगपुराणीची कथा । अगस्ति जाला सांगता । धन्य श्रोता वशिष्ट ' ( ८४–५४ ), ' हे लिंगपुराणीची कथा । अगस्ति होये सांगता । तेणे संतोष वशिष्टाचे चिता । अनंद तत्वता ऋषिवर्या ' ( अ. ८५–९७ ) असे आणखीही तो लिहितो. या निर्देशांवरून जैमिनि-अश्वमेधाव्यतिरिक्त शिवपुराण, कार्तिकमाहात्म्य लिंगपुराण, मत्स्यपुराण, भविष्योत्तरपुराण यांचा उपयोग केल्याचे कवीनेच सांगितले आहे हे स्पष्ट होते. ११९ व्या अध्यायातील साररूप निवेदनात आलेल्या कथांपैकी पुढील जैमिनीच्या अश्वमेधात आढळतात– यौवनाश्व व त्याचा पुत्र सुवेग ( अ. ४ ते ७ ), अनुशैल्य ( मुळात अनुशाल्व अ. १२ ते १४ ), घोड्याचे रूपांतर ( जैमिनीत अशा स्वरूपाची कथा असली तरी ती बरीच भिन्न आहे. भयानक देशात जलपान करताना श्यामकर्ण प्रथम ' तुरगी ' होतो, दुसऱ्या सरोवरात जाताच ' व्याघ्री ' होतो आणि मग अर्जुनाने विष्णूचे चिंतन करताच पुन्हा मूळ स्वरूपात येतो. अ. २१ ) महिकावतीचा नीलध्वज व त्याचा पुत्र प्रवीर ( अ. १४,१५ ), घोड्याचे शिलेस चिकटणे ( अ. १६ ), चंपावती नगरीचा हंसध्वज आणि त्याचे सुधन्वा व सुरथ हे दोन पुत्र ( अ. १७ ते २१ ), स्त्रीराज्यातील प्रेमळा ( जैमिनीत ' प्रमिला नाम सा राज्ञी ' अ. २१, २२ ), भिक्षण ( मुळात ' भीषण '– बकासुर-पुत्र अ. २२ ), बभ्रुवाहन ( अ. २२ ते २४ व ३७ ते ४०. मध्यंतरी अ. २५ ते ३६ त कुशलवोपाख्यान ), रत्नपुरपट्टणाचा मयूरध्वज आणि त्याचा पुत्र ताम्रध्वज ( अ. ४१ ते ४६ ), सरस्वतीनगरीचा वीरवर्मा ( अ. ४७ ते ४९ ), चंद्रहास आणि त्याचे मकरध्वज व पद्माक्ष हे दोन पुत्र ( अ. ५० ते ५९ ). पण हिंगुळजा वनात गजाननाने निर्माण केलेले विघ्न, गंधमादन पर्वतावरील राक्षस, वारू नेणारा गंधर्व, च्यवनऋषी, ' दुतोंडीया 'बरोबरचे युद्ध, त्याचा बंधू टी म का न घो ल प ( ? ), प्रयागाचे नारायणाश्रम संन्यासी, ब्रह्मगिरीवरचा मयासुरपुत्र इंद्रध्वज व त्याचा पुत्र काळकेत, लोहगिरीवरचा अंगदपुत्र अमिराहो, हिंदोळीक वनातला

‘ शैन्यजित ’ व त्याचा भाऊ व्याघ्रकेत, भिक्षणाचा बंधू काळजिव्हा, रावणाचा पुरोहित पद्माक्ष राक्षस, ‘ कंन्याकुब्जा ’ नगरीचा कुशध्वज व त्याचा पुत्र चित्ररथ, कुसुमावतीचा ‘ सिंव्हध्वज ’ असुर, चौबळ राक्षस, ‘ यक्षणी ’ भुवनातील सुलभा, वारू पाण्यात गुप्त होणे, वृषकेताचे आपल्याच गोत्रजांशी युद्ध हे भाग कवीने बाहेरून घेतले आहेत. हे कथाभाग विस्ताराने सांगताना त्या त्या स्थळी त्याने आधारग्रंथांचा निर्देश कदाचित केलाही असेल.

यावरून केवळ जैमिनि-अश्वमेधाचे भाषान्तर वा अनुवाद करण्याचा त्याचा विचार नव्हता हे उघड आहे. जैमिनीच्या अश्वमेधाच्या आधारे पण अनेक पुराणांचे मंथन करून नामा पाठकाने हा ग्रंथ निर्मिला आहे असाच निर्वाळा द्यावा लागतो. अश्वमेधावर प्रथम रचना करणाऱ्या या कवीची ही व्यापक बैठक लक्षात घेण्यासारखी आहे. अश्वमेधावर रचना करणाऱ्या श्रीधरापुढे हा ग्रंथ असावा असे वाटते. पण याविषयीची चर्चा एका स्वतंत्र लेखाचा विषय ठरेल. अश्वमेधावर रचना करणाऱ्या कवींचे ग्रंथ मुळाशी ताडून त्यांची परस्परतुलना करणे उद्बोधक ठरेल.

मला उपलब्ध झालेल्या अध्यायांपैकी फक्त ११९ व्या अध्यायाची संहिता मुळाबरहुकूम देत आहे. ऱ्हस्वदीर्घ किंवा अनुस्वार इत्यादींचा बदल केलेला नाही. चौदाव्या शतकातील कवींसंबंधी अधिक संशोधन झाले पाहिजे. मला मिळालेल्या साधनाच्या आधारे थोडी चर्चा करण्याचा येथे मी यथामति प्रयत्न केला आहे.

## ११९ व्या अध्यायाची संहिता

श्रीगणेशाय नमः । श्रीदत्तात्रयाय नमः । श्रीगोवींदा गोपाळाये नमः । श्रीरामवरद ।

जयमिनी वदे रायासी । पुढे कथा वर्तलि कैसी । समस्ति क्रमिली ते निसी । भानु उदयासी पै आला ।। १ ।। देव ऋषि करिती संध्यावदने । सूस्नात होती द्वीजगण । येथावीधी देवतार्चेन । कर्मे विधान सारीले ।। २ ।। सर्व राजे होती सूस्नात । कर्माचरणी येथोच्चीत । सीध्ध जाले पै

समस्त । श्रृंगार करित नानापरी ।। ३ ।। भेटावयास धर्मकृष्णासी । घावो घातला नीशानासी । सीध्ध करोनी नीज सैन्यासी । यज्ञमंडपासी पै येती ।। ४ ।। अैक येरिकडील वृतांत । सूस्नात जाला श्रीअनंत । तयाते पूजित दीक्षीत । जो समर्थ धर्मराव ।। ५ ।। धनंजयादी समस्त । तेहि जाले सूस्नात । सर्वाभरणी अळंकृत । यज्ञमंडपात येते जाले ।। ६ ।। मुख्य अच्यार्या कुळगुरू । जो धौम्य तपश्वि ऋषेश्वरू । तेणे कुंडा घातला अवारू । शास्त्रप्रकारू काढुनी ।। ७ ।। गर्ता वेदिका पुर्ण मंडप । पताका तोरणे रत्नदिप । यागी मुख्य श्रीहरिरूप । चीत्स्वरूप येज्ञाचे ।। ८ ।। अग्निप्रतिष्ठा पुजन । परिसमुह परियुक्षण । प्रणीतापात्रे करोनी पुर्ण । वीध्या वीसर्जन होमार्थी ।। ९ ।। बर्व्हींचे अस्तरण । अज्य-स्छाली संस्छापण । ज्वलनाज्यानादी करून । होमप्रधान मंत्रोदके ।। १० ।। श्रृकश्रृवा परिमार्जन । केले दर्भाचे परिस्तरण । उदके करोनी परिसमोहन । अग्निसंस्छापण पै केले ।। ११ ।। पध्धति अच्यार्या श्रीव्यास । ब्रंह्मस्तान बगदालभ्यास । रुत्विज वामदेव मूक्तास । अणिक बहुवस अवधारा ।। १२ ।। गौतम वशिष्ट विश्वामीत्र । अत्रि भारद्वाज पाराशर । कश्यप जमदाग्नी सौभर । समस्त ऋषेश्वर ज्यातुकर्ण । १३ ।। गाळव रोम्यहर्ष कौडण्य । हे चौदा रुत्विज मुख्य जाण । होते भौत ( बहुत ) ऋषिगण । द्वार संपुर्ण रक्षीती ।। १४ ।। येज्ञदिक्षीत धर्मराज । करी मृगश्रृंग धरोनी वोजे । येज्ञभोक्ता मुख्य बिज । देवराज श्रीकृष्ण ।। १५ ।। सभासद श्रीहरि अपण । देवऋषी वीराजमान । परिवारासहित सूह्रदजन । देवगण तेथे आले ।। १६ ।। इंद्र ब्रंह्मा हरि हर । येमधर्म वरुण कुबेर । अग्नि चंद्र आणी भास्कर । आले समग्र येज्ञमंडपा ।। १७ ।। तव येरिकडे प्रथ्वीचे भुपती । राया धर्माते भेटो येती । हे अैकोनीया श्रीपती । संतोश चिती मानीत ।।१८।। वाद्य वाजली येकसरा । राजे आले मंडपद्वारा । त्यासी वृषकेत जाउनि सामोरा । राजया समग्रा अणितु ।। १९ ।। यौवनाश्व सुवेगेसी । भेटो आला धर्मरायासी । नमस्कारोनी ऋषिकेशी । युधीष्टीरासी भेटला ।। २० ।। मग नमस्कारीले देवगण । ऋषिस घालोनी लोटांगण । तैसाची सूवेग पुत्र जाण । अभ्युस्छान तयासी दीधले ।। २१ ।। तव आला अनुशैल्य । जो असूरवंसि प्रतापमल्ल । तेणे नमस्कारीला गोपाळ । करि कल्लोळ नामाचा

॥ २२ ॥ तो भेटला धर्मरायासी। तेणे संतोष युधीष्टीरासी। ह्मणे तु विरा साह्य जालासी। अश्वमेधासी सीध्धी नेले ॥ २३ ॥ तेणे नमस्कारोनी ऋषिगंण। पार्थे तया दीधले अभ्युस्छान। धर्माते ह्मणे अर्जुन। हा वीर दारुण महायौध्धा ॥ २४ ॥ येणे प्रथम नेला वारू। हा बळिया वीर जुझारू। याते जिंकी कर्णकुमरू। प्रताप थोरू पै याचा ॥ २५ ॥ मग पुजन करोनी शामकर्ण। प्रथम प्रवेशले हिंगुळजा वन। नमिला नाही गज्यानन। वीघ्न दारुण तेणे केले ॥ २६ ॥ मग तोषोनी हींगुळा माता। ह्मणे आधि स्मरावे गणनाथा। मग नासे हे विघ्न तत्वता। मग पुजिले येकदंता सद्भावे ॥ २७ ॥ तेथुनि नीघाला शामकर्ण। प्रवेशला गीरी गंधमाधन। तो राक्षेस उटिला महा दारुण। मग निवटि भीमसेन तयासी ॥ २८ ॥ तेथुनि नीघाला वारू। तव गंधर्वि नेला सत्वरू। मग भेटला चेवन ऋषेश्वरू। महा थोरु पराक्रमी ॥ २९ ॥ तयाचे करोनी स्तुतिस्तवन। मग वारू प्रवेशला महा वन। दुंतोंडीयासी युध्ध तेथे दारुण। जाले जाण महाराजा ॥ ३० ॥ बहुत श्रम अह्मा जाले। मग देवे दुतोंडीयाते वधीले। मारुतिने साह्य बहुत केले। सागरि बुडविले निशाचर ॥ ३१ ॥ टी म का न घो ल प (?) त्याचा सोहदर। तेणे युध्ध केले दुर्धर। मग देवे विमान आणुन सत्वर। घातले निशाचर त्यामाजी ॥ ३२ ॥ ते बुडविले समुद्रात। नगरि जाळुन केलि हाताहत। तव वारू पुढारा न प्रवेशत। तेथुनि फीरत उत्तरेसी ॥ ३३ ॥ पुढे जाउन शामकर्ण। वने दारुण वोलांडुन। मग प्रवेशला बहुला वन। वत्छ होउन राहीला ॥ ३४ ॥ आह्मासी गुढ पढीले थोर। मग आठविला यादवेंद्र। पत्र लेहुन पाठविला शर। मग देवे प्रत्योतर पाठविले ॥ ३५ ॥ मग प्रार्थुनी कामधेनुसी। वत्छ नेले प्रयागासी। नारायणाश्रम संन्यासी। अभिशकेसि तीही केले ॥ ३६ ॥ मग वारु पुढारा चालीला। तो महिकावति नगरासी गेला। तेथे निळध्वजाचे पुत्रे धरिला। नामाथीला प्रविर हा ॥ ३७ ॥ या दोघाचा प्रताप गहन। नाम काढीता फाल्गुण। उभयेता कर जोडुन। केले नमन धर्मराया ॥ ३८ ॥ त्यासी पोटसि धरुन पंडुनंदन। म्हणे तुह्मि साह्य होउन केला हा यज्ञ। अैसे दोघाप्रति गौरउन। मग पुढे पार्थ नीवेदी ॥ ३९ ॥ भेटिमाजी पार्थ। निवेदितसे वृतांत। अैकोनी ठेले निवांत। ऋषी समस्त देवगण ॥ ४० ॥ नीळध्वज प्रविर समागमे

घेतला । शामकर्ण पुढारा सोडीला । उद्दालीक वनि सीळेसी जडला । उध्धार केला मग तयेचा ॥ ४१ ॥ पुढे चमकला शामकर्ण । पावला चंफावति पठण । अैसे वदता फाल्गुण । आला अपण समिप हंसध्वज ॥ ४२ ॥ पार्थे तयासी धरोनी हाती । भेटविला राया धर्माप्रती । सांगे तयाची कीर्ती । जन अैकति सभेचे ॥ ४३ ॥ याचा पुत्र सुधन्वा वीर । युध्धी तयाचा प्रताप थोर । तेणे तोशविला सारंगधर । नीज शरिर देउनी ॥ ४४ ॥ सूधन्वा धाकटा सहोदर । सुरथ नामे महावीर । तयाची प्रतिज्ञा महा थोर । जगदिश्वर संतोशवीला ॥ ४५ ॥ सद्भक्तामाजी मुगुटमणी । परम धार्मीक पित्रुवचनी । दोघे निमाले समरंगणी । प्रतीज्ञा पुरउनी महाराजा ॥ ४६ ॥ वीसरोनी पुत्रदुःखासी । सोडोनी मोहममतेसी । येउनि भेटला देवासी । हरिभक्तिसी अति नीरंतर ॥ ४७ ॥ भावे पुजि श्रीकृष्णासी । जाला पक्षपाती अह्मासी । काय वर्णावे याचे किर्तीसी । या हंसध्वजासी धर्मराया ॥ ४८ ॥ तेथुनि गेले श्रीहरि । मग वारु प्रवेशले ब्रंह्मगीरी । तेथे मयासूरपुत्र राज्य करि । सहपरिवारी इंद्रध्वज ॥ ४९ ॥ त्याचा पुत्र काळकेत । तेणे वारु धरिला नीभ्रांत । तेथे साह्य जाला अंजनिसूत । केला नीःपात तया दोघाचा ॥ ५० ॥ पाताळवीवरि तयाचे नगर । प्रधाने नेला तेथे तुरवार । मग तेथे प्रवे(श)लो समग्र । तेथे बाळकेसि सुंदर देखिली ॥ ५१ ॥ तीने दिधला शामकर्ण । आणखि अमित्य दिधले धन । अनन्यभावे आली शरण । मग बाळकेतालागुन दिधले राज्य ॥ ५२ ॥ परि वीवरद्वार न कळे कवणासी । मग मायारुपे प्रगटले ऋषिकेशी । बाहेरि काढीले सकळासी । मग लोहोगीरीपासी पावलो ॥ ५३ ॥ तेथे भेटला अमिराहो । जो अंगदपुत्र महाबाहो । त्यासी हनुमंते करोनी उपावो । तोही ठावो टाकीला ॥ ५४ ॥ तेथोनी आलो हींदोळीक वनासी । तेथुनि शैन्यजिते नेले वारुसि । मग निवट्टनि तयासी । शामकर्णासी आणीले ॥ ५५ ॥ त्याचा बंधु व्याघ्रकेत । तेणे घाला घातला नीसीत । चोरुनि नेला रतिकांत । मजहि नेत पाताळा ॥ ५६ ॥ चोरीले अह्मा दोघासी । वधु पाहे कामाक्षीसी । तेथे येणे जाले मारुतिसी । तेणे राक्षसासी नीवटिले ॥ ५७ ॥ शक्ति लाउनि भेदारा । अह्मांसी अणिले निजभारा । उपचारोनी समग्रा । वारु पुढारा सोडीले ॥ ५८ ॥ तो वारु स्त्रिराज्यात प्रवेशला । घोडा

प्रेमळेने धरिला । तेथे युद्धप्रसंग जाला । वर मागीतला भोगावया ॥ ५९ ॥ ते साटी सहश्र राणीयासी । पाठविली असे तुह्मापासी । तेथुनि वारु गेला ब्रंह्मारंण्यासी । तेथे भिक्षणे तयासी धरियेले ॥ ६० ॥ तो नीशाचर अति दारुण । तो नीवटिला न लगता क्षण । त्याचा बंधु काळजिव्हा जाण । मेघाआडुनि जुझिनला ॥ ६१ ॥ त्याचींया कैवारासी । इंद्र आला युध्धासी । तोही पावला मुर्छनेसी । येणे शीवासी मग जाले ॥ ६२ ॥ तेथे मोहनिने व्यापीले शंकरा । संतोष जाला उमावरा । देवे सोडविले निशाचरा । गणपरिवारामाजी तो ॥ ६३ ॥ तेथुनि चालीला शामकर्ण । पद्माक्ष राक्षेस अति दारुण । रावणाचा पुरोहीत जाण । वारु धरुनि तेणे नेला ॥ ६४ ॥ नाना मायामते । होमी बैसोनी राक्षसनाथे । गंधमालति स्त्रीयेते । रणभुमिते पाठविले ॥ ६५ ॥ तीने अपार राक्षस्ति मीळउनी । युध्धी त्रासीले अह्मा-लागुनी । मग हनुमंते वधीली ते राक्षेसिणी । सकळा जणि समवेत ॥६६॥ त्यावरि पद्माक्ष उठावला । तेणे संग्राम थोर केला । तो वृषकेते मेघवर्णे वधीला । दाहा केला नगरीचा ॥ ६७ ॥ तयाचे भांडारे अपरमित । भरिले सहस्रे सहश्र रथ । वारु पुढारा चमकत । पावला त्वरित मणीपुरा ॥६८॥ तेथे भेटला बभ्रृवाहन । जो चीत्रांगदेचा नंदन । तेणे युध्धी जींकीले सकळ सैन्ये । मग श्रीहरि तेथे आले ॥ ६९ ॥ अंतःपुरासमवेत । धावण्या आले रमानाथ । मग अंमृतमणी अणुनि त्वरित । वेगी उटवीत समस्ता ॥७०॥ संगे घेउनि बभ्रृवाहनासी । पुढारे सोडीले शामकर्णासी । भीमे घेउनि उल्पी चीत्रांगदेसी । तुह्मापासी पै आला ॥ ७१ ॥ तो पुढे मयुरध्वजनंदन । मार्गी राया भेटला जाण । तेणे युध्ध केले दारुण । नीमाले सैन्य अमुचे ॥७२॥ नाम घेता मयुरध्वजाचे । तया अर्थे (र्ते ?) धर्मभेटिचे । चरण वंदुनी श्रीहरिचे । मुख पार्थाचे अवलोकीत ॥ ७३ ॥ मग मयुरध्वजासी हाती धरुन । धर्मरायासी भेटवि अर्जुन । सवे तांम्रध्वजे केले नमन । सांगे वर्तमान धनंजये ॥ ७४ ॥ येणे अमुचा रथ उचलुन । केले अकाशी उत्पवन । मग भुमिसी टाकीला तेथुन । तव मुर्छापणे अह्मि दोघे ॥ ७५ ॥ देवे सावध केले मजला । रत्नपुरपटाणि नेता जाला । वेश द्विजाचा धरिला । रात्री प्रवेशला नगरात ॥ ७६ ॥ देवे होउनि वृध्ध ब्रांह्मण । मज शिष्यत्व बाणले पुर्ण । दोघे गेलो सभेलागुन । मग केले पुजन मयुरध्वजे ॥७७॥ मग

राजा देत धनधांन्यासी। देव ह्मणे द्यावे अर्ध शरिरासी। राये घातले संकल्पासी। करवतासी अणविले ॥ ७८ ॥ मेळउनि स्त्रीपुत्रासी। आणी नगरनागरिकवासी। पाहातातो सत्वधिरासी। कर्वत मस्तकि घातला ॥ ७९ ॥ फाळी केली कंठवरी। मग प्रत्येक्ष जाला चक्रधरी। कुरवाळुनि अभय करी। अंमृतोत्तरि गौरविला ॥ ८० ॥ मग राजा जाला सावचित। तव पुढे देखिला रमानाथ। साहा अश्वमेधाचे पुंण्य हति घालीत। अपण येत समागमे ॥ ८१ ॥ तो हा राजा मयुरध्वज। याचा पुत्र प्रतापी हा तांम्रध्वज। अैकोनी संतोषला धर्मराज। कीर्तीध्वज देखोनी ॥ ८२ ॥ कीर्ती अैकुनि सात्वीकाची। मानसे वेधली रायाची। ह्मणति धंन्य हे मुर्ती सत्वाची। पेट मुक्तिची वसवीली ॥ ८३ ॥ द्रौपदादीक राजेश्वर। स्वानंदे डोलति ऋषेश्वर। म्हणति आदीपुरुष सारंगधर। सत्वप्रकार दाखविला ॥ ८४ ॥ मग गर्जोनी जयजयकारेसी। अभ्युस्छान पित्यापुत्रासी। देवोनी बैसवि ऋषिकेशी। पुराणे किर्तीसी वर्णीती ॥ ८५॥ तव कंन्याकुब्जा नगरिचा रावो। कुशध्वज महाबाहो। चीत्ररथ स्वयंमेवो। भेटि पाहा हो उभा असे ॥ ८६ ॥ पार्थ करि धरोनी तयासी। धर्माते भेटवि दोघासी। प्रथम नमुनि ऋषिकेशी। मग समस्तासी भेटले ॥ ८७ ॥ मुख अवलोकी युधीष्टीर। तव वदता जाला धनुर्धर। रत्नपुरिहुनि नीघाले तुरवार। पावले नगर या रायाचे ॥ ८८ ॥ हा ब्रंह्मवंसीचा राज्यधर। कुशध्वज विष्णुभक्त साचार। चीत्ररथ याचा कुमर। सुलोचना सूंदर पतिव्रृता ॥ ८९ ॥ येणे युध्ध केले दारूण। मी केला यासी पण। याते साह्य चतुरानन। अह्मा श्रीकृष्ण साहाकारी ॥ ९० ॥ देवे उभयेताचे करोनी समाधान। कुशध्वज पुजिला श्रीकृष्ण। अणुनि दीधले शामकर्ण। आला अपण साह्यार्थी ॥ ९१ ॥ अैसि कुशध्वजाची कथा। स्वय पार्थ होय सांगता। तयाते सन्मानुनी तत्वता। पुढील्या वृतांता सांगतु ॥९२॥ पुढे चालीले तुरवार। पावले कुसुमावति नगर। तेथे सिव्हध्वज असूर। राज्यधर अति वरिष्ट ॥ ९३ ॥ तयासी वर शंकराचा। तो कोण्हा न जींकवे साचा। उपाय न चले देवाचा। प्रताप दैत्याचा काय वानु॥ ९४ ॥ तेणे धरिले शामकर्ण। संग्राम केला अति दारुण। रणा आले नृपनंदन। नरनारायण पळाले ॥ ९५ ॥ तयासी दोघे झुझत। मेघवर्ण आणी वृषकेत।

तव भिमे आणीला धृषकेत । जो का पुत्र नभदंतिचा ॥ ९६ ॥ सीव्ह-ध्वजासी वरदान । बाळकहस्ते तुज मरण । ते सत्य करित जनार्दन । मग वृषकेतनंदन वधी तया ॥ ९७ ॥ तो सहकुटुंबेसि नीवटिला । मग देवे धृषकेतु अळिंगीला । राज्यपट तयासी दीधला । तो देश वोपीला धृषकेता ॥ ९८ ॥ तेथे ठेउनि प्रधान । बाळक घेउनि गेला भीमसेन । मग देवे उठविले सकळ सैन्य । पुढे वारु जाण सोडीले ॥९९॥ घोडे जाती उतरेसी । वोलांडुनि कुसुमावतिसी । गेले सरस्वतीनगरासी । मग धरि तयासी वीरवर्मा ॥ १०० ॥ जयाचा येमधर्म ज्यामात । तेथे संग्राम जाला बहुत । अमुचा सारथी अनंत । जाली मात विपरित ॥ १ ॥ हरिभक्त हा वीरवर्मा । कोणा नाटोपे संग्रामा । कृष्णस्मरणे भय येमा । मग धर्मराय अह्मा भेटला ॥ २ ॥ हाती धरोनी वीरवर्म्यासी । भेटविला राया धर्मासी । सन्मान देउनि तयासी । देवापासी बैसविला ॥ ३ ॥ पुढे चालीले शामकर्ण । ते धरिले राक्षेस चौबळे जाण । तेथेचि भेटला बळ-वर्धन । अह्मासी घालोन विवराते ॥ ४ ॥ देवे येवोनी ते क्षणी । अपुले रूप प्रगटोनी । चौबळाते वधोनी । वीवर दिधले बळिवर्धना ॥ ५ ॥ तोषउनि बळिवर्धनासी । पुढे सोडीले वारुसी । ते गेले यक्षणीभुवनासी । तेथे जाले अद्रष्य कोणा न दीसती ॥ ६ ॥ सुलभेने चोज केले । सकळ सैन्य विवरी नेले । सूवर्णसदनि उपचारीले । भुलविले सेवेने ॥ ७ ॥ तेथे कर्णसुते ख्यांती केली । येक्षणीसेना नीवटिली । हस्तनापुरा गेला महाबळी । वार्ता जाणविली तुह्माते ॥ ८ ॥ मग देवासी घेवोनी सत्वर । पावला कामीका सरोवर । तेथे केला पांचजंन्याचा गजर । मीळाले समग्र सैन्य तेथे ॥ ९ ॥ मग देवे करोनीया युक्ती । तेथुनि काढीले अह्माप्रती । तव वारु गुप्त जळि होती । मग धुंडिती दसादिशा ॥११०॥ तव महावीर जळचर । भद्रादेविचा कुमर । सहदेवपुत्र जुझार । युध्ध थोर येणे केले ॥ ११ ॥ हा पुत्र होये धर्मराया । येरु उठोनी लागला पाया । मग युधीष्टीरे मस्तक कुरवाळुनीया । अपणा नीकट बैसविला ॥ १२ ॥ येणे अह्मा साह्य होउनी । सांभाळीली सैन्यवाहीनी । मग धर्मे तयासी गौरउनी । सवे चक्रपाणी नमियेला ॥ १३ ॥ पुढे सांगे धनुर्धर । वारु वळंघले अंबर । पाटीसी धावे कर्णकुमर । गेले सत्वर शक्रभुवना ॥ १४ ॥ शचिरमणा

आणी कर्णनंदना । भेटि जाली दोघा जणा । जाली वीपरित भावना । ठेविले शामकर्णा पै तेथे ॥ १५ ॥ सूलभेने श्रापीले वृषकेतासी । जे तु भ्रमसि मानसी । अपुल्या सांडोनी गोत्रजासी । अमरनाथासी मीळसिल ॥ १६ ॥ तैसेचि जाले धर्मराया । वारु स्वर्गी ठेउनीया । जींकीले अह्मा सर्व राया । न कळे माया देवाची ॥ १७ ॥ युध्ध जाले घोरांधर । वृषकेते जिंकीले समस्त नृपवर । मग पातला नारद मुनेश्वर । तेणे विचारे बोधीला ॥ १८ ॥ मग सख्य जाले अह्मासी । इंद्रे दिधले शामकर्णासी । वेगी पातलो पृथ्वीसी । अैक कथेसी धर्मराया ॥ १९ ॥ तव तेथे चंद्रहस्य आला । जो वैष्णवराज भक्त भला । देवे तयासी मान दिधला । येरु लागला चरणासी ॥ १२० ॥ दोघे पुत्र आती दक्ष । मकरध्वज आणी पद्माक्ष । जे क्षत्रधर्मी अध्यक्ष । राजे प्रत्येक्ष कोतळापुरिचे ॥ २१ ॥ पार्थ विनवि धर्मरायासी । ऐकावे चंद्रहस्याचे कथनासी । परम हरिभक्त सत्वरासी । वीष्णुभक्तिसी तत्पर ॥ २२ ॥ बाळपणी शाळीग्राम सिळा । याचा अशनी शयनि छंद लागला । पुजनभक्तिचा जीव्हाळा । दावी जनाला सकळासी ॥ २३ ॥ तयाचे अद्येंत अनुसंधान । अैकता सुखावे पंडुनंदन । हरिभक्ताचे चरित्र गहन । समस्त ऋषिगण अनंदले ॥ २४ ॥ जयमीनी ह्मणे रायासी । पार्थ भेटिमाजी वर्तमानासी । सविस्तर सांगे धर्मरायासी । ते श्रवण कीजे सावकासी ह्मणे नामा ॥ १२५ ॥

ईतिश्री महाभारथे अश्वमेधीक पर्वणी जयमिनीकृत्य टिकायांमः राजदर्शनी पार्थ धर्मासी वर्तमानकथनो नाम प्रसंग येकशे येकुणीस ११९ श्रीकृष्णार्पणमस्तु श्रीदतात्रयार्पणमस्तु श्रीरामवरद श्रीभगवानुवाचे

: ४ :

# भावार्थरामायणाचे तिसरे उत्तरकांड

**एकनाथांचे भावार्थरामायण**—एकनाथांनी आपल्या आयुष्याच्या अखेरीस भावार्थरामायणासारख्या एका प्रदीर्घ ग्रंथाच्या रचनेचे कार्य चालू केले होते; पण ग्रंथ अपुरा असतानाच नाथांनी शके १५२१ च्या फाल्गुन वद्य षष्ठीस आपली इहलोकीची यात्रा संपवली. परंपरा आपल्यास असे सांगते की, नाथांचा शिष्य गावबा याने नाथांच्या आज्ञेप्रमाणे प्रस्तुत ग्रंथ पूर्ण केला. आज भावार्थ रामायणाच्या छापील प्रतीत आढळणारा युद्धकांडाच्या ४४ अध्यायांनंतरचा भाग आणि संपूर्ण उत्तरकांड हे गावबाचे वाङ्मयीन कार्य म्हणून मानले जाते ते सदर आख्यायिकेमुळेच. वस्तुतः या रचनेत गावबाचा नामनिर्देश कोठेच नाही. युद्धकांडातील अहिरावण–महिरावणकथेचा भाग जयरामात्मज नामक आणखी एका भिन्न कवीचा आहे असा मात्र निर्देश त्या कथेतच आढळतो.

**श्री. कानोले यांचे संशोधन**—श्रीएकनाथ-दर्शन खंड १ मध्ये नांदेडचे सुप्रसिद्ध संशोधक श्री. विश्वेश्वर अंबादास कानोले यांचा ' भावार्थरामायणाचे अज्ञात उत्तरकांड ' हा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे या उत्तरकांडातही कविनामनिर्देश नाही. त्यांना उपलब्ध झालेले हे उत्तरकांड छापील उत्तरकांडाहून भिन्न आहे. त्याच्या शैलीवरून आणि पंचगंगा व नरसिंह सरस्वती यांच्या उल्लेखांवरून पंचगंगातीरी तेरवाड येथे ज्याचे वृंदावन आहे त्या कविवर्य मुक्तेश्वराने ते रचिले असावे असा जो तर्क त्यांनी बांधला आहे तो बरोबर वाटतो. माझे एक विद्यार्थिमित्र प्रा. व. स. जोशी, एम्. ए. यांनाही भावार्थरामायणाची एक हस्तलिखित पोथी उपलब्ध झाली असून तीतील उत्तरकांड मुक्तेश्वराचेच आहे. मला पाठविलेल्या एका पत्रात जोशी लिहितात, " छापील प्रतीतील उत्तरकांड ७७ अध्यायांचे असून मुक्तेश्वरांचे फक्त १८ अध्यायांचे आहे. त्यात स्पष्ट मुक्तेश्वराचे नाव

नसले तरी ते त्याचेच आहे हे पुढील उल्लेखावरून नक्की ठरते.नमन झाल्यानंतर पहिली ओवी अशी—‘ ॐ नमो जनार्दना स्वामी। लिलाविश्वंभर गुरुनामी। तुझीये पवित्र पादपद्मीं। मनोभृंग विश्रामो ॥ १ ॥ ’ यानंतर हे उत्तरकांड संपवितानाच्या ओव्या अशा आहेत– ‘ यका जनार्दना शरण। उत्तरकांड रामायण। संतकृपेनें जालें पुर्ण। सकळ लोकां तारक ॥ २०१ ॥ पवित्र सरिता कृष्णावेणी। पंचगंगा संगमच्छानीं। नृसींव्हसरस्वतीच्या चरणीं। ग्रंथ प्रगट लाधला ॥ २०२ ॥ तेथें जाली देववाणी। ग्रंथ पाववा प्रतिष्टानीं यकनाथाचिये सदनीं। विस्तारेल जनमुखें ॥ २०३ ॥ ’ यावरून एकनाथांचा ग्रंथ अपुरा राहिल्याने मुक्तेश्वरांनीही उत्तरकांड[1] लिहिले हे मान्य व्हावे.”

पण आज मी ज्याविषयी लिहिणार आहे ते उत्तरकांड या छापील ( गाववाच्या ) व मुक्तेश्वरी उत्तकांडांहून अगदी वेगळे आहे. प्रस्तुत उत्तरकांडाच्या उपलब्धीने एकनाथी भावार्थरामायण अपुरे राहिले असावे व एकनाथांच्या शिष्यप्रशिष्यांनी आपापल्या मगदुराप्रमाणे ते पुरे केले असावे असे म्हणावेसे वाटते. ग्रंथ पुरा करण्यासाठी एकनाथांनी गावबाला केलेली आज्ञा एक तर यांना माहीत नसावी किंवा ती कविकल्पना असावी. दुसरी गोष्टच अधिक संभवनीय वाटते.

**प्रस्तुत हस्तलिखिताचा लाभ**— संकेश्वर येथील माझे एक गुरुवर्य श्री. बाबूराव ऊर्फ धोंडो दशरथ शान्त यांच्या घरची जुनी हस्तलिखिते चाळताना मला प्रस्तुत पोथी मिळाली. गुरुवर्य शान्त यांनी मोठ्या प्रेमाने, आपुलकीने आणि विश्वासाने आपल्याकडील मराठी हस्तालिखितांचा संग्रह माझ्या स्वाधीन केला. आणखी काही सुंदर व अप्रकाशित ग्रंथांची प्राप्ती त्यांच्या येथे झाली. त्यांचाही परिचय यथावकाश करून देण्याचा माझा मानस आहे. या संशोधनसमयी माझे एक ज्येष्ठ व बंधुतुल्य स्नेही श्री. भाऊसाहेब शास्त्री एकसंबेकर व आणखी एक स्नेही श्री. जगन्नाथराव फडणीस, बी. ए., बी. टी. यांचेही साह्य मला मिळाले. या सर्वांचा मी अतिशय ऋणी आहे.

---

१. ‘ भावार्थ रामायण उत्तरकांड ’ या नावाने हा ग्रंथ संपादित करून प्रा. जोशींनी आता प्रसिद्धिला आहे.

**हस्तलिखिताचे स्वरूप**— भावार्थरामायणाची ही शान्तांकडील पोथी मला अपूर्ण अशीच मिळाली. तीत पहिले बाल, दुसरे अयोध्या व चौथे किष्किंधा ही तीन कांडे पूर्ण आहेत. तिसऱ्या अरण्यकांडातील मधली ५ ते ३९ पाने नाहीत. सुंदरकांड व युद्धकांड दोन्हीही नाहीत. शेवटी मात्र हे वेगळेच उत्तरकांड आढळले. या उत्तरकांडाची आरंभापासून ११३ अखेर पर्यंतची पाने आहेत. शेवटची एकदोनच पाने गहाळ झाली असावीत. १६ व्या अध्यायाच्या १०८ ओव्यांनंतरचा भाग येथे नाही. उत्तर-कांडाच्या पहिल्या तीन अध्यायांचे अक्षर सुंदर आहे. तेवढा भाग वगळल्यास बाकी सारी पोथी ( उपरिनिर्दिष्ट चार कांडांसह ) एकाच लेखकाने लिहि-लेली असावी. क्वचित अक्षराचे वळण काहीसे भिन्न वाटले तरी लेखणी बदलल्यामुळे तसे घडले असावे. अक्षर रेखीव नसले तरी वाचनीय आहे. लेखनात अशुद्धता बरीच आहे.

पहिली चार कांडे छापील पोथीशी ताडून पाहता सारखी दिसतात. क्वचित छापील प्रतीतील काही संस्कृत श्लोक येथे दिसत नाहीत, तर एखादा श्लोक मधूनच नवीन आढळतो. ओवीसंख्येतही काही अध्यायांत कमीअधिकपणा आहे. अयोध्याकांडाच्या छापील प्रतीतील आरंभीच्या ३२ ओव्या येथे नाहीत. आणखीही काही बारीकसारीक फरक आढळतात. पण ते या लेखाच्या दृष्टीने फारसे महत्त्वाचे नाहीत.

बालकांडाच्या आरंभीच एक वेगळा श्लोक आहे तो असा—

“ श्रीरघुविर पदपाद्मिं ठेउनि मस्तकातें ॥
नमुनि जननि लक्ष्मी वंदीलें मोरयातें ॥
अभीनव शरभावें ( शदभावें ? ) प्रार्थिलें शारजेतें ॥
गुरुचरणप्रसादें लिहीलें हे कथेतें ॥ १ ॥ ”

हस्तलिखित लिहिणाऱ्याने किंवा प्रस्तुत उत्तरकांडाच्या कर्त्याने स्वतः-संबंधीचा हा श्लोक घातला असावा.

अयोध्याकांडाच्या समाप्तीनंतर पुढीलप्रमाणे मजकूर आहे— “ अंगीरा संवछर चैत्र शुद्ध ४ थी रवारी तास ८ स समाप्त मोकांम कोट सुपा हस्ताक्षर गणेश गोवींद हलसीकर श्रिलक्षुमि नरशींह्य भक्त ॥ शुभं भवतु

निर्वीघ्नमस्तु ।। श्रीराम जयराम जयराम ।। श्री ।। " यातील कालनिदर्शक मजकुरातील 'रवारी' हा शब्द 'रविवारी' असावा. मधला 'वि' लिहायचा राहून गेलेला दिसतो. 'अंगिरा संवत्सर चैत्र शु।। ४ रविवार' हा योग शके १६७४ त येतो. म्हणजे दोनशेहून अधिक वर्षांपूर्वी ही पोथी लिहिली गेली आहे.

**उत्तरकांड**—येथे कवीचे नाव कोठेच नाही. हीही रचना एकनाथांचीच असाच आभास सर्वत्र निर्माण केला गेला आहे. सर्व अध्यायांच्या अखेरीस 'इतिश्रीभावार्थरामायणे उत्तरकांडे येकाकार टीकायां' अशी मुद्रा आहे. शिवाय प्रत्येक अध्यायाच्या शेवटच्या ओवीत 'येका जनार्दना शरण', 'येका जनार्दना शरण रंक', 'यका विनवि जनार्दन' असे ओवीपाद आढळतात. शेवटच्या अध्यायातील उपसंहारात्मक ओव्यांमध्ये कदाचित कवीची माहिती मिळण्याची शक्यता होती पण अखेरचा भागच येथे नसल्याने नाइलाज झाला आहे.

या उत्तरकांडाचे सोळा अध्याय आहेत. अध्यायांची नावे व ओवीसंख्या पुढीलप्रमाणे आहेत—

| अध्यायक्रमांक | नाव | ओवीसंख्या |
|---|---|---|
| १ | अगस्तीश्रीरामसंवाद | १५० |
| २ | रावणो प्रत्यागमनो | १२९ |
| ३ | रावण विभिषणसंवादो | १४५ |
| ४ | ऋषिनिवर्तनो | १३३ |
| ५ | जनकश्रिरामसमागमो | १२६ |
| ६ | रामराज्यकथनो | १४३ |
| ७ | सीतापरीत्यागो | १३३ |
| ८ | सुराणीकवधो मायातापसी व्याख्यानो | १११ |
| ९ | शत्रुघ्न लवणवधागमनो | १२० |
| १० | शत्रुघ्न मधुपुरीराज्यगमनो | १२३ |
| ११ | द्विजपुत्र जिवदानो | ११७ |
| १२ | अश्वमेध | २४७ |

| | | |
|---|---|---|
| १३ | जानकि स्वधामगमनो | १३८ |
| १४ | नाव दिलेले नाही. | ११२ |
| | [ या अध्यायात तिन्ही माता परधामास जातात. त्यांच्या क्रिया, युध्याजिताचे आगमन, गंधर्वावर हल्ला करण्यास भरतास पाठविणे आणि तेथले राज्य भरतपुत्रांना देणे एवढा कथाभाग आहे. ] | |
| १५ | लक्षुमणस्वर्गारोहण | १०९ |
| १६ | [ अध्याय अपूर्ण असल्याने नामनिर्देशाचा १०८ व्या ओवीनंतरचा भाग नाही. ] [ या अध्यायात लवकुशांना राज्य वाटून देणे, अयोध्येच्या जनांसह स्वर्गगमन, देवांकडून स्वागत, लवकुशांकडून उत्तरकार्य, ग्रंथाधार व अपुरी फलश्रुती एवढा भाग आला आहे.] | |

एकंदर १६ अध्यायांत २१४४ ओव्या उपलब्ध आहेत. हरवलेला भाग थोडा असावा. म्हणजे हे कांड सुमारे २१५० ओव्यांचे असावे असे वाटते.

**कवीचे आत्मकथन :**— या कांडात आत्मकथनपर ओव्यांचा अभाव आहे. पहिल्या अध्यायाच्या आरंभी काही ओव्या आहेत पण त्या युद्ध-कांडाच्या आरंभी एकनाथांनी लिहिलेल्या ओव्यांचा तर्जुमा असल्याने त्यांवरून प्रस्तुत कांडाच्या कर्त्याविषयी काहीच अनुमान बांधता येत नाही. आरंभीच्या या ओव्या अशा—

" प्रतापें संपवोनि युद्धकांड । फुडें विस्तारिलें उत्तरकांड । कीर्ति शौर्य औदार्य प्रचंड । गोडागोड कथा श्रवणें ।। १ ।। वाखाणावया उत्तरकांड । माजें सरतें कैंचे तोंड । एका जनार्दन कृपा उदंड । तेणें कांडें कांड विस्तारिलें ।। २ ।। रामायेण समुद्र अती सखोल । तो तरावया श्रीगुरुकृपा सबळ । अफार तारितें समुद्रजळ । कोंदली केवळ श्रीगुरुकृपा ।। ३ ।। रामायेणींचें निजसार । अक्षरीं कोंदलें अक्षर । पदपदार्थीं चिदचिन्मात्र । परम पवित्र

श्रीरामकथा ॥ ४ ॥ कथेमाजि दिसे परमार्थ । सबाह्य कोंदला श्रीरघुनाथ । हा गुह्याचा अति गुह्यार्थ । निजात्मस्वार्थसाधकां ॥ ५ ॥ शतकोटि श्रीरामचरित्र । एकेक ऐकतां श्रोते अक्षर । श्रीगुरुकृपा अती विचित्र । ब्रह्महत्यादि उग्र पाप नाशती ॥ ६ ॥ माजे मुखीं जें जें वचन । तें तें वक्ता श्रीजनार्दन । वचनीं वचन निर्वचन । कथा पावन श्रीरामें ॥ ७ ॥ श्रीरामकथेचा गुह्यार्थ । एक जाणे पार्वतीनाथ । कां दुजा श्रीगुरुसमर्थ । तो कथा संपवित मजकरवीं ॥८॥ माजे दृष्टी जें जें देखणें जाण । तें तें राम स्वयें होउन । मज करवीं निरोपण । जागृतीस्वप्नसुषुप्ती ॥ ९ ॥ जागृती स्वयें कर्म करितां । तेथ प्रकटे श्रीरामकथा । स्वप्नीं निजगुह्यवार्ता । होय सांगता श्रीराम ॥ १० ॥ सुषुप्ती करितां सुखशयन । तेथ नाठवे अहंसोहंपण । जागें करी रघुनंदन । ह्मणे रामायेण ग्रंथ करीं ॥ ११ ॥ अवस्थात्रयीं रघुनंदन । अवकाश नेदी अर्ध क्षिण । वदवी श्रीरामकथा गहन । ह्मणे रामायेण ग्रंथ करीं ॥ १२ ॥ माजे देहीं संचरोन । सांडिलें दवडोनि अहंपण । बैस ह्मणे करीं रामायेण । अनेक कर्म जाण करूं नेदी ॥ १३ ॥ आकाशीं भ्रमतां चातक । जैसा इच्छी मेघबिंदू येक । त्यासि वोळे जैसा घन देख । तैसा मीं रंक महत्त्वेसीं ॥ १४ ॥ श्रीरामांची कथा । चतुर्मुक्तीतें हाणोनि लाता । निभर्सून चहूं पुरुषार्थां । यथार्थ कथा परब्रह्म ॥ १५ ॥ ऐसें हें कथानिरोपण । नित्य करी जो श्रीरामस्मरण । स्वयें श्रीराम ये वोरसोन । जेवीं वत्छालागोन धेनू पैं ॥ १६ ॥ ”

**ग्रंथाधार**—एकनाथांप्रमाणेच हा कवीही अधूनमधून आधारभूत ग्रंथांचे निर्देश करीत असलेला दिसतो. पहा—

‘ ऐसी हे श्रीरामअभिषेक स्थिती । **वालिमक** वदला पूर्णानुवृत्ति । युद्धकांड पावलें समाप्ति । कथनख्याती ऐसी जाली ॥ ५७ ॥ अ. १ ॥ ’

‘ मंदोदरी विष्णुसंभूता । हे **पुराणांतरीं** आहे कथा । वाल्मीक वदला तत्वता । मयासुरसुता ह्मणोनी ॥ ७४ ॥ श्रोते करितील जरि प्रश्न । विष्णुसंभुता कीं मयात्मजा ह्मणुन । तरि **शतकोटी संख्या रामायण** । हें मिथ्या जाण ह्मणों नये ॥ ७५ ॥ अ. २ ॥ ’ ( यासंबंधी आधार सांगताना एकनाथ लिहितात, ‘ ब्रह्मोत्तरखंडींची हे कथा । विष्णुसंभूता मंदोदरी ॥ १३७ ॥ सुंदरकांड अ. ६ ॥ ’ )

तिसऱ्या प्रसंगात सीतेची पूर्वजन्मकथा ( कुशध्वजाची कन्या ) थोडक्यात सांगितल्यानंतर तिच्या अनेक नावांची माहिती देताना कवी लिहितो— ‘मग तो कुशध्वज ब्राह्मण । काळें जाला पद्माक्ष राजा जाण । त्यासि विष्णुनें केलें मातुळिंगार्पण । तेणें जन्म जाण पावली ते ॥ ११ ॥ हें समूळ कथन तत्वता । **बाळकांडीं वाल्मिक वक्ता** । पुढें ऋषीसी हळाग्रीं लागतां । जनकहस्ता दिधली ॥ १२ ॥ वेदीं प्रवेसली ह्मणोन । वेदवती ऐसें अभिधान । देहीं नाहीं त्यास्तवं जाण । वैदेही आपण बोलिली ते ॥ १३ ॥ प्राकृत ह्मणताति शेतिं । सांपडली ह्मणोनि सिता बोलती । परि तो अर्थ आणिकां मतीं । आहे तो निश्चितीं अवधारा ॥ १४ ॥ या नावांचा अर्थ श्रुतिवचन । **ऋग्वेद** बोलतसे आपण । जें त्रिलोक्यपावन कारण । केलेया श्रवण नासती पापें ॥ १५ ॥ सितासिते ऐसी श्रुती । तेही सितेची स्वरुपस्थिती । इंद्रादि देवां साह्यार्थी । हे आदिमूर्त्ति प्रकटली ॥ १६ ॥ जनकें केलें प्रतिपाळण । ह्मणोनि जानकी अभिधान । तेही त्रिलोक्यजननी आपण । जाण संपूर्ण चित्शक्ति ॥ १७ ॥ अ. ३’

पाचव्या अध्यायात खुद्द रामाच्याच तोंडून कवीने **‘रामरक्षा’** स्तोत्राचा उल्लेख पुढीलप्रमाणे केला आहे—‘श्रिराम ह्मणे माझें स्तोत्र । रामरक्षा नामें पवित्र । हें ह्मणेल जो निरंतर । असे मिं तत्पर तयापासि ॥ १२१ ॥’ ( एकनाथांनी सुंदरकांड अ. ३३-१०७ मध्ये ब्रह्मदेवाच्या पत्रात या स्तोत्राचा निर्देश केला आहे. )

‘प्रसंगे झाले **अयोध्यामाहात्म** । **स्कंदपुराणिं**चें जे उतम । निर्वाण-पददायक परम । संख्यात निसीम **वेद** बोले ॥ १०७ ॥ ऐसें वाढवितां कथन । **अठरा पुराणें** आहेति जाण । यास्तव अल्प केलें अनुसंधान । संतिं सांगो न क्षमा किजे ॥ १०८ ॥ अ. ६ ॥’

‘यतदर्थि शास्त्रवचन । **हनुमां नाटकिं** बोलिला जाणं ॥ १३८ ॥ अ. ६’.

‘तैसाच थेवोनी वसीष्ट मुनि । **बृहद्वासीष्ट** निरोपी रामालागोनि ॥ १२१ ॥ अ. ७ ॥’

आठव्या अध्यायात सुराणीकवधाची वाल्मीकिरामायणात नसलेली एक वेगळीच कथा लिहिताना ग्रंथाधार सांगण्यासाठी कवी म्हणतो, ‘हे

कथेचा वीस्तार थोर। **वाल्मीकीनें मुखीं केला** वीचीत्र। उत्तरकांडिं प्रकटला समग्र। तो संतिं सादर परीसावा ॥ ५२ ॥ सीता त्यागावया हेंची कारण। रजकमुखें लौकीक वार्ता जाण। मुख्य करावया सुराणीक-निधन । ह्मणौनि सीता वना धाडिली ॥ ५३ ॥... यैसें हें सुराणीकाचें आख्यान। सांगीतलें विस्तारें करून। वाल्मीकाचा प्रताप गहन। जो त्रीभुवना तारका (क) ॥ ६८ ॥ **चतुर्मुखें** यैसे आपण। **नारद रुसीं** केलें कथन। मग **नारद वाल्मीकालागुन । भविश्य** गहन बोलीले ते ॥ ६९ ॥ तेंच **वाल्मीकीं शेतकोटी पुर्ण**। केलें चरीत्र रामायण। जें यैकतां श्रवणें जाण। पापें दारुण लया जाति ॥ ७० ॥ हे कथा यावया हेंची कारण। जे अयोनिजा श्री ह्मणोन। **गरुडाप्रति लक्षुमी आपण।** स्वलीळा पुर्ण बोलीली असे ॥ ७१ ॥'

बाराव्या अध्यायात मारुतीच्या तोंडी **अध्यात्मरामायणा**चा उल्लेख आहे. मारुती सीतेस म्हणतो, 'रावणवधाचि कर्तव्यता जाण। यासि मुक्ष तुं कारणं । श्रीराम केवळ आनंदघनं । हें अध्यात्मरामायाणिं बोलिलें ॥ २०८॥ ज्याषि असे संसयो जाण। तेहि पाहावें अध्यात्मरामायण। समाधान पावया जाणं। त्या ग्रंताथें पाहावें ॥ २०९ ॥ यैसे हनुमंत स्तवन करितां। जानकि ह्मणे प्रघट न करि गुह्यार्था। मौन्य असावें कपिनाथा। यथ आहे मिं प्रघट न करिं ॥ २१० ॥'

अश्वमेधसमयी सीता भूमिगत झाली नाही हे सांगताना कवी लिहितो— 'वाल्मिकरामायाणि कथा ऐषि। अस्वमेधसमइं दिव्य मागतां सितेसि। गेलि पृथ्विगत हुनि परधामासि। अग्निकुंडिं दिव्य कैंचें ह्मणतिल ॥ ७६ ॥ ऐसें न मनावें श्रोतिं। **हे युगवेवस्ता** निश्चिति। कोणे येके अवतारि हे स्छिति। श्रिरघुनाथें पैं करविलि ॥ ७७ ॥ यदार्थि प्रमाण शतकोटि रामायण। कैकै पुसेल रावणरुपचिन्ह। तेचि मिषें भुमिगत होउन। परधामा जाइल ॥ ७८ ॥ अ. १३ ॥'.

रामायणकथा कोठून कशीकशी आली हे सोळाव्या अध्यायात पुढील-प्रमाणे सांगितले आहे—'हे रामायण **अथर्वणवेद** प्रमाणं। **पुर्वोतर तापिनि** संपुर्ण। कर्ता परब्रह्म आपणं। बिज संपुर्ण वेदिचें ॥ ९८ ॥

तदुपरि **ब्रह्मदेवि** जाण। शतकोटि अख्यान। ते कथा शंकर करि श्रवण। वक्ता संपुर्ण **गणेषु** ।। ९९ ।। तदुपरि **ब्रहस्पातिप्रति नारद**। करिता झाला सुखानवाद। नारदें केलें शेतलक्ष निद्वंद। स्वयं **इंद्र श्रवण करि** ।। १०० ।। नारदमुखें **विश्वामित्र** आपण। शतसहश्र संपुर्ण। स्वयं **वसि ( ष्ट )** करि जाणं। कथा पावन परमार्थ ।। १०१ ।। **वसिष्ठमुखें** श्रवण। करितां **वाल्मिक** आपण। स्वयं यवोनि चतुरानन। आपण करवि कथेसि ।। १०२ ।। त्यांतुनि काढुनि सारांश्य। फुडे मंदप्राणि बुधिनास। ? यास तरुणोपायास। **पांच शते श्लोक** स्वयं केले ।। १०३ ।। तेणे श्रवण करितां **व्यासमुनिं**। कथा पावलि **अष्टदश पुराणिं**। श्रवणें जगत्रयपावनि। जन सकळ तरावेया ।। १०४ ।।’.

**कथासंकोच आणि पुनरावृत्तीचा अभाव**—एकंदरीत सारांशरूपाने लिहिण्याकडे या कवीचा कल आहे. एखादी कथा घोळून घोळून वा पाल्हाळाने तो लिहीत नाही. जेथे ‘विस्तारें करून’ आपण कथा लिहिली असे तो म्हणतो तेथेही तो थोडक्यातच आटोपते घेतो. कधी तो ‘ संकोचना ’-बद्दल श्रोत्यांकडे क्षमा मागतो तर कधी एखादी कथा पूर्वी (एकनाथी रचनेत) येऊन गेलीच आहे असे सांगून पुनरावृत्ती टाळतो. पहा—

( १ ) ‘ कवळा स्वेत आणी कौंडण्य। पाताळ अंतरक्षिंचे योगीजन। आले ऐसें करितां व्याख्यान। कथा गहन वाढेल ।। ७२ ।। अ. १ ’.

‘ ऐसें वाढवितां कथन। अठरा पुराणें आहेति जाण। यास्तव अल्प केलें अनुसंधान। संतिं सांगो न क्षमा किजे ।। १०८ ।। अ. ६ ’.

लवकुशांचा विवाह झाल्यानंतर ‘ त्या महोछायाचें कथन। सविस्तर सांगतां गहन। ह्मणोनि केलें संकोचन। श्रोता क्षमा संपूर्ण मज कीजे ।। ८९ ।। अ. १३ ’ इ.

( २ ) पूर्वी कथा येऊन गेल्याने पुन्हा न सांगणे—

‘ त्या उपरि दशानन। पावला मैकावति स्थान। तेथील संपूर्ण कथन। पूर्वीं जाण सांगितलें ।। ५३ ।। त्यानंतरें किष्किंदेसी। जाउनि वाळिप्रति युद्धासि। तेथ पावला अपमानासी। तेहि कथा निगुती सांगितली असे ।। ५४ ।। अ. ३ ’ ( पहा– किष्किंधाकांड अ. २ व युद्धकांड अ. ८ ).

'वळि रावणाचें दर्शन। हे कथा प्रथम जाली जाण। होतां अंगद-भाषण। कथाविवरण लिहिलें असे ॥ ८२ ॥ अ. ३' (पहा– युद्धकांड अ. ७).

'तिच्या (शूर्पणखेच्या) पुत्रांचे कर्तव्य जाण। स्वर्गींहून खर्ग जाण। तें येतें तुह्मां विघ्न। पूर्वकथन सांगितलें ॥ ११८ ॥ अ. ३' (पहा– अरण्यकांड अ. ८).

'अगस्ति ह्मणे किस्किंदाकांडि। वर्णिलिसे हनुमंतप्रौढि... ॥ ११६ ॥ अ. ४' (पहा– किष्किंधाकांड अ. १०. येथे अगस्तीच मागील संदर्भ देत आहे.)

शंकरास 'कोणाचे चिंतन करिता?' असा पार्वतीचा प्रश्न. त्यावर कवी लिहितो– 'हें पूर्वील कथाअनुसंधान। अरण्येकांडीं लीहिलें जाण। प्रसंगीं उतरकांडिं लिहिली खुण। तेंची सावधान परीसा जी ॥ २६ ॥ अ. ८' (पहा– अरण्यकांड अ. २०).

**एकनाथांनी उत्तरकांड कसे लिहिले असते?**— एकनाथांनी उत्तर-कांडाची रचना कशी केली असती यासंबंधी त्यांनी लिहिलेल्या भागावरून काही कल्पना करणे शक्य आहे. रामवर्णन करिताना आलेली विशेषणे, निरनिराळ्या ऋषिमुनींनी रामादिकांसंबंधी व्यक्त केलेल्या अपेक्षा, काहींची भविष्ये, शापवाणी इत्यादींच्या आधारे हे विवेचन करता येईल. एकाच स्थलाचा येथे निर्देश करतो. रामाने वालीचा वध केल्यानंतर वालीची पत्नी तारा क्षुब्ध झाली आणि तिने रामाला शाप दिला. या प्रसंगी किष्किंधा-कांडाच्या सातव्या अध्यायात नाथ लिहितात– 'पतिदु:खाच्या दु:खावर्तीं। तारा क्षोभोनियां चित्तीं। शाप देत श्रीरघुपतीप्रती। तेही अति युक्ती अवधारा ॥ २७ ॥ विभांडूनियां लंकापती। तूं तंव पावसी सीता सती। परि ते नांदेना तुजप्रती। जाईल मागुती वनवासा ॥ २८ ॥ दोघां नांदतां अयोध्येसीं। श्रीरामा तूं बलात्कारेंसीं। वना धाडिसील सीतेसी। मजऐसा होसी अति दु:खित ॥ २९ ॥ सीता वनवासी वनाआंत। लहुकुश जन्मती सुत। बारा वर्षें अयोध्येंत। अति दु:खित श्रीरामा ॥ ३० ॥ लंकेसीं दिव्य घेईल पाहीं। सीता सती लोकीं तिहीं। येथे दवडावया कारण कायी। जग अन्यायी

तुज म्हणेल ॥३१॥ वाळी मारिला त्वां वृथा । हें आपेश बैसलें तुझिया माथां । दुजें अपेश श्रीरघुनाथा । वना सीता दवडोनी ॥ ३२ ॥ पुत्रांचिया युद्धख्याती । अयोध्ये आणिसील सीता सती । तरी नांदेना तुजप्रती । जाईल मागुती धरणीमाजी ॥ ३३ ॥ ’

यावरून अश्वमेधसमयी सीता अयोध्येस आली तरी ती रामाबरोबर राहू शकणार नाही असेच एकनाथांना दाखवावयाचे होते असे म्हणता येईल. परंतु छापील प्रतीत व प्रस्तुतच्या पोथीत राम व सीता यांच्या अश्वमेधोत्तर सुखी सहजीवनाचे चित्र रेखाटले आहे म्हणून ही रचना एकनाथी नव्हे असेही म्हणावे लागते.

**काव्यस्वरूप**— अन्य दोन्ही उत्तरकांडांच्या तुलनेने प्रस्तुत उत्तरकांड काव्यदृष्ट्या मोठे सरस आहे असे म्हणवत नाही. कोणताही प्रसंग वर्णिताना कवीची वाणी रसाळ झालेली नाही. सारा कथाभाग थोडक्यात आवरावयाचा ही त्याची भूमिका दिसते. त्यामुळे पुष्कळदा तो केवळ घटनांची नोंद करीत आहे असे वाटते. ओवी बहुतांशी एकनाथी वळणाची असली तरी ती फारशी सफाईदार नाही. एकनाथी कल्पना व वर्णने यांची पुनरुक्ती आढळणे स्वाभाविक असल्याने– किंबहुना ही रचना एकनाथांचीच भासावी असा कवीचा प्रयत्न असल्याने – तिच्याबद्दल तक्रार करता येत नाही. कवी बहुश्रुत आणि एकनाथी रचनेशी चांगलाच परिचित आहे हे त्याने केलेल्या ग्रंथोल्लेखांवरून आणि पूर्ववृत्तनिर्देशांवरून दिसून येते. तीन-चार ठिकाणीच संस्कृत श्लोक आहेत, पण ते अतिशय अशुद्ध लिहिलेले आहेत.

**काव्यपरिचय** व्हावा म्हणून काही उतारे येथे देत आहे—

वनवासाहून परतल्यानंतर **राम भरतास भेटतो** तो प्रसंग—
‘ श्रीराम आला अयोध्येसी । अैकोनी आनंद भरतासी । मग नमाव्या श्रीरामासी । परमोल्हासीं पुढां आलां ॥ २० ॥ श्रीरामचंद्राथे देखोन । भरथें केलें साष्टांग नमन । ह्मणे आजि माजें धन्य जन्म । श्रीरघुनंदन देखिलेया ॥ २१ ॥ श्रीरामें पाहोनि अनुजासी । तत्काळ धरोनि ह्रदयेसीं । ह्मणे चौदा वरुषें कष्टलासी । नंदिग्रामासी राहोनि ॥ २२ ॥ मग मस्तकीं

केलें आघ्रण। आपुल्या अंकीं बैसउन। करीतसे सांतवन। जेणें मन सुखावे ॥ २३ ॥ ह्मणे माज्या वत्सा वेल्हाळा। भरता अनुजा बाळा। आतां क्षेमा करों मजला। न वचें निराळा तुज्यायोगें ॥ २४ ॥ ऐसें करितां सांतवन। सकळा आलें प्रेम पूर्ण। ह्मणती भरताचें भाग्य गहन। स्वयें रघुनंदन सांतवी ॥ २५ ॥ अ. १ ॥'

## सीतेने घेतलेले सासवांचे दर्शन आणि बहिर्णींशी केलेला सुखसंवाद

'बोलिला विनित। पवनसुत ते समई ॥ ३२ ॥ जानकीमनिंचें ऐसें आर्त्त। आजी तिर्घी बहिणींसमवेत। हे निसी येकांतयुक्त। तरि आज्ञा वांछित स्वामींची ॥ ३३ ॥ मग श्रीराम बोलिला सुवाणी। यथार्थ बोलिला दृमपाणी। ऐसेंच होतें आमचे मनीं। तरि तिघी बहिर्णी असों येकत्र ॥ ३४ ॥ श्रीराम बोले सितेसी। आदीं भेटावें तिर्घी सासुवासी। मग सुखें आजिची निसी। तिर्घी बहिणीसीं असावें ॥ ३५ ॥ ऐसें श्रीरामवाक्य आइकोन। ह्मणती अज्ञा प्रमाण। मग वंदिती श्रीरामचरण। देयि रघुनंदन आशिर्वाद ॥ ३६ ॥ सौभाग्ययुक्ता आपल्या पतिसीं। नांदावें पुत्र-पौत्रेसीं। भक्ति हरिची अहर्निशीं। तुह्मां मानसीं असावी ॥ ३७ ॥ अज्ञा घेउनि जनकात्मजा ते। लागोनि श्रीरामचरणातें। ह्मणे सर्वांतरात्म तुजपरतें। अधिक निश्चितें आहे कोण ॥ ३८ ॥ मग तिर्घी बहिर्णी-समवेत। सिता चालिली सासुवंदार्थ। जाउनि कौसल्या सुमित्रा जेथ। आणि कैकै ते नमिली तिंहीं ॥ ३९ ॥ तिघीतें पायां लागती। मग तिघीने ते सीता सती। बैसविली मंचकाप्रति। अत्यंत प्रिती बोलत्या जाल्या ॥ ४० ॥ रत्नें टांकिती वोवाळुन। ह्मणे कष्टलीस दारूण। ह्रदयीं हरिखें आळंगुन। शोडषोपचारें जाण पुजिली ते ॥ ४१ ॥ षोडशोपचारें पूजून तेथें। ह्मणसी कष्टलीस देवकार्यार्थें। तुजा न कळे इत्थंभुत। महिमा यथार्थ जानकिये ॥ ४२ ॥ देवकार्यार्थ तुह्मीं दोघे। फेडावया भुमीभार वोजें। मग सिता रावणादिक राक्षेस वोजे। मारूनि भोजें सुख दिल्हें ॥ ४३ ॥ महिमा ह्मणे हे तुमचें। महिमाना जाणा साचें। त्यास्तवं केलें भुमाराचें। महिमा वाचे किति बोलुं ॥ ४४ ॥ भेटि सासुरांची घेउन। चौर्घी केलें येकत्र शयन। परम आल्हादें करुन। करीत कथन येकमेकीथें ॥ ४५ ॥ मग त्या

तिघी बहिणी । उन्मळा मांडवी श्रुतिकीर्त्ति सजनी । जानकिये प्रती कथनीं । रात्री क्रमुनी नेली पैं ॥ ४६ ॥ तुजें करितां आह्मीं स्मरण । गेले बहुत रात्रिदिन । आमच्या भाग्याचा उदयो पूर्ण । ह्मणोनि दर्शन तुजें जालें ॥४७॥ अैशा बैसोनि निकटी । करिताति सुखगोठी । आळिंगनें पडिली मिठी । सुखसंतुष्टी जाल्या त्या ॥ ४८ ॥ ऐसी क्रमून ते निसी । प्रभाते आल्या श्रीरामापासीं । मग वंदूनि श्रीरामपायांसी । अति संतोषीं राहिल्या ॥४९॥ अ. १ ॥ '

पाचव्या अध्यायात जनकाचे अयोध्येस आगमन होते. त्याच्या मनात रामजानकीच्या विवाहाच्या वेळी चतुर्थ होम न झाल्याने (बालकांड अ. २५ ओ. ७०-७१ पहा) तो सोहळा आता करावा असे आले आहे. म्हणून तो कौसल्येस उद्देशून त्यासंबंधी अनुज्ञा विचारीत आहे. ' मग जनक राजा कौंसलेसि । नमुनियां अल्हादेसि । ह्मणे अज्ञा झाल्या चौथिं कनेसिं । स्वसिबिराषि न्हेइन ॥ ४८ ॥ जानाकिचे पाणि-ग्रहिं । परि चतुर्थ होम देखिला नाहि । विवाहमंडपि महोत्साहिं । आपुले डोळ्याहिं नेदखो मि ॥ ४९ ॥ कौंसल्या ह्मणे जनकासि । या बोले सुख झालें सर्वांसि । परि दशरथ नेदखे या उत्साहासि । वासना त्यासि पाहाव्या होति ॥ ५० ॥ यवडें पतिरत्न सांडुन । मि न राहाति यथार्थ जांणं । परि श्रिरामदर्शनि लाधलें मनं । तरिच जाण राहिलि मिं ॥ ५१ ॥ दशरथासह-वर्तमानं । महोत्साव पाहावें ऐसें मनं । परि परलोका पावलें पतिरत्नं । त्याचें दर्शन कैसेन होतें ॥ ५२ ॥ आजि सकळहि फळा आलें । तुमचें मानस सिधि गेलें । आतां संपादावें कार्य अनुष्ठिले । आनंदमेळें सर्वहि ते ॥ ५३ ॥ मग जनक ह्मणे कौंसलेसि । जरि मज रंका अज्ञा देशि । तरि भेटविन दशरथासि । या संतोसासि पाहावया ॥ ५४ ॥ '. यानंतर ओ. ५५ ते १२४ मध्ये या सोहळ्याचे वर्णन आले आहे. त्यातील काही भाग— '... प्रथम दिवसि पुजिलें जाणं । शंकर ब्रह्मादि दशरथ राजे जन । आणि रुषिसहित देवगण । जनकें आपणं संतोसविलें ॥ ७१ ॥ दुसरे दिवसि सावित्रि गौरि । आणि सुमित्रा कौसल्या कैकै‌या नारि । सात सेते (शते) मात्रुपरिवारिं । सुमेधा समग्रिं पुजिल्या ॥ ७२ ॥ तिसरे दिवसि यक्र वर्णं ।

वधुवरें केळवालिं पुर्ण। त्यार्थे ह्मणति तेंलवणं। सकळां भोजनं जेथ राम ॥ ७३ ॥ तेथ काय असे नुन्य। सर्व सिधि वंदिति चरणं। ऐसें झालें तेंलवणं। रघुनंदनप्रभाव ते ॥ ७४ ॥ चतुर्थ दिनिं प्रातःकाळिं। जनकें उचार करुनिं वौंशावळि। मग पात्र घेवोनिं करकमळि। श्रिरामां अंजुळि प्रार्थीतु ॥ ७५ ॥ पाचवे दिनि सकळांसि। वरिष्ठां केलें भोजनासि। त्या ह्मणति वरात ऐसि। करुन मानासि सिंबिरा गेले ॥ ७६ ॥ साहावे दिंवसिं जनकें आपणं। अयोधेजना भोजन देउनं। तांबुल सुमनें वस्त्रें अर्पुंनं। स्वाश्रमां जन पाठविले ॥ ७७ ॥ सातवे दिनि सह्रुदजनभोजनं। त्यासि ह्मणति गोतां-बील जाणं। आठवे दिंवसिं प्रस्छान करुनं। मार्गभोजन तेथ केलें ॥ ७८ ॥ श्रावणि सण दिवाळि सणं। विजयादशमिं ज्यामातपुजनं। अधिकें अधिक जनके आपणं। सवें संपुर्ण मन वेंचि ॥ ७९ ॥ जेथ जनक आणिं रघुनंदनं। त्या सुखापुढे मौक्ष जैसा त्रुणं। माहाऐस्वर्य गणि कोणं। जेथ सुकैकघन श्रिराम असे ॥ ८० ॥ ... पृथक पृथक दिवस पुजनं। सांगता होइल ग्रंथ-विस्तारणं। ह्मणोन केलें संकोचनं। विचारोनि आदिअंतु ॥ ८५ ॥ ऐसि जालि विवाहसिधि। मग मिरवणि मांडिलिं सद्बुधि। तें वर्णितां सेस गुरु विधि। वेद वादशब्दि न बोलवें ॥ ८६ ॥ सपरिवार महोत्सवेसिं। वधुवरें आणिलि ग्रहप्रवेशासि। मग करुनि लक्ष्मिपुजेसि। अक्षयसुखेसिं पाहिलिं ॥ ८७ ॥ मिरवाणें होते समइं। जन दाटलें कैंषें पाहिं। तिळमात्र ठावो उरला नाहिं। सकळ सुमहि ( सुरहि ? ) तेथ आले ॥ ८८ ॥ मज गमतां वांटे चोज। जेथ नांदे वैकुंठभोज। विस्व तरायाचें काज। स्वयं रघुराज अवतरला ॥ ८९ ॥ स्वर्णमय रचिलें दुर्ग। भवंता रत्नकळसांचा परिघ। हाटवट्यिा चौबारे अमोघ। तोरणें ध्वजोघ मिरवति ॥ ९० ॥ सितासहित श्रिरघुनाथ। आरुढला विमानाआंत। जनक सुमेधा सेवा करित। क्षिण-क्षिणांत उपचारें ॥ ९१ ॥ देवरुषि नृपति जाणं। रथ गज शामकर्णि बैसोनं। फुडे भाट करिति स्तवनं। चरित्र पावन वाखाणिती ॥ ९२ ॥ देव करिति पुस्पवृष्टि। अप्सरा नाचति कोटानकोटि। गायन करिति गंधर्वथाटि। वोंवाळिति भेटि भक्तगणं ॥ ९३ ॥ चंद्र सुर्य स्वयं येवोनं। नक्षत्रें झालिं दिपिका जाणं। मार्गि सुगंधमार्जनं। वेत्रधारि जन लक्षावधि ॥ ९४ ॥ कुबेर आपण धन वांटि। करितसे सकळ तुष्टि। इंद्र करि करसंपुटि।

वीनंति श्रेस्टि परिसा ह्मणे ॥ ९५ ॥ जें असेल ज्याचें मनोगत । तें तें असे मिं पुरवित । यैसें इंद्र असे बोलत । सेवा करित रघुरायाचि ॥ ९६ ... ” पुढे दशरथास निरोप देताना— “ मग श्रिरामादि सकळ नृप । उभे राहुनं नमिति दशरथ । स्वामिनें स्वस्छाना जावें सुखरुप । ब्रह्मांशंकरादिक पक (?) संयुक्त ॥ १०७ ॥ मग दशरथ ह्मणे श्रिरामासि । तुज देखतां निवालों मानसिं। कांक्षा होति कौंसले स्त्रियसि। तरि दर्शन द्याव्यासि मिं आलों ॥ १०८ ॥ यरविं स्वर्गगत जो प्राणिं । तो पुनरपि येइल मेदिनिं । हें कदां-काळिं न घडे जनिं । वेदशास्त्रश्रवणिं आइकिलें त्वां ॥ १०९ ॥ आतां स्वस्ति असों सकळांसि । करा अक्षय अयोध्याराज्यासि । सांभाळि भरथ-लक्षुमणशत्रुघ्नासि । सिता पतिव्रतेसिं रघुनाथ ॥ ११० ॥ मग आणुनि हंष विमानं । बैसविलें दशरथ ब्रह्मेशानं । सकळ सुहृदां अल्हाद देउनं । सत्यलोका जाण जाते जाहाले ॥ १११ ॥... ”

सहाव्या अध्यायात **रामाच्या राजनीतीची** कल्पना कवीने दिली आहे. तीवरून कविकालीन परिस्थितीचीही थोडीबहुत कल्पना बांधता येते. राज्य-व्यवस्था स्वतः राम पाहात असून वेळोवेळी तो निरनिराळी ठिकाणे स्वतः फिरून पाहात आहे. “ मग स्वयं रघुनंदनं । कराव्या शाळावलोकनं । चालिला तो विचक्षणं । घेवोनि जन समागमे ॥१३॥ रत्नशाळा धनशाळा । वस्त्र-शाळा आस्तरणशाळा । पात्रशाळा धनशाळा ( धान्यशाळा ? ) । रसशाळा देखिल्या ॥ १४ ॥ रथशाळा गजशाळा । उष्ट्रशाळा शस्त्रशाळा । सुमन-शाळा चंदनशाळा । श्रिरामें डोळां देखिल्या ॥१५॥ धेनुशाळा वृशभशाळा। कंडणशाळा पेशणशाळा । श्रिरामें पाहिल्या पाकशाळा । देवां सकळा दुर्लभ त्या ॥१६॥ होमशाळा पुजाशाळा । शास्त्राध्ययनादिक शाळा । रामें पाहिल्या सुगंधशाळा । आणिं तांबुला बहुत त्या ॥१७॥ अंतपूरशाळा मात्रगृहशाळा। कौतुकार्थ यकांतशाळा । गायननृत्यशाळा । किर्तनशाळा पाहिल्या ॥ १८ ॥ मंगळशाळा विप्रशाळा । धर्मशाळा योगशाळा । श्रिराम पाहे डोळां । दानशाळा प्रसिद्ध ॥ १९ ॥ दासशाळा परिवारशाळा । दिपशाळा अग्नियेंत्रशाळा। श्रिरामें पाहिल्या चरित्रशाळा । जेथ कर्त्यव्यता सकळां आयुषीसे (?) ॥२०॥ दुंदुभि मृदंग काहाळाशाळा । आनक पटहादिका शाळा । विणा डिंडिम डमरू शाळा । जेथ सोहळा श्रिरामां ॥२१॥” पदांतींचे हे निरनिराळे प्रकार पहा—

" छत्रधारि वेत्रधारि। दंडधारि मेघडंबरधारि। व्यजनधारि चामरधारि। जे कुशळ परि सेवेलागिं॥ २३॥ वोडणधारि शस्त्रधारि। कवचधारि कटारधारि। खड्गधारि चक्रधारि। तोमरधारि अनेक॥ २४॥ अलंगाइत पटाइत। तुळवे भाले झेलित। हैकार थैकार गर्जत। रघुनाथ पाहातसे॥२५॥" पुढे तिघा बंधूंना आणि मारुतीस निरनिराळ्या प्रदेशांवर सत्ता चालविण्यासाठी रामाने शासनपत्रे दिली. त्या देशांची ही नावे पहा–" पुनरपि येके दिवसिं। बोलावोनि त्यां चौघांसि। पत्रशासन करुन त्यांसि। सता चहुदेसिं दिधलि॥ ४७॥ वस्तिस्छान कास्मिरदेश। भरथा प्रेरि रमेस। लक्षुमणालागिं म्लाछानवास। प्रख्यांति स्वाच खुरासन॥ ४८॥ शत्रुघ्नांलागिं बर्बबरदेस। योवन देस हनुमंतास। त्या देशिंचि भास्या विसेस। फिरंगि त्यास ह्मणताति॥४९॥" या रामराज्यात कोणकोणत्या प्रकारचे लोक होते त्यांची यादी पहा– एके दिवशी रामाची स्तुती करून भरत त्याला म्हणाला, "...माजि आइका विनवण। पौर वांछिति नियमचिन्हं। जेणे गहन सुख होय॥५७॥ धर्माधिकारी महाजनं। सेट्यि जोंहारि विक्रइ धान्य। जोतिसि वैद्य विचक्षणं। रामाज्ञा स्छापुन भरथ करि॥५८॥ चाटे सोवनि कोमटि वाणिं। सोनार घृतपाचिक श्रेणि। तेलि माळि पुस्पगुणि। ता (तां) बोलि आणि पुस्पकार॥५९॥ कांसार आणि सुतार। नापिक रजक चर्मकार। त्रुणविक्रइं भांडेकर। सिंबिकाकार सेवावेते (सेवाइते?)॥६०॥ वनोपवनि हर्म्यकार। चित्रविचित्र रंगकार। नाना परिचे विद्याधर। श्रिरामें सुस्वर ठेव्रिले ते॥६१॥ शस्त्रकार आयुध्याकार। नाना विद्यांचे सिल्पकार। आणि फळविक्रइ अफार। श्रिरघुविर ठेवितुसे॥६२॥ देशोदेशिंचे वणजारे। अस्वाविक्रइ वेवहारे। उदेम करुनिं भरिति उदरें। धर्मनिति रघुविरे स्छापिलें तें॥६३॥ वार्तिक आणि गुप्तवार्तिक। क्षत्ररक्षक ठाणांतरि देख। श्रिरामें ते वेळिं साम्यक। स्वविधानि देख ठेविले तें॥६४॥ सिंपि साळि जिनगार। रंगारि निळारि गोष्टकार। तांबटकर विचक्षण नर। बाह्य नगरि रघुविर स्छापिले ते॥६५॥" जाता जाता याच अध्यायातील आणखी एक ओवी पहा– रामाने आपल्या सेवेसाठी कोणाला नेमले होते? " अष्टवार्शी दशवर्शि। कुमार ठेविले निजसेवेसि। जे स्वयं अंतरंगवासि। जे प्रत्योत्तराषि महादक्ष॥६६॥"

**तपोवनात जाऊन** ऋषींच्या कान्ता पाहण्याची व तेथे चार दिवस राहण्याची **जानकी**ला इच्छा झाली आहे. दुसऱ्याच दिवशी वार्तिकांकडून जननिंदा होत असल्याचे रामास समजते. भद्र नावाच्या भृत्याने रजकाची वाणी रामचंद्राला ऐकविली. मग एकान्तात आपल्या बंधूंना रामचंद्र म्हणाला, "तंव श्रीराम ह्मणे बंधुत्रयांसी। म्यां तरी यींद्र ब्रह्मा देव साक्षेसीं। दिव्य घेंवोनि जानकीसी। रुषीमतेसीं अंगीकारीली ॥ ४८ ॥ जांनकी हे सुध सर्वथा। मीं जाणतसें गा बंधु भरता। परी लोकोपवादें तत्वता। हृदयेस्फोटता होंउं पाहे ॥ ४९ ॥ हें सोसवेना माझेनि जाण। आतां तजीन आपुला प्राण। अथवा हे जांनकी अंगना। अन्यथा दुशणा सोसी कोण ॥ ५० ॥ ज्याचे मस्तकीं अपकीर्ति जाण। तो जीवंत मेला भरथा आपण। त्यास्तवं त्यागीतो सीतेलागुन। न टांकीतां दुष्रण मज लागे ॥ ५१ ॥ अ. ७ ॥" तथापि सीतात्याग हा सुराणीक नावाच्या राक्षसाच्या वधार्थच रामाने केला होता असे कवीने या अध्यायातच देवांच्या तोंडून वदवून रामावरील दोष उडवण्याचा प्रयत्न केला आहे.

पुढे बाराव्या अध्यायात **रामचंद्राकडून सीतात्याग घडणेच शक्य नाही** हे स्पष्ट करताना कवी म्हणतो– "प्रसंगे आलि हे कथा। सितात्याग रघुनाथा। तरि हें न घडे सर्वथा। सत्य यकात्मता उभयवर्गें ॥ २२३ ॥ छाया न्हेलि लंकेषि। हे बोलीला वाल्मिक ऋषि। दुसरि शक्ति गेलि कैलासासि। पार्वति-दर्शनालागोनिं ॥ २२४ ॥ मुळ मुर्ति श्रिरामिं लज्ञ। हें वर्म जाणे शंकर आपण। सिता वनाभिगमनं। श्रिराम आपण स्वयं गेला ॥ २२५ ॥ सुराणिकवधालागोनि। श्रीराम गुप्त सितेमाझि राहुन। रुषि रक्षिले तपोवनीं। भक्त संरक्षणि श्रिरामु ॥ २२६ ॥ ते मुळ मुर्ति असे जेथ। तिथें कांचनि म्हणत। यदर्थि मंत्रशास्त्रसमत। ब्रह्म आपण स्त्रयं पाळि ॥ २२७ ॥" त्याचप्रमाणे आठव्या अध्यायात लक्ष्मी गरुडास रामायणातील काही गूढांचे स्पष्टीकरण देत असताना म्हणते ( राम हा विष्णूचा व सीता ही लक्ष्मीचा अवतार हे येथे ध्यानात घ्यावे. )— "तैसाचीं तो रघुनंदन। द्विवार मजसवें आला जाण। येक सीतपरीत्यागी आपण। तेथ सनीधान तो होता ॥ ७९ ॥ पुढें दुसरेन भुमीगता। मजसवें

येणें झालें श्रीरघुनाथा। आह्मा दोघां यैक्ये अभींनता। जाण पक्षीनाथा गरुडा॥ ८०॥"

**रावणाने प्रत्यक्ष सीतेचे हरण केले नव्हते** असे सांगताना आठव्या अध्यायात कवी लिहितो— "रावणें तेणें लंकाराज्य करितां। मग हरीली छायारूप सीता। मुळ मुर्ति गेली रजतपर्वता। पार्वतिचें तत्वता भेटीसी॥ ४४॥ तेथ राहुनि शणमास। केला श्रीराममंत्र उपदेश। मग परतली लंकेस। दिव्यांतिं सीता प्रकटली॥ ४५॥" एकनाथांनी अरण्यकांडाच्या सोळाव्या अध्यायात (ओ. १०७ ते ११७) छायारूप सीतेच्या हरणाची ही कल्पना स्वीकारलेली असली तरी स्वतः सीता मात्र अग्निमुखी राहिली असे म्हटले आहे. पहा— "सद्भावें समर्थ जानकी। स्वयें राहोनि अग्निमुखीं। छाया धाडिली भिक्षेसी निकी। येतां सकळिकीं देखिली॥ ११५॥"

बाराव्या अध्यायात (ओ. १५३ ते १८८) श्रीरामाच्या स्वरूपाचे जे वर्णन आले आहे त्यावर एकनाथांची छाप (बालकांड अ. १९) उघड असल्याने तो उतारा येथे देत नाही.

मूळ संस्कृत वाल्मीकिरामायणातील उत्तरकांड संशोधकांच्या मते प्रक्षिप्त आहे. रामकथेची अखेर सुखान्त व दुःखान्त अशी दोन्ही प्रकारची इतर काही ठिकाणी आढळते. प्रस्तुत पोथीतील कथाभागावर एकंदरीत आनंदरामायणाची छाप असल्याने सीतापरित्यागानंतर रामसीतेचे मीलन झाल्याचे कवी वर्णितो. सीता भूमिगत होते ती एका वेगळ्याच कारणाने. तेरावा अध्याय म्हणून पाहण्यासारखा आहे.

अश्वमेधानंतर रामचरित्र ऐकण्यासाठी सभेमध्ये अनेक ऋषी, वानर, प्रधान, मांडलिक राजे जमले आहेत. सर्वांना रामाने यथोचित सन्मान दिल्यानंतर सर्व स्थानापन्न झाले. मग "पुस्तक ठेवोनि रत्नपिठावरि। पुजा करोनिं शोडसोपचारि। आरंभ मांडिला मंगळाचारि। मग श्रवण करूं आदरिलें॥ १३॥ विणा टाळ श्रुति करोनि। अति सुरस द्दपदि चतुर जाणं। अति उलाषें गायन। करिति आपण स्वानंदें॥१४॥ यकरात्रि बाळकांड झालें समाप्ति। संवेचि चौदा वरुषिं वनवासाप्रति। सुमित्र सिता समवेतिं। भरथ अयोधेप्रति धाडिला॥ १५॥ पंचरात्र अयोध्या अरण्य-

कांड जाण । श्रिरामें केलें श्रवनं । वनवास क्रमिला संपूर्ण । ससिवर्गासमवेत (?) ।। १६ ।। संवेच उठावले किस्किंदाकांड गहनं । सत्तरात्र श्रवण केले संपूर्ण । सुंदरकांडाचे गोडपण । अकरा दिन श्रवण केलें ।। १७ ।। परम ख्याति हनुमंताचि । तेथ श्रिरामाचि अत्यंत रुचि । भवाब्धि तरावया नांव वाल्मिकाचि । अित कृपेचि गुणगरिमां ।। १८ ।। अलोलिक आरंभलें युद्धयकांड जाणं । श्रिराम लक्षुमणाचा प्रताप पूर्ण । सकळा जिवनां हनुमां जाणं । सुग्रिवं अंगद जांबुवंतेंसिं ।। १९ ।। तें संपलें मासा यका । मग श्रिराम अयोधे आला देखा । राज्याभिशक ऐकोनि सुखा । आनंद देखा भरथासि ।। २० ।। सवेंचि आरंभलें उतरकांड विचक्षणं । दाहा सहस्र वरुषें क्रमिलि जाणं । कथा यथवरि संपलि पुर्ण । रम्य रामायण अति गोड ।।२१।। ” पुढे “ श्रिराम चरित्र सिव्हांसनि पुजोनं । गजस्कंदिं मिरवोनं । अयोध्या नगरांत संपुर्ण । मग वाल्मिकाप्रति पुजिला ।।३१।। अ. १३ ” याच अध्यायात वाल्मिकाश्रमातून सीतेस आणविण्यात येते. वाल्मीकीने सीतेच्या शुद्धतेची ग्वाही दिली तरी लोकापवाद टाळण्यासाठी सीतेने दिव्य करावे असा रामाने आग्रह धरला त्या वेळी “ सभेसि झाला हळहळ शब्द । परस्परें बोलति उन्मद शब्द । दुःखें करिति दभोध (?) । हा हा कटकटा ह्मणोनि ।। ५५ ।। परस्परि ह्मणति केवडें विघ्न । फुडे कैसें होइल न कळे जाणं । वसिष्ट वारिनां श्रिरामा लागोनं । सितेषि प्राणांत मांडला ।। ५६ ।। ( कोणि वारिना श्रिरामासि । कैषे निर्वाण पाह्यति मुनि सभेषि । विस्व घातलें मरण धर्माषि । अति विघ्न वोडवलें ।। ५७ ।।...... ) सिता ह्मणे श्रिरामासि । स्वामि द्यावें: चरणतिर्थासि । जे मिं निःपाप निश्चयषि । तें साक्षासि अग्नि वंद्य ।। ५९ ।। मग सिता आलि अग्निकुंडानिकट । सतित्वाचि कास घालोनि बळकट । सर्वत्रि राम देखे प्रकट । मग ध्यानस्त राहिली ।। ६० ।। मग ध्यानस्त जटराग्निंसिं बोलत । तुं सर्व अंतर्यामिं सर्वगत । श्रिराम माझा वल्लभ निश्चित । तैं तुं साक्षत्व वद बापा ।।६१।। ...श्रिराममुखें सुखघनं । तेथोन आनं नातुडे माझें मनं । हेचि त्रिसत्य सत्यवचनं । ते मज संरक्ष तु ।। ६५ ।। यासि जें असेल विपरित । तैं तुं मज भस्मं करिं निश्चित । ह्मणोंनि मिटि घातलि त्वरित । जन विस्मित पैं झालें ।। ६६ ।। तवं अग्निमाजि रामषिता दिसति । स्वर्गिं देव जयजयकारें गर्जति ।

आनंदें वोसंडलि त्रिजगति । पुस्पवृष्टि करिते झाले ।। ६७ ।। " मग अग्नी प्रगट होऊन सीतारामांची स्तुती करतो. वसिष्ठांनीही मग सीतेची स्तुती केली. त्यानंतर राम सीतेस म्हणतो— ' विषम न मनावें मानषिं । प्रकट केलें तुझे महिमेसि । आतां सुख भोगावें स्वानंदमानषिं । तुझ्या सुखासि तुटि नाहि ।। ७४ ।। ऐसें बोलोनि जानकिसि । समाधान दिधलें तिसि । आनंद झाला सभेषि । सिता अंतपुराषि पाठविलि ।।७५।। ' पुढे **सीता भूमिगत होण्याचे कारण** सांगितले आहे ते असे– ' कितेक काळ झालेयावरि । कैकैया सितेथें विचारि । रावणे न्हेलि लंकेमाजारी । रावण नेत्रिं देखिला कैसा ।। ९४ ।। ते ह्मणे म्या रावणास । देखिला नाहिं सावकास । जटायु युध्य बहुवस । तैं पादांगुष्ट देखिला ।। ९५ ।। कैकै मुळिंपासोन । ते ह्मणे मि अंगुष्ट पाहिनं । सितेसि ह्मणे दाविं काढुन । यरि रेखोन दाविला ।।९६।। मग कैकेनें जाणं । अंगुष्टांचा दशानन केला संपूर्ण । श्रिरामापाषिं बोले आपणं । स्त्रियांचें लक्षण पुरुष नेणे ।।९७।। तुं ह्मणसि मजवेगळें । आन ठाइं सितेंचे मन नातळे । परि नित्य रावणाप्रति मन लाधलें । पाहिल्यावेगळें क्रमेनां ।। ९८ ।। कैकैच्या बोलावरुन । सितेषि दिव्य मागे जाणं । ते ह्मणे क्षिणाक्षिणा प्रमाणं । माजेन जाण नेदवे ।।९९।। मग ह्मणे होणार बळिवंत जाणं । दिव्यमिसें जाइन वैकुंठा आपणं । तेथ राम होइल नारायण । स्वसुखेंषि क्रिडा करुं ।।१००।। ऐसा करोनि निर्धार । दिव्य घ्यावेया उठिलि सत्वर । ते कथेचा विचार । श्रोतिं संविस्तर परिसावा ।। १०१ ।। सिता ह्मणे श्रिरामाषि । स्वामिन घ्यावें चेरणतिर्थाषि । आतां भेट परधामाषि । ह्मणोनि सद्गदित स्वयं झालि ।। १०२ ।। श्रिरामें देवोनि चरणतिर्थासि । होणार न चुके परि यांसिं । मग वंदुनि सावकासिं । क्रियावचन बोलति झालि ।।१०३।। श्रिरामावांचोनि जाणं । अनत्र पुरुषाषि नाहिं गमनं । तरि माते पृथ्वि ( मज )लागोन । द्विधा होउन ठाव देइं ।।१०४।। मनसा वाचा कर्मै जाणं । रामावेगळा पुरुष आनं । तरि माते पृथ्वि मजलागोन ! द्विधा होउन ठाव देइं ।।१०५।। तुजविण मि रघुपति । दुजा नेणे निश्चिति । हे सत्य रति ( तरी ? ) मंगळमुर्ति । धरणि अवचित द्विधा होइं ।।१०६।। पृथ्वि विस्वाचि माथा । तीणें मज ठाव द्यावा तत्वता । आता राहाणें जघ्रनता । न सोसवे सर्वथा मजलागिं ।।१०७।। तवं

अकस्मात जालें विवर । त्यांत निघेस निघालि सत्वर । मस्तकिं रत्न सिंव्हासन शुंधर । बैसलि धरणि देवि ॥१०८॥ ते स्वयं दिव्यरुप जाणं । सितेषि देउनि आलिंगन । दोहिं भाहि उचलोनं । मग पोटेषिं धरिलि ॥१०९॥ संवोचि गेली विवरांत । पृथ्वि मिळालि न दिसे गर्त । सभेषि झाला आकांत । आहा शब्द उठिला ॥११०॥ " पुढे रामाचा शोक असून पृथ्वीला शासन करण्यास तो उद्युक्त झाला आहे. पण 'अश्रुणिं' (आकाशवाणी) झाली की 'आतां सिता न भेटे.' पुढे सीतेची और्ध्व-दैहिक क्रिया केली जाते. अशा रीतीने 'लवांकुशादि अष्ट बंधु जाणं । त्याचें करोनिया लग्नं । सिता परधामाषि गेलि ॥१३८॥'.

पंधराव्या अध्यायात लक्ष्मण परधामास जातो आणि त्याच वेळी उर्मिलेने जलसमाधी घेतली असे कवी सांगतो. "(लक्ष्मण) मग विचा-रोनि मनिं । श्रिराम स्मरोनि ध्यानिं । आकळुनि श्रीराममुर्ति नयनिं । मग परधामा चालिला ॥ ९१ ॥ ऐसें ऐकोनि उन्मळा । तत्काळ पावलि शरयुजळा । पाहोनि लक्षुमणं मुखकमळा । त्याच्या स्वरूपा मिळालि ॥९२॥ "

सोळाव्या अध्यायात रामाने परधामास जाण्याची तयारी चालविली आहे. लवकुशांना त्याने राज्य विभागून दिले. " श्रिराम करि विभागासि । अर्धार्ध जाण निश्चयसिं । तेणें करोनि उभय वर्गासि । परम प्रिति वाढेल ॥ १८ ॥ " म्हणून. पुढे अयोध्येच्या जनांसह 'कोटानकोटि' विमानांत बसून रामाचे वैकुंठास गमन होते. लवकुशांनी उत्तरकार्यविधान केले. क्रिया-कर्मान्तरे, संस्कार, व्रते, दाने यांचे उल्लेख हा कवी वारंवार करतो. शेवटी त्याने **फलश्रुती** सांगितली ती अशी— " हे कथा वैकुंठिचि सिडि । स्वहितालागि ह्मणेल आवडि । तो पावेल पैले तडि । सद्गुरुविस्वासें करोनिं ॥ १०५ ॥ स्वयं ब्रह्मदेवें आपणं । ग्रंथासि दिधले वरदान । धर्म अर्थ मोक्ष संपुर्ण । परायण पाविजे ॥ १०६ ॥ तदुपरि सकळ रुषिगणिं । श्रवण स्वहिताकरनिं । रचिलि मुख्य प्रधानि । पापि जन तरावेया ॥ १०७ ॥ इहलोकिं दारिद्र नाषि । पुत्रपौत्रि वाढवि संततिषि । परलोकि पावि मोक्ष-सुखाषि । जे सनकादिक आशति ॥१०८॥ " आणि दुर्दैवाने यापुढचा ग्रंथ उपलब्ध नाही.

: ५ :

## मनाचे चरीत्र

### ( एक आध्यात्मिक कथाकाव्य )

**थोडा इतिहास**—इसवी सनाच्या अकराव्या शतकात कृष्णमिश्र यतींनी ' प्रबोधचंद्रोदय ' नावाचे एक संस्कृत सहा अंकी नाटक लिहिले आहे. या यतींच्या चरित्रासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही पण त्यांच्या नाटकाचा प्रभाव मात्र इतरांवर पडलेला आढळतो. श्रीहर्ष ( बारावे शतक ) आणि माधवाचार्य ( चौदावे शतक ) यांनी आपापल्या ग्रंथांतून या नाटकातील एका श्लोकाचा किंचित फेरफार करून उपयोग केल्याचे आढळून येते. ' प्रबोधचंद्रोदया 'च्या धर्तीवर ' संकल्पसूर्योदय ' नावाचे नाटक ' वेदान्तदेशिका 'ने संस्कृतात रचिले आहे.

मराठी कवी आणि नाटककार यांचे लक्ष काहीशा उशिरानेच या नाटकाकडे गेले असे आतापर्यंत मिळालेल्या माहितीवरून वाटत होते. 'महाराष्ट्र-सारस्वता'च्या पुरवणीत त्रिवंदूरच्या माधवस्वामीची माहिती देताना डॉ. शं. गो. तुळपुळे लिहितात, " त्यांचे एक काव्य उल्लेखनीय आहे व ते म्हणजे ' प्रबोधचंद्रोदय ' ही नाटककथा होय अशा प्रकारच्या चारपाच नाटककथा ' सरस्वती महाला 'त असून ही प्रथा खास तामिळनाडातील दिसते." ( पा. ९९७, आ. ४ थी ). येथील ' नाटककथा ' या शब्दावरून व ग्रंथनामावरून कृष्णमिश्र यतींच्या नाटकावरून हा ग्रंथ मराठीत रचला गेला असला पाहिजे असे वाटते. शालिवाहन शकाच्या सतराव्या शतकाचा प्रारंभ हा माधवस्वामीचा काल होय. पुढे इंग्रजी अमदानीत " इ. स. १८५१ मध्ये सदाशिव बजाबा शास्त्री अमरापूरकर व रावजी बापूजी

१. पहा—' प्रबोधचंद्रोदय '-Edited by K. Sambasiva Sastri, 1936, Trivandrum Sanskrit Series No. CXXII.

शास्त्री बापट या दोघांनी मिळून प्रबोधचंद्रोदय या नावाचे संस्कृतातून मराठी-मध्ये भाषान्तररूप नाटक लिहिले.'' असे डॉ. वि. पां. दांडेकर आपल्या 'मराठी नाट्यसृष्टि–पौराणिक नाटके' या ग्रंथात ( पा. ११३ ) सांगतात. पण आज मी ज्या ग्रंथाचा परिचय करून देणार आहे तो या दोहोंहून वेगळा व बराच प्राचीन आहे.

हा ग्रंथ दोनदा छापला गेला असावा असे दिसते. राजाराम कॉलेज-मधील तत्पर ग्रंथपाल ( आता रजिस्ट्रार ) व माझे स्नेही श्री. राऊत यांनी करवीर नगरवाचनमंदिरातून ( क्र. २४७६९ ) ही पोथी अवलोकनासाठी मला उपलब्ध करून दिली. हीत बारा अध्याय असून ओवीसंख्या १०१० आहे. मात्र शेवटच्या पानावर 'ओवीसंख्या १०११' असे छापलेले आहे. 'हे पुस्तक मुंबईत काशिनाथ वासुदेव खांडेकर यांणी जगदीश्वर छा. छा.' असा शेवटी निर्देश असून कवीचे नाव पहिल्या नऊ अध्यायांत श्रीनाथदास व शेवटच्या तीन अध्यायांत श्रीहरी ( रि ) दास असे आढळते. पुस्तकात मुखपृष्ठासह ८४ कागद असून मजकूर ( ८२×२+१= ) १६५ पाने आहे. मुखपृष्ठाच्या पहिल्या कागदाच्या मागील बाजूस मन राजा व त्याच्या दोन्ही बाजूंस प्रवृत्ती व निवृत्ती या दोन राण्या बसलेल्या व त्यांच्या दोन बाजूंस संकल्प व विकल्प हे प्रधान उभे असलेले असे चित्र आहे. कवीच्या गुरूचे 'श्रीपति' हे नाव अ. १ ओ. १० मध्ये आढळते.

'प्राचीन मराठी संतकवि, खंड पहिला' या कै. ज. र. आजगाव-करांच्या पुस्तकात पृ. ४२५ वर 'श्रीनाथदास ऊर्फ हरिदास' या कवीच्या नावावर 'मनश्चंद्रबोध' या छापील ओवीबद्ध ग्रंथाची माहिती आली आहे. त्यांनी उद्धृत केलेल्या ओव्या खांडेकरांनी छापिलेल्या पोथीतील अ. १ ओ. ९ ते १८ व २० ते २६, अ. २ ओ. ५५ ते ६७ या ओव्या होत. पण 'ह्या ग्रंथाचे अध्याय ११ असून ओवीसंख्या ९२४ आहे' असे आजगावकर म्हणतात. तेव्हा खांडेकरांनी छापलेल्या ग्रंथाहून आजगावकरांनी पाहिलेला ग्रंथ वेगळा असावा असे दिसते. दात्यांच्या ग्रंथसूचीत "; **हरिदास** मनश्चंद्रबोध मुंबई; तात्या राघोजी कदम; जगदीश्वर ( शिळा छाप ), मुंबई; शके १७९७; ( ८५×२ ); ६·२×४·५

...लिपि एवं संग्रहालय, ठाणे. ...
अनुक्रम ....७४७२०... दि: ....।।९।१६...
क्रमांक ....२०२४.... नों: दि: ...।१३।८०...



[ पोथी; प्रवृत्तिनिवृत्तिवाद ] ” अशी नोंद आहे. आजगावकरांनी ही पोथी पाहिलेली असावी. पुढे मुक्तेश्वरासंबंधी लिहिताना पृ. ४४९ वर याच कवीचा उल्लेख “ ‘मनश्चंद्रबोध’ ग्रंथाचा कर्ता श्रीनारायणदास ऊर्फ हरिदास ” असा आजगावकर करतात. म्हणजे श्रीनाथदास, हरिदास आणि श्रीनारायणदास अशी या कवीची तीन नावे आजगावकरांनी दिली आहेत. पण ही तीनही नावे खरी नसून कवीचे नाव ‘ श्रीपतिदास ’ असे आहे असे मला मजकडील एका हस्तलिखिताच्या आधारे म्हणावयाचे आहे. कवीच्या नावासंबंधी पोथी छापणाऱ्यांनी काही घोटाळा केला, की त्यांना उपलब्ध झालेल्या हस्तलिखितात वरील नावे होती हे सांगणे कठीण आहे.

मजकडील हस्तलिखिताच्या आधारे पुढील चर्चा करून या ग्रंथाचा परिचय करून देत आहे.

**ग्रंथकर्ता आणि त्याचा काल**—ग्रंथकर्त्याच्या चरित्राबद्दल आणि कालाबद्दल निश्चित विधाने करण्यास आज पुरावा उपलब्ध नाही. त्याच्या गुरूचे नाव ‘ श्रीपति ’ ( प्रसंग १ ओ. १० व २२ ) होते व म्हणून तो स्वतःचा उल्लेख ‘ श्रीपतिदास ’ असा करतो याहून अधिक माहिती प्रस्तुत ग्रंथ देत नाही.

भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोशात ‘ श्रीपतिदास २ मराठी कवि. याची एक गर्भगीता आहे. तसेंच यानें मनाचें चरित्रहि लिहिलेलें दिसतें. ( मं. वार्षिक १८३६, क. अ. ) ’ अशी नोंद आहे.

उद्धवचिद्घनकृत संतमालिकेत ‘ श्रीपतिदास योगनाथ । पवाडे प्रसिद्ध जयाचे ।। ५० ।। ’ ( अन्य पाठ—‘ श्रीपतिदास वैजनाथ । पूर्ण भक्त हरीचे ’ ) असा या कवीचा उल्लेख आढळतो. उद्धवचिद्घन रामदासांच्या वेळी हयात होता असे त्याच्या एका पदावरून दिसते. ( पहा—ग्रंथमाला, मे १९०३ ) यावरून रामदास, उद्धवचिद्घन यांच्यापूर्वी केव्हा तरी श्रीपतिदास होऊन गेला एवढे निश्चित. उद्धवचिद्घनाने श्रीपतिदासाचे नाव दासोपंतानंतर गुंफले असले तरी कालनिर्णयाच्या दृष्टीने त्याला फारसा अर्थ नाही. कारण नामदेवाच्या पुत्रांची नावे त्याने एकनाथानंतर घातली आहेत. तथापि ‘ योगनाथ । पवाडे प्रसिद्ध जयाचे ’ असे त्याने जे म्हटले आहे

मराठी ग्रंथ संग्रहालय ... दा. क्र. ७५८१२

त्यावरून व प्रस्तुत ग्रंथाच्या अंतरंगावरून आमचा हा कवी एक योगी म्हणून गाजला होता याविषयी शंका राहात नाही.

तथापि या ग्रंथाच्या अंतरंगावरून श्रीपतिदासाच्या कालासंबंधी काही अनुमान बांधता येईल. प्रस्तुत ग्रंथात विवाहाचे वर्णन दोन ठिकाणी आले आहे ( मोह व भुली यांचे लग्न, प्र. २ ओ. ६० ते ६६ व बोध आणि उन्मनी यांचे, प्र. ५ ओ. ४३ ते ६३ ). येथे तत्कालीन विवाहपद्धतीतील चालीरीतींचे निर्देश आहेत. त्यांत मंगलाष्टकांचा उल्लेख नाही. मंगलाष्टके एकनाथकालाच्या अखेरीअखेरीस महाराष्ट्रात लोकप्रिय झाली असावीत असे माझे मत आहे. रुक्मिणीस्वयंवरात ( रचनाकाल शके १४९३ ) व भावार्थरामायणाच्या बालकांडात ( रचनाकाल शके १५१५ ते १५२१ च्या दरम्यान ) अशा दोन ठिकाणी एकनाथांनी विवाहपद्धतीचे सविस्तर वर्णन केले आहे ( रु. स्व. अ. १३ ते १८ व भा. रा. बालकांड अ. २२ ते २६ ). या दोन्हीही ठिकाणी एकनाथ मंगलाष्टकांचा उल्लेख करीत नाहीत. मात्र सुंदरकांडाच्या नवव्या अध्यायात ( म्हणजे आपल्या आयुष्याच्या अखेरी-अखेरीस केलेल्या रचनेत ) दशरथ-कौसल्या-विवाहाचे पूर्ववृत्त वर्णिताना एकनाथ लिहितात, " दोहींचा जो निजहरिख । तोचि तयांचा मधुपर्क । बोल बोलिलीं जे अनेक । मंगलाष्टकें तीं तेथें ।। ७२ ।। ". मुक्तेश्वरानेही विराटपर्वात उत्तरा-अभिमन्यूंच्या विवाहाच्या वेळी ( अ. ८–५० ) मंगलाष्टकांचा निर्देश केला आहे. यानंतरच्या काळात मात्र ज्यांनी ज्यांनी एखादी विवाहकथा रचिली त्यांनी त्यांनी फक्त उल्लेखच केला नाही तर शार्दूलविक्रीडित वृत्तात काही मंगलाष्टकेही गुंफिलेली आहेत. वामनपंडित, वेणाबाई, विठ्ठल, नागेश इत्यादींचे ग्रंथ याची साक्ष देतील. म्हणून मंगलाष्टकांचा निर्देश न करणारा श्रीपतिदास एकनाथपूर्व असावा असे माझे अनुमान आहे. ग्रंथमाला मासिक पुस्तकात छापलेले ' एक जुने मानभावी काव्य ' राजवाड्यांच्या मते ज्ञानेश्वरांनंतर चाळीस वर्षांनी रचले गेले. यात श्रीकृष्णविवाहसमयी ' वैवाहिका परम मंगल गाति बाळा ' ( १६६ ) असे म्हटले असून पुढे श्लोक १६७ ते १७१ ही रचना मंगलाष्टकसदृश असून ती शार्दूलविक्रीडित वृत्तातच आहे. पण संशोधन-लेखसंग्रहाच्या पहिल्या भागात ( पृ. १६९ ) ह. ना. नेने या कवीचा

काल शक १४६० मानतात. शिवाय या ग्रंथाचा प्रचार फारसा नव्हता व नाही. विवाहपद्धतीच्या वर्णनात एकनाथांनी जी सूक्ष्मता दाखविली आहे ती लक्षात घेता मंगलाष्टकांच्या बाबतीतील माझे विवेचन मान्य व्हायला हरकत नसावी.

भाषेचे स्वरूपही हा कवी एकनाथांपूर्वी होऊन गेला असावा या मताला बळकटी आणणारे आहे. प्रस्तुत हस्तालिखितात 'तेधे' (प्र. ९–७) या शस्त्राचा जो उल्लेख आला आहे तेवढा वगळल्यास एकही यावनी शब्द आढळत नाही. बऱ्याच ओव्यांच्या चौथ्या चरणांत मध्येच पहिल्या तीन चरणांप्रमाणे यमक आढळते. अशा ओव्या नामा पाठक (अश्वमेध पर्व-हस्तलिखित) व अज्ञानसिद्ध नागेश (नागेशमाहात्म्य– ह. लि.) या एकनाथपूर्व कवींत आढळत असल्याने अशी साडेतीन किंवा साडेचार चरणी ओवी हे खास एकनाथी वैशिष्ट्य मानता येत नाही. कथारोळ, वोव्हारे (वधूवर), राजबीदी (राजमार्ग), लाहिलहिं (लगबगीने), सारोख, सपुर, अपैसें, येकोंकी (येकवंकी–तादात्म्य), नेहटी (जवळ), वाटीव, बीक, रळी, प्रहुडी (प्रौढी), आभार (भार), आईच्छा (इच्छा) इत्यादी शब्द, जाणिजेतु, पोखीतु, हरीखे अशी क्रियापदे, 'त्याची गोष्टी झणे काढा', 'न लजसी', 'नवचे', 'नेंदावें' अशी निषेधार्थी रचना, 'मज पाहाता' (मी पहात असता), 'मज प्रपंचाते आसता' (मी प्रपंच असताना) असे संस्कृत वळण, 'प्रवृत्तीचें करी म्हणीतलें'. 'वैराग्यें अक्षता घेतलीया। संतोशे माथा घातलिया', 'बोलतखेवो' अशी विशिष्ट रचना, निरनिराळ्या विभक्तींच्या अर्थी फक्त सामान्यरूपांचा वापर, 'तीये प्रवृत्तीचेनी बोलें' अशी विशेष्याच्या विभक्तीप्रमाणे बदलणारी विशेषणे, 'राणीया, आवडतीया' अशी अनेकवचने, संस्कृत शब्दांच्याऐवजी अस्सल देशी वळणाच्या शब्दांचे प्राचुर्य इत्यादी विशेषांवरून प्रस्तुत कवी एकनाथांच्या पूर्वी होऊन गेला असावा असे मला वाटते. तेराव्या प्रसंगात जे भक्तिमाहात्म्य आले आहे त्याला भागवताचा आधार आहे असे म्हणता आले तरी ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायातील काही ओव्यांची त्यावर दिसणारी छाप स्पष्ट आहे. हा कवी काही ठिकाणी 'ज्ञाना'चा उल्लेख

'ज्ञानेश्वर' असा करतो. ज्ञानेश्वरांच्या कीर्तीचाच हा परिणाम असावा. एवंच, ज्ञानेश्वरोत्तर आणि एकनाथपूर्व असा या कवीचा काल- त्यातही ज्ञानेश्वरांनंतर लौकरच- असावा असे माझे अनुमान आहे. 'रत्नमाळे'चा कर्ता श्रीपती (ज्ञानेश्वरपूर्व) याचा आणि प्रस्तुत कवीच्या गुरूचा नाम-सादृश्यापलीकडे संबंध नसावा, कारण 'रत्नमाळा' हे ज्योतिषविषयक प्रकरण आहे.

"एकनाथी ओवीप्रमाणे चौथ्या चरणात यमक, व पुल्लिंगी आकारान्त ('अकारान्त' हवे) शब्दाची उकारान्त रूपे यांवरून हा कवी २७५ वर्षांपूर्वी होऊन गेला असावा असे वाटते" असे आजगावकरांना (प्रा. म. सं. क. खं. १, पृ. ४२७) वाटते.[१]

**हस्तलिखिताचा लेखनकाल व लेखकू**—अखेरचा प्रसंग संपल्या-नंतरचा मजकूर असा आहे—"ईती श्री प्रबोधचंद्र ।। मनचरीत्र कथाग्रंथ संपुर्णमस्तु ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।। श्रीराम ।। सके ।। १६ ।। भावनाम संवछरे माग मासे कृष्णपक्षे दशमी गुरुवारे प्राथःकाले प्रथम प्रहरे लेखन समाप्त।। हस्ताक्षेर गुरुवर फकीराचा सुत संताचा दास मंगळ माहेश्वरी शुभं भवती ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।। श्रीरस्तु ।। " येथे शकांक देताना १६ पुढील जागा 'लेखकू'ने मोकळी सोडली आहे. 'भाव नाम संवछरे माग मासे कृष्ण-पक्षे दशमी गुरुवारे' हा योग सतराव्या शतकात शके १६७६ मध्ये येतो. (इंग्रजी तारीख ६ फेब्रुवारी १७५५-पिल्ले जंत्री). शके १६७६ मध्येच ही पोथी लिहिली गेली असती तर १६ पुढील जागा मोकळी सोडण्याचे कारण नव्हते. अर्थात शके १६७६ मध्ये झालेल्या प्रतीतील ७६ हा अंक अस्पष्ट झाल्यानंतर प्रस्तुत प्रत लिहिली गेली आहे. साधारणपणे शके १७०० नंतर प्रस्तुत प्रतीचे लेखन झाले असावे. 'गुरुवर फकीराचा सुत संताचा दास' हा 'लेखकू' अमक्याच प्रतीचा असे निश्चितपणे सांगता येत नाही. मूळची प्रत (श. १६७६ मधील) अस्पष्ट झाल्यानेच कदाचित असेल, प्रस्तुत पोथीत काही ओव्या व ओवीचरण अपूर्ण राहिले आहेत.

१. महाराष्ट्र सारस्वताच्या पाचव्या आवृत्तीच्या पुरवणीत डॉ. तुळपुळे या कवीस त्याच्या आध्यात्मिक रूपके साधण्याच्या पद्धतीवरून एकनाथोत्तर मानतात.

**ग्रंथनाम**—पोथीच्या आरंभी " ज्ञानबोध ॥ मनचरीत्र ॥ " असे म्हटले असून नंतर नमनांना सुरुवात केली आहे. प्रसंगांच्या अखेरीस ' ईती श्री प्रबोधचंद्र श्रीपतीदासकृत मनचरीत्र प्रथम प्रसंग ', ' ईती श्री प्रबोधचंद्रे ॥ श्रीपतीदासकृत ॥ ' ( प्र. २, ३, ४, ५ ), ' ईती श्री प्रबोधचंद्रे श्रीपतीदासकृत मनचरीत्र ॥ ' ( प्र. ६, ७, ८ ) असे उल्लेख आहेत. पहिल्या प्रसंगात कवी म्हणतो, " तरी हें मनाचे चरीत्र। कथा आहे जी पवीत्र।... ॥ २८ ॥ " इतरत्रही ' मनाचे चरीत्र ' असेच तो लिहितो. तेरावा प्रसंग संपल्यानंतर ' ईती श्री प्रबोधचंद्र ॥ मनचरीत्र कथाग्रंथ संपुर्णमस्तु ॥ ' असा निर्देश आहे. तेराव्या प्रसंगाच्या अखेरीस तो लिहितो, " या ग्रंथा नावं प्रबोधचंद्र। अैसें पुराणी बोलीलें साचार। म्हणउनी मनाचे चरीत्र। म्हणीजे यासी ॥ ८२ ॥ ". यावरून कवीला ' प्रबोधचंद्र ' व ' मनाचे चरीत्र ' ही दोन्ही नावे मान्य आहेत असे दिसत असले तरी ' मनाचे चरीत्र म्हणीजे यासी ' असे तो म्हणत असल्याने ' मनाचे चरीत्र ' हेच ग्रंथनाम त्याने योजिले असावे असे वाटते. ग्रंथारंभी ' ज्ञानबोध ' असे एक नाव आढळत असले व बाराव्या प्रसंगाच्या उत्तरार्धात आणि तेराव्या प्रसंगात ' ज्ञाना 'ने ' मना 'ला बोध केलेला असला तरी हे नाव इतरत्र कोठेही उल्लेखिलेले नाही. म्हणून प्रस्तुत ग्रंथाचा उल्लेख ' मनाचे चरीत्र ' असा मी केला आहे.

या ग्रंथाचे नाव आणि कविनाम यांसंबंधी आणखीही अन्य पुरावा मिळतो. तंजावरच्या सरस्वती महालातील मराठी ग्रंथांचे जे वर्णनात्मक कोश प्रसिद्ध झाले आहेत त्यांतील पहिल्या भागात[१] ठोकळ क्रमांक २३५ ते २४२ मध्ये उल्लेखिलेल्या आठही प्रती प्रस्तुत ग्रंथाच्या असून प्रत्येक क्रमांकात ' प्रवृत्तिनिवृत्तिसंवाद, मनचरित्र—श्रीपातिदासकृत ' असाच उल्लेख आहे. ओवीसंख्या चार प्रतींत ६२८, दोन प्रतींत ६७७ व इतर दोन प्रतींपैकी एकीत ७२२ व दुसरीत ७७३ अशी नोंदलेली

१. A Descriptive Catalogue of the Marathi Manuscripts and Books in the Tanjore Maharaj Sarfogi's Sarswati Mahal Library Vol. I.

आहे. सहा प्रतींत प्रसंग सात तर दोन प्रतींत सहा आहेत. ‘श्रीरामदासी संशोधना’च्या द्वितीय खंडात ‘बाडांक १२०७ (३)’मध्ये ‘श्रीपतिदासकृत प्रवृत्तिनिवृत्तिसंवादे मनाचें चरित्र– ओवी ७३२’ असा निर्देश आहे. या सर्व ग्रंथांतील याद्यांत सदर ग्रंथ दुसऱ्या कोणत्याही कवीच्या नावावर आढळत नाही. म्हणून छापील ग्रंथाचे व त्यावरील कवीची नावे चुकीची आहेत असे म्हणणे भाग आहे. यापुढे ‘मनाचे चरीत्र’ हा ग्रंथ श्रीपतिदासाचा म्हणूनच उल्लेखिला जाणे आवश्यक आहे.

**प्रसंगांची नावे व ओवीसंख्या**— प्रस्तुत हस्तलिखितात तेरा प्रसंग व १११३ ओव्या आहेत. म्हणजे इतर प्रतींहून येथील प्रसंगसंख्या व ओवीसंख्या अधिक आहेत. प्रत्येक प्रसंगाच्या अखेरीस त्या त्या प्रसंगाचे वेगळे नाव निर्दिष्ट आहेच असे नाही. प्रसंगांची नावे व प्रत्येकी ओवीसंख्या अशी—

| प्रसंग | नाव | ओवीसंख्या |
|---|---|---|
| १ | — | ३९ |
| २ | — | १२२ |
| ३ | नीवृतीस्वपुत्रसंवादे ॥ पूर्ववृत्तांतनीरोपण ॥ | ८८ |
| ४ | नीवृतीज्ञानसंवादे ॥ राज्यवीचारप्रकरणनाम | ७४ |
| ५ | बोधवीव्हावराज्यस्थापन ॥ नाम | ११६ |
| ६ | प्रवृत्तीसुतप्रधानराजावीचार ॥ कृत नाम | ७९ |
| ७ | वीवेकसीष्टाईगमन नाम | ८१ |
| ८ | वीवेकसीष्टाईकृत ॥ युध्यकरणवीरवीभाग नाम | ९२ |
| ९ | — | ८७ |
| १० | — | ६० |
| ११ | — | ७३ |
| १२ | — | ११७ |
| १३ | — | ८५ |
| | एकूण ओवी — | १११३ |

## काव्याचे स्वरूप

काल आणि कविचरित्र यांविषयी निश्चित माहिती देता येत नसली तरी मराठीतला हा एक वेगळ्या स्वरूपाचा, महत्त्वाचा आणि रसाळ ग्रंथ आहे असे मात्र निश्चितपणे म्हणता येईल. कृष्णमिश्र यतींच्या नाटकावरून कवीला ग्रंथलेखनाची प्रेरणा मिळाली असली तरी हा ग्रंथ भाषान्तर तर नाहीच, पण रूपान्तरही नाही. कृष्णमिश्रांचा सूत्रधार म्हणतो, “ तद् वयं शान्तरस-प्रयोगाभिनयेनात्मानं विनोदयितुमिच्छामः । ” प्रस्तुत ग्रंथही शान्तरसावर अधिष्ठित आहे. नाटकाच्या कथानकातील ‘ मना’च्या ‘ प्रवृत्ति-निवृत्ती द्वे धर्मपत्न्यौ । तयोः प्रवृत्त्यां समुत्पन्नं महामोहप्रधानमेकं कुलम् । ’ हा भाग आमच्या कवीने तसाच घेतला आहे; पण ‘ निवृत्त्यां च द्वितीयं विवेक-प्रधानमिति ( कुलम् ) ’ यात थोडा फरक करून त्याने बोधाला महत्त्व दिले आहे. मूळ नाटकात जैन, बौद्ध, चार्वाकमतवादी आदींची जी थट्टा आहे तिचा मागमूसही ‘ मनाचे चरीत्रा ’मध्ये नाही. ‘ महाराज विवेकेन नैयायिकं दर्शनं दौत्ये प्रहितम् ’ असे मुळात तर येथे बोध व ज्ञान यांनी विवेकालाच शिष्टाईसाठी पाठविले आहे. ‘रति, विभ्रमावती, मिथ्यादृष्टि, दिगंबर, भिक्षु, कापालिक, मैत्री, वस्तुविचार, विष्णुभक्ति, सरस्वती, उपनिषद्देवी, निदि-ध्यासन, प्रबोधचंद्र ’ आदी संस्कृतातील व्यक्तिरेखा येथे नाहीत. अज्ञान, प्रपंच, उन्मनी, आनंद, विश्रान्ती अशा काही वेगळ्या व्यक्तिरेखाही श्रीपति-दासाने निर्मिल्या आहेत. शिवाय कथानकाची मांडणी आणि काव्यकल्पना यांतही खूपच फरक आहे. आमच्या कवीने ग्रंथ मुळातून वाचला असेल की नाही अशीही शंका मनाला यामुळे चाटून जाते. या शंकेला आणखीही एक कारण आहे. तेराव्या प्रसंगात ‘ या ग्रंथा नावं प्रबोधचंद्र । अैसें पुराणी बोलीलें साचार ’ असे कवीने म्हटले आहे. मूळ नाटकाच्या नावाचा जसा त्याने संक्षेप– कदाचित मूळ ग्रंथ प्रत्यक्ष पाहिला नसल्याने— केला आहे तसेच तो या ग्रंथाचे ‘ प्रबोधचंद्र ’ हे नाव ‘ पुराणात ’ आहे म्हणतो. प्रबोधचंद्रोदय काही पुराण नव्हे. या नावाचे एखादे पुराण असेल असेही वाटत नाही. वस्तुस्थिती कशीही असो, कवीने सारा ग्रंथ आपल्या कल्पकतेने व बहुश्रुततेने सजविला आहे एवढे मात्र खरे.

श्रीपतिदासाने आपल्या ग्रंथास सर्वत्र ‘ कथा ’ असे म्हटले आहे. आपल्या कथेला वेळोवेळी त्याने जोडलेली विशेषणे सार्थ आहेत– ‘ तरी हें मनाचें चरीत्र । कथा आहे जी पवीत्र । श्रीगुरु तुमचा होईल वर । तरीच उत्तर अनुवादो ॥ २८ ॥ प्र. १ ’, ‘ तेंची कथाकौतुक । ऐकता वाटे सुख ॥ १२२ ॥ प्र. २ ’, ‘ रसाळ साजीरी कथा हे ॥ ८८ ॥ प्र. ३ ’, ‘ पुढिल कथा मनोहर । अती सादरे ऐका पां ॥ ७३ ॥ प्र. ५’, ‘ तरी चालउं सीघ्रगती । कथा निगुती रसाळ ॥ ११ ॥ प्र. ७ ’, ‘ येथुनि युध्याचा अवसरु । कथा आहे जी सनागर ॥ ९२ ॥ प्र. ८ ’ आणि शेवटी फल-श्रुती सांगताना कवी लिहितो, ‘... संपले मनाचे चरीत्र । ऐके तया पुण्य पवीत्र । माहा दोश नीवारी ॥ ६९ ॥ जो भावें परीसे हे कथा । त्याची तुटे संसारवेथा । आणी मुक्ती लाभे सायोज्यता । श्रवणमात्रें करूनी ॥७०॥ या ग्रंथाचें गहींवर । जे वाचुनी पाहती चतुर । त्यासी आत्मबोधबीवर । कळेल सहजची ॥ ७१ ॥ ऐसें मनाचें चरीत्र अपुर्व । पाहता या शरी-राचा अनुभव । घेतां सारांश सर्व । शंशयो पैं तुटेल ॥ ७२ ॥ हें कथेचें गहीवर घ्यावें । आपुलीया अनुभवें । तेणे सुख होईल स्वभावें । तें अनुभवावें प्रेमेसी ॥ ७३ ॥ प्र. १३ ’. वेदान्ती कल्पनांमुळे काहीशी सांकेतिकता आढळत असली तरी कथेचा रसाळपणा किंवा चटकदारपणा कोठेही कमी झालेला नाही.

इतर प्राचीन मराठी कवींप्रमाणे आमचा कवीही मोठा विनयसंपन्न आहे. ग्रंथाचा प्रथम प्रसंग केवळ नमनांचा आहे. गणेश, वाग्देवता, सद्‌गुरू आणि संतजन यांना उद्देशून केलेल्या या नमनांत कवीच्या श्रद्धा, गुरुभक्ती, संतप्रीती आणि विनयसंपन्नता या गुणांची साक्ष आपणांस पटते (प्र. १ ओ. १ ते ३८). गुरुवर्णनाची अशक्यता अनेक दृष्टान्तांनी स्पष्ट केल्यानंतर कवी गुरूला विनवितो, ‘ तरी ते माझी वागवल्ली । तुं वागवी आपुलिये कृपाजळी । तेणें फळीं फळेल रसाळीं । प्रेमकलोळीं अक्षराचा ॥ २४ ॥ तुझा पद्महस्त तोचि मंडप । अमृतदृष्टी छायारूप । तेणें वाग्वलीं अद्‌भुत । ज्ञानफळि फळेल संतत ॥ २५ ॥... आतां वेळ कर्मावयालागुनि । बोलतो बोलाचि काहाणी । तें उपसाहावी मजलागुनी । म्हणउनि चरणी लागतो

सादरें ॥ २७ ॥ '... पुढे संतजनांना उद्देशून कवी म्हणतो, '...तुम्ही संत कृपा कराल। तरी अदरीलें कार्य सीधी जाईल। मनोभाव उल्हासेल। प्रेम बहुसाल माझें पैं ॥ ३३ ॥ तुम्ही बोलवील्या मी बोलेन। तुमचे कृपे वागवेन। तुम्हासीच शरण येईन। तुमचा म्हणउनि परीयेसा ॥ ३४ ॥ तरी तुम्ही श्रोतेजनी। कृपा करावी मजलागुनी। ऐकावी माझी विनवणी। सावधान करूनि मानस ॥ ३५ ॥ माझे बोबडे बोल। येथें नाहि वीत्पती आणी वोल। आतां काय बोलो बहुसाल। अल्प केवळ मती माझी ॥ ३६ ॥'. पुन्हा तेराव्या प्रसंगाच्या अखेरीस श्रोत्यांना वंदन करून कवी लिहितो, '... म्हणे मी संताचे दीन। मजवरी कृपा करावी ॥ ७४ ॥ धीटपणे बोलीलो बोल। येथें कांहीं नव्हे नवल। तुमची कृपा बहुसाल। मज आपल्यावरी ॥ ७५ ॥ पुंसा पडो सीकवीजे। मग आपणची ऐकोनी संतोसीजे। तयापरी हें माझें। बोबडे बोल ॥ ७६ ॥ तुम्हीं मज बोलावीलें। तुमचें तुम्हासी नीवेदीलें। यालागि मी संचलें। तुमचीया कृपेनें ॥ ७७ ॥ माझे पराकृत बोल। येथें नाही वीत्पती आणी कुशळ। परं तुम्ही सरतें कराल। म्हणउनी पांया लागतो ॥ ७८ ॥ मीं बोलीलो बाळमती। या कवीत्वा नाही वीत्पती। तुम्ही सुजाण चक्रवती। म्हणउनी पांया लागतो ॥ ७९ ॥ तुम्हा मायबापापुढें। मी बोलीलो बोबडें। तें मानावें वाडेंकोडें। म्हणोनी पांया लागतो ॥ ८० ॥ येथें आधीक आणी आथवा उणें। तें सांभाळुनी घेणें म्हणें। मी तुमचें कृपेचें पोसणें। म्हणउनी पांया लागतो ॥ ८१ ॥'.

कथेच्या व संवादांच्या ओघात निरनिराळ्या पौरागिक व्यक्तींचे व प्रसंगांचे त्याने केलेले उल्लेख त्याच्या बहुश्रुततेची साक्ष देतात. सर्व ग्रंथभर खेळविलेले आध्यात्मिक रूपक आणि अधूनमधून अशा रूपकांचा त्याने उठविलेला थाट त्याच्या आध्यात्मिक अधिकाराची आणि कवित्वाच्या थोरवीची ग्वाही देतात. आपल्या ग्रंथात पाल्हाळीकपणा आल्याची जाणीव खुद्द कवीलाच होती हे त्याने वारंवार काढलेल्या ( सात ठिकाणच्या ) उद्गारांवरून दिसत असले तरी ग्रंथ कोठेही कंटाळवाणा वाटत नाही. उलट विस्तारभयास्तव कवी संयमच पाळतो असे वाटते.

प्रवृत्तीच्या व मोहादींच्या आहारी गेलेले मन ‘ निवृत्ति, ज्ञान, बोध, विवेक ’ इत्यादींच्या प्रयत्नांनी ताळ्यावर येऊन भगवद्भक्तीला कसे लागले हे कवीला येथे कथारूपाने सांगावयाचे आहे. कथानकाची आकर्षकता, व्यक्ति-रेखाटनाचे कौशल्य (व्यक्तींच्या बाह्य व आन्तर वर्णनांनी ), युद्धप्रसंगांतील चमत्कृती आणि ओज, संवादांतील प्रवाहित्व आणि आरोप-प्रत्यारोपांच्या ठिणग्या, कौटुंबिक जीवनातील रागलोभमत्सरादी भावना, विवाहपद्धतीचे तत्कालीन वर्णन, योग्य ठिकाणी येणारा उपदेश इत्यादी गुणांनी प्रस्तुतचे काव्य विलोभनीय ठरणारे आहे. तशात कवीच्या निरभिमानतेचा, प्रेमळ-पणाचा, गुरुभक्तीचा, संतप्रीतीचा, आध्यात्मिक अधिकाराचा परिचय होतात्र ‘ रसाळ साजीरी हे कथा ’ हे स्वतःच्या काव्यासंबंधी खुद्द कवीने काढलेले उद्‌गार सार्थ आहेत असाच कोणाही रसिकाचा अभिप्राय पडेल यात शंका नाही.

**‘ रसाळ साजीरी कथा हे ’**

‘ कायापुरनगरी ’मध्ये ‘ मन राजा राज्य ’ करीत होता. संकल्प आणि विकल्प हे त्याचे दोन प्रधान. त्याला ‘ प्रवृती नीवृती दोघी राणीया ’ पण ‘ प्रवृतीचें लावण्य देखोनी भुलला ’ होता तो. लवकरच निवृत्तीस त्याने ‘ बाहेर घातलें ’ आणि तिने मग ‘ निरंजना बीजें केलें.’ या वेळी ती गरोदर होती. निरंजनपुरात एक सुंदर आश्रम करून ती राहिली. तिचा भाऊ ‘ परमार्थ ’ जवळ राहिला होता.

इकडे प्रवृत्तीचा बंधू ‘ भ्रम ’ विनोद दाखवून मनाला आपलाच छंद लावता झाला. कित्येक दिवसांनी प्रवृत्तीला संतती झाली. ‘ वडिल मोहो प्रसीत्ध । तया धाकुटा काम क्रोध । डंभ मछर आणी मद । लोभ प्रसीत्ध धाकुटा ॥ ’ असे सात पुत्र आणि लावण्यवती पण दुराचारी व अविचारी ‘ आशा त्रुष्णा कल्पना । भ्रांती ईछा वासना । ’ अशा सहा कन्या प्रवृत्ती प्रसवली. या सर्वांचे ‘ धायपणें ’ ‘ दुर्बुधी ’ करीत होती. ही मुले ‘ अवीवेक आणि अवनीती । तयासी वीशेष खेळती ’ आणि ‘ अवक्रीया ते जागती । उभी संतत त्यापासी ’. ‘ प्रपंचीक ’ जनांची वासना या कुमरांवर फार होती. या मुलांना ‘ वीशयाचें भातुकें । दुर्बुधी देतसे कौतुकें । तें फार करूनीयां नीकें । उल्हासें सकळीके सेवीती ’.

पुढे बहुत दिवस क्रमिल्यानंतर एके दिवशी मोहाला राज्य द्यावे असा प्रवृत्तीने मनापुढे प्रस्ताव मांडला. शिवाय “ पुर्वज अहंकार अमुचा। तोची प्रधान करू मोहाचा। राज्य चालउ जाणे साचा। तो अहंमतीचा वेगळा ॥ ३५ ॥ अणिक येक दुजा प्रधान। माझा पीता होय अज्ञान। तो मोहातें हाती धरुन। राज्य संपुर्ण चालवील ॥ ३६ ॥ ” असेही तिने सुचविले...मोहाचा विवाहही करण्याच्या इच्छेने पुनः प्रवृत्ती म्हणाली, “ मेळउं सोयेरा सधर। तिही लोकी जी थोर। देखा साचार प्रपंचु ॥ ४१ ॥ त्यासी सोईरीक करीतां। मज बरवें वाटे नृपनाथा।... या प्रपंचाची कन्या नागरी। भुली नांवें अती सुंदरी। तेंचि करूं जी नोवरी। अती साजीरी मोहासी ॥ ४४ ॥ ... आणि मी सुनमुख देखेन। तीचे हाती घरोवा लावीन। तें भुलवील संपुर्ण। भल्या भल्या विरक्तां ॥४८॥”. नृपनाथाला हे आवडले. संकल्पविकल्प या प्रधानांना विचारिता त्यांनीही संमती दिली. मन राजा ‘ मग फोडिता जाहला भांडारें ॥ ५६ ॥ तिं वीशयभांडारे अगाध। शब्द स्पर्श रूप रस गंध। उचीत दिधले प्रसीत्ध। मनें सुबध जनासी ॥ ५७ ॥’. ‘ प्रपंचा ’ला शीघ्र पाचारिले, त्याची ‘भुली’ कन्याही सत्वर आणविली.

## ‘ ऐसें लग्न लागलें ’

‘ मग पाहुनियां मुहुर्त। भुलिसी प्रपंच हाती धरीत। अज्ञान उभा संतत। मोहो जेथें त्यापाठीं ॥ ६० ॥ भ्रमे अक्षता घेतलीया। दोघाचीये अजुंळि ( अंजुळी ) सुदलीया। वों पुण्य म्हणउनी घातलीया। अवीवेकें तया मस्तकीं ॥ ६१ ॥ प्रपंचाची स्त्री वीस्मृती। ते धार घालि यथानीगुती। आशात्रुष्णादि समस्तीं। वोवाळीती कुरवंडी ॥ ६२ ॥ अैसें लग्न लागलें। दीसे वोव्हारे चांगलें। मग बोहुलीयावरी बैसवीलें। तें वोहंवारे भलें हव्यासाचें ॥ ६३ ॥ अवक्रीयेचें काकण। अवनितीचे लोण। तयाचे पालवी संपुर्ण। बांधले जाण दुर्बुत्धी ॥ ६४ ॥ तया मोहा भुली सेशपाट। भरी प्रवृती मन सुभट। मग प्रपंच धरुनीयां नेटे। राजबीदी नीट मीरवीली ॥ ६५ ॥ लोकीकाची राजबीदी। मेळउनि भेदाचि मादी ( मांदी )। जालि ग्रहप्रवेशसित्धी। कुबुत्धीकुतर्कांचि ॥ ६६ ॥ ’

**‘ मोहा बैसवीती सींह्मासनी ’**

‘कुळ तेंची सींह्मासन। सीळ ते मृदु आसन। तेथें मोहोराजा आणुन। मुहुर्ते जाण बैसवीला ।। ७० ।। मान्यतेचा टीळकु लल्हाटीं। दुख उद्वेग कुंडलें गोमटी। ... प्रळाप देखा चंदन। सर्वांगासि केलें लेपन। वरी परिमळद्रव्य जाण। परिपुर्ण लोभाचें ।। ७२ ।। तयावरी कंठमाळा। अवीद्येचीया सुढाळा। तेणे तेजें ढळढळा। वीकासलें जगत्रय ।। ७३ ।। ह्रुदयावरि चींतापदक। शोभा दावी अलोलीक। वरि सुमनमाळा देख। अती चोख प्रमदाची ।। ७४ ।। लालुप्याची बाहुभुषण। लटीकेपणाची कांकणे। आपुला संशयो मने। मुद्रिका तेणें दिधली ।। ७५ ।। कटीसुत्र नेटापाटाचें। राया कंठी शोभे साचें। चरणी गर्जना वांकीचें। अती नींदेचे अशुची ।। ७६ ।। नींदा हाची तोडर। करि नींदेचा गजर। मी माझे-पणाचा सुंदर। मनोहर पादुका ।। ७७ ।। वीकाराची अंगि साजीरी। आवीचारचीरा त्यावरी। प्रपंच पांघुरवीला आपुले करी।... जातिवर्ण आश्रम। तेंची छेत्रेचामर उतम। मेघडंबरे अनुपम्ये। महत्त्वाचें रम्य शोभत ।। ७९ ।। रुढपणे तें कीर्तीमुख। शोभे रायासन्मुख। असंतोषाचे कुचे सुरेख। दोंहिं भागि देख शोभती ।। ८० ।। हिंसा शस्त्र शोभे करी। घातक सुरि कटावरि। चंचळ दर्पण भारी। भेद करी साजीरा ।। ८१ ।। तारुंण्य वय तें धन। जपतप नाना खाद्यपक्वान्न। त्रीवीध ताप दीपन। दीवटी सुलक्षण रायापासी ।। ८२ ।। कठीणत्व तें नेत्रधारी ( वेत्रधारी ? )। अपकिर्ती बंदीजन समोरी। पुढे अपसरा नाचती सुंदरी। अती अवीचारी कुकर्मांच्या ।। ८३ ।। दुंदभी आणी भेरी। रजतमाच्या वाजती गजरी। तो नाद त्रैलोक्यामाझारी। भरोनी भारी दाटला ।। ८४ ।। गुढीया तोरणें साजीरी। अपस्तुतीची घरोघरी। सडे रंगमाळा भारी। दारोदारी शोभती ।। ८५ ।।’. ‘ अहंकार ’ व ‘ अज्ञान ’ हे मोहाचे प्रधान झाले. ‘ भ्रम ’ व ‘ अवीवेक ’ हे ‘ सभेचे मंडळीक ’ बनले. निवृत्तीचे कोणी ‘ सोहदर ’ आल्यास त्यांना दंडावे असा आदेश प्रवृत्ती आपल्या पुत्रांना देऊन ठेवते. त्यासाठी

## ' देशदुर्गे तयासी दिदली '

' सकळ राज्य मोहा अधीन । प्रधानाचेनी अनुमते जाण । कामा अधीन केलें सीश्न । नेत्र स्छान क्रोधाचें ॥ ९४ ॥ जींव्हा समर्पीली लोभा । मद मानेवरी केला उभा । हृदयाचा गाभा । मछर स्वयंभा दीधला ॥ ९५ ॥ डंभा वोपीली त्वचा । प्रपंच बैसवीला जेथे वाचा । भ्रमा आणी अवीवेकाचा । राब त्याचा पैं तेथें ॥ ९६ ॥ ' आणि मन ? ' मग अपण समीप मने । स्वाधीन ठेवीली दाहा वदन । तयाची नावें सावधान । आईका श्रवणे श्रोते हो ॥ १०१ ॥ श्रोत्र त्वचा चक्षु जीव्हा घ्राण । वाचा पाणी पाद गुद सीश्न । ईतुकी समागमे घेऊन । घरटी अनुदीन घालीत ॥ १०२ ॥ ' ज्या वेळी ज्याची आवड त्याच्याच नादात मन गुंतून राहू लागले. केव्हा या वाहनांशिवायही क्षणात ते त्रिभुवन हिंडून येई. सारांश, मोहाचे राज्य चालू झाले आणि सर्वत्र प्रवृत्तीचीच सत्ता दिसू लागली. ( प्र. २ ).

## ' निवृती नीरंजनी आसतां । तेथें अपुर्व काये वर्तलें ? '

निरंजनी निवृत्ती प्रसूत झाली. ' प्रथम चौधी कन्या जालीया । भक्ति शांति क्षमा दया । जवळी सुबुधी असे धाया । बहिण राया मनाची ॥ २ ॥ तया उपरी सीघ्र । उपजले पांचहि पुत्र । भाव वैराग्य वीचार । वीवेक सुंदर । आणी नीजबोधु ॥ ३ ॥ ' मुले वाढू लागली. त्यांचे खेळ सुरू झाले आणि ते पाहून निवृत्तीला आनंद होई. त्यांना दृष्ट लागेल म्हणून ती विषय वोवाळून टाकी. प्रवृत्तीचे कोणी हेर मुलांना पाहतील म्हणून निवृत्तीचा भाऊ परमार्थ निरंतर त्यांच्यासमवेत राहू लागला. खेळत असताना एके दिवशी ' साधुकुमरें ' त्यांना हसून म्हणाली, " तुमची नीवृती जननी । भ्रतार ( रें ) तजुनी सांडीली ॥ २२ ॥ मन राजा तुमचा पीता । तयाची प्रवृतीवरीच वास्ता । राज्य दीधलें तीयेचे सुता । तुम्हा सर्वथा टाकीलें ॥ २३ ॥ ". हे ऐकून निवृत्तिनंदन ' चवंकले '. आईजवळ येऊन ते विचारू लागले, " तुं तंव पट्टाची भाज । कवण अन्याव ठेवीला तुज । प्रवृतीसी धरीलें गुज । तें सकळ बीज सांग माते ॥ २७ ॥ ". ' नीवृती गहिवरली नयने ' आणि म्हणाली, " अैका हित देखा सांगतें

॥ ३० ॥ प्रवृतीची गोष्टी न काढावी । मनाची वार्ता सांडावी । राज्याची आस न धरावी । तें कारण जीवीं अैका पां ॥ ३१ ॥ कवाणि प्रवृतीचें ऐकती । तरी आम्हातें दंडीती । आणी तुमचीया प्राणा घतती । हे नीश्चींतां जाणा पां ॥ ३२ ॥ ". मुलांनी विचारिले, " येवढा धाक कां धरीला मनी ? " माता म्हणाली,

### " मुळ अैका कथा । तया नृपनाथा मनाची

पहिलें निर्गुणापासुनी हें क्षत्र । निर्माण जाहले वीचीत्र । तेथे त्रीगुणाचा वीस्तार । वीस्तारला ॥ ३६ ॥ तेची सत्व रज तम जाणावें । वाढीनलें सावेव । तेथें नीपजली पंचेवीस तत्वें । शक्तीसमुदाये पंचभुती ॥ ३७ ॥ अक्षर होते तें क्षरलें । वीस्तारुनीयां जाहलें । पींड ब्रह्मांड भलें सावेव ॥ ३८ ॥ अव्यक्त तेंची अक्षर । व्यक्तीसी आलें म्हणउनि क्षर । या दोहिसी साचार । संग सार क्षेत्राचा ॥ ३९ ॥ येथें प्रपंच वीस्तारला अद्भुत । त्या वीस्तारा नाही गणीत । म्हणउनी क्षेत्र बोलीजेत । यालागि नेमस्त पुर अैसें ॥ ४० ॥ ...अैसें पंचभुतीक हें क्षत्र । तेथें मन नृपवर । राज्य चालवी सुंदर । अती चतुर चपळपणें ॥ ४२ ॥ ...ईंद्रीयाणां मनश्चास्मी ॥ अैसें ॥ अैसें गितेमाजी बोलीलें रुशीकेशे । म्हण उनि तत्वामाजी परीयेसें । अती वीशेश वरीष्ट ॥ ४५ ॥' प्रथम मीच त्याची पट्टराणी होते, पण ' अज्ञानाची कुंवरी ' प्रवृत्ती जशी त्याने वरली तसा तो तिच्या तंत्राने चालू लागला. मला बाहेर घातले त्याने आणि मग मी येथे आले, ' ते मी वहीले सगर्भे '. तिकडे प्रवृत्तीला सात पुत्र आणि सहा कन्या झाल्या. आता त्यांनी मोहास राज्यी स्थापिले आहे. प्रवृत्तीचे दूत येथेही हिंडत असतील तरी ' त्याची गोष्टी झणे काढा.' मुलांना हसू आले आणि ती म्हणाली, " ' त्याचे भय न दावी आम्हासी । राज्य घेउं सायासी.' तुझ्या वडिलांना–ज्ञानास–प्रधान करू. तरी ज्ञानास भक्ती व भाव यांच्यामार्फत मूळ पाठवावे. एवढी एक गोष्ट तू कर." ( प्र. ३ ).

### ' ज्ञान आलींयांवरी । बोध होईल राज्याधीकारी '

ज्ञानाकडे जायच्या वेळी भक्ती म्हणाली, " नवविधा प्रकारांनी ज्ञानाची पूजा करून मी त्याला घेऊन येईन." भक्ती व भाव निघाले. ' ती उभयवर्गें

सुरेखे । सोहंमेळें चालती हरीखें । भक्ती पुढे चवंके । माघे कवतुक भावार्थे ॥ ७ ॥.' ज्ञानाजवळ जाताच ' तंव भक्ति भाव वेगी । नमस्कारीती साष्टांगि । नववीध पुजा तयालागि । देती वेगी तें काळीं ॥ ९ ॥ वेदांतशास्त्र बहुत श्रवण । संतवचने सावधान अैकणे । तीची तया कर्ण-भुशणे । दोघेजण प्रीतीकरुन घालीती ॥ १० ॥ कीर्तन तें दक्षणा । अती उपमा नाही गणणा । ते समर्पीली जाणा । तेणें ज्ञान उल्हासें ॥ ११ ॥ स्मरणाची खाद्यभोजें । तयापुढे ठेवीली वोजें । तें ज्ञाने दृष्टी देखीजे । आनंद उपजे पाहतांची ॥ १२ ॥ पादशेवन पादुका । अती सीधीदायका । चरणी घातलीया सुरेखा । आदरें देखा तें काळीं ॥ १३ ॥ अर्चन बरवें चंदने । सर्वांगा केले लेपन । वंदन तें सुमन । चरणी जाण वाईलें ॥ १४ ॥ दास्य हें नाना उपचार । सख्य हें वस्त्र पीतांबर । पांघुरवीलें सपुर । तेणें सुख थोर तयासी ॥ १५ ॥ आत्मनिवेदन नैवेद्य । पुढे ठेवीला आगाध । तें देखताची शुध्द । ज्ञाना आनंद पै जाहला ॥ १६ ॥ प्रेमाचीया रत्नमाळा । घातली तयाचीया गळा । प्रीतीच्चिया तांबोला । मुखकमळा शोभीवंत ॥ १७॥ अैसी भक्ती पुजा करी भावें । ते तें स्छळी भाव दृढावें । तें देखोनी स्वभावें । ज्ञान मानवे तयासी ॥ १८ ॥ ' 'ज्ञानेश्वर' संतुष्ट झाला. "कवणा कार्या तुम्हातें । नीवृतीने पाठवीले येथें । ?" असा प्रश्न त्याने विचारिला. "सर्व सांगत बसलो तर वेळ लागेल. सर्व गोष्टी तेथेच आपल्यास समजतील." असे म्हणून भावभक्तींनी त्वरा चालविली. ज्ञानाच्या आगमनानंतर सर्वांनी त्याला नमस्कार केला. त्याने मग पृच्छा केली, "कवणा कार्या मज बोलावीलें । काय अवघड असे मांडलें ?" मागचा इतिहास व राज्य मिळविण्याची मुलांची इच्छा निवृत्तीने ज्ञानास निवेदिली. त्याला मुलांची इच्छा पसंत पडली. तो म्हणाला, "आतां भाग्य उदयो जाला । कांहि चांगला या क्षेत्राचा ॥ ४७ ॥ प्रवृती आणि प्रवृताच्या कुमारी ।

**या क्षेत्राची केली बोहरी ।**

जग गोवीले आपणाहारी । मन ही भारी व्यापीलें ॥ ४८ ॥ आणी हीं दश ईंद्रीयें । लावीली वीशयाची सोये । नेणती कार्याकार्य । अनेअन

तीहि केलें ॥ ४९ ॥ नीती तीहीं उलंघीली । सत्यक्रीया तेहीं बुडवीली । अवक्रीयेचि बहुत केली । तिही चाली क्षत्रामाजी ॥ ५० ॥ सुबुधी नाहि तयापासी । कुबुधी नांदे अहिर्णीसी । नीती दवडुनी अवनीतीसी । पाळीलें तीसी आहे पैं दृढ ॥ ५१ ॥ अैसी दुर्जने तें ठाईंची । " शेवटी निवृत्तीच्या पुत्रांना राज्य मिळावे म्हणून साहाय्य करण्याचे आश्वासन देऊन पूर्व-तयारीच्या दृष्टीने तो पुढील सूचना करतो,

## ' अैसी ज्ञानवचनें '

" तरी संतोशातें हाकारा । आणि ते नीतीते पाचारा । जीचेनी अवनितीचा थारा । मोडावा खरा नीर्धारें ॥ ५६ ॥ आनंदा द्यावा मान । हर्शे आसो द्यावा अनुदीन । चींता हे दवडुन । जवळुनि पैं घालावी ॥५७॥ संतवचन पाळावी । दुष्टाची बुधी नाईकावी । आणि संगती धरावी । दृढ बरवी साधुची ॥ ५८ ॥ पाळावी नीरापेक्षता । तजावी लालुप्यता । करुणा सर्वभुती आतां । सर्वथा पैं आसावी ॥ ५९ ॥ सदा संतुष्ट आसावें । असंतुष्टत्व दवडावे । सुखदुखि न व्हावें । व्याकुळ स्वभावें कदाचीत ॥ ६० ॥ ". निवृत्तीने हे मानले आणि आपली मुले ज्ञानाच्या हाती दिली. ते कुमरही ज्ञानाची पादारविंदे सेवून त्याच्या शब्दाप्रमाणे चालू लागले. पुनः निवृत्तीने विचारिले,

## " राज्य द्यावे कवणा पुत्रासी ? "

मग बहुतांसमवेत ' आलोच ' करून ज्ञान म्हणाला, " भाव तरी सकळाहुनि वडील । तो येकेचि स्थळी भाव गुंफेल । व्यापकपणे केवी वर्तेल । राज्य चालवील कैसेनी ॥ ६९ ॥ वैराग्य तरी नाहि हांव । वीरक्त तयाचा मनोभाव । तो केवी चालवील अपुर्व । हे राज्यराणिव क्षेत्राची ॥ ७० ॥ वीचाराची यकची परी । आहोरात्र वीचार करी । तो केवी सांवरी । राज्य भारी येथीचें ॥ ७१ ॥ वीवेका सांगावा वीवेके । तयासि हें राज्य न टके । तरी बोधासी राज्य कवतीकें । देतां नीकें मज वाटत ॥ ७२ ॥ तो धाकुटा तरी होय । परि व्यापकत्व तया बोलणे आहे । स्वानुभवसुखाचि सोये । तोचि पाहे जाणतु ॥ ७३ ॥ " ( प्र. ४ ).

ज्ञान सर्वांना पुनः म्हणाला,

**" ' निजबोध नेटका । त्याचे गुण**

देखा वर्णीन ॥ १ ॥ ' गुणवंत, अति शान्त, रंक व समर्थ यांना सारखेच मानणारा, साजऱ्या स्वरूपाचा, सर्व लक्षणांनी परिपूर्ण, आजानुबाहू, हास्यवदन, दृढ आसनी, ' उन्मीळित ' नयनांचा, योगयुक्त, राजलक्षणी, आपपर न मानणारा, विरक्त, ऐक्यभावाने ओतलेला अद्वैताचा पुतळा, साधुजनांचा विसावा, चारी देहांचा जाणता, चारी अवस्था भोगून अभोक्ता, चारी पुरुषार्थांची खूण जाणणारा, चारीही मुक्ती भोगणारा, ' तत्त्वमसि ' महावाक्याचा अर्थ जाणणारा, निरंतर स्वरूपाचे अनुसंधान राखणारा, नाना विकारांत न गुंतणारा, ' कर्माकर्म वीचार । ते जया ब्रह्म साचार । विकाराचा अंकुर । मनी साचार न देखें पैं ॥ ११ ॥ कर्म ब्रह्माची प्रतिती । ऐसि जयाची निश्चळ मती । बोधलेंपणे चीतवृती । डंडळ ना चितीं सुचीत ॥ १२ ॥ जन हेंची जनार्दन । ऐसे जयाचें अखंड ध्यान । तयापासी अनुमान । अनुदीन असेना ॥ १३ ॥ पुर्यांष्टकाचा जाणता । साहि वीकाराचा ज्ञाता । परी कवणेवीसी अहंता । न धरी सर्वथा मानसी ॥ १४ ॥ '...ज्याची नित्य चौथी अवस्था असा तो आहे. ' ऐसा तो निज-बोधु । बोधलेपणे सुबोधु । आनंदरूप स्वानंदु । आनंदकंदु सुखाचा ॥ २१ ॥ सकळ भोगुनि अभोक्ता । सर्वही करूनी अकर्ता । वीस्व देखे देखता । तद्‌पता आत्मत्वें ॥ २२ ॥ वीश्वीं वीश्वात्मा पुर्ण । हें अनुभवें जाणे खुण । ऐसी स्थीती संपुर्ण । जाणे खुण तयाची ॥ २३ ॥... ऐसा सलक्षणिक साजीरा । तेजोन्मय ज्ञानाचा हीरा । तयावेगळा सोयरा । आणिक दुसरा न दीसें ॥ २५ ॥ ' " निवृत्तीला ही योजना मान्य झाली. पण याच वेळी परमार्थाने सुचविले की बोध जोपर्यंत ' सापत्नीक ' नाही तोपर्यंत राज्याला योग्य नव्हे, तरी त्याचा आधी विवाह करावा. ' नोवरी 'चा विचार करू लागले, तेव्हा निवृत्ती आणि विवेकादी म्हणाले,

**" ' नोवरी आहे जी सुरेख '**

तशीच सगुण आणि सुलक्षणी. ती योग्यांची विश्रान्ती आहे. ' अवोलणेपणे शाहणि । आखंड डुलत आसनी । वीरक्ताची स्वामीणी । बोधा लाहाणी अती

पाडें ॥३४॥ ' ती ' आनंद ' व ' विश्रांति ' यांची सर्वांत धाकटी कन्या. ' जाग्रुती, स्वप्न, शुषुप्ती आणि तुर्या ' या चौघींहून ती धाकटी. ' जोतीष्र वर्तीलें ब्रम्ह्यानी । तीयेचें नांव नीघालें उन्मनी. ' बापाने तेच नाव ठेवले. संतजनांनाही नाव आवडले." मग आनंदाला पाचारण्यात आले. त्याला हा संबंध आवडला.

**' ऐसी संपादीली लग्नसित्धी '**

" मग लग्न पाहुनी त्वरीते । आनंदे आरंभीलें उचीत । बोधाकारणें वीधीयुक्त । कन्यादान त्वरीत माडीलें ( मां ? ) ॥ ४३ ॥ मधुपर्के पुजा वोजें । आनंदे केली सहजे । शोडश उपचार पुजीजे । स्वानंद सहजे स्वभात्रें ॥ ४४ ॥ मग तो आनंदा त्वरीत । उन्मनीसि हाती धरीत । ज्ञान उभे संतत । बोध जेथें त्या पाटी ॥ ४५ ॥ भक्ती भावें अंत्रपाट धरीला । ते देखोनी परमार्थ मानवला । तवं धीर बोलिला । सावधान भला म्हणउनी ॥ ४६ ॥ वैराग्यें अक्षता घेतलीया । संतोशे माथा घातलिया । ॐ पुण्य म्हणउनीयां । घडवटे घडि राहीली ॥ ४७ ॥ वीश्रांती आनंदाची राणी । ते धार घाली तये क्षणी । धृती स्छीती सोवासिणी । समवंत्या येउनी उभ्या असे ॥ ४८ ॥ तेथें नाना ध्वनीचीया वाजंत्रे । ध्यानाचीया युक्तो साजीरें । अैके त्याचें मन मुरे । ध्यानभरें ब्रह्मांडी ॥ ४९ ॥ ॐ पुण्याचेनी भारी । वीवेक अंत्रपाट काढी झडकरी । मग सहजाचीये बोवल्यावरी । तीं वोहारें भारी बैसती ॥ ५० ॥ संशयाचा ग्रकार । निर्धारे केला आपार । तेणें नीवृत्ती सुंदर । देखोनी थोर उल्हासें ॥ ५१ ॥ अभीमानाचे लोण । सांडीलें पै वोवाळुन । तंत्र आचार्यें लज्याहोमहावन । संगादुने सांडीलें ॥ ५२ ॥ कंकणें बांधीली करीं । स्वानुभवाची साजीरी । पदरी गांठी पडली येकसरीं । अहीक्याची भारी वधुवरा ॥ ५३ ॥ धृती स्छिती सोवासीणि । आणी ते नीवृत्ती जननी । शेष भरीती येउनी । थोर मनी संभ्रमे ॥ ५४ ॥ चौघी वाचा तये क्षणि । परतोनी गेलीया कुरवंडी करुनी । स्वप्न जाग्रुती मेहुणी । त्या लाजुनी राहील्या ॥ ५५ ॥ तुर्या चौथी जगवीख्याती.। उन्मनीची सखी आवडती । साक्षत्वें त्या दोघाप्रती । उभी जागत पाहातसे ॥५६॥ तुर्येचेनी संगातें ।

तें वोंहारे शोभतें । आणि देखोनी त्या वोव्हरातें । तुर्या यथार्थ उल्हासे ॥ ५७ ॥ तेथें वीधीनिशेध दोन्हि । ते नातळति असोनी । दुजेपणे नीघोनी । गेलें परतें तें काळी ॥५८॥ च्यान्ही मुक्ती च्यारी दीवस । चतुर्थी संपादीली सावकास । सत्वगुणाचे साडे सुरस । जाहले व( ब ? )हुवस संतोश ॥५९ ॥ अैसी संपादीली लग्नसिध्धी । त्रीकांडवीहित आचार्यवीधी । वेदांताचा नीजबोदी । वोहारें बुधी मीरवली ॥ ६० ॥ सांख्याचा ग्रह-प्रवेश । तया जाहला सावकाश । द्वैतमादीया ( मां ? ) होत्या बहुवस । त्या समरस जाहालीयां ॥ ६१ ॥ भेदाचा भास तुटला । अैक्यें जोडा येक जाहला । समाधीस्त राहीला । हे जाणती कळा अनुभवीये ॥६२॥ मग संतोशे ते क्षणी । धेंडा नाचवीला सम आंगाणि । संतवऱ्हाडि वोवाळणि । वीधीनीशेध दोन्ही घालीती ॥६३॥ ” बोध व उन्मनी यांच्या प्रीतीला उपमाच नाही. आता बोधाला राज्याभिषेक करावयाचे ठरते. ( या राज्या-भिषेक वर्णनातही कवीने आध्यामिक रूपकांचा थाट चांगलाच उठविला आहे. ७६–९६ ). लौकरच ‘ राजी स्थापीला बोधराजेंद्र.’ निवृत्तीच्या विनंतीप्रमाणे ज्ञानाने प्रधानपदाचा स्वीकार केला. बोधाचे रक्षक म्हणून ‘ भाव, वैराग्य, वीचार, वीवेक ’ यांची आणि सभेचे नाईक म्हणून ‘ धीर, परमार्थादीक, आनंद ’ यांची ज्ञानाने योजना केली. त्यांना निरनिराळी ‘ देसदुर्गे ’ वाटून दिली आणि हे सर्व पाहून निवृत्ती आनंदली. ( प्र. ५ ).

## ‘ मोहासमीप आतां । दुत सांगतील वार्ता ’

गुप्तपणे विचरत असलेल्या धूर्त दूतांनी निवृत्तीकडील सर्व वृत्त मोह-राजाला कळविले. बोधाच्या अधिकाऱ्यांची नावे सांगितल्यावर दूत म्हणाले, “ सदासमभारे सन्नध । आहोरात्र आसती सावध । तयासि कवण करी द्वंद । तें आगाध नागवती ॥ १६ ॥ तया घरी भक्तिची सता । तेथें वीवेक आहे जाणता । वीचाराची सबळता । भाव दृढता वैराग्यसी ॥ १७ ॥ तेथें धीर तो बळकट । कवणा नाकळे आदट । तयावरी ज्ञान सुभट । पाहाता मुगुट सर्वांचा ॥१८॥ तेथें आनंद वावरे । हर्शे संतोशहिं वीच्चरे । तेणे निवृत्तीसी बळे पुरें । अति नीर्धारे जालें असे ॥ १९ ॥...अैसे सबळ जाले निवृतीसुत । तुम्ही आझुणि कां सुचीत । ”. हे ऐकून

**‘ दुर्स्चीत जाहला मोहो रावो ’**

आणि म्हणाला, “वैरी प्रबल झाले. आता काय उपाय करावा ते सांगा.” यावर ‘ अहंकार ’, ‘ अज्ञान ’, ‘ काम ’, ‘ क्रोध ’, ‘ लोभ ’, ‘ मद ’, ‘ द्वेश ’, ‘ भ्रम ’, इत्यादी ‘ आपुलाला पुरुशार्थ । रायापासी बोलीले समस्त ’. आपल्या सहा कन्यांना हाताशी धरून प्रवृत्ती बोलली, “ माझी नेणसी रे माया । हे जग आचरे माझी क्रीया । येव्हडे माझे सामर्थ्य सावया । मीं रंका राया गोवीतें ॥ ४९ ॥ शास्त्रें माझीये सोई चालती । पुराणेंहिं माझे गुण गाती । मीमुळें असे नीश्चीती । आदी अंती चराचरी ॥ ५० ॥ मुख्य ब्रह्म अैसें अैकीलें । तेहिं म्या पुरुषत्वा आणीलें । आवतार नाना जालें । तें गुंपलें माझेनी ॥ ५१ ॥...” तिच्या कन्यांनीही आपापले बळ राजाला सांगितले. मोहाला आनंद झाला आणि मग त्यानेही आपला पुरुषार्थ प्रधानांना सांगितला,

**‘ मज मोहाचि महिमा अैसी ’**

“ मी मोह करीता राणीव । मोहे गोवीलें ब्रह्मादीक देव ।...मुख्ये वीष्णुच वेडा लवीला । भक्ताचेनि मोहें गुंफला । कांहि सांग पा या बोला । अन्यथा वहिला असेना ॥ ६६ ॥ भक्ताचेनि मोहे गुंपत । येकाचे द्वारी तीष्टत ॥ येकाची सेवा करीत । लाज बहुत सांडुनी ॥ ६७ ॥ येकाच्या गाई राखे आवडी । येकाची धुतसे घोडी । नाना आपदि काढी । लव्रडसवडी येकासि ॥ ६८ ॥ तो तवं पाहता नीर्गुण । भक्ताकारणे जाला सगुण । येवढें माझें वींदाण । जाणति जाण सज्ञान पैं ॥ ६९ ॥ ब्रंम्हादी पुरंदर । मोहें करिती आपुलाला व्यापार । तेहिं मोहे मोहीलें थोर । कीती सांगो आपार हे जाणसी सर्वज्ञा ॥७०॥ कींन्नर गण गंधर्व । यक्ष राक्षेस मानवे । ते म्या गोवीलें सर्व । ते लाघव काय सांगो ॥७१॥ येरां जनाचा काय लेखा । तें तवं माझेचि अंकीत देखा । स्थावरजंगमादीका । म्यां गोउनि देखा पाडीलें ॥ ७२ ॥ वडील आमचा पिता मन । तोची जाला मज आधीन । तेथें नीवृत्तीचे नंदने । कायसी दीन बापुडी ॥ ७३ ॥...” यानंतर सर्व वीरांना सावध राहण्याचा आदेश मोह देतो भांडारे फोडून सर्व वीरांना द्रव्य वाटण्याबद्दल प्रधानाला आज्ञा करतो. ( प्र. ६ )

**‘ नीवृतींहेरे...समस्त देखीलें ’**

प्रवृत्तीकडील वरील सर्व वृत्तान्त निवृत्तीच्या विचक्षण हेरांनी तावडतोब ज्ञानादिकांना सांगितला. हे ऐकून निवृत्ती दुश्चित्त झाली आणि ‘ तरी यासी वीचार कैसा । करावा जी ज्ञानेशा ? ’ म्हणून तिने ज्ञानाला विचारले. ज्ञान, भाव, वैराग्य, विचार, विवेक, परमार्थ, धीर, आनंद, भक्ती, शान्ती इत्यादिकांची वचने ऐकून निवृत्ती संतोषली आणि सर्वांना द्रव्य वाटण्याची तिने आज्ञा केली. या वेळी विचाराने सुचविले, “ धर्मशास्त्राचा बोल लागू नये म्हणून ‘ सिष्टाई आधी पाठवणे.’ ” शिष्टाईसाठी कोणास पाठवावे याचा विचार सुरू झाला. आनंद नित्य आनंदभरित, परमार्थ भोळा, भाव भावार्थी, ‘ वैराग्यासी बोलणें नावडे ’, ‘ वीचार वीवंचनेच्या ठाई अहोरात्र तटस्त ’, संतोष आणि हर्ष हे राजस राजयोगी म्हणून यांपैकी कोणालाही हे काम जमणार नाही; म्हणून मग विवेकास या कामी नियुक्त करण्याची ‘ ज्ञानेश्वरा ’ची योजना सर्वांना मानवली. निवृत्ती विवेकाला म्हणाली, “ तुवां शीष्टाईस लागेल जाणें । हें कार्य वेगि करणे । शाहणपणें अवश्य ॥ ७७ ॥ काय म्हणातिल तें ऐकावें । कळेल तैसें उतर द्यावें । राज्य आपुलें मागावें । सौम्य भावें करूनी ॥ ७८ ॥ कींवा युध्येवीण नेंदीत । ऐसें तऱ्हीं करावे नीश्चींत । दोहिमाजी येक नेमस्त । यावें त्वरीत साधुनी ॥ ७९ ॥ ” त्याला विडा देऊन आज्ञा दिली. ( प्र ७ )

**‘ आतां सीष्टाईसी जाईल वीवेक । तेची ऐका कथाकौतुक ’**

मग विवेक ‘ झडकरून ’ निघाला. आपला ‘ सापत्निक ’ बंधू आला म्हणून मोहाने त्याला ‘ बैसावया ठावो केला ’ व ‘ कवणीकडे बीजें केलें ? ’ असा प्रश्न विचारला. मनात मात्र शत्रू आला म्हणून तो दुखवला होता. विवेक म्हणाला, “ निवृत्तिमाता व ज्ञान यांच्या आदेशाप्रमाणे मी आलो आहे. आम्ही व तुम्ही ‘ सापत्नीक बंधु ’, तेव्हा ‘ राज्याकारणे द्वंदु मिथ्या ’ होय. वडील स्त्रीच्या पुत्रास राज्य मिळणे हे नीतिशास्त्राला धरून आहे. ‘ वडील भाज पटाची । नीवृती माता आमुची । प्रवृति तरी सापेची ’ तेव्हा ‘ तुम्हा राज्य आम्हा वनांतरे ’ हे बरे नाही. ‘ तरी आतां बरवें जालें । जें ईतुकें दिवस राज्य तुम्हीं केलें । तें आम्हासीच पावलें । यासि

नाहि अन्यथा वहिलें सर्वथा ॥ ११ ॥ ' तथापि तुम्ही आता एक करावें की हे राज्य बोधास द्यावे आणि ' तुम्ही प्रवृतिसहित स्वभावें । लीन असावें सर्वा ठाईं '. कामक्रोधादी जे तुमचे ' सोहदर ' त्यांनाही एक नगर आम्ही देऊ. त्यांनी ज्ञानाच्या आज्ञेत पण तेथेच स्थिर असावे. तुमच्या मनात जे असेल ते मला सांगा." हे ऐकून साहजिकच मोह रागावला आणि त्या भरातच तो बोलला, " याचा लेखा नाही मज। पाहो नेंदी हे राज्य। अैसी माझी पैज। तुम्हा सहज ठाउकी ॥ ३३ ॥ " अहंकार आणि अज्ञान हेही रागाने बोलले. प्रधानांचा विचार ऐकून मोह राजा संतोषून म्हणाला, " घाला घाला बाहेर। हा वीवेक क्रुर येथुनीयां." हे ऐकूनही सामोपचाराची आशा न सोडता पण धाक दाखविण्याच्या इच्छेने बोध पुनरपि बोलू लागला, " मोहा तु बंधु आमचा। म्हणउनि आलो सा वा सिष्टाई ॥ ४४ ॥ तरी आमचीया मानसी। वीरोध नसावा परीयेसी। म्हणउनी तुम्हासी। साम्योपचारेसी मागो आलो ॥४५॥ पर मीं हीत सांगता। कोप आला तुम्हा समस्ता। युध्द करणें हें वास्ता। वसे चीता तुमचीया ॥ ४६ ॥ दुष्ट तुझे प्रधान। अहंकार आणी अज्ञान। याचें उतर तुं अैकोन। कां बंधन पावसी ॥ ४७ ॥ अज्ञान तवं नेणें काहीं। अहंकारासी वीचार नाही। सदा गर्वीष्ट आपुले ठाईं। अहंमती पाहीं करुनीयां ॥ ४८ ॥ तुझे बंधु कामक्रोधादीक। तें तवं ठाईचेच मुर्ख। नेणती वीचार वीवेक। दुर्जन देख दुराचारी ॥ ४९ ॥ हा मंडळीक भ्रममामा। याने भ्रांती घातली आहे तुम्हा। त्याचेनि मतें तुमची महीमा। धड आम्हा दीसेना ॥ ५० ॥ आणी हे प्रवृतिमाता क्रुर। ते नीवृतिसी करी सवतिमछर। मनही राजा साचार। तीणें वेडा थोर लावीला ॥ ५१ ॥ नगरामाजी आपुली सता। वाढवी त्वरीता तिही लोकीं ॥ ५२ ॥ आशातृष्णादि तुमच्या बहीणी। त्या तवं कर्कशा पापीणी। या जनातें स्छानस्थानी। वेडा गोउनी लावीलें ॥ ५३ ॥ तुम्हा सकळाचे मानसी। कुबुधी नावें परीयेसी। आपलें स्वहित कवणासी। नेदा सायासी वावरो ॥ ५४ ॥ समस्ताचेनी मतें। काहिं बरवें न दीसे तुम्हातें। जें होणार हो तें। यासि वीपरीत कवण ॥ ५५ ॥ जे जे होणार जे जे क्षणी। त्यासि वीपरीत करील कोण्ही। बुध्दी कर्मानुसारणी। वीधाता लेखणि न चुकें ॥ ५६ ॥... आझुणी तरी अैका हित

येक । नका धरूं युध्याचें कौतुक । तुमचें वाटीवेचे बीक । नुरे देख संत्रदळी ॥ ६० ॥ ' वैराग्यविचारांचे बाण आणि ज्ञानाचे दारुण ज्ञानखड्ग पाहून तुमचा पराक्रम नाहीसा होईल. आनंदपरमार्थाच्या पुढे तुमचा पुरुषार्थ भंगेल. ' मग अैकाल माझी वचने । सुखे राहाटाल सेवकपणे । तरी आतां सांगतो सौजन्य । ते दुर्जन हो नाईका ॥ ६२ ॥ ". " यासी द्यारे दवडुन " असे मोह दुखवल्या गेलेल्या मनाने म्हणाला. बोध परतला आणि त्याने सर्वांना निर्णय कळविला की, " युध्यावीण आतां । राज्य न ये आमचीया हातां '. ज्ञानाला आनंद झाला. ताबडतोब युद्धाची तयारी सुरू झाली. परमार्थास दळाधिपती करण्यात आले. ' मग भाटा नीरोप दीधला । हाकारा केला मोहातें '. बंदीजन बोधादिकांचे पवाडे पढू लागले. ते ऐकून मोहादी खवळले आणि त्यांनीही आपल्या ' भाटा दिधली पेटवणी '. त्यांचेही वीर युद्धोन्मुख झाले. प्रपंचास दळाधिपती करण्यात आले ( प्र. ८ ).

**' येथुनि युध्याचा अवसरु '**

दोन्ही सैन्ये सिद्ध झाली. आपल्या सैन्याला नाभिकार देत रणरंगधीर वैराग्यवीर पुढे झाला. त्याच्यावर मोठ्या अभिमानाने काम 'लोटला'. 'यावा कैसा तयाचा । कुचा भवंडीला संताचा (वसंताचा ?) । रुणझुण शब्दे भ्रमाचा । कोल्हाळ गाजे ॥ ६ ॥ मंद सुगंध सुसीतळ । तेधे झळके मळयानीळ । तीं छत्रें चामरें सकळ । आभरणादीक ॥ ७ ॥ प्रेम यौवनदशा । नयनकटाक्ष-वळसा । तीच शस्त्रें परीयेसा । झळके दावीती ॥ ८ ॥ तेथें रुपाच्या वयसा अनेक । काय सांगो भार अलोलीक । ते सैन्य पाहतां वैराग्यादीक । चंचकलें पैं मानसी ॥ ९ ॥ ' अशा रीतीने काम रणांगणावर आला. आपले महिमान सांगताना तो म्हणाला, " मी अनेकांना जिंकले आहे. ब्रह्मादिकांना माझा धाक वाटतो. चंद्राला कलंक मी लावला. भगेन्द्राची काय अवस्था झाली त्याचा थोडा विचार करा. ' उर्वेवंसी ' ( ? वास्तविक मेनका हवे ) पाहून विश्वामित्र भुलला ती करणी माझीच. ' नारद रळी करूं गेला । स्नान करीतां स्त्री जाहला । साटी पुत्र प्रसवला । तें वीदांग ( विंदाण ? ) माझेची ॥ १७ ॥' पाराशर मुनी ' मछोदरी 'ला पाहून किंवा शंकर ' भीली 'ला पाहून भुलला तोही प्रताप माझाच. ' कृष्ण

अवतार संपुर्ण । त्यास लागलें राधेचें ध्यान । ते महीमान माझेचो '..."
वैराग्याला हे ऐकून हसू आले आणि तो म्हणाला, ' आपले महिमान वानितोस पण अपमान का सांगत नाहीस ? मी सांगतो ऐक. ब्रम्हसुत सनत्कुमाराचा तू शरणांगत तर वायुसुत हनुमंताने तुला तोडरी घातले. भीष्मदेवाचा तू ' आंकणा ' तर पूर्वी एकदा शंकराने तुला भस्मसात केले होते. शुकदेव, कार्तिक स्वामी, गजानन यांना तर तुझी पर्वाच नाही. नारदालाही तू आवडत नाहीस हे जगाला ठाऊक आहे. संत, महंत, विरक्त, योगेश्वर, ' ईंद्रजीत ' यांना ' तुझी नावडे मात.' अशी सर्वांनी तुझी निंदा करून तुझा त्याग केला असताही निलाजरेपणाने कशाला बडबडतोस ? ' तोची तुं रें न लजसी । वांयां वांटीव बोलसी । स्त्रीयामाजी मिरवीसी । पुरुशार्थ आपुलें ॥ ३० ॥ '..." क्रोधवश होऊन कामाने अती तिखट व दारुण असे पाच बाण वैराग्यावर सोडले. ' तेणें वैराग्य आली घिरीघीरी'. त्याला ' मुर्छांगत ' पाहून विचाराने हात दिला व सावध केला. मग धीर व विचार यांच्या साहाय्याने बळ चढलेल्या वैराग्याने विरक्तिनामक शक्ती सोडून कामाचे वर्मांग भेदले आणि ' केसी धरूनी बांधला '. क्रोध रक्तांबर डोळे करून वैराग्यावर धावणार तोच विचार त्याला आडवा आला. क्रोधानेही आपला माहिमा अनेक उदाहरणे देऊन सांगितला. त्याच्या अपमानाचे प्रसंग सांगून विचाराने त्याचा उपहास केला. मग क्रोधाने ' क्रुर तमीष्ठु दोनी बाण ' विचारावर सोडले. विचाराला ' घीरीघीरी ' येऊन ' नावेक गेला चाचरी'. या वेळी धावत येऊन शान्तीने त्याला सावध केला. आता विचाराने विवंचनानामक शक्ती क्रोधावर सोडली त्यामुळे क्रोध ' मृछीतु जाहला '. विचाराने त्यालाही बांधले. मोहाच्या दळी ' हाहाकारु ' झाला. ( प्र. ९ ) आणि मग—

## ' उठाव केला महावीरीं '

' भ्रम, डंभ, मछर, मद ' परदळावर चालून गेले. त्यांना विवेकाने ' आडवारा ' केला. विवेकावर भ्रमाने ' भ्रांती ' शक्ती, डंभाने ' गर्वाचे बाण ', ' मछराने ' ' कर्कश शस्त्र ' आणि मदाने ' उन्मताचा तोमर ' या शस्त्रांचा मारा केला. विवेकाने त्यांचे अनुक्रमे ' सावध खर्गे ',

' अगर्वचक्रकरुनी ', ' लीहीनत दंडें ' व ' सावध खर्गकरुनी ' निवारण केले. मग मुक्तीचे खड्ग घेऊन विवेकाने ' भ्रम हाणोन पाडीला ठाई ठाई । डंभाची फोडीली डोई । मछर हृदई भेदला ॥ १४ ॥ मदे हाणीतला मानेवरी । '. अशा रीतीने चौघेही रणी आल्याचे पाहून मोह दुःखित झाला. प्रपंच त्याला आश्वासन देऊन सिंहनाद करीत रणांगणावर आला. त्याच्यावर परमार्थ चालून गेला. एकमेकांची वर्मे ते बोलू लागले. खवळलेल्या प्रपंचाने ' भेद वीशाद ' हे दोन दारुण बाण परमार्थावर सोडले. ते अंगी लागल्याने परमार्थ ' दुश्चीत ' झाला. क्षमा व दया त्याच्या साहाय्यास धावल्या. मग ' अभेद मुद्गल ' हाती घेऊन प्रपंचाच्या मस्तकावर परमार्थाने घाव घातला. मूर्छा येऊन पडत असताच परमार्थाने त्याला बांधून टाकले व बोधरायाजवळ आणले. आता मोहाची आज्ञा घेऊन अहंकार व अज्ञान पुढे झाले. त्यांच्यावर ' ज्ञान ' चालून गेला. ( प्र. १० )

ज्ञानापुढे अहंकार स्वतःची व अज्ञानाची महती सांगतो. इतकेच नव्हे तर " पाहें पां आत्मतत्व नीर्गुण । पर म्यां बांधला त्रीगुणें करून । ऐसें बोलीले असें जाण । गीतेमाजी गोवींदे ॥ ११ ॥ " असा भगवदुक्तीचा आधारही देतो. " आपला ' फुगारा ' कशाला वानितोस ? " असा प्रश्न विचारून ज्ञानही अनेक पौराणिक संदर्भ देऊन स्वतःचे महत्त्व वर्णितो. अहंकाराने मग रागावून ' अहंता शस्त्र ' सोडले. त्यावर ' सहज उदास दोनी बाण ' ज्ञानाने सोडले. त्यामुळे ' अहंकार उलंडला भुमंडळीं.' त्याला ज्ञानाने बंदी केले. मग अज्ञानाने ' हींसा शस्त्र ' सोडले. त्याचे ' अहींस खर्गे ' निवारण करून ज्ञानाने अज्ञानाच्या उरावर घाव मारला. अज्ञानालाही मूर्छा आली. अशा रीतीने ' अहंकार बंदी घातला । अज्ञान नगराबाहेरी दवडीला.' हे सर्व पाहून निवृत्ती संतोषली. मग ' लोभ द्वेश ' सरसावले. ' भाव आणि धीर ' यांनी त्यांना पाचारिले. लोभाच्या ' लालुप्य शस्त्रा 'ने भाव ' घुर्मीने दाटला.' भक्तीने हात देऊन त्याला सावचित केला. मग ' निर्धार भाल्या 'ने लोभावर घाव केला व त्याला मूर्छित पाडले. याच वेळी ' द्वेश ' व ' धीर ' यांची ' मिळणी ' झाली. द्वेषाने कर्कश शस्त्र सोडले तर धीराने धारणा शक्ती सोडून त्याला मूर्छित पाडले. इतकेच नव्हे तर द्वेष ' मुकला प्राणा '. मग मोह स्वतःच चालून गेला. ( प्र. ११ ).

**‘ जैत बोधासीं आलें ’**

ते पाहून स्वतः ‘ बोध ’ उठला. ‘ दोघा जाहली भेटी। तवं मोहो बोधासी करी गोष्टी ’– “ लोक अहर्निश मला आठवतात. तुझी आठवण क्वचित एखादा ‘ तडी तापसी भीकारी ’ करतो. खरे म्हणजे ‘ जगासी जो प्रीय राणा। तोची भुमंडळीचा राणा। प्रीतीवीण कल्पना। कां करणें राज्याची ॥ ८ ॥ ’... तसे पाहिले तर ‘ जो तुझी संगती धरी। तो सदाचा भीकारी। या लोकीकामाझारी। त्यासी न मानीती ॥ १३ ॥ ’ पण माझे महिमान पहा,– माझ्यापुढे ज्ञान, ध्यान, साधन, आचार, विचार, वैराग्य, विवेक, परमार्थ, आनंद, बोध, निवृत्ती, भक्ती, क्षमा, दया इत्यादी कोणाचेच चालत नाही. ‘ मी जगाचें मुळ। मी या यमाचें माहाबळ। वीशयाचे कोल्हाळ। माझेनी जे ॥ २६ ॥ ’... ‘ मी आणी माझें। हें तुम्हापासी नाही सहज। तरी कैचे चालेल वोजे। राज्य या क्षेत्राचें ॥ ३५ ॥ ’ तेव्हा तुम्ही राज्याची इच्छा न धरावी हे बरे. ‘ तुम्ही वसावें येकांती। धरावी अतीताची संगती। जपमाळा घेउनीयां हाती। आजपाजप करावें ॥ ४८ ॥ दृढ आसन घालावें। प्रणवपीठीं राहावें। प्राणायाम करावें। सोहंमेळेसी ॥ ४९ ॥ तुम्हां लज्याची नाही। अभीमान नसे तुमचा ठाईं। कुळाचार सर्वहीं। वर्जुनीयां घातला ॥ ५० ॥ ऐसे तुम्ही नीर्गुण। तुम्हां राजा म्हणेल कोण। यालागि सांडा ध्यान। राज्य करावयाचें ॥ ५१ ॥ ’... ” बोधरायाने त्याची स्तुती अव्हेरिली. बोध सहर्ष डोलत होता पण बोलला नाही. मोहाने ‘ मोन ’ ( मोहन ? ) शस्त्र जपून मोहकपणे बोधावर सोडले. बोध त्या शस्त्राकडे पाहात असताच त्याची ‘ वाताहत ’ होऊन ते ‘ जेथीचें तेथें वीरालें ’. आपले काही चालणार नाही याची मोहाला कल्पना आली. मग त्याला वाटले, ‘ आतां एक असे कारण। या बोधासीच रीघीजे शरण। तेणें चुकेल जन्म-मरण। यरवी घड न दीसे ॥ ६१ ॥ ’. अशा रीतीने मोह बोधास शरण आला. आणि ‘ जैत बोधासी आलें। आपुलें राज्य आपणा जाहलें। नगरी धेंडे पीटीलें। स्वराज्य म्हणउनी ॥ ६६ ॥ ’ सर्वांना आनंद झाला. विवेक ज्ञानाला म्हणाला, “ प्रवृत्तिसुत ‘ हें सापत्नीक बंधु आमुचें। याचा

वधु करु नये साचें । ईहीं वचन प्रतीपाळावें तुमचें । आज्ञाप्रमाण वर्तावें ॥ ७२ ॥" ज्ञानाने ते मानले, पण त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी विचाराची योजना केली. प्रवृत्ती निवृत्तीची दासी झाली आणि प्रवृत्तीच्या राक्षसी कन्या 'बंदी घातल्या'.

## 'आता मना तुम्ही येक करावें'

नंतर 'ज्ञानेश्वराने' मनाला उपदेश केला "...येथून आता निवृत्तीची सत्ता सुरू झाली... आता तुम्ही बोधाजवळ 'दृढ येकाग्र बैसावें'. इंद्रियांच्या अधीन न व्हावे. संकल्पविकल्पांना दंडावे. प्रवृत्ती-समीप न बसावे. मोहात गुंतू नये. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर यांचा संग न धरावा. 'आशा त्रुष्णादी ईछा । यांची न धरावी वांछा । आणी नाना वीशयावीशी कांक्षा । ते असो नेदावी ॥ ८६ ॥'... पट्टाची भाज निवृत्ती तिच्याशी 'गुज असावे', त्यामुळे 'अैक्यापरत्रीचें भोज वाढेल'. भाव निरंतर हृदयी धरावा. वैराग्य समागमे हिंडवावा. विवेक समीप बसवावा. 'कार्याकार्य ठाईं । वीचार असावा तीये समईं ।'. परमार्थास जिवावेगळा करू नये. आनंदास केव्हाही विसरू नये. हर्ष कंठी धरावा. धीर सोडू नये. 'भक्ती शांति क्षमा दया । ह्या आवडतीया कुवंरीया । यासी प्रेम करूनीयां । माहेर करावें ॥ ९५ ॥ ध्रुति स्छीती साजणी । आणी तें वीश्रांती आनंदाची राणी । तीयेसी मंदीरा आणुनी । गौरवावें आदरें ॥ ९६ ॥ तुर्या हें चौथी । उन्मनीची बहीण आवडती । तिसही अती प्रीती । जवळीकें ठेवावें ॥ ९७ ॥ या सकळाचा असो द्या समागम । ...सुख आलीयां न सुखावें । दुखप्राप्ती जाहलीयां न दुखावें । आनंद-युक्त असावें । सदा काळीं ॥ १०० ॥ ...जे जें वेळे जे नीर्मीत । ते अपसयाची येईल टाकीत । अैसें मनी नीश्चीत अनुभवें करूनी ॥ २ ॥ यालागी सहजी सहजपणें । सहजची वर्तावें जाण । सहजावेगळें जाण । मानसीं न धरावें ॥ ३ ॥ तरी सहज म्हणसी कैसें । तरी तें सांगतों अैका सावकाशे । हें पींड ब्रह्मांड अपैसें । चाले सहजेची ॥ ४ ॥ रुतकाळीं संवछर । तीथी वार नक्षत्र । युग आणी मन्मंतर । ते सहजेची चालती ॥ ५ ॥ ...म्हणउनी सहजस्छीती । वर्तावें गा नीश्चीती । कवणावीसी

खंती । मानसीं न धरावी ॥ ११ ॥ साहावा भेदाभेद । नीवडावा वीशाद । आणी कत्रणेवीशी द्वंद । न धरावा मानसी ॥ १२ ॥ जनी असोनी जनपणे । सुखें वर्तावें जाण । परी मनी न धरणें । फळवासना ॥ १३ ॥ आणीक येक मना का (क ?) रणें । स्वरूपीं असावें सावधान । तेणें संसारबंधन । न बाधी तुज ॥ १४ ॥ संगती धरी साधुची । शेवा करी गुरूची । रुची असो दे नामाची । मुखी सदा सर्वदा ॥ १५ ॥ नामाचें महीमान । काये मी सांगो अती गहन । नामेकरीतां पावन । जाहले बहुतेक ॥ ११६ ॥ '...'' (प्र. १२).

## ' अैसें नाम अती पावन '

ज्ञानाने आता नाममाहात्म्य सांगायला प्रारंभ केला, " नामे गजेंद्र सुटला । नामे अजामेळ उत्धरीला । वैकुंठी सरिता जाहला । तया नामेकरूनी ॥ १ ॥ द्रोपदी वस्त्राहरणी । नामे सुटली नीर्वाणी । आणी तें गणीका कुंटणी । नामे जाहली पावन ॥ २ ॥ ' ' दैत्यवैंसी प्रल्हाद ', नारद, गणेश, सरस्वती आणि ' गंधर्वादीक ' नामाचे कीर्तन गातात. ' जे नाम उचारीती । तयासी कळीकाळ कांपती । येमही येतो काकुलती । नामउचारेंण कत्यासी ( कर्त्यासी वा करी त्यासी ) ॥ ६ ॥ नामे स्वर्गसुखप्राप्ती । नामे लाभती च्यान्ही मुक्ती । नामावेगळी गती । जाण नीश्चीती असेना ॥ ७ ॥ जो कोण्ही करी नामअभ्यासु । तोची दासामाजी दासु । नाम जपे महेशु । तया होउनी आगळा ॥ ८ ॥ तपदान तीर्थव्रत । जरी केले गा बहुत । परी त्या नामापरतें । आणीक नाहीं साधन ॥ ९ ॥...''

## आणी संताचे संगतीसी । अंतर पडो नेंदावें

संताचीये संगती । तेणें उपजे भावभक्ती । नीर्मळ होये चीतव्रती । तया संगतीपासांव ॥ १२ ॥

## नववीधा भक्ती आंत । वावरो दें तुझे चीत ।

तेणें तुं पारांगत । सहजेची होसी ॥ १३ ॥...कामे भयें वैरे । साईयासे धने साचार । अथवा भक्ती नाना साहा प्रकारें । भजन करावें ॥ १५ ॥

कामे भजलीया गोपीका। भजोनी पावलीया मोक्षसुखा। भयेंकरुनी कौंसादीका। मोक्षसीधी पावलें ॥ १६ ॥ हिरंण्यकस्यप हीरण्याक्ष। ना ते रावणकुंभकर्णादीक राक्षेस। शुशुपाळादीक वक्रदंत बहुवस। वैरें मोक्ष पावलें ॥ १७ ॥ सोईरेपणे पांडवा। लाधला मोक्षसुखाचा ठेवा। ममत्वें गौळ्यादीक वसुदेवा। या समस्तादीका सकळा ॥ १८ ॥ संन्नीधानें यादवां सकळा। की गोधनें राखता गोपाळा। ना तरी रघुनाथ अवतारी वान्नरकुळा। मोक्ष लाभें संनीधाने ॥ १९ ॥ शेवा दास्य करीतां। गरुडादि हणुमंता। जे लक्ष्मी मुख्य कांता। शेवा करीतां पारांगत ॥ २० ॥ श्रवणें परीक्षीती अर्जुनादीक। पावले मोक्षाचें परमसुख। वंदने अक्रुरादी वीशेख। परम सुख पावलें ॥ २१ ॥ पाहा पां बळ चक्रवती। दुजा सीभ्र महा भुपती। ते आत्मनिवेदने मोक्षप्राप्ती। सायोज्य गती पावलें ॥ २२ ॥ कपीलाचार्य मुख्य। आणी शुक तो वीशेख। नातरी वीदेही जनक। ज्ञाने मोक्ष पावले ॥ २३ ॥ वाल्मीक व्यासदेव। आणीकहीं बहुत मानभाव। कवीत्वें पावलें गौरव। मोक्षसुखाचें ॥ २४ ॥ जडभरीतादि थोर थोर। आणीकही नव योगेश्वरे। आत्मसुखें पावले पार। मोक्षसुखाचें ॥ २५ ॥ रुक्मांगद अंबरुसी। व्रतेकरूनी पावले मोक्षासी। हे तवं बहूतांसी। ठाउके आसे ॥ २६ ॥ पाहा पां तो पारासुर। धृव धाकुटा कुंवर। कवी हरी ईत्यादि योगेश्वर। तपें मोक्षसारांश पावले ॥ २७ ॥ युधीष्टीर आणी तो नळ। माहाराजे पुण्यसीळ। ते मोक्षसुख पावले केवळ। येक सत्येकरूनी ॥ २८ ॥ पाहा पां कर्ण सुर्येकुंवर। दुजा श्रीयाळ सत्वधीर। ते पावलें मोक्षपार। दात्रुत्वकरूनी ॥ २९ ॥ नारदादी हणुमंत। भीश्म तो जगवीख्यात। स्वामी कार्तीक ईश्वरसुत। सुख पावले ब्रंम्हाचार्यें ॥ ३० ॥ पृथु चक्रवती रावो। खटवांग हरीचंद्र माहाबाहो। वीदुर श्रुतदेव मुचकुंदादि सर्व। माहाराजे ॥ ३१ ॥ आणी थोर थोर रूशीवर। ईतर जना नाही पार। योग अर्चन भजनसार। लाभलें मोक्षाचें ॥ ३२ ॥ आतां असो हा भक्तीवाद। वर्णीता असे अगाध।..." सारांश, 'मन तवं व्यापक परीयेसी। पर ज्ञानें केलें येकदेशी। भेद दवडुनी अभेदेसी। नीश्चळ राहीलें ॥ ५३ ॥'

## ' असें सामराज्य जाहलें '

' ऐसी बोधाची राणीव जाहली । मनाची धांव पारूशली । प्रवृतीची क्रीया बुडाली । सता जाहली नीवृतीची ॥ ५४ ॥ नीःस्कंटक राज्य जाहलें । वैरी ठाई ठाई आहाळीलें । तें देखोनी सुख जाहलें । संतजना वीरक्तां ॥ ५५ ॥ आणी ते बोधाची राणी । पतीव्रता हो उन्मनी । सगुण गुणे शाहाणी । बोधा लाहाणी अती पाडे ॥ ५६ ॥ तुर्या उन्मनीची बहीणी । ते जाणे तया दोघाची खुण । साक्षीत्वें उभी राहुन । पाहे त्या दोघातें ॥ ५७ ॥ वीश्रांति राणी आनंदाची । तेही असे तेथेची । तया दोघांची प्रीतीची । गोडी तीयेलागी ॥ ५८ ॥ आनंदासहीत तयाजवळी । असे पैं सदा काळीं । वर्तत असे पैं सदा सहमेळी । हर्शासमवेत ॥ ५९ ॥ आनंदा वीश्रांती करीतां । बोध जाहला शोभता । आणी मन ही पीता । तेथची दृढावला ॥ ६० ॥ ऐसा बोध तो बोधला । साक्षत्वें आपणची जाहला । नामरुपाचा ठेला । भेद तेथें ॥ ६१ ॥ पुर्या आष्टकाचें खंडण । जाहलें तुटलें बंधन । तीनी गुण वीरोन । येक जाहले ॥ ६२ ॥ द्रस्टा दृश्य दृशा दरुशण । ज्ञाता ज्ञेय ज्ञान । ध्याता ध्येय ध्यान । त्रीपुटी जाण वीराली ॥ ६३ ॥ भोग्य भोग भोक्ता । कार्य कारण कर्ता । तेही साक्षत्वें पाहतां । आपणची जो ॥ ६४ ॥ ऐसा बोध सगुण । प्रणवपीठीची लाधला खुण । वोंमीत्येकाक्षर बंह्म जाण । आपणची जाहला ॥ ६५ ॥ अक्षर तेंची क्षरले । क्षर तेंची आक्षर जाहलें । या परतें काहि नाही उरलें । राज्य संचलें स्वरूपें ॥ ६६ ॥ राजमुद्रा ॐकार भारी । आसे सकळाचा सीरावरी । हे तरी साच चराचरी । संतजना ठाउकें ॥ ६७ ॥ ऐसें सामराज्य जाहलें देख । सरला भेदाचा आवांका । तेणें सुख जाहले सुखा । प्रेमी प्रेम मीळालें ॥ ६८ ॥ ' ( प्र. १३ ).[1]

---

१. प्रस्तुतची हस्तलिखित पोथी संकेश्वर येथील माझे एक गुरुवर्य श्री. बाबूराव ऊर्फ धोंडो दशरथ शान्त यांच्याकडून मला मिळाली.

: ६ :

# ‘ शान्त ’ गुरुपरंपरा

मराठीत ग्रंथरचना करणारे एक लिंगायत संत शान्तलिंगाप्पा, रामदास पंचायतनात ज्यांचा अंतर्भाव केला जातो असे एक थोर कवी जयरामस्वामी वडगावकर, आणि बेळगाव जिल्ह्यातील संकेश्वर गावी होऊन गेलेले एक संतकवी दशरथ शान्त या सर्वांचा समावेश शान्तपरंपरेत होतो. या गुरुपरंपरेत येथे पन्नास ते बावन्न नावे आढळतात. त्यांत पौराणिक आणि ऐतिहासिक, कानडी आणि मराठी, शिवभक्त आणि कृष्णभक्त, शैव आणि शाक्त सत्पुरुष आहेत. ‘ शान्तिपंचीकरण ’ या छापील पोथीत ही परंपरा त्रुटितपणे छापली गेली आहे. पण मजकडील हस्तलिखितात ( त्रुटित ) ती पूर्णपणे दिलेली आहे. ती आणि आज मी प्रकाशात आणीत असलेल्या ‘ सुखबोध ’ नामक कवीच्या ‘ परंपरा परमपुरुष आराधन ’ या १२५ ओव्यांच्या प्रकरणातील परंपरा जवळजवळ एकच आहे.

मन आणि विवेक यांच्यातील संवादाच्या रूपाने कवीने ही ‘ सिद्धशान्त परंपरापिढी ’ ( ५९ ) निवेदिली आहे. प्रथमतः निर्विकार परब्रह्म म्हणजेच प्रभू पंचमहासिद्धेश्वर असे तो सांगतो. त्यापासून ही परंपरा सुरू झाली. सदाशिव-ईश्वर-महेश्वर-महारुद्र या क्रमाने चार अवतार कृतयुगात झाले. शान्तिपंचीकरणाच्या चौतिसाव्या अध्यायात शंकराचार्यनिर्मित चार आश्रम म्हणजे चारी दिशांचे मठ व अन्य सहा मठ यांची हकीकत सांगितल्यानंतर एका सातव्या मठाचे अध्यायाच्या शेवटी कवीने वर्णन केले आहे ते असे—

‘ सातवा मठ महाशून्य । जो कां शांत अद्वैतपूर्ण । जेथें भेदाभेद अभिमान । गलित जाण सहज होती ॥ ३७ ॥ सर्वांची सांठवण जेथें । महाशून्य बोलिजे त्यातें । नादबिंदुकळातीत । शांतत्व शुद्धत्व अद्वैत जे ॥ ३८ ॥ आदिमध्यअंतीचा ठायीं । शांतत्व व्यापिलें सर्वत्र पाही ।

शांतिविना विश्रांति नाही। सिद्ध मुमुक्षु विषयी जो कां ॥ ३९ ॥ चार वाणी च्यार खाणी। चार वेद शास्त्रपुराणी। नाना साधन चहुं वर्णी। चार आश्रम षण्मठ मान्य ॥ ४० ॥ अष्टांग योगसाधनकळा। चवदा विद्या चौसष्टि विमळा (चौसष्ट कळा – छापील प्रत)। ज्या ठायीं होताति गोळा। विश्रांति विमळा महाशून्य ॥ ४१ ॥ महाशून्य मठ सातवा। येथील अनुभव ज्ञानी घ्यावा। जंबुद्वीपेचि आघवा। अद्वय वेदांत सारासार (सारसारा – छा. प्र.) ॥ ४२ ॥ साक्षात्कार मुख्य पद। अर्धमात्रा क्षेत्र प्रसिद्ध। विमलानंदतीर्थ अगाध। आत्मलिंग देव तेथिचा ॥ ४३ ॥ शांतिदेवी तयांचे वामी। शोभताहे शांतमुख (सुख – छा) धामी। महावाक्यविवरण नेमी। हे विचारणा तेथिची ॥ ४४ ॥ जयांते महावाक्य-विवरण। स्वयं ब्रम्ह होवोनि राहण। जेथें नाही दुजेपण। मी तूं कोण कोठील नसे ॥ ४५ ॥ सद्‌गुरुवाक्य रसाळ गोडी। लाधली जयां सदैवा आवडी। तयांची वर्णितां प्रौढी। प्रौढत्वा नाडी सहजचि ॥ ४६ ॥ सहजी सहजा नोहे तुटी। भूतमात्री शांतिगोठी। जैसें सुवर्ण पाहतां दिठी। कांती खोटी ऐक्यत्व होय ॥ ४७ ॥ ऐक्यत्व बोध बोले परी। नाना साधन श्रमला जरी। शांतीवाचूनि तिळभरी। सौख्य निर्धारी तयां न भेटे ॥ ४८ ॥ जरि भेटे श्रीगुरुनाथ। कृपेने मस्तकी ठेवितां हस्त। शांति-सुखचि वोसंडत। नाही आदिमध्य–अवसान ॥ ४९ ॥ आदिअंत जयां न कळे। तो हा सद्‌गुरु सगुण (सद्‌गुण – छा) लीळे। तारावया खेळ खेळे। भक्त भोळे भाविक अज्ञ ॥ ५० ॥ भावार्थासि नाही जाती। जाती अतीत श्रीगुरुमूर्ती। तो हा कृष्णदास श्रीकृष्णमूर्ती। कृपावचनोक्ती वदविली ॥ ५१ ॥ वदले जे आचार्य गुरुराज। त्याचीच हे टीका सहज। संत समर्थ ऐकिजे वोज (बोज – छा)। कृष्णदास जयराम गुज सांगे ॥५२॥ '

अध्यायान्तीच्या येथील या उल्लेखामुळे हा ग्रंथ जयरामस्वामींचा आहे अशी समजूत ग्रंथप्रकाशकांची झालेली दिसते. पण हा ग्रंथ जयरामस्वामींचा नसून दशरथ शान्तांचा आहे व त्याची रचना शके १७३५ त झालेली आहे. मात्र या अध्यायातील विवेचनास जयरामस्वामींचा आधार असावा असे येथील निर्देशावरून वाटते. या शान्तपरंपरेचा मठ ' महाशून्यमठ ' म्हणून ओळखला जाणे इष्ट आहे हे वरील उताऱ्यावरून स्पष्ट व्हावे.

पुढे पस्तिसाव्या अध्यायात कृतयुगातील या चार अवतारांविषयी दशरथ शान्त लिहितात—

‘...प्रभु पंचमहासिद्ध पुरुष । त्याणे केले चवघे शिष्य । चहु दिशेस स्थापिले ॥ २ ॥ पंचकलशपूजा अपूर्व । मध्यमेरुमंडल भाव । विंध्याचल कलश पूर्व । तेथें सदाशिव मुख्य आचार्य ॥ ३ ॥ पश्चिमे गंधमाद ( न ) कलश । ईश्वर तेथील आचार्य परिस । उत्तरे हिमाद्रि कलश विशेष । महेश्वर आचार्य तेथील ॥ ४ ॥ महेंद्र कलश स्थापी दक्षिण ( स्थापिला दक्षिणे - छा । ) । तेथें आचार्य महारुद्र जाण । तेथील देव तीर्थ पूर्ण । करूं वर्णन तयांचे ॥ ५ ॥ विंध्याद्रिमठी श्रीविद्यादेवी । विश्वालिंग देव स्वभावी । विश्वउद्धारतीर्थ ठेवी । विश्वपालन क्षेत्रनाम ॥ ६ ॥ गंधमादन पश्चिममठी । गदाधरी देवी गोमटी । गवेश्वर गोमती गंगातटी । वसे गौरव मंगळक्षेत्र ॥ ७ ॥ हिमाद्रीमठ जाण उत्तरे । तेथें देव हिमकेदार । भागीरथी तीर्थक्षेत्र । सर्वपावन देवी पार्वती ॥ ८ ॥ महेंद्रमठ तो दक्षिण । दक्षिण समुद्र तीर्थ जाण । दक्षणामूर्ती देव पूर्ण । दाक्षायणी आदिशक्ती ॥ ९ ॥ सर्व पापत्रासक ( हारक —छा. ) क्षेत्र म्हणती । हे शांतमठ चार ( शांतमठाची —छा ) वित्पत्ती । सांगीतली तुजप्रती । संशयग्रंथी छेदावया ॥ १० ॥ विंध्याचळमठी ऋग्वेद । दिव्यालिंग शोभे शुद्ध । गंधमादनमठी भेद । यजुर्वेद जंगमलिंग ॥ ११ ॥ हिमाद्रिमठी वेद साम । प्रसादलिंग महा उत्तम । महेंद्रमठी अथर्वण नाम । शिवलिंग सौम्य वसताहे ॥ १२ ॥ सूक्ष्म वेद मेरुमठी । महालिंग तेथील हतवटी । आतां शांतपरंपरा गांठी । देवु सेवटी अवधारी ॥ १३ ॥ प्रभु पंचमहासिद्धेश्वर । सांगू तयांचा विस्तार । सदाशिव ईश्वर महेश्वर । महारुद्र चार मठी ॥ १४ ॥ ’

म्हणजे कृतयुगापासूनच शान्तांची मठपरंपरा सुरू झाली असे कवीला सांगायचे आहे. ‘ सुखबोधा ’ने मात्र अशी अन्य माहिती काहीच दिलेली नाही. त्रेतायुगात घंटाकारण ( घंटाकर्ण ), शंखाकारण ( एका संस्कृत श्लोकात ही नावे घटकर्ण, शंकुकर्ण अशी आढळतात ), कालान्तक, सर्वानुग्रहक ( सर्वानुग्रह— शांति पं. ) आणि द्वापारयुगात महाकर्तृमूर्ती, अनुग्रहेश्वर, सर्वसाक्षी, सर्वाचार्यवर ( सर्वाचार्य — शां. पं. ) असे आठ अवतार

झाले. पुढच्या साऱ्या व्यक्ती या कलियुगातील असल्याचे सुखबोध सांगतो. म्हणून त्या ऐतिहासिक असाव्यात असे वाटते. रेवणासिद्ध, मरळसिद्ध, येकोराम, पंडिताराध्य या कलियुगातील चौघांचा निर्देश करून मग रेवणासिद्धापासून दशरथ शान्तांपर्यंत ( ओ. १६ ते ४२ ) कवीने ही परंपरा सांगितली आहे. 'अवतार सांगीतले आनान। परी तो येकचि श्रीभगवान।' ( ६१ ) हेही त्याने सांगून ठेवले आहे. चरन्ती गंगाधराचे विश्वरूपदेव (२६) आणि शान्तमूर्ती सोमेश्वराचे हुल्लिकान्ति सोमेश्वर (२९) अशी दुसरी नावे असावीत. दशरथ शान्तांनी विश्वरूपदेव आणि हुल्लिकान्ति सोमेश्वर ही नावे दिलेली नाहीत. शिवाय त्यांनी मोजदाद करून क्रमही दिला आहे. त्यामुळे या दोन नावांना त्या भिन्न व्यक्ती असतील तर या परंपरेत स्थान देता येत नाही. मात्र ६७ ते ६९ या ओव्यांतील वर्णन वाचताना सुखबोध या भिन्नभिन्न चार व्यक्ती मानतो असे दिसते. तसे असेल तर या ५२ व्यक्ती होतात; पण सुखबोध आणि पूर्णबोध हे बस्वलिंगाचे गुरुबंधू म्हणून व पुढे ही परंपरा बस्वलिंगापासून चालू होते म्हणून या तीन गुरुबंधूंची एकच पिढी धरल्यास दशरथ शान्तांपर्यंत ५० पिढ्यांचा हिशोब बरोबर होतो.

शान्तिपंचीकरणाच्या ( हे ग्रंथनामही चुकीचे वाटते. ) मजकडील हस्तलिखितात काही अध्यायांच्या अखेरीस 'शांति–प्रकरण' असे नाव आढळते. मात्र काही अध्यायांच्या शेवटी 'शांतिपंचीकरण' असेही आहे. पण येथे 'पंचीकरण' हा प्रमुख विषय नसल्याने 'शान्तिप्रकरण' हेच नाव समर्पक वाटते. पस्तिसाव्या अध्यायात ही परंपरा पुढीलप्रमाणे दिलेली आहे.—

'प्रभु पंचमहासिद्धेश्वर। सांगू तयांचा विस्तार। सदाशिव ईश्वर महेश्वर। महारुद्र चार मठी ॥ १४ ॥ घंटाकारण शंखाकारण। कालांतक सर्वानुग्रह आठ जाण। महाकर्तुमूर्ति अनुग्रहेश्वर दोन। सर्वसाक्षी सर्वाचार्य पूर्ण हे बारा ॥१५॥ रेवणासिद्ध मरळसिद्ध। येकोराम पंडिताराध्य। षोडश जाले पुढे भेद। ज्ञानी सावध परिसावें ॥१६॥ धर्मइंद्र रुद्रमुनींद्र। मुक्तमुनी समाधिसोमेश्वर। विंशती जाले पुढे विस्तार। ऐक सादर सच्छिष्या ॥१७॥

चन्नसदाशिव येकविसावा । चतुर्दशविद्यापारंगत बाविसावा । रेवणाचार्य बोळमाल्लिकार्जुन गणावा । चतुर्विंशातिपर्यंत ॥ १८ ॥ षडगदगी बसवेश्वर भाळलोचन । धातुर्वादी अठाविस जाण । पदडीकांति ( बदरीकांत—छा ) चन्नमल्लिकार्जुन । चरंती ( हा शब्द छापील प्रतीत नाही. ) गंगाधर येकतीस ॥ १९ ॥ शिंगळसिद्ध निराहारीसिद्ध । समाधिसिद्ध शांतसोमेश्वर प्रसिद्ध । हुल्लिकांति चंनवीर चल्लुरशांत वंद्य । विद्यापारंगत अडतीस हे ॥ २० ॥ नीलकंठ काशीपती शांतमूर्ती । चाळीस जाले यथानिगुती । श्रीकृष्ण क्लेशहरण जयराम गणती । निरंजन स्वामी त्रेच्याळ हे ॥ २१ ॥ ( ही ओवी छापील प्रतीतून गळलेली. ) शांतबोध शांतेश्वर । सुखबोध पूर्णबोध निर्धार । बसवलिंग शांतलिंग सधर । दशरथ शांत पन्नास हे ॥ २२ ॥'

या दोन्ही ठिकाणी जयरामस्वामींच्या गुरूंचा निर्देश करताना 'क्लेशहरण' हे विशेषण जोडले आहे. ते श्लेषपूर्ण मानले तर कृष्णाप्पा हे न्हावी होते या समजाला आधार मिळतो. पण दासविश्रामधामकर्ते लिहितात, "कृष्णाजी अप्पा ब्रह्मविद । गुरु तो बावाचा ( जयरामस्वामींचा ) सिद्ध प्रसिद्ध । उपनाम नाहवी ठेऊनि दुर्मेदें । पीडिती ऐका कारण ॥ ३० ॥ पटळ ॥३८॥" आणि कारण म्हणून एका वारिकाच्या कन्येशी कृष्णाप्पांचा ठक ब्राह्मणांनी विवाह लावून दिला होता अशी वार्ता ते सांगतात. महीपती असेच सांगतो. पुढे ७० व्या अध्यायात कृष्णाजी नापिक व त्यांचा व्यापारी शिष्य जयरामपंत यांची कथा आत्मारामबुवा सांगतात. मात्र हा कृष्णाजी नापिक समर्थशिष्य आहे, शान्तशिष्य नव्हे. समर्थ रामदासांच्या बखरीत कृष्णापा हे उरुणाबादचे राहणारे असून त्यांचे उपनाम अभ्यंकर होते असे म्हटले आहे. यांनी माघ शुद्ध पौर्णिमा शके १५४५ स वडगाव येथे समाधी घेतली. यानंतर जयरामस्वामी हे वडगावच्या गादीवर बसले. जयराम स्वामींच्या बखरीत त्यांच्या निरंजन या शिष्याचा उल्लेख आढळत नाही. निरंजनाविषयी सुखबोध लिहितो, 'जयासि नावडे जनभान । म्हणोनि विजन सेवित' (३५). यामुळेच त्याचा वडगाव मठाशी संबंध राहिला नसावा. निरंजनापासून त्यामुळे पुढे दुसरी शाखा निर्माण झाली आणि तीतच संकेश्वरचे दशरथ शान्त हे सत्पुरुष येतात. डफळापूरच्या शान्तेश्वरांचे सुखबोध आपा, पूर्णबोध आणि बस्वलिंग हे तीन शिष्य म्हणून ते तिघेही गुरुबंधू होत

( ओ. ३७, ३८ ) अशी शान्तिपंचीकरणापेक्षा अधिक माहिती सुखबोध देतो. यांतील बस्वालिंगाचे शिष्य संकेश्वरचे शान्तलिंग (३८). या शान्तलिंगांनाच शान्त घराण्याच्या वंशावळीत शान्तलिंगप्पा ऊर्फ सातप्पा असे म्हटले आहे. शान्तलिंग व भागीरथी या दांपत्याच्या पोटी दशरथ शान्तांचा जन्म झाला. दशरथ शान्तांनी अनेक चमत्कार दाखविल्याच्या आख्यायिका ऐकायला मिळतात. यांना अनेकांकडून इनामे मिळाली आणि शान्तांचे घराणे संकेश्वरात सुप्रतिष्ठित झाले. एका स्वतंत्र लेखात या दशरथ शान्तांचा परिचय करून देण्याचा मानस आहे. दशरथ शान्त हे शक्तीचे उपासक म्हणून शाक्त होते. यांनी शके १७५८ आश्विन वद्य अष्टमीस देह ठेवला. त्यांच्या सुखबोध नामक शिष्याने प्रस्तुतचे ‘ परंपरा परमपुरुष आराधन ’ हे प्रकरण रचले. यावरून प्रस्तुत प्रकरणाची निर्मिती इ. सनाच्या एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात झाली असावी.

प्रस्तुत प्रकरणाची तीन हस्तलिखिते गुरुवर्य श्री. बाबूराव ऊर्फ धोंडो दशरथ शान्त ( शान्त घराण्याचे आजचे प्रमुख ), संकेश्वर यांच्याकडून काही वर्षांपूर्वी मला मिळाली. त्यांच्या आधारे ही परंपरा आज प्रसिद्ध करीत आहे. गुरुवर्य बाबूराव शान्तांनी आपल्याकडील अनेक हस्तलिखिते देऊन मला कायमचे उपकृत केले आहे.

श्री

श्रीगणेशाय नमः श्रीगुरुभ्यो नमः ॥ ॐ नमो जी सद्गुरु शांता । सिद्ध परमात्मा अवधूता । तुझा उल्लेख विश्वपिता । विश्वमाता ईछा तुझी ॥ १ ॥ ऐसा तू श्रीगुरु । सिद्ध परमात्मा शांतेश्वरु । तु परम पुरुष ईश्वरु । तुझा विस्तारु परंपरा ॥ २ ॥ तुचि अवतार अनेक । अनेकी तु स्वामि येक । ऐसें निजदेखणे चोख । मन विवेक विवरती ॥ ३ ॥ आत्मस्थितिच्या निजभुवनी । मन विवेक नांदती दोनि । नांदत असतां प्रितीकरुनी । विवेकालागुनि मन पुसें ॥ ४ ॥ ह्मणे स्वामी जी विवेका । ज्ञानसृष्टिच्या तु अर्का । मज परंपरेची पीठिका । वीस्तार निका सांगावी ॥५॥ जो परंपरा-प्रकाश । तो परंपरेचा परम पुरुष । ऐसिया ऐक्यविचारास । कृपेन आंह्मास सांगावें ॥ ६ ॥ कैसें गुरुपरंपरेचें ज्ञान । कैसे परमपुरुषाचें ध्यान । कैसें

अंतरी आराधन । कृपा करोन सांगावें ॥ ७ ॥ शिव आदिगुरु सर्वांसी । शिव गुरुत्वे[1] भजे कवणासी । त्या आदिगुरुपासुनि आंह्मासी । परंपरेसि सांगीजे ॥ ८ ॥ ऐसी मनाची विनंती । ऐकोनी विवेक बोलती । अैक गुरुपरंपरासंतती । अवधान चित्ती धरोनियां ॥ ९ ॥ आदिगुरु परमेश्वर । जो परब्रम्ह निर्विकार । प्रभु पंचमहासिद्धेश्वर । नाम साचार जयाचें ॥ १० ॥ प्रभु पंचमहासिद्ध देवो । तेणे कृतायुगी पाहा हो । उपदेशिला सदाशिवो । जो सर्वजीवव्यापक ॥ ११ ॥ सदाशिवापासूनि ईश्वर । ईश्वरापासूनि महेश्वर । महेश्वरापासोनि महारुद्र । चारि अवतार प्रभूचे ॥ १२ ॥ तेथूनि त्रेतायुगी जाण । घंटाकारण शंखाकारण । तिजा काळांतक पूर्ण । सर्वानुग्रहक आपण चौथा जो ॥ १३ ॥ तेथूनि द्वापारी अवतार । महाकर्तुमूर्ती अनुग्रहेश्वर । सर्वसाक्षी सर्वाचार्यवर । ऐसे अवतार प्रभूचे ॥ १४ ॥ तेथूनि कलयुगी प्रासिद्ध । रेवणासिद्ध मरळासिद्ध । येकोराम पंडिताराध्य । रेवणासिद्ध वंद्य[2] सर्वा ॥ १५ ॥ प्रभू रेवणासिद्धेश्वर । तयाचा शिष्य धर्मइंद्र । धर्मइंद्राचे कृपापात्र । रुद्रमुनींद्र स्वामी हा ॥ १६ ॥ रुद्रमुनींद्रापासोनि । प्रगटले मुक्तमुनी । मुक्ती द्यावी भाविकालागुनी । म्हणोनी जनी अवतार ॥ १७ ॥ मुक्तमुनीचा अवतार । स्वामी समाधिसोमेश्वर । समाधिसुख अपरंपार । निरंतर सेवी जो ॥ १८ ॥ समाधि सोमेश्वरापासाव । प्रगटे चन्नसदाशिव । जयाचे कृपादृष्टी जीव । होती शिव[3] तद्रूप ॥ १९ ॥ चन्नसदाशिव अवधूत । तयाचा शिष्य अति अद्‌भूत । चतुर्दशविद्यापारंगत । जयाते[4] अर्चिती[5] सर्व विद्या ॥ २० ॥ चतुर्दशविद्यापारंगतान । रेवणाचार्य (र्या) बोधिलें ज्ञान । रेवणाचार्य स्वामीन । बोळमल्लिकार्जुन बोधिला ॥ २१ ॥ बोळमल्लिकार्जुनाचे दये । प्रगटे षडगदगी[6] स्थापनाचार्य । जो देवचि परि भक्त होय । अर्चिताहे षडदर्शन ॥ २२ ॥ षडगदगी[6] स्थापनाचार्याचा । शिष्य बसवेश्वर साचा । बसवेश्वर स्वामीचा । शिष्य साचा भाळलोचन ॥ २३ ॥ भाळलोचनाचा अवतार । धातुर्वादी सोमेश्वर । जयाचे कृपे चमत्कार । तद्रूपाकार भक्त होती ॥ २४ ॥ तयाचे[7] कृपादृष्टी

---

१ गुरुत्व (अन्य प्रतींतील महत्त्वाचे पाठ तळटीपांत दिले आहेत. ). २ वंदे. ३ जीव. ४ जयाचे. ५ अर्चीत. ६ शडंगदगी. ७ तयांचे.

स्वयमेव । प्रगटे पदडीकांतिदेव । पदडीकांतिपासाव । चन्नमल्लिकार्जुन देव अवतार ॥ २५ ॥ चन्नमल्लिकार्जुनाचे कृपे । चरंतीगंगाधर तद्रूप । गंगाधराचा प्रताप । विश्वरूपदेव हा ॥ २६ ॥ विश्वरूपदेवाचा शिष्य । सिंगळ[८] द्वीपी सिंगळसिद्धेश । सिंगळसिद्धाचा निजांश । निराहारी सिद्धेश स्वामि हा ॥ २७ ॥ निराहारी सिद्धाची कृपा पुरती । समाधिसिद्धासि घडली प्राप्ती । समाधिसिद्धाची निजभक्ती । शांतमूर्ति सोमेश्वर ॥ २८ ॥ शांतमूर्ति सोमेश्वर । तोचि हुल्लिकांति[९] सोमेश्वर । हुल्लिकांति अवतार । हुल्लिकांति चलवीर स्वामि हा ॥ २९ ॥ हुल्लिकांतिचलवीर । तयाचे कृपेचा अवतार । प्रगटे चल्लूरशांतेश्वर । भक्तोद्धार स्वामि हा ॥ ३० ॥ चल्लूरशांताचे[१०] कृपामृत । प्रगटे विद्यापारंगत शांत । जयाची[११] बुद्धि धाता होत । विद्या निर्मीत सर्वही ॥ ३१ ॥ विद्यापारंगत शांत श्रेष्ठ । तयाचा शिष्य अति वरिष्ठ । प्रगटे कासीपती नीलकंठ । जो ब्रह्मनिष्ठ अवतारी ॥ ३२ ॥ प्रभू नीलकंठ कासीपती । तयाचा शिष्य शांतमूर्ति । जो कां अगाध शांत स्थिति । भोगी पुरती अखंड ॥ ३३ ॥ तयाचें कृपादृष्टी आपण । प्रगटे कृष्ण क्लेशहरण । क्लेशहरणाची कृपा पूर्ण । प्रगटे संपूर्ण जयराम स्वामी ॥ ३४ ॥ जयराम स्वामीचे दयेन । प्रभू प्रगटे निरंजन । जयासि नावडे जनमान । ह्मणोनि विजन सेवित ॥ ३५ ॥ निरंजन स्वामीचा अवतारु । प्रगटे शांतबोधेश्वरु । शांतबोधाचा विस्तारु । शांतेश्वरु डफळापुरीं ॥ ३६ ॥ शांतेश्वराची पूर्ण कृपा । सावगावी सुखबोध आपा । दाखउनि मार्ग सोपा । वंशदीप प्रकाशिलें ॥ ३७ ॥ पूर्णबोध बस्वलिंग । हे गुरुबंधु जाण तीघ । बस्वलिंगाची कृपा सांग[१२] । शांतलिंग सकेश्वरीं ॥ ३८ ॥ संकेश्वरीं ऐका ज्ञानी । भागीरथी तयाची पत्नी । महा पतिव्रता लावण्यखाणी । मदन[१३] कुरवाळुनि[१३] सांडिजे ॥ ३९ ॥ ती साक्षात् भागीरथी । रमा सावित्री पार्वती । सीता तारा सरस्वती । भासे मजप्रती तद्रूप ॥ ४० ॥ किंवा अवतरली अनुसया । अत्री ऋषीची निजभार्या । तिचा उपकार[१४] फेडावया । दत्तात्रय जन्मले ॥ ४१ ॥ तोचि

---

८ शिंगळ. ९ हुलि०. १० चल्लूरशांताचि. ११ जयांचे. १२ सांगे. १३ मदनकुर वोवाळूनि. १४ अवतार.

अवतार सत्य जाण । दशरथ शांत नामाभिधान । पूर्ण ब्रह्म सनातन । चिन्मय रत्न गुरुमूर्ति ॥ ४२ ॥[१५] पुर्वसुकृत ठेवा पुरा । दत्तात्रय आले शांतउदरा । पट्टाभिषेक करुनि त्वरा[१६] । पूर्णपदी स्थापिला ॥ ४३ ॥ स्वरुपसूर्य प्रकाशला । किं मनतरु[१७] फळासि आला[१७] । ज्ञानसमुद्र उचंबळला । शिष्यशशीतें देखोनी ॥ ४४ ॥ तें पाचैचे निजसदन । चार्‍ही येती लोटांगण । चार्‍हीविरहित बोलणें । बोधी जाण शिष्यातें ॥ ४५ ॥ वर्णावया शांतस्थिति । सहस्रमुखासि नाही स्फूर्ति । निगमादीक नेतिनेति । शास्त्रें म्हणती पुराणें ॥ ४६ ॥ करावया शांतस्तवा । षडदर्शना पडिला[१८] गोवा । तेथे प्राकृताचा कोण केवा । भक्तिभावा बोलत ॥ ४७ ॥ शांत सद्गुरु-निधान । शांत पतीतपावन । शांत स्वरूपाचे महिमान । वर्णाव्या ज्ञान मज नाही ॥ ४८ ॥ शांत सुखाचा सागर । शांत बोधाचा आगर । शांत विवेकाचें मंदिर । शांत सूत्र निजमना ॥ ४९ ॥ शांत स्वरूपाचें श्रेष्ठपण । शांत स्थिति हे मंडण । शांतस्थिति बाणल्यावीण । उणेपण देवभक्तां ॥ ५० ॥ शांतस्थिती बाणे पूर्ण । तरि आधीक देवाचें देवपण । भक्ताची जे भक्ती जाण । ते शांतस्थिती गुणपरिणाम[१९] ॥ ५१ ॥ शांत आदीची आदी । शांत शोभा सर्वांमधी । शांत अंतीची आवधी । शांत समाधी जीवशिवा ॥ ५२ ॥ ऐसा सिद्ध शांत सद्गुरु । जयाचा न कळे महिमा अपारु । तेणे घेतले अवतारु । भक्तोद्धारु करावया ॥ ५३ ॥ शिष्य रति गुरु कांत । वाक्यानळ[२०] बोधरेत । कर्णरंध्रीं संभवत । तेणे वाढत शिष्यकुळी ॥ ५४ ॥ वाती लागता दीपा दीप । तैसा शिष्य सद्गुरुकृपे । स्वयें सिद्धाचि तद्रूप । सद्गुरुकृपे-

---

१५ येथे ४२ या संख्येवर √ अशी खूण करून आणखी एक ओवी समासात लिहिलेली आहे तिला ओवीक्रमांक नाही. ती नंतर कोणी तरी लिहिलेली असावी. ती ओवी अशी—‘ त्याचे पायी मडिवाळ देवरु । लडिवाळपणे पादुका करु । त्याच्या संगे जाहला थोरु । वाहळ जसे नदिसंगे ॥ ’ काही कागदांत मडिवाळ देवरु यांचा ‘ राजश्री मडिवाळपा निसबत शांत बावा ’ असा उल्लेख आढळतो. त्यावरून मडिवाळपा हे या शान्त घराण्याचे कारभारी व दशरथ शान्तांचे शिष्य असावेत. १६ बरा. १७ मनतरूप प्रकाशला. १८ पाडिला. १९ गुणे परि०; उणे परिणामा. २० वाक्यानळे.

करूनि ॥ ५५ ॥ ऐसी गुरुपरंपरासंतती । भावे सांगीतली तुजप्रती । आतां तुं श्रद्धास्थिति । करी भक्ती देवाची ॥ ५६ ॥ जो हे परंपरा ध्याय । तो शुद्ध संप्रदाय । जो नेणे गुरुपरंपरासोय । तो जन्मांध माय नेणे तैसा ॥ ५७ ॥ म्हणोनि गुरुपरंपराज्ञान । हे गुरुक्तासि मुख्य साधन । गुरुभक्ताचे आयेतन । ते हें ज्ञान गुरुपरंपरा ॥ ५८ ॥ हे[२१] सिद्धशांत परंपरापीडि ( ढी ) । भावें उभारिली गुढी । येथें जो श्रद्धा आवडी । ध्यानी बुडी दे तो धन्य ॥ ५९ ॥ सांगीतले परंपराअवतारु । परी तो येकचि श्रीगुरु । ऐसा धरुनिया निर्धारु । करी आदरू निजभजनि ॥ ६० ॥ अवतार सांगीतले आनान । परी तो येकचि श्रीभगवान । तेही अखंडित निजध्यान । ऐक ज्ञान सांगेन ॥ ६१ ॥ परंपरापरमपुरुष । प्रभु पंचमहासिद्धेश । प्रभू परमात्मा अदृश्य । दिसे दृश्य निजध्यानी ॥ ६२ ॥ दशरथ शांत पुर्ण निका । हा प्रभुच्या निजपादुका । शांतलिंग बस्वलिंग देखा । अंगुष्ट नेटका[२२] उभय हे ॥ ६३ ॥[२३] सुखबोध श्रीचरण । शुद्धस्वरुप शांत आपण । वाम सव्य भाग पूर्ण । शांतबोध संपुर्ण प्रभूचे ॥ ६४ ॥ निरंजन स्वामि हे निजांग । जयराम स्वामी उदर अव्यंग । श्रीकृष्ण क्लेशहरण सांग । कुशी अभंग[२४] प्रभूच्या ॥ ६५ ॥ प्रभू शांत हे नाभी पाहे । नीलकंठ कासीपती निजहृदय । विद्यापारंगत शांतराय । चल्लूरशांत बाह्य हस्त दोनी ॥ ६६ ॥ हुल्लिकांति चन्नवीर । हा प्रभूचा कंठ साचार । हुल्लिकांति सोमेश्वर । हनुवटी सुंदर प्रभूची ॥ ६७ ॥ शांतमूर्ति सोमेश्वर । हें प्रभूचें निज वक्त्र । समाधिसिद्ध व निराहारी सिद्धेश्वर । शोभती अधर प्रभूचे ॥ ६८ ॥ शिंगळासिद्ध विश्वरूपदेवो । हे प्रभूचे दशन पाहा हो । चरंतीगंगाधर स्वयमेवो । रसना जिव्हा प्रभूची ॥ ६९ ॥ चन्नमल्लिकार्जुन आपण । हें प्रभूंचे निज घ्राण । शोभे सत्य सरळपण । प्रसन्न वदन प्रभूचे ॥ ७० ॥ पदडीकांतिदेव योगेंद्र । आणि धात्रवादी

---

२१ श्री हे. २२ टेका. २३ येथे ६३ या संख्येवर √ अशी खूण करून पानाच्या वर लिहिलेली एक अधिक ओवी. तिलाही ओवीक्रमांक नाही. म्हणून नंतर कोणीतरी घातलेली. ती ओवी अशी—' दशरथशांताचे पदरज । लाहोनि माडिवाळ सुखे निज । दृश्य निवृती सहजी सहज । निजरूपी रंगल्या ॥ ( टीप १५ पहा. दोन्ही ठिकाणची ओवी भिन्न प्रकारची आहे. ) २४ अव्यंग.

सोमेश्वर । हे प्रभूचे कर्णरंध्र । शोभा आपार शोभती ॥ ७१ ॥ भाळलोचन बसवेश्वर । हे प्रभूचे नयन थोर । पाहातां तरळले ज्ञाननेत्र । न पाहे स्थीर राहिलें ॥ ७२ ॥ षडगदगी[२५] स्थापनाचार्य । आणि बोळमल्लिकार्जुन योगिय । नेत्राचे बुबुळद्वय । रेवणाचार्य प्रकाश ॥ ७३ ॥ चतुर्दशविद्यापारंगत । हे प्रभूचि भृकुटी शोभत । चन्नसदाशिव अवधूत । लल्लाट अद्भुत प्रभूचें ॥७४॥ स्वामि समाधिसोमेश्वर । हा प्रभूचा अर्धचंद्र । मुक्तमुनी योगेंद्र । मस्तक थोर प्रभूचा ॥ ७५ ॥ रुद्रमुनी शिखा श्रेष्ठ । धर्मइंद्र जटामुगुट । प्रभू परमात्मा विराट । देखोनि संतुष्ट निजमन ॥ ७६ ॥ पंडिताराध्य आपण । हें प्रभूचे निजज्ञान । जया ज्ञानी दोनि चिन्ह । देवभक्तपण[२६] मिरवंति ॥ ७७ ॥ देव भक्त दोनि नाम । दों नामी येक वस्तु सम । हाचि स्वामि येकोराम । येक संभ्रम प्रभूचा ॥ ७८ ॥ येकपणाचीही स्फूर्ति । विसरोनि केवळ जे ज्ञप्ति । हाचि मरळसिद्धमूर्ति । समाधीस्थिती प्रभूची ॥ ७९ ॥ तया समाधीची वोळख । ऐसा जो कां निजविवेक । तोचि रेवणासिद्ध देख । आत्मविवेक[२७] प्रभूचा ॥ ८० ॥ सर्वाचार्यवर आपण । हें प्रभूचें वरद लक्षण । सर्वाचार[२८] वर देणें । कृपाळूपण प्रभूचें ॥८१॥ सर्वसाक्षीदेव । हे प्रभूचे निजसाक्षत्व । सर्व दृश्याचे द्रष्टत्व । सर्वसाक्षीदेव स्वामि हा ॥८२॥ गुरु अनुग्रहेश्वर । हा प्रभूचा उपदेशव्यवहार । निजभक्तां करणे[२९] उद्धार[३०] । हा भाव साचार अनुग्रहेश्वरु ॥ ८३ ॥ महाकर्तुमूर्ति अवधूत । हा प्रभूचा कर्तव्य अर्थ । जया अर्थी हे समस्त । विश्व कृत भासतु ॥ ८४ ॥ स्वामि सर्वानुग्रहक । हा प्रभूचा समबोध देख । शिष्या शिष्य नोळख[३१] । करी वोरख[३२] बोधाचा ॥ ८५ ॥ काळांतक पूर्ण । हे प्रभूचें अखंड लक्षण । काळवेळेची गणण । नेणोनि असणें अखंड ॥ ८६ ॥ शंखाकारण प्रसिद्ध । प्रभूचा महावाक्य शब्द । जेथून प्रभवले वेद । तो महावाक्य शब्द प्रभूचा ॥ ८७ ॥ घंटाकारण आपण । हे प्रभूची अनाहत गर्जन । जेथ वेधले योगीजन । लुब्ध होउनि राहिले ॥ ८८ ॥ स्वामी जो महारुद्र । हा प्रभूचा निजहंकार । द्वैतभावाचा संव्हार । उरी[३३] नुरे कांहींची ॥ ८९ ॥ महेश्वर

---

२५ शडंगदंगी. २६ देवभक्तपणे. २७ आत्मा विवेक. २८ सर्वाचार्य. २९ कारणे, कारण. ३० उद्धर. ३१ नोळखे. ३२ वोळख. ३३ उरे.

जो आपण। हा प्रभूचा अहंब्रह्मपण। दुजे वृत्तीचे नसे स्फूर्ण[३४]। अहंब्रह्मपण[३५] अखंड ॥ ९० ॥ स्वामी जो ईश्वर। हा प्रभूचा विश्वाकार। विश्व माझाचि विस्तार। हा भाव साचार ईश्वरु ॥ ९१ ॥ आतां स्वामी सदाशीव। हें प्रभूचें निज आत्मत्व। सबाह्यांतरि पाहोनि देव। मन स्वयमेव सुखावे ॥ ९२॥ ऐसा परमात्मा जगदीश। प्रभू पंचमहासिद्धेश। परंपरापरमपुरुष। पाहोनि हर्ष मनासि ॥ ९३ ॥ स्वरुप पाहोनि प्रभूचें। हारपलें मनपण[३६] मनाचें। भरतें दाटलें प्रेमाचें। ऐक्यतेचे सुख भोगी ॥ ९४ ॥ मेघमुखें सिंधु उसपे। गंगामुखें पावे तद्रूप। तेवी मायायोगें मनस्वरुप। निर्विकल्प ध्यानयोगें[३७] ॥ ९५ ॥ परमपुरुषाचे स्वरुप। मनें पाहिलें सद्रूप। पाहोनि आपण तद्रूप। निर्विकल्प होउनि पाहे ॥ ९६ ॥ प्रभू स्वामीचे आत्मकळे। मनें[३८] पावलें केवळ। आली मुर्छा झांकिले डोळे। काही न कळे ऐसे जाहलें ॥ ९७ ॥ आत्मकळे पाहतां दृष्टी। मन मूर्छित समाधिसृष्टी। तव विवेक धरोनि मुष्टी। ह्मणें पहा दृष्टी परमात्मा ॥ ९८ ॥ तया विवेकाचा शब्द। मनें मानिला सुखबोध। पाहे तव शांतचि स्वतसिद्ध। दिसे प्रासिद्ध निरामय ॥ ९९ ॥ निरामय निरंजन। शांत परमात्मा निजधन। त्याचे चरणी विवेक मन। तल्लीन होउनि राहिली ॥ १०० ॥ सद्गुरुकृपे समाधान। मन पावले तल्लीन। तल्लीनपणें अखंड ध्यान। ध्यानी पूजन करितसे ॥ १ ॥ श्रवण-राउळा आंत। मननदेउळ[३९] लखलखीत। ध्यासस्थळी साक्षात। मन अर्चीत शांतलिंगा ॥ २ ॥ सुबुद्धीभावाचे उमाळे। हेचि पूजा उपचार सकळ। पूजावया जासनीळ। मन केवळ उदीत ॥ ३ ॥ लय लक्ष निःसीम। हे चिदानंददीप उत्तम। ज्योतिप्रकाश निर्धूम। प्रभे परब्रम्ह दिसतसे ॥ ४ ॥ प्रेमभावजल भरून। केलें देवासि मज्जन। स्वानंदविभूति चर्चून। केलें लेपन[४०] अनंगा ॥ ५ ॥ सम[४१] भावाची परिधाने। सत्वगुणाची भूषणे। शुद्ध सत्वाचें चंदन। अक्षता पूर्ण अक्षयेसी ॥ ६ ॥ शुभ भावना हे सुमन। सद्गुरुनाथासि वाउन। निजज्ञानाचें दर्पण। स्वमुख संपूर्ण दिसे जेणें ॥७॥ शुद्ध समता अबीर। उधळुनिया देवावर। अनुहात घंटागजर। नादें अंबर

---

३४ स्फुरण. ३५ ०पणे. ३६ मानपण. ३७ ०योग. ३८ मन०. ३९ मनदेव. ४० लेखन. ४१ प्रेम.

दणाणी ॥ ८ ॥ अहंसोहं धूपारती । येकोभाव येकारती । विज्ञानदशा जे पुरती । देवाप्रती नैवेद्य ॥ ९ ॥ पूर्णदशा पूर्णपण । हेचि तांबूल परिपूर्ण । स्वात्मरंगें संपूर्ण[४२] । मुखमंडण शोभत ॥ ११० ॥ आतां पुढें पंचारती । कायाकनकताटाप्रती । चित्तचतुष्टय पंचारती । पंच वाती पंचप्राण ॥ ११ ॥ ज्ञानेंद्रिय पंच ज्योति । निराभास कर्पुरदीप्ति । षड्गुण भक्त उभे ठाकती । वोवाळिती प्रभूतें[४३] ॥ १२ ॥ जयजयाजी निरालंबा । जयजयाजी स्वयंभा । जयजयाजी जगदारंभा । शांत प्रभो जयजया ॥ १३ ॥ जयजया जी लक्षा । जयजया जी अपरोक्षा । जयजया जी सर्वसाक्षा । शांत प्रत्यक्षा जयजया ॥ १४ ॥ जयजया जी निराकारा । जयजया जी निर्विकारा । जयजया जी परात्परा[४४] । शांतेश्वरा जयजया ॥ १५ ॥ जयजया जी निरामया । जयजया जी परमात्मया । जयजयाजी अंतरात्मया । शांत स्वामिया जयजया ॥ १६ ॥ जयजया जी अगाधा । जयजया जी स्वतःसिद्धा । जयजया जी निजानंदा । शांतबोधा जयजया ॥ १७ ॥ ऐसी हे आरती । आता ललित पुढती । मन विवेक गाती । गातां होती तल्लीन ॥ १८ ॥ वृत्ती स्वरूपी वळत । वळूनि तेथचि गळत । गळूनि तेथेंचि मिळत । ऐसें ललित[४५] सेवटीं ॥ १९ ॥ तेथूनि जयजयकार । शिव हर महादेव उच्चार । ऐक्यत्वाचा नमस्कार । निर्वाण साचार मंगळारती ॥ १२० ॥ ऐसी हे देवपूजा । भावें पूजिला प्रभूराजा । हृदईं अधिष्ठुनि वोजा । भक्तप्रजा सुखरुप ॥ २१ ॥ परमपुरुष आराधन । हृदईं अधिष्ठिलें विवेकमनें । हे पाहोनि समाधानें । परम तल्लीन सुखबोध ॥ २२ ॥ जो ध्याय श्रीगुरुमूर्ति । जो गाय श्रीगुरुकीर्ति । जो करी गुरुभक्ती । त्यासि प्राप्ती सुखबोध[४६] ॥ २३ ॥ जो भेदाभेद न पाहे । जो अभेदचि स्वय । अद्वैतरूप शांत राय । त्यासि ध्याय सुखबोध ॥ २४ ॥ नित्य शांतसमागमेसी । जो भोगी शांत क्षमेसी । जो शांत स्वसुखविलासी । त्याची[४७] दासी[४७] सुखबोध ॥ १२५ ॥ इति श्री परंपरापरमपुरुष आराधन संपूर्णत्ता भवतु ॥ श्रीगुरुशांत दत्तात्रेयः प्रीयतां ॥

---

४२ शोभे पूर्ण. ४३ प्रभूत्त. ४४ परंपरा. ४५ गलित. ४६ यानंतरचा एका प्रतीतील भाग फाटून गेला आहे. ४७ त्याचा दास.

## : ७ :

# शान्तलिंगाप्पा आणि विवेकचिंतामणी

'विवेकचिंतामणी' हा प्राचीन मराठीतील ग्रंथ कर्नाटक विश्वविद्यालय आणि पुणे विद्यापीठ यांचे पहिले संयुक्त प्रकाशन म्हणून प्रसिद्ध झाला आहे. त्याचे संपादन धारवाडच्या कर्नाटक महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रमुख प्राध्यापक डॉक्टर पंडित आवळीकर यांनी केले आहे. डॉ. दा. चिं. पावटे आणि महामहोपाध्याय द. वा. पोतदार या दोन्ही कुलगुरूंचे अनुक्रमे 'Foreword' आणि 'पुरस्कार' लाभल्याने ग्रंथाचे भाग्य वाढले आहे. ९८ पृष्ठांपर्यंत विस्तारलेली संपादकांची प्रस्तावना, सुमारे दहा पानांची विषयानुक्रमणिका, पान १ ते ३४१ त मूळ ग्रंथाची दहा परिच्छेदांची बरीच उत्तरकालीन वाटणारी संहिता, पान ३४२ ते ३७१ त वारदप्रतीच्या आधाराने नोंदलेले पहिल्या दोन परिच्छेदांचे पाठभेद, पान ३७२ ते ४३४ त टीपा, आणि शेवटच्या दोन पानांवर 'ग्रंथातील प्रक्षेप व संक्षेप' असे या ग्रंथाचे स्वरूप आहे.

या विद्यापीठप्रकाशनापूर्वी विवेकचिंतामणीचे पहिले दोन परिच्छेद सोलापूरच्या श्रीमान वारदांच्या आश्रयाखालील 'वीरशैवलिंगिब्राह्मणधर्म-ग्रंथमाले'तून ३५ वा ग्रंथ म्हणून शके १८३० मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यात प्रथम परिच्छेदाचे श्रीमल्लिंगराजकृत संस्कृत रूप आणि त्याखाली 'श्रीशांतेश्वरकृत प्राकृत ओव्या' छापल्या असून मधून मधून तळटीपांत काही जादा ओव्या दिल्या आहेत त्या मूळ निजगुण शिवयोगींच्या कन्नड ग्रंथात असणाऱ्या अधिक भागाचे वे. शा. रंगाचार्य मुधोळकर यांच्याकडून भाषान्तर करवून घेऊन घातल्या आहेत. दुसऱ्या परिच्छेदात मात्र शान्तेश्वरकृत मराठी संहिता आणि तिच्याखाली तिचेच मराठी गद्य रूपान्तर देण्यात आले आहे.

या दोन्ही प्रकाशनांच्या मुखपृष्ठांवर 'श्रीनिजगुण शिवयोगीकृत विवेकचिंतामणि' असा छापलेला मथळा उघडच दिशाभूल करणारा आहे. मराठीतील हा ग्रंथ मराठी कवीच्या नावावरच नोंदला जायला हवा होता. शिवाय हे मराठीकरण निजगुण शिवयोगींच्या कन्नड ग्रंथाचेच आहे असा निर्वाळा निःसंदिग्धपणे देता येत नाही हे पुढे स्पष्ट होईलच.

## ग्रंथप्रकाशनाची घाई

विवेकचिंतामणीची ही दोन्ही प्रकाशने संहितेच्या बाबतीत असमाधानकारक आहेत. विद्यापीठप्रकाशन तर अधिकच निराशाजनक आहे. मात्र त्यात संपादकाकडे फार दोष आहे असे मानण्याचे कारण नाही. प्रा. आवळीकरांना जे हस्तलिखित मिळाले ते सन १८४४ मधील आहे. श्रीमल्लिकार्जुनशास्त्रींना (वारद प्रकाशन) मिळालेल्या हस्तलिखिताचा काळ नमूद नाही. हस्तलिखिताची माहिती देताना ते लिहितात, "श्रीशान्तेश्वरकृत ओवीबद्ध मराठी भाषान्तर रा. रा. अण्णा ढोणे वैरागकर याजकडून मोठ्या कष्टाने प्राप्त झाले. हा ओवीग्रंथ फार जुनाट असून जागजागी वाळवीने खाल्ल्यामुळे अत्यंत जीर्ण झाला आहे. तत्रापि दैवयोगे मजकूर मात्र अद्याप गहाळ झालेला नाही." पण एवढ्याने निश्चित काल ठरवता येत नाही. 'हे हस्तलिखित मिळवण्याचा प्रयत्न करूनही ते हाती लागले नाही' असे प्रा. आवळीकरांनी म्हटले आहे. एवढा प्रयत्न सोडला तर ही पोथी अन्यत्र मिळते की नाही याचा शोध त्यांनी घेतल्याचे दिसत नाही. सरस्वती महाल, तंजावर, किंवा वाग्देवता मंदिर, धुळे येथील संग्रहांत या ग्रंथाची एकही प्रत दिसत नाही, हे खरे. तथापि शान्तपरंपरेतील एखाद्या मठात अजूनही हा ग्रंथ मिळण्याचा संभव आहे. म्हणून असे म्हणावेसे वाटते की ग्रंथप्रकाशनाची एवढी घाई करण्याचे कारण नव्हते. असे ग्रंथ पुन्हा पुन्हा छापले जात नाहीत.

आहे या परिस्थितीतही अधिक काळजी घेतली जाणे आवश्यक होते. मूळ हस्तलिखितात शब्दांची जोडतोड चुकीची असली तर ती तशीच ठेवण्यात अर्थ नव्हता. उदाहरणार्थ, पुढील काही स्थळे नमुन्यादाखल पहावीत—

| | | |
|---|---|---|
| ईशान्याभि मुखे | ५०७।२ ईशान्याभिमुखे | हवे |
| अंगुळीत्रयानेयेकवट | ५२०।२ अंगुळीत्रयाने येक० | ,, |
| स्वाहाया वचनी | ५८६।२ स्वाहा या वचनी | ,, |
| प्रीति नेसाचें | ८७७।२ प्रीतिने साचें | ,, |
| ति तुल्याने | १२११।२ तितुल्याने | ,, |
| निशादहे मकूट | १५६।४ निशाद हेमकूट | ,, |

यांतील शेवटची तीन स्थळे संपादकांनी टीपा देताना लक्षात घेतलेली आहेत. संहितेतच तशी दुरुस्ती त्यांनी केली असती तर वाचकांची सोय झाली असती.

३३६।२, ४२९।२, ८१२।२, १५४।३ इत्यादी ओव्या अपूर्ण आहेत. संहितेत त्या तशा दर्शवायला हव्या होत्या.

काही ओव्यांतून येणारी द्विरुक्त अक्षरे संहिता देताना वगळायला हरकत नव्हती. उदा.– **का** कारण ७४९।२, तया–**या** ७५५।२ इत्यादी.

दुसऱ्या परिच्छेदातील १९८ व्या ओवीत एकच चरण दोनदा आला आहे. ‘ प्रयोजन प्रीती ’ हे शब्द एकदाच ठेवले की ओवी सुटसुटीत होते.

‘ त्याचे ठाई ’ ( ओ. ६७, ४३१, ४३९ परि. १ इ. ), ‘ याचे लक्षण पुढे सांगो ’ ( ओ. ७९ नंतर १ ) इ. गद्य मजकूर ओवीहून वेगळा दाखवणे भाग होते. ८१९।२ ही ओवी नसून ते सरळ गद्य आहे. पृ. १४० ते १४३ वर गद्य मजकूरच आहे तरीही तेथे ८२४ ते ८३३ असे ओवीक्रमांक आहेत आणि परत १४३ व्या पानावर ८२४ पासून पुढचे ओवीक्रमांक आहेत. मधूनमधून आढळणाऱ्या या गद्याचा संपादकांनी कोठेच विचार केलेला नाही.

ओवीस क्रमांक नसणे ( ११६९।२ नंतर ), एखादा क्रमांक गळणे ( ३७५।२ नंतर एकदम ३७७. वारदप्रतीतही ३७५ व ३७७ या दोन ओव्यांच्या मधील ओवी आढळत नाही. ), अनुष्टुभांना ओवीक्रमांक देणे ( ४५, ४६।१० ), ३१२।१ या संस्कृत श्लोकास ओवीक्रमांक देणे ( वारदप्रतीत याला क्रमांक नाही. शिवाय हाच श्लोक दुसऱ्या परिच्छेदाच्या

प्रारंभी आहे. ) अशा चुका मुळात असल्या तरी विद्यापीठप्रकाशनात राहायला नको होत्या.

वारदप्रतीत पहिल्या परिच्छेदात पाच ओव्या अधिक आहेत. त्यांची नोंद व्हायला हवी होती. वारदप्रतीत अधिक आलेला भाग त्या त्या ठिकाणी तळटीपांत द्यावयास पाहिजे होता. पहिल्या दोन परिच्छेदांचे वारदप्रतीतील पाठभेद त्या त्या ठिकाणी तळटीपांत आले असते तर अभ्यासकांची अधिक सोय झाली असती.

संहितेच्या दृष्टीने एवढा विचार पुरे. प्रस्तावनेमधील काही विधानांचा अधिक विचार मला करावयाचा असल्याने तिकडे वळतो.

## ' विवेकचिन्तामणी 'चा कर्ता

' विवेकचिन्तामणि ' नावाचा कन्नड ग्रंथ ज्ञानकोशासारखा असून तो गद्यात लिहिलेला आहे. त्याचे लेखक निजगुण शिवयोगी. पण निजगुणांचा काल अनिश्चित आहे. विजापूरचे माझे एक ज्येष्ठ स्नेही श्री. ना. ब. जोशी ' परमानुभवबोधा 'च्या प्रस्तावनेत लिहितात, ' श्रीनिजगुणांचा कालही खि. सन १२५० पासून १६५० पर्यंत हेलकावे खात आहे. या चारशे वर्षांच्या दरम्यान ते केव्हा तरी होऊन गेले असे म्हटले जाते. ज्ञानकोशात [ भाग १० वा ( क ) पान २०६ ] निजगुण १७ व्या शतकाच्या मध्यावर झाले असे म्हटले आहे ' ( श्रीनिजगुण शिवयोगी काल व कार्य, पृ. ४ ). म्हणजे ज्याच्या ग्रंथाचा आधार शान्तलिंगाप्पा घेतात असे म्हटले जाते त्या मूळ ग्रंथकाराचा काळ ठरलेला नाही. या चारशे वर्षांच्या ( किंवा प्रा. माळवाड म्हणतात त्याप्रमाणे ' १२ व्या शतकापासून ते १७ व्या शतकापर्यंत[१] ' म्हणजे पाचसहाशे वर्षांच्या ) दीर्घावधीत एकाहून अधिक ' निजगुण शिवयोगी ' होऊन गेले असण्याचीही शक्यता आहे. प्रस्तुत निजगुणांची कालनिश्चिती या मराठी अनुवादाच्या कालनिश्चितीवरून करता येणे शक्य आहे, पण त्यासाठी

१. Studies in Education and Culture, in Honour of shri D. C. Pavate. page 369.

मराठी अनुवादाचा काल संशयातीतपणे सिद्ध व्हायला हवा आणि मराठी ‘ विवेकचिन्तामणी ’ कन्नड विवेकचिन्तामणीचाच अनुवाद आहे हे एखाद्या उभयभाषाकोविदाने निभ्रान्तपणे सांगायला हवे. श्री. ना. ब. जोशी तर एकदा ‘ सविवेचन भाषान्तर ’ ( पृ. १ ) म्हणतात तर एकदा ‘ ओवीबद्ध रूपान्तर ’ ( पृ. ५ ) म्हणतात.

निजगुणांनी दोन संस्कृत ग्रंथ लिहिले असावेत असा तर्क केला गेला असून श्री. ना. ब. जोशी त्यांची नावे ‘ दर्शनसार ’ आणि ‘ आत्मतर्कचिंतामणि ’ ( पृ. ६ ) अशी देतात तर मल्लिकार्जुन शास्त्री शिवतर्कचिंतामणि ’ ( प्रस्तावना पान १ वरील टीप ) नामक एकाच ग्रंथाचे ( विवेकचिन्तामणीत निजगुणांनीच उल्लेख केल्याचे सांगून ) नाव देतात. मात्र निजगुणांचे इतर सात ग्रंथ कन्नडमध्ये आहेत हे जसे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे तसे ‘ शिवतर्क-चिन्तामणी ’च्या भाषेसंबंधात त्यांनी काहीच विधान केलेले नाही. निजगुणांनी ‘ विवेकचिन्तामणि ’ कन्नडमध्ये रचला असेल तर तोच परत संस्कृतमध्ये त्यांनीच रचला असण्याची शक्यता कमी वाटते, किंवा आधी संस्कृतात रचला असेल तर मग परत कन्नडमध्ये रचण्याचा संभवही कमीच.

श्री. रा. चिं. ढेरे एक वेगळीच माहिती देतात. ‘ दत्तसंप्रदायाचा इतिहास ’ या पुस्तकात ( द्वितीयावृत्ती ) आंध्रातील परमानंदतीर्थांच्या ‘विवेकचिंतामणि’ याच नावाच्या तेलगू ग्रंथाची ओळख करून देताना त्यांनी म्हटले आहे, ‘ या ग्रंथाची दोन हस्तलिखिते तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयात ( क्र. ७५०, ७५१ ) आहेत. “ हा ग्रंथ निजगुण शिवयोगी यांनी तेलगूतून कानडीत अनुवादित केला आहे, ” अशी टीप प्रा. रावांनी दिली आहे. ही टीप आपल्या दृष्टीने फार महत्त्वाची आहे. कारण निजगुण शिवयोगींच्या ‘ विवेकचिन्तामणी ’चे मराठी रूपान्तर एकनाथकालीन लिंगायत मराठी संत शान्तलिंगस्वामी यांनी केले आहे. ‘विवेकचिन्तामणी’ ही निजगुण शिवयोगी यांची स्वतंत्र रचना आहे, अशी कानडी पंडितांची आजवरची धारणा आहे. निजगुणांच्या प्रस्तुत ग्रंथाचे मूळ तेलगूत आहे, याची कानडी पंडितांनाही कल्पना नसावी.’ ( पृ. १८८ ).

ही भिन्न भिन्न मते पाहिली तर आज एवढेच म्हणता येते की, निजगुणांनी 'विवेकचिन्तामणी' नावाचा एक ग्रंथ लिहिला. तो कन्नडमध्ये की संस्कृतमध्ये ह्या बाबतीत साशंकता. कन्नडमध्ये लिहिला असेल तर त्याचे मूळ प्रा. राव म्हणतात त्याप्रमाणे तेलगूत आहे की आणखी एखाद्या संस्कृत ग्रंथात आहे याचा निर्णय आज लागलेला नाही.

शान्तलिंगाप्पांनी 'विवेकचिन्तामणि' या कन्नड गद्य ग्रंथाचाच अनुवाद वा भाषान्तर केले हे अंतर्गत पुराव्यावरून सिद्ध होत नाही.

आपण 'विवेकचिन्तामणि' या कन्नड ग्रंथाचा अनुवाद करीत आहोत असे शान्तलिंगाप्पांनी कोठेही म्हटलेले नाही. उलट

'श्रीमद्यनेक सुरवरादिक । सन्मत्तानें शोभे विवेक- ।
चिन्तामणी म्हाणिजे तारक। संस्कृत शास्त्र ॥१४०॥ –परि १० ॥'

असे ते म्हणतात. म्हणजे 'विवेकचिन्तामणी हा अनेक देवतादिकांच्या संमतीने शोभणारा ग्रंथ म्हणजे संस्कृत तारक शास्त्र' असा हा त्यांचा अभिप्राय त्यांच्यासमोर 'विवेकचिन्तामणि' नामक संस्कृत ग्रंथ असावा असे सांगणारा वाटतो. पुन्हा—

'ते विवेकचिन्तामणी शास्त्र ।
प्राकृत भाषा सविस्तार।
सांगिजेल म्हणे शान्तेश्वर ।
जगस्त्वहीतनिमित्यें ॥ २७ ॥ परि. १ ॥',

'तयाचिये युक्तीवरीं ।
मी प्राकृत भाषा बोलिलो वैखरीं ॥ १२०४ ॥ –प. १ ॥',

'इति सकळ वेदशास्त्रार्थ ।
मुख्य निरोपिला प्राकृत ॥ १ ॥ प. २ ॥'

या ठिकाणी मूळ संस्कृताच्या अपेक्षेने 'प्राकृत भाषा' असे शब्द शान्तलिंगाप्पांनी वापरले असावेत. पण निजगुणांचा संस्कृत विवेकचिन्तामणि उपलब्ध नाही. शान्तलिंगाप्पांच्या समोर निजगुणांचा ग्रंथ असावा असे ज्या आधारावर म्हटले जाते तो भाग असा आहे—

‘ निजगुणाचेनि योगेश्वरें । जें साक्षात् शंभूच्या पुत्रें ।
तयाचे चरित्र अपारें । सांगीतलें असें ॥ १२०३ ॥
तयाचिये युक्तीवरीं । मी प्राकृत भाषा बोलिलो वैखरीं ।
ते प्रीति पावो सर्वेश्वरीं । श्रीशंभो नीळकंठी
॥ १२०४ ॥ प. १॥ ’

या ओव्यांचा अन्वयार्थ लावताना ‘ तयाचे ’ म्हणजे कोणाचे हे स्पष्ट होत नाही. वारदप्रतीत या ओव्या अशा आहेत—

‘ निजगुण देव योगेश्वर । जो साक्षाच्छंभूचा वरपुत्र ।
तयाचे चरित्र अपार । सांगत असे ॥ १२०९ ॥
तयाचे युक्तिवरी । मी प्राकृत भाषा बोलिलो वैखरी ।
तो प्रीति पावो सर्वेश्वरिं । श्रीशंभो नीलकंठी
॥ १२१० ॥ प. १॥ ’

—याचा गोळाबेरीज अर्थ साधारणपणे असा होईल. ‘ प्रत्यक्ष शंकराचे वरपुत्र जे निजगुण योगेश्वर त्यांचे चरित्र ( महत्कृत्ये ? ) खूप काही सांगते. त्या त्यांच्या युक्तीच्या आधारे मी प्राकृत भाषेत हे बोललो. सर्वेश्वर श्रीशंभो नीलकंठाच्या ठिकाणी तो ( ? ) प्रीती पावो म्हणजे श्रीशंभू-नीलकंठाला आवडो.’ येथे ‘ युक्ती ’ऐवजी ‘ उक्ती ’ असा पाठ असेल काय ? तरीही ‘ चरित्र ’ हा शब्द अडचणीतच टाकतो. शान्तलिंगाप्पांनी कन्नड ग्रंथ आधाराला घेतला नसावा याला आणखीही कारण देता येईल.

यापूर्वी कै. खरशीकरशास्त्र्यांच्या संपादनाने प्रसिद्ध झालेल्या ‘ कर्णहंस ’ ( कर्णहस्तिकी किंवा हस्तकी— गो. का. चांदोरकर— भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त शके १८३७, कर्णहस्तिकी— महाराष्ट्र सारस्वत— भावे चतुर्थ आ. पृ. ४३५; कर्णहस्तकी— पांगारकर— म. वा. इ. खंड २ पृ. ५२९; करणहासकी ( कर्णहस्तकी ) कर्णहास्य— सरस्वती महाल यादी व्हॉ. १; कर्णहंसकी— कर्णहंस ओ. १४ ) या ग्रंथात तर मूळ संस्कृत श्लोक उध्दृत करूनच शान्तलिंगाप्पांनी टीका लिहिली आहे. विवेकचिंतामणीतही मधून मधून संस्कृत वचने ( ४०।१, ८४६।१ इ. ) व श्लोक ( ३१२।१,

४५–४६।१०) ते उध्दृत करतात. ह्यावरून त्यांचा संस्कृतचा व्यासंग जसा सिद्ध होतो तसा कन्नड भाषेचा होत नाही. साहजिकच शान्तलिंगाप्पांना कन्नड भाषा येत असेल की नाही याचीच जेथे शंका निर्माण होते तेथे ' शान्तलिंगस्वामींची मातृभाषा कन्नड असावी. ' (प्रस्तावना, पृ. ६२) हे प्रा. आवळीकरांचे विधान संशोधनक्षेत्रात टिकण्यासारखे नाही. खुद्द आवळीकरांनीच पुढे म्हटले आहे, ' परंतु कन्नड भाषेची छाया ' विवेक चिंतामणी 'वर पडलेली आढळत नाही.' (प्र. पृ. ६२). पण हे विधान एखाद्या उभयभाषापंडिताने करायला हवे. कन्नड ही शान्तलिंगांची मातृभाषा असती तर तसा निर्देश त्यांनी जरूर केला असता. ' गुरुचरित्रा 'चा कर्ता सरस्वती गंगाधर ' भाषा न ये महाराष्ट्र ' (गुरुच. १·४९) असा आवर्जून उल्लेख करतो. आपल्याला संस्कृताचा अभ्यास नसल्याने कर्नाटक-कवी कुमारव्यासाच्या आधाराने आपण ग्रंथविलास आरंभिल्याचे महाभारत रचणाऱ्या चंद्रात्मज रुद्राने सांगितले आहे. निजगुण शिवयोगी आणि चन्नबसवेश्वर हे कर्नाटकातील सत्पुरुष आहेत, त्यांनी काही कन्नड रचना केलीही आहे, पण तेवढ्यावरून शान्तलिंगाप्पांनी कन्नड ग्रंथांचाच अनुवाद केला असे म्हणणे बरोबर ठरणार नाही.

श्रीचन्नबसवेश्वरांच्या ' करणहसुगे ' या कन्नड ग्रंथाचा शान्तलिंगस्वामींनी अनुवाद केला असेही प्रा. आवळीकर म्हणतात. हा विचार दुसऱ्या कोणीही मांडलेला नाही. ' त्यांना (शान्तलिंगाप्पांना) संस्कृत उत्तम येत असावे, हे चन्नबसवेश्वराचे सूत्रावर त्यांनी टीका केल्यामुळे सहज दिसते.' (श्रीशान्तलिंगप्पा महाराज यांचे चरित्र, पृ. १४) असे कै. खरशीकर-शास्त्री म्हणतात, तर श्री. य. खु. देशपांडे लिहितात, ' प्रस्तुत कर्णहंस ग्रंथ लिंगायतपंथप्रवर्तक श्रीबसवेश्वर यांचे भाचे आणि पंथाचे एक श्रेष्ठ आचार्य यांनी केलेल्या सदतीस संस्कृत श्लोकांच्या एका अध्यात्मग्रंथावर श्रीशान्तलिंगाप्पा या थोर विभूतीने मराठी भाषेत केलेली ओवीबद्ध टीका होय ' (पृ. १६). भावे पांगारकरही हा कन्नडचा अनुवाद आहे असे म्हणत नाहीत. तसा अंतर्गत पुरावाही त्या ग्रंथात नाही.

२९ नोव्हेंबर १९६४ रोजी मुंबई राज्याचे भूतपूर्व महसूलमंत्री ना. म. पु. पाटील यांना भेटण्यास मी बेळगावी गेलो होतो. 'कर्णहंस' या

ग्रंथाची एक सटीक व पाठभेदासह आवृत्ती प्रसिद्ध करण्याचा त्यांचा विचार आहे. चन्नबसवेश्वरांचे म्हणून जे ३७ संस्कृत श्लोक मानले जातात ते चनबसवेश्वरांचे नसून आगम ग्रंथांतील आहेत असा सिद्धान्त ते प्रस्थापिणार आहेत. बहुतेक श्लोकांचे उद्गम त्यांनी शोधले आहेत. या ३७ संस्कृत श्लोकांवर चनबसवेश्वरांनी कन्नडमध्ये गद्यात टीका लिहिली असे मानले जाते. अर्थात चनबसवेश्वरांची ही गद्य–कन्नड टीका तपासल्याविना शान्तलिंगाप्पांनी त्यांचे कितपत अनुसरण केले हे सांगता येणार नाही. कदाचित चनबसवेश्वरांनी एकत्रित केलेल्या या ३७ संस्कृत श्लोकांनाच चनबसवेश्वरांची कृती म्हणून शान्तलिंगाप्पांनी आपल्या नजरेसमोर ठेवले असावे.

तेव्हा शान्तलिंगाप्पांच्या या दोन ग्रंथांच्या संदर्भात बोलायचे तर त्यांनी संस्कृतावरूनच हे दोन्ही ग्रंथ मराठीत अनुवादले असे म्हणणे सत्यास धरून होईल.

कन्नड विवेकचिंतामणी आणि प्रस्तुतचा मराठी ग्रंथ यांच्यात आढळणाऱ्या विरोधी स्थळांचा आणि गाळलेल्या किंवा अधिक आलेल्या स्थळांचा विचार संस्कृत विवेकचिंतामणीच्या उपलब्धीनंतर अधिक योग्य तऱ्हेने होऊ शकेल. तोपर्यंत निर्णयात्मक विधाने एककल्लीपणाची आणि दुराग्रहाची ठरतील.

## वडगावमठाची स्थापना

वडगाव येथील 'गादीची मूळ स्थापना शान्तलिंगाप्पा ऊर्फ शान्तेश्वर महाराज यांनी केली' (महाराष्ट्र सारस्वत, पृ. ४३४) आणि 'शके १५०४ मध्ये वटग्राम ऊर्फ वडगाव येथे येऊन यांनी (कृष्णाप्पांनी) तेथे मठाची स्थापना केली' (पृ. ४३५) अशी दोन वेगवेगळी विधाने कै. भाव्यांनी केली आहेत. प्रा. आवळीकरांनी ही दोन्ही विधाने प्रस्तावना पृ. ११ व १६ वर उध्दृत केली आहेत. पण शान्तलिंगाप्पांची कालमर्यादा ठरविण्यासाठी त्यांनी विशेष विचार वा चर्चा न करता कै. भाव्यांच्या पहिल्या विधानाकडे आपला कल दर्शविला आहे. किंबहुना या दोन्ही विधानांत परस्परविरुद्धत्व आहे हे त्यांच्या लक्षातच आलेले दिसत नाही. अन्य आधारही प्रा. आवळी-

करांनी पाहिलेले नाहीत. कै. जनार्दन बाळाजी मोडकांनी इ. स. १८९९ त ' जयराम स्वामी वडगावकर त्यांचे गुरु परमगुरु व शिष्यप्रशिष्य यांच्या चरित्राची बखर ' प्रसिद्धिली आहे. तीत वडगाव मठाची स्थापना शान्तलिंगाप्पांनी केली असे कोठेच म्हटलेले नाही. शान्तलिंगाप्पांचे एक शिष्य कृष्णाप्पा ऊर्फ कृष्णदास हे वारुळवाणे ( उरुणाबाद—रामदास स्वामींची बखर; उरुण बहे- आचार्य कालगावकर ) येथील कुलकरणी. शान्तलिंगांच्या अनुग्रहानंतर गावी रहात व दर महिन्याच्या शुक्ल एकादशीस श्रीशंभुमहादेव ( शिखरशिंगणापूर ) येथे गुरुदर्शनास जात. कृष्णाप्पांचा एक शिष्य कुंदाजी ( कुकजी – भक्तमंजरीमाला; कुब्जाबावा – जयरामस्वामीकृत अपरोक्षानुभूती, प्रस्तावना ) हा वडगावाचा वतनदार पाटील होता. कृष्णाप्पा उरुणबहे→वडगाव→शिखरशिंगणापूर असा मार्ग आक्रमीत असत तरीही कुंदाजी आपल्या गुरूंच्या म्हणजे कृष्णाप्पांच्या दर्शनास कृष्ण-पक्षातील एकादशीस गुरुग्रामी जाई. पुढे कुंदाजी पाटलाच्या ' शरीरास इजा ' होऊ लागल्याने आपला नेम चालणार नाही असे त्याला वाटले आणि म्हणून त्याने कृष्णाप्पांना ' वडगावी रहावे ' अशी विनंती केली. कृष्णाप्पांनी ती मानली व मग वडगावाहूनच ते गुरुदर्शनास जाऊ लागले. शान्तलिंगांनी आपल्या अंतसमयी ' आता आजपासून तू वडगावी राहून आमचे चिंतन करीत स्वस्थ असावे ' असे कृष्णाप्पांना सांगितले. जयराम स्वामींच्या बखरीतील या वृत्तान्तावरून वडगावमठाची स्थापना कृष्णाप्पांनी केली हे उघड आहे.

भारत–इतिहास–संशोधक मंडळाच्या शके १८३७ च्या इतिवृत्तात कृ. वि. आचार्य कालगावकर यांचा ' वडगाव मठाची परंपरा ' हा लेख आला आहे. वडगावमठाची स्थापना कृष्णाप्पांनी केली असेच त्यांनी म्हटले आहे.

जयरामस्वामींच्या बखरीत शान्तलिंगाप्पांच्या संबंधीच्या काही सुंदर आख्यायिका आल्या आहेत. तथापि शान्तलिंगांच्या चरित्राविषयी निश्चित माहिती फारशी उपलब्ध नाही. अशा वेळी मिळतील त्या आख्यायिका, दंतकथा लिहून ठेवणे एवढेच संशोधकाचे काम राहते. चिकित्सक बुद्धीला

त्यांतील अद्भुतता पटत नाही एवढेच फार तर म्हणता येईल. कै. खरशीकर-शास्त्र्यांनी तेच केले. पण प्रा. आवळीकरांनी ‘ कै. खरशीकरांपेक्षा कै. बामणगावकर अधिक चिकित्सक वृत्तीचे वाटतात.’ (प्रस्ता. पृ.१३) असे म्हणून कै. खरशीकरांना अन्याय केला आहे. चिकित्सेने मांडलेले मत बरोबरच असते असा आग्रह धरता येत नाही. खुद्द बामणगावकरांनीही ‘ दिसतात, असावी ’ अशी क्रियापदे वापरून जपूनच लिहिले आहे, पण आवळीकर मात्र ‘ बामणगावकरांचे विवेचन कोणासही मान्य होण्यासारखे आहे ’ असे लिहितात. बामणगावकरांचे झाले तरी तर्कच. लोकप्रसिद्ध नि ग्रंथनिविष्ट दंतकथा देणे एवढेच काम कै. खरशीकरांनी केले.

## शान्तलिंगांचा मृत्युशक

शान्तलिंगाप्पांचा ‘ मृत्युशक अगदी तिथीसकट उपलब्ध आहे. शक १५४५ माघ शु. पौर्णिमा हा त्यांचा निधनकाल होय.’ ( प्रस्ता. पृ.१४ ) असे कै. भाव्यांच्याच आधाराने पण त्यांच्यापेक्षा जोराने आणि छाती-ठोकपणे प्रा. आवळीकर सांगत आहेत. कै. भाव्यांनी दिलेल्या पुढील अभंगाचाच आधार ते देतात—

‘ आद्य शान्तेश्वर प्रसिद्ध सकळां । तो प्रेमजिव्हाळा कृष्णदास ॥
शके पंधराशे पंचेचाळीसांसी । माघ पौर्णिमेसी समाधिस्त ॥ ’

पण प्रस्तुत अभंगातून ही तिथी शान्तेश्वरांच्या समाधिकाळाची असा अर्थ निघत नाही. यातील ‘ कृष्णदास ’ हे पद निर्णायक मानायला हवे. शान्तेश्वर हे कृष्णदास नव्हेत. ‘ सर्वांना माहीत असलेले आद्य शान्तेश्वर. प्रेम जिव्हाळाच असा कृष्णदास ( किंवा कृष्ण हा दास–शिष्य म्हणजे कृष्णाप्पा ). तो पंधराशे पंचेचाळीसात माघी पौर्णिमेस समाधिस्थ झाला ’ असा या अभंगाचा अर्थ होतो आणि तो अन्य पुराव्यांनी सिद्ध होतो.

जयरामस्वामींच्या बखरीत १२ ते १४ पानांवर कृष्णाप्पांच्या समाधि-प्रसंगाचे वर्णन आले आहे. तेथे ‘ श्रीकृष्णाप्पास्वामी यांनी शके १५४५ माघ शुद्ध १५ रोजी समाधि घेतली ’ असे म्हटले आहे.

भारत इ. सं. मंडळाच्या शके १८३७ च्या इतिवृत्तातील कृ. वि.

आचार्य कालगावकर यांच्या लेखात ‘ कृष्णाप्पास्वामी वटग्रामास आले सके १५०४ ते सके १५४९ रुधिरोद्गारी नाम संवछरे माघ शु॥ १५ स समाधिस्त जाहाले ’ ( बखरीच्या स्वरूपाची तीन पाने लेखकांना मिळाली होती. त्यातील हा मजकूर आहे.) असा उल्लेख आहे. पण रुधिरोद्गारी संवत्सर १५४९ त येत नसून १५४५ त येतो. म्हणून १५४९ हा आकडा मुळात चुकीने लिहिलेला असावा, किंवा ५ ऐवजी ९ असे चुकीचे वाचन केले गेले असावे, किंवा छपाईची चूक असावी हे मान्य करावे लागते. या लेखातील इतर शक व शकांची नावे यांचा मेळ बसतो व महादेवस्वामीच्या निधनशकाव्यतिरिक्त इतर सर्व शक व तिथी जयरामस्वामींच्या बखरीतील शकतिथींशी जुळतात.

जयरामस्वामींच्या अपरोक्षानुभूती ग्रंथाच्या प्रस्तावनेत ‘ कृष्णाप्पा स्वामींनी शके १५४५ त जीवंत स्थळसमाधी ’ घेतल्याचा निर्देश आहे.

‘ कृष्णापा आपा यांनी जिवंत समाधि १५४५ रुधिरोद्गारी नाम संवत्सरी माघ शुद्ध पौर्णिमेस घेतली ’ असेच हनुमंत स्वामीची बखर सांगते.

‘ भक्तमंजरीमाले ’च्या चौदाव्या अध्यायात ‘ शके १५६० माघमास। ...परिधावी संवत्सर आदित्तवार पौर्णिमा ’ असा कृष्णाप्पांचा समाधिकाल नमूद आहे. पण १५६० त ‘ परिधावी ’ नाही, ‘ बहुधान्य ’ आहे. पण माघी पौर्णिमा आदित्यवार हा योग शके १५४५ त येतो. म्हणून येथे १५६० हा शकांक व शकनाम यांची नोंद चुकीची आहे.

संत-कवि-काव्य-सूचीमध्ये गो. का. चांदोरकर कृष्णाप्पांचा समाधिशक १५४५ हाच देतात.

श्रीरामदासी संशोधनाच्या द्वितीय खंडात ‘ कृष्णस्वामी ( १५४५ माघ शु. १५ )’ असा त्यांचा समाधिशक कै. समर्थभक्त शंकरराव देवांनी दिलेला आहे.

इतक्या ठिकाणी कृष्णाप्पांचा समाधिशक १५४५ हा दिला असताना तोच शान्तलिंगाप्पांचा निधनशक म्हणून आवळीकर मानतात ते केवळ हा ग्रंथ शके १५२६ मध्ये लिहिला गेला असे त्यांना ठरवायचे असल्याने व अन्य आधार त्यांनी पाहिलेच नसल्याने. शके १५४५ हा कृष्णाप्पांचा

निधनशक म्हणताना ‘ भाव्यांनी फारसा विचार केलेला दिसत नाही ’ असे आवळीकर लिहितात. पण खरे म्हणजे शान्तलिंगाप्पांचा निधनशक ठरवताना आवळीकरांनी मुळीच विचार केलेला नाही. ‘ एकाच दिवशी शान्तलिंग व कृष्णाप्पा या दोघांनी समाधी घेतली असे मानणे बुद्धीला पटत नाही ’ असे ते म्हणतात. येथे बुद्धीला पटण्या न पटण्याचा प्रश्नच नाही. दोघांनी एकाच दिवशी समाधी घेतली असा पुरावा असेल तर तसे मानणे भागच आहे. पण जयरामस्वामींच्या बखरीवरून शान्तलिंगाप्पांच्या समाधीनंतर बराच काळ कृष्णाप्पा हयात होते, आणि वडगावमठाच्या स्थापनेच्या आगेमागे पण जवळच्याच काळात शान्तलिंगाप्पा समाधिस्थ झाले होते असे मानावे लागते. शके १५१० च्या पूर्वी शान्तलिंगांनी आपली जीवनयात्रा संपविली होती असे मान्य करणे भाग आहे, असे मला वाटते.

### ग्रंथनिर्मितिशक

हस्तलिखितातील संहिता जशीच्या तशी म्हणजे मुळातील चुकीच्या जोडतोडी ठेवून छापली आहे. मात्र कालोल्लेखाचा शेवटचा भाग मूळ संहितेनंतर अर्धवटच छापला आहे. संहिता संपल्यानंतर हस्तलिखितात असणारा पूर्ण स्थलकालोल्लेख असा– ‘ क्रोधीनाम संवत्सरे अश्वीन वद्य १३ त्रयोदशी गुरुवारी विवेकचिंतामणी ग्रंथसमाप्ति ॥ ’ ( संहिता, पृ. ३४१ ) ‘ शके १७६६ क्रोधीनाम संवत्सरी श्रीशंभूमहादेवी ग्रंथसमाप्ति ॥ हे पुस्तक नऱ्होजी बिन चणगवंडा पाटील राजमाने मौजे निपाणी याचे पुस्तक असे ॥ ’ ( प्रस्ता. पृ. १५ ). वास्तविक कालोल्लेखादिकांचा हा उत्तरभाग मूळसंहितेच्या अखेरीसच छापावयास हवा होता. निदान प्रस्तावनेत तो नमूद केला असल्याने हा कालोल्लेख तपासून पाहणे शक्य झाले आहे. कालोल्लेखात दोन्ही ठिकाणी ‘ ग्रंथसमाप्ति ’ असाच शब्द आहे. मग एक प्रत्यक्ष मूळ ग्रंथाच्या निर्मितीचा आणि दुसरा प्रस्तुत प्रतीच्या लेखनाचा असे का मानावयाचे ? ग्रंथकार जेव्हा ग्रंथनिर्मितीचा काल निर्देशितो तेव्हा तो मूळ संहितेत शेवटी येतो. येथे ‘ नीळकंठार्पणमस्तु ’ असे लिहून ग्रंथसमाप्ती झाल्याचे दर्शविल्यानंतर हा कालोल्लेख आला असल्याने तो

कवीने नोंदला असेल असे म्हणता येत नाही. शिवाय पूर्वार्धातील नोंद ही ग्रंथनिर्मितीची मानावी तर तेथे शकांक नाही, आणि उत्तरार्ध प्रतलेखनाचा मानावा तर तेथे तिथीचा निर्देश नाही. असे अर्धवट उल्लेख सहसा कोणी करीत नाही. म्हणून 'क्रोधीनाम संवत्सरे अश्वीन वद्य १३ गुरुवारी शके १७६६ शंभूमहादेवी ग्रंथसमाप्ति' हा एकच निर्देश मानावयास हवा. तो ग्रंथनिर्मितीचा असण्यापेक्षा प्रतलेखनाचा असण्याची शक्यता अधिक. हे दोन भिन्न काळांचे निर्देश आहेत असे मान्य करणे अवघड आहे. आता पिल्लेजंत्रीप्रमाणे 'क्रोधीनाम संवत्सर अश्वीन वद्य त्रयोदशी गुरुवार' हा योग शके १५२६ मध्ये येतो हे खरे, पण मग शके १७६६ चे काय करावयाचे? शिवाय शके १५२६ मध्ये ग्रंथलेखन करण्यास शान्तालिंगाप्पा हयात नव्हते त्याला काय करावयाचे? मोडकजंत्रीप्रमाणे शके १७६६ च्या आश्विन वद्य त्रयोदशीस शुक्रवार आहे; गुरुवारी द्वादशी आहे. म्हणजे तिथीचा व शकाचा मेळ बसत नाही असे वरवर पाहिले असता वाटते. जंत्रीमध्ये सूर्योदयाची तिथी दिलेली असते. शिवाय—

'यां तिथिं समनुप्राप्य उदयं याति भास्करः।
सा तिथिस्सकला ज्ञेया दानाध्ययनकर्मसु ॥'

अशी पद्धतीही आहे. तथापि कोणी कालनिर्देश अचूक करू इच्छित असेल तर तो दिवसाच्या त्या त्या वेळी असणारी तिथीही नोंदू शकेल. 'जनने मरणे चैव तिथिस्तात्कालिका स्मृता' असाही नियम आहे. शके १७६६ क्रोधीनाम संवत्सर आश्विन वद्य १२ गुरुवार या दिवशी सूर्योदयाला द्वादशी असून ती ३५ घटी ४८ पळांपर्यंत आहे. त्यानंतर गुरुवारीच त्रयोदशी सुरू होते. म्हणजे शके १७६६ मधील गुरुवारच्या आश्विन वद्य त्रयोदशीचा हा उल्लेख प्रतलेखन त्या दिवशी सायंकाळानंतर म्हणजे घटी ३५ पळे ४८ नंतर झाले असले पाहिजे असे सांगणारा आहे. म्हणजेच शके १७६६ आश्विन वद्य १३ गुरुवार हा कालोल्लेख अचूक आहे हे स्पष्ट आहे.

शके १५२६ हा जसा ग्रंथनिर्मितीचा काल नव्हे त्याचप्रमाणे शके १५४५ हा शान्तालिंगाप्पांचा समाधिशक नव्हे. ज्या दोन शकांवर भिस्त

ठेवून प्रा. आवळीकर कालनिर्णय करू पाहतात तेच असे ढासळत असल्याने एतद्विषयक त्यांचे सारे लेखन अपुऱ्या माहितीवर आणि कच्च्या संशोधनावर आधारलेले आहे असे नाइलाजाने म्हणावे लागते.

## शान्तपरंपरा

“ ‘शांतिपंचीकरण’ हा ग्रंथ पुरंदरे आणि कंपनी याणी पदच्छेद करून, टिपा देऊन व शुद्ध करवून “ गणपत कृष्णाजी प्रेस ”मध्ये छापून प्रसिद्ध केला. शके १८२३ सन १९०१ ” हा छापील ग्रंथही आवळीकरांनी पाहिला नाही. त्यांनी तो समग्र पाहिला असता तर तो जयरामस्वामींचा नव्हे असे स्पष्ट विधान कदाचित त्यांनी केले असते. तसे नाही म्हणूनच ‘ हेच नाव ( शान्तपरंपरा ) जयरामस्वामींनीही ‘ शांतिपंचीकरण ’ ग्रंथात दिले आहे ’, ‘ जयरामस्वामींच्या म्हणून दिलेल्या ‘ शांतिपंचीकरणा ’तील उताऱ्यात ’,‘ त्याचप्रमाणे एकविसाव्या ओवीतील सात नावे जयरामस्वामींच्या नंतर झालेल्या पुरुषांची आहेत. जयरामस्वामी ती नावे कशी देतात ? ’, “ ‘ शांतिपंचीकरण ’ हे जयरामस्वामींचेच मानावयाचे झाले तर, एकविसावी ओवी ही कोणी तरी नंतर घुसडली आहे ”, “ ‘शांतिपंचीकरणा’चा कर्ता दुसराच कोणी तरी असावा आणि तो दशरथ शन्तानंतरचा असावा ” अशी धरसोडीची विधाने त्यांना करावी लागली आहेत. छापील शांतिपंचीकरण[२] मी पाहिले आहे. शिवाय याची एक त्रुटित हस्तलिखित प्रत गुरुवर्य बाबूराव ऊर्फ धों. द. शान्त ( रा. संकेश्वर, जिल्हा बेळगाव ) यांच्याकडून मला मिळाली आहे. या दोहोंच्या आधारे मी निःशंकपणे म्हणू शकतो की हा ग्रंथ दशरथ शान्तांनी लिहिलेला आहे. छापील ग्रंथात ग्रंथनिर्मितिकालाच्या ओव्या छापल्या गेलेल्या नाहीत. मजकडील हस्तलिखितात त्या अशा आहेत—

२. हे ग्रंथनामही चुकीचे वाटते. यात पंचीकरणाचा विषय नाही. मजकडील हस्तलिखितात काही अध्यायांच्या शेवटी ‘ शांति-प्रकरण ’ असे नाव आढळले व तेच योग्य वाटले.

‘ शके सत्तराशे पंचतीस ।
चैत्र शुद्ध प्रतिपदा दिवस ।
श्रीमुखनाम संवत्सरास ।
भृगुवार वसंत ऋतु जाणावा ॥ ५८ ॥
रेवती नक्षत्र प्रथम प्रहरी ।
अमृतवेळ कल्याणकारी ।
श्रीशांतालिंग दत्तावतारी ।
वदला वैखरी दशरथ शांत ॥ ५९ ॥ ’

यावरून दशरथ शान्तांनी[३] हा ग्रंथ शके १७३५ त लिहिला हे उघड आहे. या ग्रंथाच्या परितसाव्या अध्यायातील ( छापील ग्रंथातील ) वीस आणि एकवीस यांमधील गळलेली ओवी अशी आहे—

‘ नीलकंठ काशीपती शांतमूर्ती ।
चाळीस जाले यथानिगुती ।

३. या सत्पुरुषांनी शके १७५८ आश्विन वद्य अष्टमीस देह ठेवला. ‘ इंद्रायणी ’च्या १९६२ च्या दीपावली अंकात ( वर्ष १, अंक १ ) श्री. रा. चिं. ढेरे यांनी ‘ शांतबोध ’ या त्रुटित स्वरूपात मिळालेच्या हस्तलिखिताचा “ शांतलिंगस्वामींचा ‘ शांतबोध ’ ” या लेखात परिचय करून दिला आहे. तेथे शेवटच्या परिच्छेदात ओवी-रचनेच्या भिन्नतेमुळे त्यांना आलेली शंका बरोबर आहे. ‘ शांतबोध ’ हा ग्रंथ शान्तलिंगाप्पांचा वाटत नाही. दशरथ शान्ताच्या ‘ शांतिप्रकरणा ’तील ओवी साडेचार चरणी आहे. म्हणून ‘ शांतबोध ’ दशरथ शान्तांचा असण्याची शक्यता आहे. शान्तपरंपरेत शान्तलिंगाप्पांच्या नंतर शान्तबोध किंवा शान्तबोधेश्वर, डफळापूरचे शान्तेश्वर, संकेश्वरचे शान्तलिंग ऊर्फ सातापा, आणि दशरथ शान्त असे सत्पुरुष होऊन गेले आहेत ( माझा ‘ ‘ शान्त ’ गुरुपरंपरा ’ हा लेख पहावा. ) यांपैकी एखाद्याने ‘ शान्तबोध ’ रचला असण्याची शक्यता आहे. तो प्रस्तुत शान्तलिंगाप्पांचा मात्र वाटत नाही.

श्रीकृष्ण क्लेशहरण जयराम गणती ।
निरंजन स्वामी त्रेच्याळ हे ॥ ’

प्रा. आवळीकरांच्या संशोधनास साह्य करावे या हेतूने मजकडील ‘परंपरा परम पुरुष आराधन’ हे सुखबोधकृत १२५ ओव्यांचे हस्तलिखित प्रकरण मी त्यांच्या स्वाधीन केले होते. ते हाती लागताच मला न विचारताच त्यावर एक लेख नवभारतात त्यांनी प्रसिद्ध केला होता. प्रस्तुत हस्तलिखित मजकडून मिळाल्याचा निर्देशही त्यांनी त्या लेखात केला नव्हता. पण पुढे हुबळीच्या एका कन्नड वर्तमानपत्रामध्ये नवभारतामधील त्या मराठी लेखाचे कन्नडमध्ये भाषान्तर करवून घेऊन स्वतःच्या नावावर छापताना मात्र टीपेत माझ्या नावाचा उल्लेख त्यांनी केला होता. ‘ शान्तपरंपरा ’ हा लेख प्रसिद्ध करण्याची त्यांना इतकी घाई झाली होती की त्यामुळे सखोल विचार करण्याची आवश्यकता त्यांना वाटली नसावी. या हस्तलिखित प्रकरणाचे नाव ‘ परंपरा परम पुरुष आराधन ’ असे असताना त्यातील ‘ परम ’ शब्द प्रा. आवळीकरांनी गाळून टाकला. हे मूळ हस्तालिखित या पुस्तकात ‘ शान्त गुरुपरंपरा ’ या नावाच्या लेखासह प्रसिद्ध केले आहे.

सुखबोधाला दशरथ शान्ताचा शिष्य न म्हणता दत्तात्रय शान्ताचा शिष्य असे प्रा. आवळीकरांनी म्हटले आहे, आणि दत्तात्रय शान्त हा दशरथ शान्ताचा पुत्र असेही सांगितले आहे. या ‘ दत्तात्रय शान्तां ’चा शोध आवळीकरांनी कोठून लावला हे समजत नाही. प्रस्तुत प्रकरणातील ‘ शांतलिंग संकेश्वरीं ॥ ३८ ॥ ... भागीरथी तयाची पत्नी ... ॥ ३९ ॥ ... किंवा अवतरली अनुसया । अत्री ऋषीची निज भार्या । तिचा उपकार फेडावया । दत्तात्रय जन्मले ॥ ४१ ॥ तोचि अवतार सत्य जाण । दशरथ शांत नामाभिधान । ... ॥ ४२ ॥ पूर्वसुकृत ठेवा पुरा । दत्तात्रय आले शांत उदरा । ... ॥ ४३ ॥ ’ या भागाचा अर्थच प्रा. आवळीकरांना समजलेला नाही. ‘ संकेश्वर येथील शान्तलिंगांची पत्नी भागीरथी म्हणजे जणू अनुसूयेचा अवतार. तिच्या पोटी दत्तात्रय अवतरले तेच दशरथ शान्त.’ हा सुखबोधाचा आशय पाहिला म्हणजे दशरथ शान्त हे दत्तावतार असे तो

सांगत आहे हे न समजल्याने दत्तात्रय हा दशरथ शान्तांचा पुत्र अशी विपर्यस्त माहिती प्रा. आवळीकर देतात. संकेश्वरातील शान्त घराण्याच्या वंशावळीत दत्तात्रय हे नावच आढळत नाही. ही वंशावळ पुढे देत आहे.[४]

## विवेकचिन्तामणीची भाषा आणि काव्यमयता

या मथळ्याखाली सुमारे १५ पृष्ठांचा मजकूर प्रा. आवळीकरांनी लिहिला आहे. एक तर ही संहिता अगदी अलीकडची आणि बरीचशी अशुद्ध. त्यामुळे भाषेचा विचार हा शके १७६६ च्या प्रतीच्या भाषेचा विचार ठरतो. शान्तलिंगाप्पांची भाषा ‘ कर्णहंसा ’त काहीशी आढळते. चुकीच्या संहितेचे भाषाशास्त्रीय विशेष सांगताना झालेल्या एका गमतीचे

४.




*यांनी ‘ शांतिप्रकरण ’ शके १७३५ त लिहिले. यांचा निधनशक १७५८

उदाहरण पाहा—वर्णविपर्ययाचे एक उदाहरण प्रा. आवळीकरांनी ‘सकळ < कळस’ असे नोंदले आहे (पृ. ६४). अक्षरांची उलटापालट होऊन झालेले लेखन वर्णविपर्ययाचे मानायचे झाल्यास अनवस्था प्रसंग ओढवेल. वर्णविपर्यय होण्यालाही काही कारणे असतात हे अभ्यासकांना सांगण्याची गरज नाही. काव्यदृष्ट्याही या ग्रंथाचे महत्त्व नजरेत भरण्यासारखे नाही. प्रतलेखकाच्या निष्काळजीपणामुळेही असेल पण ठिकठिकाणी प्रसादगुणाची हानी झालेली आहे.

विवेकचिन्तामणीतील तत्त्वज्ञानासंबंधी लिहिण्याचा माझा अधिकार नाही.

प्रा. आवळीकरांच्या संशोधनाला साह्य व्हावे आणि त्यांनी केलेल्या विधानांचा ऊहापोह करावा या इच्छेने हा लेख लिहिला आहे. सत्यासत्याची छाननी वाचकांनीही करावी. वाङ्मयेतिहासलेखकांना शान्तलिंगाप्पांच्याविषयी काही निश्चित विधान करण्यास या लेखाची मदत होईल.

उभयता विद्यापीठांच्या संयुक्त प्रकाशनांतून अधिक निर्दोष कृती बाहेर याव्यात व डॉ. आवळीकरांनी कर्नाटकातील वास्तव्याचा आणि आपल्या कष्टाळूपणाचा अधिकाधिक लाभ द्यावा अशी इच्छा व्यक्त करतो. आणि एक प्राचीन ग्रंथ मराठी वाचकांना उपलब्ध करून दिल्याबद्दल उभय विद्यापीठांचे–विशेषतः कर्नाटक विद्यापीठाचे आणि डॉ. आवळीकरांचे अभिनंदन करतो.

## : ८ :

# मुक्तेश्वराचे विराटपर्व

मुक्तेश्वराने आपली भारतावरील रचना करताना काही ठिकाणी मूळ संस्कृत कथेत [ मुक्तेश्वरापुढे संस्कृत महाभारताची एक वेगळीच संहिता असावी असेही एकवार वाटते. ] फेरफार केलेले आढळतात. आदिपर्व रचताना त्याने मूळचे सूत्र फारसे दृष्टीआड होऊ दिलेले नाही. उलट त्या काळी प्रचलित असलेल्या प्राकृत भारती कथा लक्षपूर्वक वाचल्यानंतर त्यांत आढळणाऱ्या फरकांमुळे काहीसा रागावून तो आपली नापसंतीही दर्शवितो. उदाहरणार्थ, द्रौपदी-स्वयंवराचा जो पण एका प्राकृत कवीने[1] सांगितला त्याविषयी तो लिहितो,

“ प्राकृत कवीचा वाग्जल्प । तैलकढाही पाहोनि रूप ।
फिरत मच्छाचा सकंप । वामनेत्र विंधावा ॥ ७२ ॥
परि तें मूळ भारतीं नाहीं । ह्मणोनि असो न बोलें कांही ।

१. पहा–( अ ) नामा विष्णुदास, महाराष्ट्र सारस्वत ( आ. चवथी ), पृ. २८५; ( आ ) विष्णुदास नाम्याचे ‘ द्रौपदी-स्वयंवर ’–ह. ना. नेने, महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका, एप्रिल–मे–जून १९५४, पृ. २८–३०; ( इ ) कथाकल्पतरु, स्तबक ८, अ. २६, ओ. ७६–७८. आठव्या स्तबकापासून या ग्रंथाची पुढची रचना मधुकर कवीची असून त्याने हा ग्रंथ शके १५४५ त पूर्ण केला ( कथाकल्पतरु, स्तबक १४, अ. ३२ ). मुक्तेश्वराने ही रचना पाहिली असेलच असे म्हणवत नाही. आणखी एक शंका आहे. चौदाव्या स्तबकाच्या बत्तिसाव्या अध्यायात ‘ मोरोबा पराडकर ’ ( ओ. ३५ ) असा मोरोपंतांचा उल्लेख आढळतो. एक तर ही ३५ वी ओवी प्रक्षिप्त मानली पाहिजे किंवा ‘ शके १५४५ ’ हा ग्रंथाच्या शेवटी येणारा कालनिर्देश चुकीचा ठरला पाहिजे. मोरोबा पराडकर मोरोपंताखेरीज अन्य असेल असे वाटत नसल्याने ही ओवी प्रक्षिप्त मानण्याकडे मन प्रवृत्त होते.

नळुकाछिद्रातुनि पाहीं । यंत्र भेदुनि पाडिलें ॥ ७३ ॥ ”

(आदिपर्व, अ. ४१. मजकडील हस्तलिखित). पुन्हा जरासंधवधाच्या वेळी ‘ खर्जुरीपर्ण ’ चिरून कृष्णाने भीमास जो संकेत[२] दाखविला त्याचा निषेध करताना तो म्हणतो,

“ कथा बोलिली ग्रंथांतरीं । संकेत दाविला मुरारीं ।
खर्जुरीपर्ण धरूनि करीं । मध्यभागीं चिरियेलें ॥ ६१ ॥
सव्य अपसव्य सांडितां करें । मग न जडतीच परस्परें ।
परी हें व्यासऋषीश्वरें । कथिलें नाहीं भारतीं ॥ ६२ ॥ ”

(सभापर्व, अ. ७. सं. प्रा. द. सी. पंगू). पण प्राकृत कवीच्या ‘ वाग्जल्पा ’ला किंवा ‘ ग्रंथान्तरीं ’च्या कथांना न अनुसरण्याचे हे धोरण मुक्तेश्वराने सर्वत्र सांभाळलेले नाही. व्यासांची संगती सोडून विस्तार केल्याबद्दल श्रोत्यांनी रागावू नये असे सांगताना “ सांडूनि व्यासाची संगती । चालों नये आणिके पंथीं । ऐसें जाणोनियां श्रोतीं । व्यर्थ विस्तार न मानावा ॥ २५२ ॥ (सभापर्व, अ. १२)” असे जसे तो नम्रतेने विनवितो तसेच “ व्यासें वाढितां जगातें । ग्रासु लागला वृध कवि तें । त्याचिये मुखींचीं उचीष्ट सितें । म्यां दुर्बळें वेचिलीं ॥ १७४ ॥ (हस्तलिखित सभापर्व, अ. ५)” असे एखाद्या ठिकाणी विनयाने सांगतो.

---

२. कृष्ण याज्ञवल्कीने (पहिले सात स्तवक याने रचिले) कथाकल्पतरूत हा संकेत तृणाचा आधार घेऊन सांगितला आहे. पहा—‘मग खुणाविलें गोपाळें। भीमसेनासी ॥ ९४ ॥ तृणाची करोनियां दुफोडी। कृष्णें सांडिली दे्व्हडी। मग तैसाचि चिरिला दों घडीं। जरासंध तो ॥ ९५ ॥ ऐसा टाकिला बहुत वेळे। परि मिळतां न राहती शकलें। मग मृात्तिकालिंग राचिलें। घडामाजी ॥ ९६ ॥ ऐसा मारिला महाजेठी । जरासंध महा हट्टी। परि तो नेला वैकुंठीं । श्रीकृष्णदेवें ॥ ९७ ॥ हे श्रीभागवतींची कथा। ......॥ ९८ ॥ अ. १६ ॥ स्तबक ४’. ‘मृत्तिकालिंगा ’चा व ‘ तृणा ’चा येथलि उल्लेख मुक्तेश्वरात नाही. ‘ कथाकल्पतरु ’ हा संपूर्ण ग्रंथ कृष्णयाज्ञवल्कीचा अशी डॉ. नांदापूरकरांची समजूत दिसते. पण आठव्या स्तबकापासूनची पुढची रचना मधुकराची आहे म्हणून पुढच्या रचनेचे संदर्भ देताना त्यांनी कृष्णयाज्ञवल्कीचा केलेला निर्देश उघडच चुकीचा आहे.

भारती काव्य लिहिताना पुढे पुढे केवळ व्यासांच्याच आश्रयाने जाण्याचा हेतू त्याने सोडून दिलेला आहे असे दिसते. विराटपर्व लिहिताना तर त्याने मूळ कथेत अनेक ठिकाणी फेरफार केल्याचे दिसून येते. ह्या फेरफारांचे आधार शोधणे आणि त्यांची सरसता वा निरसता ठरविणे अगत्याचे आहे. मुक्तेश्वरपूर्व मराठी भारतकथा संपूर्णपणे अद्यापि प्रसिद्ध झालेल्या नसल्याने हे ठरविणे काहीसे कठीण असले तरी उपलब्ध साधनांवरून काही विचार मांडल्यास ते अस्थानी ठरणार नाहीत. मात्र हे करताना मुक्तेश्वरावर अकारण अन्याय होऊ नये ही खबरदारी घेतली जाईल.

वनपर्वाच्या ( संपादक प्रा. पंगू, आ. २ री ) उपसंहारात ‘ पुढारें असे विराट अति अपूर्व ’ असा विराटपर्वासंबंधीचा मुक्तेश्वराचा अभिप्राय आहे. जैसा शर्व । दृष्टी दिसे तपांतीं ’ अशी त्याने तेथे वापरलेली उपमाही मोठी बोलकी आहे. पहिल्या तीन पर्वांचे कष्टदायक तप संपल्यानंतर आता अपूर्व विराटपर्व श्रोत्यांना शंकराप्रमाणे दिसणार आहे ही आनंदाची वार्ता तो अभिमानाने सांगत आहे. खुद्द विराटपर्वांत ( संपा. प्रा. पंगू ) ‘ नवरस-सुधेचा सुधार्णव । श्रवणइंद्रियाचें वैभव । अति अभिनव ( अ. १–४ )’ असे विराटपर्व मी सांगणार आहे, ‘ महाराष्ट्र काव्याचीये पंक्ति । गुरुत्व गौरव इये ग्रंथीं ( अ. ८–१२३ )’ असून आपली वाणी ‘ नवरसावरि सुगरणी । तृप्त करि सुखभोजनि । श्रवणद्वारें संतातें ( अ. २–९९ )’ असे आत्मविश्वासाने फुलून तो उद्गार काढतो. महाभारताच्या वाचकांनी आपल्या पारायणास विराटपर्वापासून सुरुवात करावी अशी प्रथा आहे. गोपिकाबाईने[३] सवाई माधवराव पेशव्यास केलेल्या ‘ तेरा कलमी उपदेशा ’त “ शास्त्री यांजवळ विराटपर्वापासून भारतातील चिंतनिका करीत असावी.” असा या परंपरेचा निर्देश आढळतो. म्हणून मुक्तेश्वराने केलेला स्वकथागौरव आणि व्यक्तविलेला आत्मविश्वास त्याला स्वतःला हे पर्व किती अपूर्व आणि अद्‌भुत वाटत होते याची साक्ष देतात. “ विश्वंभराचे ( अन्यपाठ– मुक्तेश्वराचिये ) ग्रंथसदनि । दूषणश्वान रिघेना ॥ ५ ॥ मूढें अल्पकें बोलति वचनें । ते मछरे अथवा नेणतपणें । गुणग्राहीक जिवें प्राणें । प्रेम करिति

३. ऐतिहासिक पत्रबोध–सं. रियासतकार गो. स. सरदेसाई, पत्रक्रमांक ५९.

या ग्रंथा ॥ ६ ॥ अ. १ (विराटपर्व)” असे त्याने म्हणून ठेवल्याने टीकाकारांची पंचाईत झाली आहे. आजच्या टीकाकारावर मात्सर्याचा आरोप येण्यासारखा नसला तरी ‘नेणतपणा’चा येण्याचा संभव आहे. म्हणूनही जपून लिहिणे प्राप्त आहे.

मुक्तेश्वरास अद्‌भुताची अतिशय आवड आहे. आपल्या रचनेत सर्वत्र ‘अद्‌भुत’, ‘अति अद्‌भुत’ अशा शब्दांचाही त्याने नजरेत भरण्याइतका वापर केला आहे. एका विराटपर्वांतच पुढील स्थळे आढळली—

(१) दुर्योधन दुःश्रीत चीत। बंधु मंत्रीया सावध करित।<br>
विराटनगरि अति आद्‌भुत। दुष्ट वार्ता अैकिजे ॥ ४४ ॥ अ. २

(२) अद्‌भुत माजला अविचारु। तोचि भासे भूतसंचारु।<br>
हृदयकाळिजीं खडतरु। कंदर्पसर्प झोंबिनला ॥ १० ॥ अ. ३

(३) हस्ते धरुनि असुडिला। किचक झोंबिये मिसळलां।<br>
दोघां संग्राम मांडला। अति अद्‌भुत तें काळीं ॥ १४० ॥ अ. ३

(४) रुद्रभुमिके तळवटिं। नीबीड वृक्षाचि बहु दाटि।<br>
तेथुनि प्रकटला जगजेठि। रुप आद्‌भुत अवलीळा ॥ २५ ॥ अ. ४

(५) हस्तें पिटोनियां भाळा। ह्मणे आद्‌भुत देखीजे डोळां।<br>
निरोपोनि मंत्रीयां सकळां। प्रेत दहन करविलें ॥ ३० ॥ अ. ४

(६) जरि ते जीवे जीत आसते। कोठें तरि चोजवते।<br>
आद्‌भुत करणीस्तव पावते। प्रसीद्धता लौकिकीं ॥ २० ॥ अ. ५

(७) विराटशेना सींधोदक। अति अद्‌भुत लोटतां देख।<br>
त्रीगर्त पातले संन्मुख। घोर संग्राम मांडला ॥ ७२ ॥ अ. ५

(८) पुष्टिभागीं बांधले हात। मोकळा केशी विराटनाथ।<br>
नेता देखोनि अति अद्‌भुत। हाहाकारु माजला ॥९०॥ अ. ५

(९) प्रतोद घेऊनियां हातिं। रथ लोटला सत्वरगति।<br>
विमानयानिं अमरपति। ह्मणे अद्‌भुत मांडलें ॥ ३४ ॥ अ. ६

(१०) येतां देखोनि येक रथ। अवघे ह्मणति आति आद्‌भुत।<br>
सकळीकांचे चक्षु तेथ। येके ठाईं मीनले ॥ ४५ ॥ अ. ६

(११) निग्रह करावा केवळ । अद्‌भुत बल्लवाचें बळ ।
ग्रंथीक आणी तंतीपाळ । सिद्ध आसति सन्मुखीं ॥ ४७ ॥ अ. ७

(१२) अभिमन्यु जाहालियां जामात । सोयरा जोडला कृष्णनाथ ।
विराट ह्मणे अति अद्‌भुत । भाग्य माझें त्रिलोकीं ॥ १ ॥ अ. ८.

हे त्याचे अद्‌भुताचे वेड आपण लक्षात घ्यायला हवे. अकराव्या अध्यायाचे वर्णन करताना ' जेथ शांताचेया घरा । अद्‌भुतु आला आहे पाहुणेरा । आणि येरां हिं रसां पांतिकरां । जाला मानु ॥ २ ॥ ' असे ज्ञानेश्वर सांगतात. मुक्तेश्वराच्या बाबतीत अद्‌भुताच्या घरी वेळोवेळी वेगवेगळे रस ' पाहुणेरा ' येतात असे दिसते.

पांडव अज्ञातवासात दडून राहाणेच अशक्य अशी मुक्तेश्वराची कल्पना होती. म्हणून प्रत्येक प्रसंगी ते उघडकीला येतील अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे तो प्रभावीपणे वर्णितो. विराटास तर त्यांच्या आगमनापासूनच त्यांच्याविषयी हरघडी संशय येतो. (अ. १–८३, ९८-९९; अ. २–१ ते १२, ९६; अ. ५–१३१; अ. ६–१७१ इ.). सुदेष्णाही द्रौपदी-विषयी अशीच साशंक झाली होती (अ. १–११९). विराटपर्वातील प्रत्येक प्रसंगामागे पांडवांचा पराक्रम असला पाहिजे असे कौरव आणि त्यांचे पक्षपाती मानत आलेले आहेत. प्रत्यक्ष समोर उभे राहून पांडव उघडकीस आल्याचे माप त्यांच्या पदरात कोणी घालीत नाही एवढेच. पाचव्या अध्यायात खुद्द धर्मही सुशर्म्यास ' जे जे द्रीष्टी त्वां देखिलें । मनें आसेल जे कल्पिलें । तें तें मुखें न बोले बोले । काळें प्रकट होतसो ॥ १२६ ॥ ' असे स्पष्टच सांगतो. पहिल्या अध्यायाच्या अखेरीस मुक्तेश्वर लिहितो—

' मांजरपीलिया अैसे काखे । कुंजरबाळ कैसेनि झाके ।
अंधकारि लपतां अर्कें । लोकद्रीष्टी न लोपे ॥ १२६ ॥

लपविता कस्तुरिपरिमळु । सर्वत्र प्रगट करि अनिळु ।
तेवि तयाचा गुप्त खेळु । भेरिनाद जगश्रवणीं ॥ १२७ ॥ (पंगुप्रत).'

आणखीही एक गोष्ट विचारात घेणे जरूर आहे. चुकीची संहिता प्रमाण मानूनही मुक्तेश्वरावर टीका झाली आहे. एक उदाहरण देतो.

वनपर्वाच्या चौथ्या अध्यायात ( प्रा. पंगूंची प्रत, आवृत्ती दुसरी ) प्रतिस्मृतिविद्या ( महाविद्याबीजमंत्र – मुक्तेश्वर ) व्यासांनी धर्मास दिली (ओ.७२) असेच मुक्तेश्वर सांगतो. त्यानंतरच्या, अर्जुनास उद्देशून व्यास बोलत असल्याच्या ७४ व ७५ या ओव्या प्रक्षिप्त आहेत. मजकडील वनपर्वाच्या तीनही हस्तलिखित प्रतींत त्या नाहीत. त्या तेथे आहेतच असे मानून " ' व्यासांचे आगमन नि अर्जुनाचे अस्त्रार्थगमन ' या प्रसंगात मुक्तेशांनी थोडा गोंधळ केला आहे " अशी टीका डॉ. नांदापूरकरांनी[४] केली आहे. त्यांनी मुक्तेश्वरावर घेतलेले काही आक्षेप संहितानिश्चितीनंतर दूर होतील असे वाटते.

संस्कृत आणि मराठी भारतकथा वाचून मुक्तेश्वराने आपली कथा रचिली असली तरी तो केवळ भाषान्तर वा उसनवारी करीत नाही. भारती कथेत आपल्या इच्छेप्रमाणे तो जसे संक्षेपविस्तार करतो तसेच अन्य प्राचीन ग्रंथांच्या आधारे तर केव्हा स्वतःच बदलही करतो. त्याला योग्य वाटल्यामुळेच त्याने ही फिरवाफिरव केली असली पाहिजे. विराटपर्व वाचताना काही बदल समर्थनीय वाटतात तर काही स्थळे मुक्तेश्वराच्या श्रेष्ठ प्रतिभेची आणि सहिष्णू व विशाल अन्तःकरणाची साक्ष देतात. अशा काही स्थलांचा विचार करण्याचे येथे योजिले आहे.

**दुर्गास्तवन**—मूळ महाभारतात हा ' दुर्गास्तव ' नसावा असे प्रा. रघुवीरांचे[५] मत आहे. पण परिशिष्टावरून[६] हे स्तवन अनेक प्रतींत–विशेषतः दाक्षिणात्य– असल्याचे आढळून येते. मुक्तेश्वराने पहिल्या अध्यायात ( ओ. ६८ ते ७८ ) विराटपूरप्रवेशापूर्वी धर्मराजाच्या तोंडी हे दुर्गास्तवन घातले आहे. यासंबंधी लिहिताना डॉ. नांदापूरकर आपल्या प्रबंधात ( पृ. ११४ ) म्हणतात, " शमीवर शस्त्रे ठेवून विराटनगरीत प्रवेश करताना धर्माने मनात दुर्गास्तवन केले, तर मुक्तेशांनी नगरात

४. मुक्तमयूरांची भारते, पृ. ९०.

५. Introduction, The Virataparvan – Bhandarkar Oriental Research Institute.

६. वरील ग्रंथ– 4 The Durgastava A to G.

शिरताच एक दुर्गाप्रासाद उभवून धर्मास त्यातील दुर्गेची स्तुती करावयास लाविले. ती मुळापेक्षा सुंदर नसली तरी बरीच वरच्या प्रकारची, स्वतंत्र आणि विस्तृत आहे. यांनी देवीचे मुळाप्रमाणे प्रत्यक्ष दर्शन देववून वरही देवविला." याच भागावरील तळटीपेत ते लिहितात, "ही स्तुती काही भारतांतच आहे. ...मुक्तेशांनी रचिलेली स्तुती संशोधित विराटपर्वाच्या परिशिष्टात निर्देशिलेल्या "$D^4$ $D^5$ $D^6$ and G" या प्रतींपैकी एकीवरून विशेषतः 'G'वरून घेतलेली दिसते." पण परिशिष्टातील सारी स्तवने वाचूनही असे म्हणावेसे वाटते की, दुर्गास्तवन येथे घालण्याची कल्पना फक्त मुक्तेश्वराने स्वीकारलेली आहे. येथील बहुश्रुतता, सहिष्णुता, आणि वृत्तीची विशालता ही खास त्याची वैशिष्ट्ये आहेत. दुर्गा ही एक राष्ट्रीय देवता आहे असे मुक्तेश्वराला वाटत असावे, आणि म्हणूनच साऱ्या धार्मिक पंथोपपंथांचे देवतात्व तिच्यात सामावले आहे असे तो दाखवितो. तिच्या स्वरूपात मुक्तेश्वराला बौद्धांची तारा,[७] शैवांची गौरी, शाक्तांची वज्रादेवी,

---

७. 'तारा' या शब्दावरील 'बृहस्पतीची पत्नी. ही उमाच अवतरली होती.' ही दा. के. ओकांची टीप ('काव्यसंग्रह'-ग्रंथमाला-३२ विराटपर्व, अ. १, पृ. ९) चुकीची आहे. प्रा. पंगूही 'टीपा व स्पष्टीकरण' देताना पृ. २३ वर "ओ. ७६-'तारा' या नावाने वेदामध्ये तूच अवतरली आहेस. तारा ही बृहस्पतीची पत्नी असून, दुर्गेचा अवतार म्हणूनच ती वेदात वर्णिली आहे." अशीच चूक करतात. प्रा. ओकांच्या पुढे 'सुगतागमीं' हा बरोबर पाठ तरी नव्हता. 'सुगत' म्हणजे गौतम बुद्ध. म्हणून 'सुगतागम' म्हणजे बौद्ध धर्मग्रंथ. 'पाइअसद्दमहण्णवो'मध्ये 'तारा-६ बौद्धोंकी शासन-देवी (कुप्र. ४४२)' अशी माहिती आहे. या तारेच्या स्तुतिपर काही स्तोत्रे 'ज्ञानकोश प्रस्तावना खंड विभाग ४ था (बुद्धोत्तर जग)' मध्ये उल्लेखिलेली आहेत ती अशी— '१. आर्यतारास्रग्धरास्तोत्र- काशिकी कवी सर्वज्ञमित्र याने अवलोकितेश्वराची अर्धांगी तारा इच्या स्तुतिपर लिहिलेले गुणमय स्तोत्र काव्य. २. आर्यतारा-नामाष्टोत्तरशतकस्तोत्र- आर्य तारेच्या १०८ नावांचे स्तोत्र. ३. एकविंशतिस्तोत्र- तारा देवतेच्या प्रार्थनापर पद्यांची विस्कळित माला.' (प्रकरण ११ वे, पृ. २४२).

जैनांची पद्मावती, वैदिकांची त्रिपदा गायत्री, सांख्यांची व्यापक आदी शक्ती या साऱ्या दिसतात. थोडक्यात ती विश्वमाता आहे. हे स्तवन असे–

“ नगरप्रवेसीं नरशार्धुळा । दुर्गाप्रासाद देखिला डोळां ।
दुर्गा भगवति विशाळा । लोटांगणीं वंदिली ॥ ६७ ॥
धर्मराज करि स्तवन । विस्वमाते तुते नमन ।
तुजवेगळें ब्रह्म आन । हें सर्वथा घडेना ॥ ६८ ॥
ब्रह्मा शंकरु आणि हरि । बाळकें जन्मलि तुझे उदरिं ।
वर्तति आपुले व्यापारिं । तुझी आज्ञा जननीये ॥ ६९ ॥
तुझी आज्ञा भंगीता देख । ब्रह्मां जाहाला चतुर्मुख ।
लिंगपतन त्रीयंबक । कपाळपाणी त्वां केला ॥ ७० ॥
विष्णुषिं देउनि बहु सोंगें । बहुत खेळसि आंगें ।
लागतां वृंदेचिये मार्गें । श्मशानवासी तो केला ॥ ७१ ॥
शक्राआंगीं पडिलि भगें । शशांक व्यापीला क्षयरोगें ।
तो तुझेनि आज्ञाभंगें । अविधीमार्गें वर्ततां ॥ ७२ ॥
करुं नये तें कर्म करणें । श्रेष्ठीं वर्जीता राहटणें ।
तेची तुझी अवज्ञा जाणे । वेदवचन यथार्थ ॥ ७३ ॥
तो आमुतें घडला दोषु । ह्मणवोनि भोग आरण्यवासु ।
आता उगवुनि कृपादिवसु । निशा नासी अवदशा ॥ ७४ ॥
जें जें व्यक्ताव्यक्त दिसे । तें तें श्वरुप तुझेची असे ।
तुझेनिच येके अंशें । विश्व सगळे चालिजे ॥ ७५ ॥
तारा तुचि सुगतागमीं । गौरी भगवति शैव धर्मीं ।
वज्रादेवि यया नामीं । कौळिकाच्यारिं बोलिजे ॥ ७६ ॥
जैन म्हणति पद्मावति । त्रीपदा गाइत्रि वेदमति ।
सांख्य बोलति तुजप्रति । आदी शक्ती व्यापक ॥ ७७ ॥
आवतार धरुनियां गोकुळीं । जन्मलीसी नंदा कुळीं ।
कंसकुळा करुनि होळि । चैध्य मागध अटिले ॥ ७८ ॥ (पंगुप्रत).”

‘ महालक्ष्मीची आरती ’ लिहिताना मुक्तेश्वराने तिचे असेच वर्णन केले

आहे. ही 'करवीरपुरवासिनी' (मुक्तेश्वराची ही कुलदेवताही आहे.) या 'दुर्गे'चीच प्रतिमा दिसते. प्रस्तुत आरतीतील तिसरे कडवे या दृष्टीने पाहण्यासारखे असल्याने ते येथे उद्धृत करीत आहे—

"तारा, शक्ति अगम्या, शिवभजकां गौरी।
सांख्य म्हणती प्रकृती निर्गुण निर्धारीं।
गायत्री निजबीजा निगमागम सारी।
प्रगटे पद्मावती निजधर्मांचारीं.[८] ॥ जय देवी० ॥"

(काव्यसंग्रह. ५४. मुक्तेश्वरकृत स्फुट काव्ये, पृ. २८९).

८. येथे 'जिनधर्मांचारीं' असा पाठ असावा. म्हैसूर राज्यातील शिमोगा जिल्ह्यात हुमच या गावी पद्मावतीचे जैनमंदिर आहे. 'जैनशिलालेखसंग्रहः (द्वितीयो भागः)'मध्ये क्र. १९७, १९८, २१३ इत्यादी शिलालेखांत 'पद्मावती-लब्ध-वर-प्रसादासादित" असे शब्द आढळतात. 'श्रवणबेल्गोल और दक्षिण के अन्य जैन-तीर्थ' या राजकृष्ण जैनांच्या पुस्तकात (पृ. ५५) '४. कत्तलेबस्ति' या मथळ्याखाली पुढील माहिती आढळते—"यह मन्दिर १२४ फुट लम्बा और ४० फुट चौड़ा है। चन्द्रगिरि पर यह सबसे बड़ा मान्दिर है। गर्भगृहके चारों ओर प्रदाक्षिणा है। नवरंग से मिला हुआ एक सभा-भवन भी है और एक बाहरी बरामदा भी। बाहरी ऊँची दीवार के कारण इस मन्दिर में अन्धेरा रहता है। इसलिए इस मन्दिर का नाम कत्तलेबस्ति (अन्धेरेवाला मन्दिर) पड़ा है। बरामदे में पद्मावती की मूर्ति है। इसीसे इसे पद्मावती बस्ति भी कहते हैं। इस मन्दिर में प्रथम तीर्थङ्कर भगवान ऋषभदेव की ६ फुट ऊँची मनोहर प्रतिमा है। दोनों बाजुओं पर दो चौरीवाहक खड़े हुए हैं। मन्दिर के ऊपर का दूसरा खंड जीर्ण अवस्था में होने के कारण बन्द कर दिया गया है। यह मन्दिर होय्सल नरेश विष्णुवर्द्धन के सेनापती गङ्गराज ने अपनी मातुश्री पोचव्वे के हेतु सन् १११८ ई० के लगभग निर्माण कराया था।"

'स्तवानिधि' ऊर्फ तवंदी (बेळगाव जिल्हा) या जैनांच्या तीर्थस्थानीही पद्मावतीचे मंदिर आहे. कोल्हापुरात पद्माळ्यावर (रेसकोर्सजवळ) पद्मावतीचे जैनमंदिर आहे. कोल्हापूरच्या महालक्ष्मीस पूर्वी 'पद्मावती' म्हणत असत व हे मंदिर जैनांचे होते असे सांगितले जाते.

एका देवतेत अशा अनेक देवतांचे स्वरूप पाहण्याची कल्पना मुक्तेश्वरास हनुमन्नाटकाच्या पहिल्या अंकातील पुढील श्लोकावरून कदाचित सुचली असावी—

" यं शैवाः समुपासते शिव इति ब्रह्मेति वेदान्तिनो
बौद्धा बुद्ध इति प्रमाणपटवः कर्तेति नैयायिकाः।
अर्हन्नित्यथ जैनशासनरताः कर्मेति मीमांसकाः
सोयं वो विदधातु वाञ्छितफलं त्रैलोक्यनाथो हरिः ॥ ३ ॥ "

हाच श्लोक बेलूरच्या (म्हैसूर राज्य) चन्नकेशवमंदिराच्या आवारातील, बाराव्या शतकातील शिलालेखात[१] किंचित फरकाने आढळतो तो असा—

" यं शैवास्समुपासते शिव इति ब्रह्मेति वेदांतिनो
बौद्धा बुद्ध इति प्रमाणपटवः कर्त्तेति नैयायिकाः।
अर्हश्चेति ह जैन-शासन-मतिः कर्म्मेति मीमांसकाः
सोऽयं वो विदधातु वांछितफलं श्रीकेशवेशस्सदा ॥ "

'संक्षेपरामायण' लिहिताना मुक्तेश्वराने 'हनुमन्नाटक' चांगले अभ्यासिले होते असे स्पष्ट दिसते. त्याप्रमाणेच मुक्तेश्वराने खूप भ्रमंती– विशेषतः दक्षिण भारतात– केली होती असे त्याच्या ग्रंथांवरून म्हणता येते. या भ्रमन्तीत हा शिलालेखही कदाचित त्याने पाहिला असावा. शैव-वैष्णवांच्या झगड्याविरुद्ध तुटून पडणाऱ्या मुक्तेश्वराने अशी व्यापक भूमिका घ्यावी हे रास्तच आहे. मुक्तेश्वराच्या या विशाल वृत्तीची दखल टीकाकारांनी आजपर्यंत घेतलेली नाही.

'युगवाणी' मासिकाच्या जानेवारी १९५८ च्या अंकात डॉ. विद्याधर जोहरापूरकर यांनी 'मुक्तेश्वरोक्त देवता : एक टीप' या नावाचा एक छोटा लेख लिहिला आहे. त्यात मुक्तेश्वरानंतर सुमारे एक शतकाने झालेल्या जैन कवी जिनसागराची (शके १६४३ मधील आदित्यव्रतकथेपासून शके

---

१. Epigraphia Carnatica [ Mysore Archaeological Series Vol. V ( part I ) ]—By B. Lewis Rice, 1902, page 99.

१६६६ मधील जीवंधरपुराणापर्यंत याच्या विविध रचना उपलब्ध आहेत असे डॉ. जोहरापूरकर सांगतात.) माहिती आली आहे. या कवीने लिहिलेले पद्मावतीस्तोत्र विदर्भातील जैन समाजात सुपरिचित असल्याचे सांगून मुक्तेश्वराच्या दुर्गास्तवातील काही भागाशी समान असणारा पुढील श्लोक ते उद्धृत करतात—

> " तारा तू सुगतागमी, भगवती श (शै) वागमी बोलिली।
> वज्रा कौलिक वानिली जिनमती पद्मावती वर्णिली ।।
> गायत्री प्रतिपाद्य वेद म्हणवी सांख्यागमी मानिली।
> हे माया प्रकृती असी बहुत हे पद्मावती चांगली ।। ३ ।। "

प्रस्तुत लेखात 'तारा' ही महायान बौद्ध संप्रदायात एक प्रसिद्ध देवता असून नेपाळातील बौद्ध अद्यापिही मंत्रतंत्रादिकांनी या देवतेची पूजा करतात असे ते सांगतात. पद्मावतीविषयी ते लिहितात, " जैनांची पद्मावती ही तेविसावे तीर्थंकर पार्श्वनाथ (सनपूर्व ८७७–७७७) यांच्यावर निस्सीम भक्ती असणारी एक गौण देवता आहे. ही पूर्वजन्मी एक नागिणी होती व मरणासन्न अवस्थेत पार्श्वनाथांचा उपदेश ऐकल्यामुळे तिला नागकुमारदेवतांच्या इंद्राणीचे पद प्राप्त झाले अशी कथा जैन ग्रंथात आढळते."

**विराटगृही जाण्याचा पांडवांचा क्रम**— गुप्त वेषाने विराटाच्या दरबारी जाण्याचा पांडवांचा क्रम संस्कृत भारतात धर्म, भीम, द्रौपदी, सहदेव, अर्जुन व शेवटी नकुल असा आढळत असल्याचे सांगून मुक्तेश्वरावर टीका करताना आपल्या प्रबंधात (पृ. ११५) डॉ. नांदापूरकर लिहितात, " व्यासांनी धर्म–भीमानंतर द्रौपदीचा प्रवेश घालून, हे पांडव नव्हेत अशी दिशाभूल केली. यात रचनाकौशल्य आहे. मुक्तेशांच्या साध्या मांडणीने यातील स्वारस्य लोपले." पण मूळ संस्कृत भारतात व्यासांनी, वयोमानाप्रमाणे ज्येष्ठाने आधी जाण्याचा क्रम अनुसरला आहे असे मुक्तेश्वराच्या बाजूनेही म्हणता येते. संशोधित संस्कृत विराटपर्वाच्या प्रस्तावनेत प्रा. रघुवीर म्हणतात, "Secondly, the entry of Pandavas

and Draupadi into the Virata capital is in the order of their ages in S, viz. Yudhisthira, Bhima, Arjuna, Sahadeva, Nakula and Draupadi (Page XVIII)" मुक्तेश्वरापुढे अशी एखादी दाक्षिणात्य प्रत असल्याने त्याने हा क्रम स्वीकारला. 'चम्पूभारतम्'च्या या स्तबकात वयोमानाप्रमाणे जाण्याचा हा क्रमच स्वीकारलेला आहे. नंतरच्या काळात विराटपर्वावर रचना करणाऱ्या 'हरि वामना'ने मुक्तेश्वरी क्रम मानला आहे. कन्नड[10] कवी कुमारव्यासात हाच दाक्षिणात्य प्रतीतील क्रम आढळतो. तेव्हा असलाच तर रचनाकौशल्याच्या अभावाचा हा दोष मूळ संस्कृतातच असल्याने मुक्तेश्वरास दोषी धरणे चुकीचे आहे.

**जीमूतिवध**— मूळ भारतात विराटगृहीच्या ब्रह्मोत्सव-प्रसंगी (उत्साहकृत्य–मुक्तेश्वर, अ. २–३५) जीमूतीच्या[11] होणाऱ्या आगमनामागे दुर्योधनाचा हात दिसत नाही. पण तो तसा असल्याचे दर्शवून मुक्तेश्वराने या प्रसंगात अधिक परिणामकारकता आणली आहे, आणि पांडवांच्या शोधासाठी कौरव सदैव कसे धडपडत होते हेही दर्शविले आहे. दुर्योधनाच्या आज्ञेनेच जीमूती विराटगृही येतो (संधी ४) असे कन्नड कवी कुमारव्यासाने म्हटले असले तरी हा प्रसंग त्याने कीचकवधानंतर वर्णिला आहे. मधुकर कवीने कथाकल्पतरूत हा प्रसंग (स्तबक ९, अ. १०) कीचकवधोत्तरच रंगविला असून त्यालाही दुर्योधनाची प्रेरणा मान्य आहे. हरि वामनाने हा प्रसंग (अ. ४) कीचकवधानंतर सांगितला असून जीमूतीच्या आगमनामागे त्यानेही दुर्योधनाचा हेतू चिकटविला आहे. सुयोधनाकडून एक मल्ल कीचकवधापूर्वी विराटगृही येतो व भीम त्याला ठार मारतो असे कन्नड कवी पंपाने आपल्या 'भारतम्'मध्ये दाखविले असले तरी या मल्लाचे नाव 'विषखर्पर' असे असल्याचे तो

१०. या लेखात आलेले कन्नड कवींचे संदर्भ त्या त्या ग्रंथांच्या अनुक्रमणिका कष्टाने वाचून दिलेले आहेत.

११. 'जीमुतवाहन' असाही शब्द मुक्तेश्वर काही स्थळी योजितो.

सांगतो ( आश्वास ८ ). या घटनेमागील दुर्योधनाची प्रेरणा अशा रीतीने काही कन्नड-मराठी ग्रंथांत आढळते. संस्कृतात आधार असावा असे वाटते.

**द्रौपदीची व्यक्तिरेखा**— मुळातील द्रौपदीच्या व्यक्तिरेखेत, काही प्रसंगांत फेरफार करून मुक्तेश्वराने आपल्या काळास अनुसरून बदल केला आहे. मुळातील विस्तृत द्रौपदीवर्णनाचा संक्षेप 'पद्मिणी' (अ. १. ११४) या एकाच विशेषणाने तो करतो. सैरंध्रीच्या सौंदर्याने विराटाधिप तिजकडे आकृष्ट होईल अशी भीती सुदेष्णेला वाटते पण आपल्या गंधर्वपतींचा उल्लेख करून द्रौपदी तिच्या मनातील संशय दूर करते हे सांगण्याची गरज मुक्तेश्वराला वाटलेली नाही. तथापि 'यो मे न दद्यादुच्छिष्टं न च पादौ प्रधावयेत्' (अ. ८–२९) या द्रौपदीच्या दोन्ही अटींचा "उच्छिष्ट अन्नाचे भोजन। पराचे चेरणप्रक्षाळण। हे दोनि कामे करुनि भीन्न। दास्य करिन मी तुझें ॥ १२२ ॥ अ. १" असा अनुवाद त्याने केला आहे.

पुढे कीचकाकडून झालेल्या अपमानानंतर तेजस्वी द्रौपदीने शीघ्रकोपी भीमाकडे जाणे साहजिक होते. मुळात ती तशी भीमाकडेच जाते आणि कठोर शब्दांनी धर्मांची निर्भर्त्सना करून स्वतःसह सर्वांच्या दुःस्थितीचे करुणोद्वेगजनक वर्णन करते. पण धर्मांची ही कडक निर्भर्त्सना संस्कृत भारतातील भीमाप्रमाणेच मुक्तेश्वराला आवडलेली नसावी. प्रतिव्रता स्त्रीच्या तोंडी नवऱ्याला इतके टाकून बोलणारी भाषा नसावी असे तत्कालीन परिस्थितीप्रमाणे किंवा त्याच्या आदर्श पातिव्रत्याच्या कल्पनेमुळे त्याला वाटले असणे संभवनीय आहे. त्यामुळे द्रौपदीच्या येथल्या तेजस्वीपणाला काहीसे वैगुण्य आले आहे असे काहींना वाटत असले तरी तिच्या तोंडून बाहेर पडणारी प्रखर पतिनिंदा टळली आहे. यासाठी त्याने द्रौपदीला भीमाकडे जाऊ न देता धर्माकडे नेले आहे. ज्याच्या विरुद्ध आग पाखडायची त्याच्यासमोरच तिला नेण्याने तिचा त्वेष मवाळेल हा मुक्तेश्वराचा अंदाज बरोबर ठरला आहे. तशात सभास्थानीच्या तिच्या बोलण्यानंतर व दीर्घ रुदनानंतर भीमसेन वृक्षाकडे अवलोकीत होता, ते त्या वृक्षाने कीचकास झोडपण्याच्या उद्देशाने, हे लक्षात येताच कंकाने व ( तेथे उपस्थित असण्याचे कारण नसता ) अर्जुनाने 'स्वस्छ गा विरपाळा।

त्याचें उसीणें स्वल्प काळा । प्राणनाश पावेल ( अ. ३–५६ )' असे म्हणून भीमास आवरले होते हे तिच्या लक्षात आहे. धर्माच्या अनुज्ञेविना भीम आता काही करणे शक्य नव्हते. म्हणूनही तिने धर्माकडे जाणे इष्ट असे मुक्तेश्वराने ठरविलेले दिसते. द्रौपदी धर्माकडे गुप्ततेने आल्यानंतर व तिचा शोक ( अ. ३–ओ. ६३ ते ७३ ) ऐकल्यानंतर धर्म तिला म्हणतो, " अैक गुह्यार्थ । भिमशेना जाणवि मात । करिल शत्रूचा नीःपात । अर्ध क्षणु न लगतां ॥ ७४ ॥ च्यारि मास दिवस गणने । उरले म्हणवुनि लागलें साहाणें । ये-हवि किचक जातां प्राणें । तेची काळीं जाण पां ॥ ७५ ॥ आतां स्वस्छ करुनि मन । वृतांत अैकतां भीमशेन । करिल किचकाचें हनन । हें निर्धारें जाण पां ॥ ७६ ॥ अ. ३ " म्हणजे चार लोकांसमक्ष बल्लवाने कीचकघात करू नये, म्हणून सभास्थानी धर्माने त्यास आवरले व आता त्याने कीचकहनन गुप्तपणे करावे अशी अनुज्ञाही धर्मानेच दिली. धर्माचे व द्रौपदीचे हे वागणे अशा रीतीने विचार केल्यास सुसंगत ठरते. आता भीमास ही धर्मानुज्ञा कळली की पुढचे काम सोपे होते.

याच वेळी भीम तेथे येतो तो दैवगतीने ( अ. ३. ७७ ) असे मुक्तेश्वर म्हणतो. यामुळे पुढचा त्रास वाचून याच ठिकाणी भीमास धर्माची अनुमती कळली आहे. पण या प्रसंगावर साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास आणि डॉ. नांदापूरकर या दोघांनी आक्षेप घेतले आहेत. श्री. हरदास लिहितात, " अज्ञातवासात पांडव असता हवी तेव्हा एकान्तात द्रौपदी पतीची गाठ घेऊ शकत नव्हती हे साधेही वर्णनाच्या भरात मुक्तेश्वराच्या ध्यानात राहिले नाही व शेवटची कमाल म्हणजे युधिष्ठिर व द्रौपदी एकान्तात बसली असताना भीम तेथे आल्याचे मुक्तेश्वर वर्णन करतात. अशा स्थितीत बंधूंपैकी कोणी प्रवेश केल्यास त्याने तीर्थयात्रेस जावे असा पांडवांचा संकेत होता हेही मुक्तेश्वराच्या ध्यानात राहिले नाही." ( महाराष्ट्र, नागपूर, १२ सप्टेंबर १९५३ ). डॉ. नांदापूरकरही असाच आक्षेप घेताना म्हणतात, " " शय्यासदनाच्या एकान्तीं " ते दोघे ( धर्म व द्रौपदी ) संवादत असता, भीमसेनाच्या आकस्मिक आगमनाने

तर तो ( = गोंधळ ) फारच वाढतो. हे भीमागमन मुळाच्या तर विरुद्ध आहेच, पण यांनीच आदिपर्वात द्रौपदीची जी वाटणी केली तिच्याही विरुद्ध आहे. यावरून रचनेच्या आवेशात मुक्तेश्वर मागील पुढील गोष्टींचा संबंध ठेवीत नाहीत हेच दिसते. असो." ( मुक्त मयूरांची भारते, पृ. १२० ). पण मूळ ग्रंथात द्रौपदी गुप्तपणे भीमसेनाकडे जातेच की नाही ? ती येथे युधिष्ठिराकडे गेली आहे एवढेच. शिवाय अज्ञातवासात असताना, म. म. हरदास व डॉ. नांदापूरकर समजतात तसा द्रौपदीचा पतीशी एकान्त होत होता असे मानण्याला कोणत्याही विराटपर्वात आधार नाही. आणि म्हणूनच भीम तेथे आला तरी त्याला तीर्थयात्रेला जाण्याची आवश्यकता नव्हती. अज्ञातवासातही पांडवांच्या ( यांत द्रौपदीही आलीच ) परस्पर भेटी होत असत असे विराटपर्वाच्या ( संशोधित प्रत ) बाराव्या अध्यायात व्यासांनी सांगून ठेविले आहे. मुक्तेश्वरानेही 'निशाकाळिं येकांतसदनिं । संवादति समस्तें ॥ २१ ॥' असे दुसऱ्या अध्यायातच आधी वाचकांना कळवून ठेवले आहे. पुढे सातव्या अध्यायात तर त्याने 'युध्य करुनि आलियां रातिं । पांचही बैसले येकांतिं । नीकट द्रुपदी महासति । संवादति तें अैका ॥ ३४ ॥' असा सहाही जणांच्या एकान्त-संवादाचा स्पष्टपणे उल्लेख केला आहे. तेव्हा या पद्धतीप्रमाणे आणि शंकाच असली तर मुक्तेश्वराने म्हटल्याप्रमाणे दैवगतीनेही या वेळी भीम धर्माकडे आला आहे. कीचकाच्या संदर्भात धर्माशी विचारविनिमय करावयाचा उद्देश धरून तो तेथे येणे स्वाभाविक होते. द्रौपदीची संतप्तता आणि शोकाकुल अवस्था पाहून तो पुढे झाला आहे. तेथेच व त्याच वेळी कीचकाच्या वधाचे आश्वासन तो तिला देतो. एवंच, म. म. हरदास आणि डॉ. नांदापूरकर समजतात तो दोष मुक्तेश्वराच्या माथी मारणे अन्यायाचे होईल. अशा प्रकारचा बदल अन्यत्र आढळत नाही. म्हणून तो विसंगत वाटणार नाही याची मुक्तेश्वराने काळजी घेतलेली आहे. ( द्रौपदीच्या व्यक्तिरेखेसंबंधी आणखी थोडा विचार पुढे 'उत्तरेस रहस्य सांगणे' या सदराखाली केला आहे. )

**कीचकाची उत्कंठा**—द्रौपदीशी संकेत ठरल्यानंतर नृत्यागारामध्ये भीमाआधी कीचक जाऊन बसत असल्याचे दाखविण्यात मुक्तेश्वराला कीचकाची कामोत्कंठा परिणामकारक रीतीने सांगावयाची होती हे उघड आहे. कीचकाची उत्कंठा शिगोशीग भरली होती. सूर्य 'लागवेगें' अस्तमानास जात नव्हता म्हणून त्याला तो 'मंदट्ट' (अ. ३. १३०) म्हणतो. मधुकर कवीचा कीचक नाट्यशाळेत आधी जातो, इतकेच नव्हे तर 'बृहन्नटासि गर्वें ह्मणे। आजि तुह्मीं अन्यत्र जाणें। आह्मां येथें करणें निद्रा। येरू निघाला तत्क्षणें ॥ ८० ॥ अ. १०, स्त. ९' आणि मग 'भीम नटोनी स्त्रीवेषें। आला सैरंध्रीस्वरूपता ॥ ८४ ॥.' हरि वामनाने कीचकाला नृत्यागारात भीमाआधी नेऊन बसविले आहे. मुक्तेश्वराने ही योजना आधीपासून ठरविली होती. द्रौपदीस आश्वासन दिल्यानंतर भीम म्हणतो, "किचकें तेथें केलियां शयन। माझें होइल आगमन। पुढां होइल माहाकंदन। तें ऐकाल समस्त ॥ ८८ ॥ अ. ३". कीचकाशी संकेत ठरल्यानंतर पुन्हा भीमास द्रौपदी म्हणते, "नृत्यशाळे तो आलियां। तुवां जावें तया ठायां... ॥ १२८ ॥ अ. ३".

**मल्लयुद्धवर्णने**—भीम-जीमूता आणि भीम-कीचक अशी दोन मल्लयुद्धे विराटपर्वात आहेत. मल्लयुद्ध आणि कुस्ती यांत फरक आहे हे ध्यानात घेतले पाहिजे. मल्लयुद्धात पराभूतास ठार मारले जाते, तर कुस्तीत पराभूत जिवंत राहू शकतो. या दोन्ही प्रसंगांच्या चित्रणात मुक्तेश्वराने 'अद्‌भुत' आवेश, गतिमानता आणि चित्रमयता आणल्या आहेत. या प्रसंगांची स्तुती करताना ह. भ. प. पांगारकर[१२] लिहितात, "कुस्तीतले डावपेच मुक्तेश्वराला जात्या माहीत होतेसे दिसते."; तर डॉ. नांदापूरकर[१३] म्हणतात, "यावरून त्यांना बाहुयुद्धे वर्णिण्याची आवड दिसते, पण त्यात मल्लविद्येचे ज्ञान नसते (पृ. ११६). ...येथेही (भीम-कीचक-युद्धात) मुक्तेश्वरी रचनेत पेचांचे नाव नसून प्राणान्तक मारामारी आहे

१२. कविवर्य मुक्तेश्वर, चरित्र आणि काव्यविवेचन, पृ. ७९.

१३. मुक्तमयूरांची भारते.

(पृ. १२५)." पण येथे मुक्तेश्वराला डावपेचांचे नावनिशीवार वर्णन घालायचे नव्हतेच. भीमाने या वेळी पत्करलेल्या पेशाला अनुसरून त्याच्या काही क्रियांचे वर्णन करून मुक्तेश्वराला येथे विनोदही निर्माण करावयाचा आहे हे कोणीच लक्षात घेतलेले दिसत नाही. शिवाय या दोन्ही प्रसंगांच्या वर्णनांत मुक्तेश्वराने जी भिन्नता दाखविली आहे तीही चित्तवेधक आहे. जीमूतीशी झालेल्या युद्धातील विनोदाचे हे चित्र पहावे—

'कांडणें कुटणें परिघाटणें । पाटा पसरुनि वरि लाटणें ।
पाकक्रियेचि लक्षणें । तुज दावणें जेठिया ॥ ७४ ॥
हस्तघातिं पादघातिं । पाडुनि अनुकार दावि क्षिति ।
अैसें उलथिजें म्हणुनि हातिं । देहे टाकी पालुथे ॥ ७५ ॥...
मग उचलोनि वाइंला सीरिं । सहश्र फेरे चक्राकारिं ।
भवडुनि टाकिला धरेवरि । पक्वफळासारिखा ॥ ७७ ॥
अैसा फोडिजे नारेळ । म्हणुनि पायें ताडिलें मौळ ।
मुर्च्छा दाटुनियां प्रबळ । पंचप्राणा मूकला ॥ ७८ ॥
पुतळे बांधिले जिये पाइं । तो चरण छेदिला हस्तघाइं ।
वृक्षशाखा टाकिजे भुइं । तैसा खंडुनि सांडिला ॥ ७९ ॥ अ. २'

यात कांडणे, कुटणे, ठेचणे, लाटणे, उलथणे, पक्वफळ (भोपळा वगैरे) किंवा नारळ फोडणे अशा अहिंसक स्वयंपाकातील क्रियांचे वर्णन आले आहे. आणि आता कीचकाशी झालेल्या युद्धातील विनोदाचे हे चित्र पहावे—

'पडतां उचलोनी शिरीं । भवंडुनि टाकिला पृथ्वीवरि ।
सव्य पाय रोऊनि सीरीं । हस्त दोन्ही उपडिले ॥ १५३ ॥
अंगुष्ट रोऊनि नाभिस्छानी । छेदुनि सांडिले चरण दोन्ही ।
शिर पीळोनियां धरणि । भिन्न करुनि टाकिलें ॥ १५४ ॥
जैसा किरात शस्त्रघातें । च्यारी पाद ग्रीवा हातें ।
छेदुनियां हो कुर्मातें । भिन्न करि भक्षावया ॥ १५५ ॥
तैसे निवटुनि अस्तीजाळ । शरीर केले मांशगोळ ।...१५६॥ अ. ३'

पुढे चौथ्या अध्यायाच्या सहाव्या ओवीत ‘ पादपक्ष ग्रीवाहिन । कुर्कुट सांडि छिन्न भिन्न ’ असे पुन्हा सांगून मांसाशन करणारांच्या स्वयंपाकातील क्रिया येथे आहेत हे मुक्तेश्वराने स्पष्ट केले आहे. या मल्लयुद्धातील हे वेगळेपण वाचकांनी, संपादक टीकाकारांनी टिपायला हवे.

**उत्तरेस रहस्य सांगणे**— चौथ्या अध्यायात मुक्तेश्वराच्या अर्जुनाने “ येसील आमुच्चिया संमंधा ( ओ. ५२ ) ” या शब्दांनी आपण कोण आहोत हे उत्तरेजवळ सूचित केले आहे असे वाटते. यापेक्षा स्पष्टतेने वा सूचकतेने अन्य काही त्याने सांगितले आहे असे दिसत नाही. मुक्तेश्वरी रचनेत अनेक व्यक्तींना पुढील घटना आधीच ज्ञात असल्यासारख्या अनेक ठिकाणी दिसतात हेही ध्यानात ठेवून या प्रसंगाचा विचार करावा. वनपर्वाच्या पाचव्या अध्यायात शाप देताना उर्वशी अर्जुनास म्हणते, “ हारपोनी पुरुषवेख । लागेल स्त्रीवेषाचा कलंक । ‘ बृहन्नडा ’ ऐसें सर्व लोक । नाम तुतें ठेविती ॥ ६१ ॥ कंचुकी नीवी बंधासनीं । मस्तकीं पल्लव पाटी वेणी । ताटंक कर्णीं कर कंकणीं । वर्ष एक वर्तसी ॥ ६२ ॥... ” पुढे लगेच अर्जुनाचे सान्त्वन करताना इंद्र म्हणतो, “ नष्टचर्य येक वरुष । विराटगृहीं घडेल यास । तेथे धरूनियां अंगनावेष । गुप्त असिलें पाहिजे ॥ ६६ ॥.” वनपर्वाच्या अठराव्या अध्यायात यक्ष धर्मास सांगतो, “ अरण्यवास सरला देख । उरलें नष्टचर्येचें वर्ष एक । तें ही क्रमितां दुष्ट लोक । तुम्हां कोणी नेणती ॥ ११६ ॥ होऊनी विराटनगरवासी । नांवें ठेवूनी अनारिसीं । रूपें पालटती आपैसीं । माझेनि वरें वीर हो ॥ ११७ ॥ ” विराटपर्वाच्या प्रारंभी ( अ. १, ओ. १५ ते १८ ) धौम्याने धर्मराजास कोठे व कोणत्या नावांनी रहायचे हे सांगितले आहे. मूळ भारतात ‘ सेवकनीती ’ आहेच. पांडव सेवक म्हणून राहणार आहेत हे ठाऊक झाल्याशिवाय का धौम्याने सेवकनीतीचा उपदेश केला ? यात ‘ अज्ञातवासातील अज्ञातपणाच्या कल्पनेची हेटाळणी ’ होते असे डॉ. नांदापूरकरांना ( पृ. ११३ ) वाटते. पण कृष्ण, द्रुपद इत्यादींना पांडवांच्या अज्ञातवासातील वास्तव्याचा काहीच ठावठिकाणा नव्हता असे कसे व का मानायचे ? धौम्याने तर वनवासात पांडवांना बारा वर्षे अखंड सोबत दिली होती. आपल्यावर लोभ करणाऱ्या

विश्वासाच्या माणसांपासून हे गुप्त राखणे शक्य व इष्ट होते काय? एका अडचणीत सापडल्यानंतर आणि उत्तरेच्या स्वभावाची खात्री पटल्यानंतर अर्जुनाने हे रहस्य तिला सांगितले, म्हणून काही ती डांगोरा हाती घेऊन कौरवांना सांगायला जाणार नव्हती. गोग्रहणाच्या पूर्वी नाही तरी महाभारतातला अर्जुन आपले रहस्य उत्तराला सांगतोच ना? आणि ते योग्य वेळी सांगितले होते असे म्हणावे तर उत्तराने विराटाजवळ आपल्या विजयाविषयी बोलताना मूळ भारतातच अर्जुनासाठी 'देवपुत्र' या शब्दाचा वापर (विराटपर्व, संशोधित प्रत, अ. ६४·१९) कशाला केला? असो.

अर्जुनाने उत्तरेस केलेल्या या रहस्यकथनावर श्री. हरदास पुढीलप्रमाणे आक्षेप घेतात, "मूळ महाभारतात अर्जुन उत्तरगोग्रहणाच्या वेळी प्रत्यक्ष रणक्षेत्रात गेल्यावर एका विशिष्ट प्रसंगी आपण कोण आहोत हे गूढ उत्तराला उलगडून सांगतो. तो ज्या वेळी हे सांगतो त्या वेळी चान्द्रकालगणनेप्रमाणे पांडवांचा अज्ञातवास संपलेला असल्यामुळे त्याच्या त्या सांगण्यापासून काहीही धोका नसतो. त्याऐवजी मुक्तेश्वरांची बृहन्नडा मात्र निष्कारणच उत्तरेला– म्हणजे उत्तराच्या बहिणीला– आपण कोण आहोत हे सांगून मोकळी होते. इतकेच नाही तर अभिमन्यू तुझे पाणिग्रहण करील हेही सांगून टाकते. ज्यातून पुन्हा बारा वर्षांचा वनवास उत्पन्न व्हावयाचा ते हे महान रहस्य आधीच उत्तरेला सांगून टाकण्यात अर्जुनाच्या स्वभावाचे गांभीर्य तर नष्ट झालेच आहे, पण पार्थाच्या दैदीप्यमान शीलाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेले उत्तरा-अभिमन्यूच्या विवाहाचे काव्यही सौंदर्यदृष्ट्या संपलेच आहे. (महाराष्ट्र, नागपूर, १२ सप्टेंबर १९५३)."

या प्रसंगासंबंधी लिहिताना डॉ. नांदापूरकर तर मुक्तेश्वरावर भलतेच भडकले आहेत. त्यांचा हा राग पहा–"या प्रसंगात मुक्तेशांनी फारच फेरफार नि चमत्कार केले. सैरंध्री परत येताच राणी तिला निघून जावयास सांगते. त्यावर सैरंध्री "धीर न धरवे वहिला। तरी जाईन तत्काळ" ४-४-३५ असे मुळाविरुद्ध उत्तर देते. ते अविचाराचे असले

तरी कथानक वाढविण्यास उपयुक्त आहे. यामुळे यांना मुळात नसलेले अनैसर्गिक नि हीन प्रसंग घालावे लागले. राणीस असे बोलल्यावर सैरंध्री ते बृहन्नडेस सांगते. बृहन्नडा उत्तरेस सांगते. उत्तरा राणीस सांगून तिला राहवून घेते. यातील उत्तरेचे सारेच भाषण चमत्कारिक आहे; पण "तीतें बदाल दुष्ट वचन। तरी मी त्यजीन आपुला प्राण। आणिक असेल कारण। तें जाणवेल पुढारें" ४-४-४४ ह्या तिच्या बोलण्यावरून तर बृहन्नडेने तिला आपले गौप्य सांगितले असावे असे वाटते. ह्याने अज्ञातवासाच्या कल्पनेवरच आघात झाला. एवढा अनर्थ सैरंध्रीच्या दुरुत्तराने केला. असो. सैरंध्रीची अशी सोय केल्यावर यांनी बृहन्नडेकडून उत्तरेस भविष्य सांगितले की, तुला अभिमन्यू पती मिळेल, परीक्षिती पुत्र होईल, आणि तो शुकमुखाने जगात भागवत विस्तारील. पांडव भक्त असल्याकारणाने त्रिकालज्ञ आहेत या कल्पनेने हा भाग रचिला. अशा प्रकारे यांनी कथानक लांबविले, पण त्या योगे ते अत्यंत हीन झाले. त्याची सगळी गोडी लोपली, पात्रांचे महत्त्व मालवले, प्रसंगाचे औचित्य उधळले, आणि रसिकतेची राळ उडाली." (मु. म. भारते, पृ. १२७) उतारा थोडा लांबला पण आक्षेपाचे स्वरूप वाचकांना स्पष्टपणे कळावे म्हणून तो घेतला आहे.

आता मुक्तेश्वराने असा बदल का केला याची थोडी कारणमीमांसा करणे आवश्यक आहे. कीचक आणि त्याचे १०५ अनुज यांचा निःपात झाल्यानंतर विराटकुळावर त्याचा काहीच परिणाम न होणे अशक्य होते. सैरंध्रीच्या पायी भावांच्या वधाची ही घटना घडल्याने सुदेष्णा साहजिकच तिच्यावर रागावली आहे. म्हणून ती तिला स्पष्ट म्हणते, "आतां वसों नको येथें। जाई आणिका नगरातें (अ. ४. ३४)". पतींनाही खडसावणारी द्रौपदी आता सुदेष्णेचा अनुनय करण्याच्या मनःस्थितीत नाही. आपल्यावर ओढवलेल्या कीचकोपकीचकांच्या संकटांतून भीम-पराक्रमाने ती मुक्त झाली आहे. अशा स्थितीत दुबळेपणाला उबगलेल्या द्रौपदीने त्राग्याने तिला उत्तर दिले, 'बहुत काळ पैं लोटला। श्वल्प शेष कांहिं उरला। तुतें धीर न वचे धरियेला। तरि जाइन तात्काळि ॥

अ. ४. ३५ " (मुळात 'तेरा दिवस राहिले' असे म्हटले आहे. अ. २३-२७) कीचकवधापूर्वी भीमाकडे जाण्याऐवजी धर्माकडे जाण्याने तिचे जे तेज उणावले होते असे काहींना वाटते त्यांनी ते येथे अशा रीतीने भरून निघाले आहे हे मान्य केले पाहिजे. पण त्यामुळे आणखी एक पेच-प्रसंग निर्माण होऊन पुढचा अल्पावधी गुप्तपणाने कसा निभणार अशा शंकेने वाचक बेचैन होतो.

लगेच नृत्यशाळेत जाऊन द्रौपदीने हा वृत्तान्त बृहन्नळेला सांगितला. बृहन्नळा तिला आश्वासन देते आणि या बाबतीत रदबदली करण्यास उत्तरेस सांगते. पांडवांपैकी दुसऱ्या कोणास हे करता आले नसते. येथे शक्तीचा उपयोग होणार नव्हता. भावांच्या हत्यांनी क्षुब्ध झालेल्या सुदेष्णेच्या मनाचा पीळ येथे नाजुकपणाने सोडवायला हवा होता म्हणून सुदेष्णेच्या कन्याप्रेमाचा उपयोग करून घेण्याचे अर्जुन ठरवतो. विराटाच्या घरच्या सर्व मंडळींत उत्तरा ही बृहन्नळेची शिष्या असल्याने हे नाते प्रभावी वर्चस्व गाजविण्याजोगे होते. या काळात गुरुशिष्यसंबंध हा रक्तसंबंधावर मात करू शकत होता, म्हणून अर्जुनाने, तशात शिक्षणाचा कालही संपत आला होता म्हणून गुरुदक्षिणा मागितली. नकार देणे उत्तरेस अशक्य, आणि उत्तरेची निकरावर येऊ पाहात असलेली इच्छा डावलणे तिच्या आईस अशक्य, म्हणून हा पेच विशेष त्रास न होता सुटला. मग बृहन्नळा उत्तरेस म्हणाली– गुरूचे नाते बाजूस सारून सेवकाच्या भूमिकेवरून म्हणाली, "बुडविलें उपकारसागरिं (अ. ४-४८)." गुरुदक्षिणा मिळाल्याने संतुष्ट झालेल्या अर्जुनाच्या कृपेने गीतनृत्यकलेत उत्तरा शारदेप्रमाणे निपुण झाली. मग प्रार्थनेच्या सुरात गुरूकडे वर मागून ती विचारते, "मतें (मातें) कवण प्राणेश्वरु ? (४. ५०)" अर्जुन पुढील भविष्य सांगतो ते अभिमन्यु–उत्तराविवाह, परीक्षितिजन्म आणि त्याचे शुकमुखाने भागवत-श्रवण इतक्या गोष्टींचे. वर मागण्याची व देण्याची ही हकीकत गुरुशिष्या या नात्यामुळे सांगावी असे मुक्तेश्वराला वाटले असले पाहिजे. शिवाय क्षणभर सहवासात येणाऱ्या उत्तरापेक्षा वर्षभर सतत शिष्या म्हणून जवळ वावरणाऱ्या उत्तरेला अर्जुनाने आधी विश्वासात घेणे औचित्यास सोडून आहे असे

कसे म्हणावयाचे ? पुढे " उत्तरा द्यावि अर्जुनातें । हा संकल्प बहु काळ मातें ( अ. ७. ९० ) " असे सांगून विराट विज्ञापना करतो त्या वेळी " उत्तरा माझी सिष्यिण खरी । विद्या सिकविली ते कुमारी । भार्या न करुनि गुणसुंदरी । स्नुषा करिन आवडि ( अ. ७-९२ ) " असे अर्जुन सांगतो, त्याची पार्श्वभूमी मुक्तेश्वराने येथे निर्माण करून ठेवली आहे. पण यामुळे उत्तरा–अभिमन्यूच्या विवाहाचे काव्य सौंदर्यदृष्ट्या सरले की वाढले ? द्रौपदीचे तेज उणावले की बळावले ? नव्या पेचाने नि त्याच्या उकलीने प्रसंग फिकटले की रंगले ?

**गोग्रहणाचा उद्देश**— गोग्रहणाच्या पाठीमागेही पांडवशोध घेण्याचा कौरवांचा उद्देश मुक्तेश्वराने दर्शविला आहे, त्याला मुळात आधार नाही. पांडव त्या ठिकाणी असावेत असा कौरवांना संशय आला असला तरी गंधर्वांकडून कीचक मारला गेल्याने आता मागील अपमानाचा विराटावर सूड घेण्याची संधी मिळेल असे त्रिगर्ताधिपती सुशर्म्याला वाटत असल्यानेच हा गोग्रहणाचा बेत आखला जातो. पण मुक्तेश्वराच्या सुशर्म्याला अर्जुनाव्यतिरिक्त पाचांचा ( चार बंधू व द्रौपदी ) नावनिशीवार पत्ता लागला आहे तो कसा हे स्पष्ट झालेले नाही. कथाकल्पतरूत 'ते पांडवच' असा निर्धार मधुकराच्या शकुनीने ( ९-११-५ व ६ ) व्यक्तविला आहे. त्याचप्रमाणे सुशर्मा व विराट यांचे युद्ध चालू असता 'सुशर्मा विराटासि ह्मणे । आमुचें कर्तृत्व कोणी न जाणे । पांडव कराया ठाउके । आह्मीं हरिलीं गोधनें ॥ ३४ ॥ ( उत्तरार्ध, स्त. ९, अ. ११ ) ". यावरून पांडवशोधाचा उद्देश धरूनच आपण गोहरणाचा उपक्रम केल्याचे सुशर्मा विराटास स्पष्टपणे सांगत असल्याचे दिसून येते. हरि वामनाच्या विराटपर्वात एका वार्तिकाला पांडवांचा संशय आला आहे ( अ. ४ ) आणि मग शकुनी दुर्योधनास म्हणतो—

" आतां जाउनियां बळें निजदळें राया ! विराटास रे !
देतां त्रास, समस्त पांडव तुझ्या येतील स्पष्टास रे ! ॥ ८ ॥ अ. ५."

'पांडवप्रतापा'त श्रीधरानेही पांडवशोधासाठीच कौरव गोग्रहणास प्रवृत्त झाल्याचे सांगितले आहे. गंधर्वांनी कीचकास मारल्याची दूतांकडून

समजलेली वार्ता ऐकून ते पांडव असावेत असे दुर्योधन म्हणतो; शिवाय भीष्माने सांगितलेली चिन्हेही त्यांना विराटदेशात दिसली आहेत (अ. २७). तेव्हा मुक्तेश्वराप्रमाणे मधुकर, हरि वामन, व श्रीधर हे तिघेही गोग्रहणा· मागे पांडवशोधाचा उद्देश दाखवितात. कन्नड कवी पंपाच्या भारतात पांडव विराटपुरीत असले पाहिजेत असा दुर्योधनाचा तर्क असून "विराटाच्या गाई आपण पळवू, मग पांडव स्वस्थ राहतील ?" असा दुर्योधनाचा प्रश्न आहे (आश्वास ८). कुमार व्यासाच्या विराटपर्वात कीचक व मल्ल यांच्या वधामुळे पांडव विराटनगरीत असावेत असा आपला कयास दुर्योधन मंत्र्यांना निवेदीत आहे. गोग्रहण केल्यास गोमुक्ततेसाठी पांडव प्रकट होतील व मग त्यांना पुन्हा तेरा वर्षे वनवास–अज्ञातवासास पाठवावे असा तेथे दुर्योधनाचा मानस आहे (संधी ५). या साऱ्यांना अशा प्रकारची महाभारताची एखादी दाक्षिणात्य प्रत उपलब्ध असावी.

विराटावरच्या या संकटात त्याच्या आश्रयाला असलेल्या पांडवांनी आपणहून मदतीचा हात पुढे करण्याने व चौघांसाठी (अर्जुन वगळून) धर्माकडून रथाची मागणी पुढे आल्याने पांडवांच्या— विशेषतः धर्माच्या स्वभावाला येथे अधिक तेज व उठाव मिळाले आहेत हरि वामनाचा कंक विराटास अशीच विनंती करतो (अ. ५). अवधी संपण्याचा वा न संपण्याचा विचार न करता कुमारव्यासाचा धर्मही विराटास साहाय्य करण्यास उद्युक्त झाला आहे. धर्माच्या या मागणीला संस्कृत भारताच्या एका दक्षिणी प्रतीत आधार मिळतो तो असा—

'रथेषु युज्यमानेषु कङ्को राजानमब्रवीत् ।
मयाप्यस्त्रं चतुर्मार्गमवाप्तमृषिसत्तमात् ।
दंशितो रथमास्थाय पदं निर्याम्यहं गवाम् ।
अयं च बलवाञ्छूरो वल्लो दृश्यतेऽनघ ।
गोसंख्यमश्वबन्धं च रथेषु समयोजय ।
नैते न जातु युध्येयुर्गवार्थमिति मे मतिः ।'

(विराटपर्व, संशोधित प्रत, पृ. १३६, तळटीप ५५९).

**विराटानें मारलेले फासे**—उत्तरविजयाने शेफारलेल्या विराटास धर्म छेडतो. त्याचा विराटास राग येतो. मुळात विराटाने धर्माच्या मुखावरच फासे मारले आहेत. मुक्तेश्वरात विराटाचा राग वर्णिला आहे, धर्माच्या कपाळास फासे लागून रक्तही आले आहे, पण विराटाने फासे जमिनीवर आपटल्या नंतर ते 'उसळोनि लागले धर्माभाळिं ( अ. ६. १६८ )' असे वर्णिल्याने विराटाचा धर्मावरील प्रत्यक्ष हल्ला चुकविलेला आहे. विष्णुदास नामाच्या विराटपर्वांतील याच प्रसंगाचे, दोन भिन्न प्रतींतील उतारे महाराष्ट्र-सारस्वत कार भाव्यांनी दिले आहेत. त्यांतील दुसऱ्या उताऱ्यातील[14] काही भाग असा—"वैराट कंकभटासी म्हणे: आम्हीं गेलों होतों दक्षीणें: उतरु दुर्योधनातें जीणें: सात क्ष्यौणी सैन्यासी ॥ यावरी कंकभट्ट बोलीले: तुम्ही सुसर्मा यातें जींकीलें: तैशे ची उतर दुर्योधनातें जींकीलें: काये नवल असे ॥ यैसे वैराटे आईकीले: तें जीवीं लागलें: फासे हांतीचे टाकीले: ते उसलुनी कपाळी बैसले: कंकभटाचीया ॥ तेणे कपाळ फुटलें: तेथें असुध नीघालें: ते सेळंद्रीया काय केलें: कचोळे वोडविलें: भुमीला असुध पडेल म्हणोनिया।" या उताऱ्याशी मुक्तेश्वरी रचनेचे पुष्कळच साम्य आहे. कथाकल्पतरूत हा प्रसंग मधुकर कवीने जवळजवळ असाच चित्रिला आहे—

"जवळी बाहूनि कंकभट। तयासि सांगे वैराट[15]।

---

१४. महाराष्ट्र–सारस्वत, आवृत्ती चवथी, पृ. २८७.

१५. मधुकराच्या या ओव्यांत १, २ व ४ अशा चरणांत यमक असून तिसरा चरण निर्यमक आहे. ओवी-रचनेचा हा एक वेगळाच प्रकार आहे. यासंबंधी खुद्द कवी लिहितो— "झाडकवी मुद्रा पाडोनी। आरण्य विराट पर्वे दोनी। कथिलीं महाराष्ट्रभाषा। सारासार उद्धरोनी॥ (स्त. ९, अ. १२, ओ. ११२)". पुन्हा १३ व्या अध्यायाच्या प्रारंभी तो म्हणतो, "येथोनि नाहीं झाडकवी। तेरा वरुषें भोगिलीं पांडवीं। आतां औटचरणी ओंवी। ऐकें उद्यमार्थी॥ ३ ॥." नवव्या स्तबकात अ. ४ ते १२ अशा नऊ अध्यायांत ( पांडव कष्ट भोगत होते म्हणून ? ) ही 'झाडकवी मुद्रा' मधुकराने पाडिली आहे. 'झाड' या शब्दाने कवीला काय सुचवायचे आहे ते स्पष्ट नाही. आणखी एका ठिकाणी त्याने 'झाडकवी प्रयोजन' ( स्त. ९, अ. ७–१२६ ) असा उल्लेख केला आहे.

समरीं जिंकिला दुर्योधन । पाहें मम पुत्राचा लाट ॥ ७६ ॥
कंकभटें तें जाणोनि कारण । बोलिला विराटाति वचन ।
जैसा जिंकिला आपण सुशर्मा । तैसेंचि उत्तराचें जैतपण ॥ ७७ ॥
ऐसा मर्मभेद ऐकोनी । मत्स्य क्रोधें खवळला मनीं ।
म्हणे चाटाई मांडिली ब्राह्मणें । पाहें नेत्र उपडोनी ॥ ७८ ॥
आवेशें कंपायमान जाहला । पुढें सारीचा पट देखिला ।
हात घालेनि घेतले फांसे । तेणें चौरंग त्राहाटिला ॥ ७९ ॥
फांसा उसळोनि नेहटीं । बैसला कंकाचे ललाटीं ।
तेणें सुटली रक्तधारा । सैरंध्री देखे बरवंटी ॥ ८० ॥
(उत्तरार्ध, स्त. ९, अ. १२)

मुक्तेश्वराच्या विराटाने ‘ पाश भूमीके पीटीले ( ६·१६७ )’, विष्णुदास नामाच्या ‘ वैराटा ’ने ‘ फासे हातीचे टाकीले ( ते कोठून उसळले हे स्पष्ट नाही ), तर मधुकराच्या ‘ वैराटा ’ने ‘ हात घालोनि घेतले फांसे । तेणें चौरंग त्राहाटिला ’. मधुकराच्या या चौरंगाला महाराष्ट्र-सारस्वत-कारांनी विष्णुदास नामाच्या दिलेल्या पहिल्या उताऱ्यात ( पृ. २८६ ) थोडा आधार आहे—“ ऐसें उत्तर धर्में केलें । तें जिव्हारीं लागलें । ने व्हेळीं हातीचे फासे टाकिले । रायें कोपें बहुते ॥६६॥ ते फासे पाटावरि पडिले । तेथौनि उसळले । ते लागले कपाळीं । धर्माचिये ॥ ६७ ॥ ”. येथल्या ‘ पाटा ’ऐवजी विष्णुदास नामा ‘ चौरंग ’ म्हणतो. एरवी शान्त असणारा व मर्मभेद न करणारा धर्म अर्जुनाच्या पराक्रमाने मनातून अतिशय सुखावला होता म्हणूनच त्याच्या तोंडून असे उद्गार बाहेर पडलेले दिसतात.

**समारोप**—वर चर्चिलेल्या स्थळांशिवाय आणखी काही फेरबदल मुक्तेश्वराने केले आहेत. मुक्तेश्वरी विराटपर्वाच्या संहितानिश्चितीनंतर त्यांचा विचार करता येईल. आज काही स्थळे ( उदा.–रणक्षेत्रावरील अर्जुन–उत्तर–संवाद, अ. ६ ) संदिग्ध व असमाधानकारक आहेत. म्हणून अशा

व इतर बारीकसारीक प्रसंगांविषयी आताच ऊहापोह करणे फायद्याचे ठरणार नाही.

मुक्तेश्वर हा महाराष्ट्राचा एक फार मोठा कवी आहे. डॉ. नांदापूरकरांनी आपल्या प्रबंधात त्याच्यावर फार मोठा अन्याय केला आहे. म्हणून टीका करताना मुक्तेश्वराच्यासंबंधात कोणते धोरण स्वीकारले पाहिजे याचे थोडे दिग्दर्शन केले आहे. त्याच्या चरित्रासंबंधी व चारित्र्यासंबंधी काही अपसमज पसरले आहेत. ते प्रस्तुत संग्रहातील दोन्ही लेखांच्या आधारे दूर व्हावेत अशी अपेक्षा आहे.

मूळ महाभारतच आदर्श मानावयाचे असल्यास भाषान्तरापेक्षा वेगळी खटपट करण्याचे कारण नाही. तसली खटपट मुक्तेश्वरासारख्या तेजस्वी प्रतिभेच्या कवीला कटकटच वाटणार. अज्ञातवासात उघडकीला आल्यास फिरून तेरा वर्षांच्या दिव्यातून जावे लागेल अशा भयाची टांगती तलवार डोक्यावर लटकत असताही पांडव कचरले नाहीत, दुष्टांना शासन करताना त्यांनी माघार घेतली नाही, आधुनिक भारतीय स्वातंत्र्यसंगरातील भूमिगतांप्रमाणे उघड्या गुप्ततेने ते वावरले असाच ठसा मुक्तेश्वरी विराट-पर्वाच्या वाचनाने मनावर उमटतो यात शंका नाही. ही जितकी पांडवांची कथा आहे तितकीच शिवाजीपूर्व स्वातंत्र्योन्मुख महाराष्ट्राची कथा आहे. 'महाराष्ट्र जे सर्व राष्ट्रासि राजे' (रामायण, युद्धकांड, ४६९) त्याला सदैव आवडणारी ही वीरकथा आहे. अद्‌भुताचे पिसे लागलेल्या वेड्याने काळावर मात करण्यासाठी त्या काळात पाहिलेले हे एक गोड स्वप्न आहे!

◊ ◊ ◊

# व्यक्तिनामसूची

(या सूचीत पौराणिक व्यक्तींचा अंतर्भाव केलेला नाही. नावापुढील आकडा पृष्ठांकाचा.)


अत्रे मुधाजी बापूजी ६०
अमरापूरकर शास्त्री सदाशिव बजाबा ९९
अमृतराय २३
अवचित ५४
अवचितसुत काशी ५४
अज्ञानसिद्ध नागेश १०३
आकाणा गोसावी ४१
आजगावकर ज. र. ३१, ५८, ६०, ६१, १००, १०१, १०४
आत्मारामबुवा १३५
आपटे द. वि. ५९
आबाजी ४१–४३
आवळीकर पंडित १४४, १४५, १५०, १५२, १५४–१५६, १५८, १६०–१६२
उद्धव चिद्घन १०१
ऋषभदेव १७१
एकनाथ (एका जनार्दन, नाथ) ३–१२, १४, १५, २१, २३, ३३, ३५, ३६, ३८, ३९, ४१, ४२, ४४–५०, ६१, ६२, ७८, ७९, ८१–८४, ८७, ८८, ९५, १०१–१०४, १४८.
एकनाथ बिन बाजी नाईक ४१–४३
एकसंबेकरशास्त्री भाऊसाहेब ७९
ओक दा. के. (काव्यसंग्रहकार) ४, ९, १६९
कदम ता. रा. १००
कानोले वि. अं. ७८
कालगावकर आचार्य कृ. वि. १५३, १५४
कालिदास २
काशी ५४
कुकजी (कुंदाजी, कुब्जाबावा) १५३
कुमार व्यास (कन्नड कवी) १५१, १७४, १८५
कुलकर्णी आऊजी ५५
कुलकर्णी ल. रा. ५१
कृष्ण क्लेशहरण (कृष्णदास, कृष्णाप्पा) १३२, १३८, १४०, १५२–१५६, १६०
कृष्णदास जयराम १३२
कृष्णमिश्र यती ९९, १०७

कृष्ण याज्ञवल्की १६४
कृष्ण संतापा १६१
कृष्णा १६१
कृष्णाजी नापिक १३५
केशव ४४
कोलते वि. भि. ५३
खरशीकरशास्त्री १५०, १५१, १५४
खांडेकर का. वा. १००
गावबा ७८, ७९
गुरुनाथ १६१
गोगटे गो. रा. ३९
गोदा ४४, ४५
गोपिकाबाई १६५
गौतम बुद्ध १६९
गंगराज सेनापती १७१
गंगा – गंगाबाई ४१, ४४, ४५, ५६
गंगाधर ५३
चतुर्दश विद्या पारंगत १३५, १३७, १४१
चंद्रात्मज रुद्र १५१
चन्न बसवेश्वर १५१, १५२
चन्न मल्लिकार्जुन १३५, १३८, १४०
चन्न सदाशिव १३५, १३७, १४१
चरंती गंगाधर १३४, १३५, १३८, १४०
चल्दुर शान्त १३५, १३८, १४०
चांदोरकर गो. का. १५०, १५५
चिंतामणिसुतु मुद्गल ५७
चिंतामणी ( चिंतोपंत ) ३२, ३३, ३७, ४०, ४३, ४५, ५५–५७
जनार्दन ३३, ३८, ४९, ५०, ६१, ७९, ८१–८३
जनी जनार्दन २५
जयरामपंत १३५
जयरामस्वामी वडगावकर ( जयराम ) १३१, १३२, १३५, १३८, १४०, १५३, १५५, १५८, १६०
जयरामात्मज ७८
जानकी ( नागेशाची आई ) ५४
जानकी ( बहिणाबाईची आई ) ५५
जिनसागर १७२
जैमिनी ६२, ६४, ६८, ६९, ७०, ७७
जोशी ना. ब. १८, १४७, १४८
जोशी मोर ५४
जोशी व. स. ७८
जोहरापूरकर विद्याधर १७२, १७३
टीपकार ६७
टेंभेस्वामी ( वासुदेवानंद सरस्वती ) ३४
ढेरे रा. चिं. १४८, १५९
ढोणे वैरागकर अण्णा १४५
तुकाराम ३
तुळपुळे शं. गो. ९९, १०४
त्रिंबक ५४

त्र्यंबक ५४
दशरथ १६१
दांडेकर वि. पां. १००
दाते शं. ग. १००
दादाजी कोंडदेव ५९
दादोबा पांडुरंग १४
दासोपंत ३३, १०१
दुंडगेकर ६१
देव ( समर्थभक्त ) शंकरराव ६४, १५५
देवराव ५३
देशपांडे य. खु. १५१
धर्मइंद्र १३४, १३७, १४१
धातुर्वादी १३५, १३७, १४०
धोपेश्वरकर वि. बा. ५२
नरसिंह सरस्वती ७८, ७९
नरेन्द्र २८, ५८
नाईक भाऊसाहेब ६०, ६१
नागकवी ३१
नागनाथ ५३
नागेश ३, ८, ९, १२, १४-३१, ५४, १०२
नांदापूरकर ना. गो. १६४,१६८, १७३, १७६-१७८, १८०-१८२, १८८.
नामदेव १०१
नामा विष्णुदास १६३, १८६, १८७
नारायण १६१
नारोबा १६१
निजगुण शिवयोगी १४४, १४५, १४७-१५१.
निरंजन ४१-४३, ४५
निरंजन स्वामी १३५, १३८, १४०, १६०
निराहारी सिद्ध १३५, १३८ १४०
निवृत्ती ( निवृत्तिनाथ ) ३४, ४५
नीळकंठ काशीपती १३५, १३८, १४०, १५९
नेने ह. ना. १०२, १६३
पदडीकान्ती १३५, १३८, १४०
परमानंदतीर्थ १४८
पांगारकर ल. रा. ३१, ३४, ३७, ६४, १५०, १५१, १७८
पाटील म. पु. १५१
पाटील राजमाने नऱ्होजी बिन चणगवंडा १५६
पाठक ५५
पाठक नामा ६२–७७, १०३
पार्श्वनाथ १७३
पावटे दा. चिं. १४४, १४७
पुरुषोत्तम आप्पा १६१
पूर्णबोध १३४, १३५, १३८
पेशवे सवाई माधवराव १६५
पोचव्वा १७१
पोतदार द. वा. ४८, ६२, ६३, ६५, १४४

पंगू द. सी. ३, ४, ९, ११, १४–१८, २०, २२–२७, २९, ३०, ४८, १६४, १६५, १६७–१७०
पंडिताराध्य १३४, १३७, १४१
पंप ( कन्नड कवी ) १७४, १८५
प्रियोळकर अ. का. १४, ३२–३५, ३७, ३९, ४०, ४३, ४५, ४८–५२, ५६–५८, ६०
फडणीस जगन्नाथराव ७९
बकूबाई ४१, ४२
बसवलिंग (बस्वलिंग) १३४–१३६, १३८, १४०
बसवेश्वर १३५, १३७, १४१
बसवेश्वर ( लिंगायतपंथप्रवर्तक )१५१
बहिणाबाई ५५
बाजी नाईक ४१
बापटशास्त्री रावजी बापूजी १००
बामणगावकर १५४
बाळकृष्ण ६१
बाळकृष्ण आप्पा १६१
बोळ मल्लिकार्जुन १३५, १३७, १४१
भाऊराव तेरवाडकर ४२
भागीरथी १३६, १३८, १६०
भावे वा. कृ. ३१
भावे वि. ल. ३१, ६४, १५०–१५२, १५४, १५६, १८६, १८७
भाळलोचन १३५, १३७, १४१
भिडे बा. अ. ३२, ३६, ३७, ४८, ५०
भीमस्वामी ३८, ३९, ४२, ४५, ५१
भुजंगपंत ४१
भुजंगबुवा १६१
मडिवाळ देवरु १३९, १४०
मधुकर १६३, १७४, १७८, १८४–१८७
मरळसिद्ध १३४, १३७, १४१
मल्लिकार्जुनशास्त्री १४५, १४८
मल्हारी ५४
महादेव १६१
महादेवस्वामी १५५
महीपती ४४, १३५
माधव ( माधवस्वामी ) ४४, ९९
माधवाचार्य ९९
माळवाड १४७
मिराशी वा. वि. ५१
मुक्तमुनी १३४, १३७, १४१
मुक्ता ४५
मुक्तेश्वर ३, ११–१४, १६–१८, २१, २३, २५, ३२–६१, ६६, ७८, ७९, १०१, १०२, १६३–१८८.
मुक्तेश्वरबुवा ४१–४३.
मुद्गल ५५, ५६, ५८, ५९
मुद्गल कृष्णदास ५८

मुद्गल कृष्णाजी ५९
मुद्गल गोविंद ५९
मुद्गल गंगाजी ५९
मुद्गल चिंतामणिसुत ३२, ३३, ३७, ५६
मुद्गल चिंतामणी ५७
मुद्गल चिमणाजी ५९
मुद्गल द. ब. ५८
मुद्गल दादाजी ५९
मुद्गल बापूजी ५९
मुद्गल माणकेश्वर ५९
मुद्गल श्यामजी ५९, ६०
मुधाजी बापूजी ५९, ६०
मुधोळकर रंगाचार्य १४४
मोडक ज. बा. १५३
मोर जोशी ३१
मोरोपंत ३
मोरोबा पराडकर १६३
यशवंतराव कोकाटे ३१
येकोराम १३४, १३७, १४१
रघुनाथ (राघोबा) ४७, ४८
रघुवीर १६८, १७३
राऊत मा. दौ. १००
राजकृष्ण जैन १७१
राजवाडे ४२, १०२
रामदास ६, १२, ५६, १०१, १३१, १३५
राव १४८, १४९
रुकडीकर बाबूराव ६२
रुद्रमुनीन्द्र १३४, १३७, १४१
रेवण सिद्ध १३४, १३७, १४१
रेवणाचार्य १३५, १३७, १४१
लक्ष्मण १६१
लिंगराज १४४
लीला (लीलाबाई) ३३, ३९, ४१, ४३, ४५, ५६
लीला विश्वंभर (विश्वंभर) ३२, ३३, ३५–४५, ४९, ५६, ५७, ७९, १६५
वाटवे के. ना. २
वामन पंडित १९, २०, २६, १०२
वासुदेवानंद सरस्वती–टेंभे स्वामी पहा
विठ्ठल कृष्ण ६१
विठ्ठलपंत ४५
विठ्ठल बीडकर १–२१, ५४, १०२
विद्यापारंगत १३५, १३८, १४०
विष्णुवर्धन १७१
विश्वरूपदेव १३४, १३८, १४०
विश्वंभर–लीलाविश्वंभर पहा
विश्वंभर एकनाथ ४१–४३
विश्वंभर भाऊराव ४२
विश्वंभर स्वामी (श्रीविश्वंभरबोवा) ६०, ६१
वेणाबाई १९, २०, २५–२८, १०२
वेदान्तदेशिक ९९
शान्त दशरथ १३१-१३६, १३९, १४०, १५८-१६१

शान्त बाबूराव ऊर्फ धोंडो दशरथ ७९, ८०, १३०, १३६, १५८, १६१
शान्तबोध १३५, १३८, १४०, १५९
शान्तमूर्ती १३५, १३८, १५९
शान्तमूर्ती सोमेश्वर १३४, १३८, १४०
शान्तलिंग (सातापा) १३५, १३६, १३८, १४०, १५९-१६१
शान्तलिंगापा १३१, १४४-१६२
शान्त सोमेश्वर १३५
शान्तेश्वर १३५, १३८, १४०, १५९
शाहिस्तेखान ३१, ५९
शिंगळ सिद्ध १३५, १३८, १४०
शिव छत्रपती (कोल्हापूर) ४२, ४३
शिवराय ५९
शिवदास गोमा ४४, ४७, ५८, ५९
शंकर १६१
शंकराचार्य १३१
श्रीकृष्ण क्लेशहरण (कृष्णाप्पा १३५
श्रीधर ७०, १८४, १८५
श्रीनाथदास १००, १०१
श्रीनारायणदास १०१
श्रीपातिदास १०१, १०२, १०५-१०८
श्रीपती १००, १०१
श्रीपती (रत्नमाळाकर्ता) १०४
श्रीपाद १६१
श्रीहरि (री) दास १००, १०१
श्रीहर्ष ९९
षडगदगी १३५, १३७, १४१
समाधिसिद्ध १३५, १३८, १४०
समाधिसोमेश्वर १३४, १३७, १४१
सरदेसाई गो. स. १६५
सरस्वती गंगाधर ५३, १५१
सर्वज्ञमित्र १६९
साखरे ५३
सामराज ५, २२, ३०
सायंदेव ५३
सुखबोध १३१, १३३-१३६, १४३, १६०
सुखबोध (वरीलहून भिन्न) १३५, १३८, १४०
सुगत १६९
सुरूरकर बहिरो बाबाजी ५९
सोपान ४५
सोळंखी ५४
संतोषमुनी कृष्णदास १८, २५
हरदास बाळशास्त्री १७६, १७७, १८१
हरिपंडित ४७, ४८
हरि वामन १७४, १७८, १८४
हलसीकर गणेश गोविंद ८०
हुल्लिकान्ती चंनवीर १३५, १३८, १४०
हुल्लिकान्ती सोमेश्वर १३४, १३८, १४०
क्षीरसागर ५४
ज्ञानदेव (ज्ञानेश्वर) ३, ३४, ४५, १०२, १०४, १६७

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ८ | खालून २ | श्रीशकरें | श्रीशंकरें |
| ३५ | ३ | नाही | नाही. |
| ४५ | खालून ७ | असते | असे |
| ५६ | खालून ११ | आाश्चर्य | आश्चर्य |
| ५८ | ६ | आकणा | आंकणां |
| ६४ | शेवटची | ११९ | अ. ११९ |
| ७२ | १३ | दुंतोंडीयासी | दुतोंडीयासी |
| ७२ | १७ | त्यामांजी | त्यामाजी |
| ८९ | ३ | करों | करीं |
| ८९ | खालून १३ | सर्वांतरात्म | सर्वांतरात्मा |
| ९१ | खालून २ | सुंगंध० | सुगंध० |
| ९२ | शेवटची | पदांतींचे | पदार्तींचे |
| ९३ | १० | बर्बचरदेस | बर्बरदेस |
| ९६ | १० | सपलि | संपलि |
| ९९ | ७ | आढळून | आढळून[1] |
| १०५ | ३ | ईती | ‘ ईती |
| १०५ | खालून ३ तळटीपेत | Cata logue | Catalogue |
| १०७ | ३ | अंसे | असे |
| ११४ | खालून ६ | म्हंणाली | म्हणाली |
| १३८ | खालून ७ | सकेश्वरीं | संकेश्वरीं |
| १४९ | ७ | नाहा | नाही |
| १५४ | खालून ९ | निणायक | निर्णायक |

| | | | |
|---|---|---|---|
| १६१ | ४ | विवेकं० | विवेक० |
| १६१ | ५ | मथळ्याखांली | मथळ्याखाली |
| १६१ | वंशावळीत | पुरुबात्तम० | पुरुषोत्तम० |
| १६५ | ११ | जैसा | ' जैसा |
| १७४ | ५ | हाव्या | सहाव्या |
| १८२ | २ | राणीसं | राणीस |
| १८२ | खालून ४ | कीचकोपंकीचकांच्या | कीचकोपकीचकांच्या |
| १८७ | खालून १० | ह तीचे | हातीचे |

ग्रं. क्र. १५८९२
REFBK-0015912



प्राचीन मराठी कवी आणि काव्य यांविषयी लिहिलेल्या आठ संशोधनपर लेखांचा 'संशोधनधारे'त समावेश आहे. या संशोधनपर निबंधांचे लेखक प्रा. **पां. ना. कुलकर्णी** यांचा प्राचीन मराठी साहित्याचे संशोधन हा एक मनःपूर्वक छंद. या छंदातूनच प्रस्तुत संग्रहाची ही निर्मिती.

प्रा. पां. ना. कुलकर्णी हे मुंबई विद्यापीठाचे एम्. ए. असून त्यांना बी. ए. (ऑनर्स) ला तर्खडकर सुवर्ण पारितोषिक मिळालेले आहे. धारवाड, नागपूर व औरंगाबाद येथे काही वर्षे अध्यापन केल्यानंतर सांप्रत ते कोल्हापूरला राजाराम कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य करीत आहेत.

आपले अध्यापनाचे कार्य सांभाळून वाङ्मयसंशोधनाच्या छंदाकडे ते आस्थेने लक्ष पुरवीत आले आहेत त्यांची संशोधकाची भूमिका अभिनिवेषी नाही की सांप्रदायीही नाही. शोध आणि बोध अशा जिज्ञासू वृत्तीतून प्राचीन काव्याचे ते संशोधन करीत आले आहेत. शोधाशोधी, संशुद्धी, आणि साधार माहिती अशी त्यांच्या संशोधनसंपादनाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

विठ्ठल बीडकराचे सीतास्वयंवर, मुक्तेश्वरचरित्र, नामा पाठकाचे अश्वमेधपर्व, मुक्तेश्वर विराटपर्व, भावार्थरामायण आदी विषयांची प्रस्तुत ग्रंथातील चर्चा अभ्यासकांना मार्गदर्शक ठरावी.

**व्हीनस प्रकाशन**

*'तपश्चर्या'*

३८१ क, शनिवार पेठ : पुणे २